म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. क्र. ११८३

सन १९५८

# अमेरिका

## एक प्रबंध

REFBK-0009774

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... किं ....................
क्रमांक ...................... नों: दि: ....................

## प्रस्तावना

अमेरिकेबद्दल बोलतांना अर्थातच मला सामान्यपणें 'युनायटेड स्टेट्स' म्हणून संबोधला जाणारा खुद्द अमेरिका देश अभिप्रेत आहे. या देशांतील लोकांना 'अमेरिकन लोक' ही एकच संज्ञा आहे. त्या खंडांतील इतर देशांना आणि तेथील लोकांना स्वतंत्र नांवें आहेत.

माझ्या एकूण सहा महिन्यांच्या प्रवासांत अमेरिकेबद्दल माझ्या मनावर जे विविध ठसे उमटले त्यांचा मीं अधिक स्पष्टपणें आणि सुसूत्र विचार करण्याचा प्रयत्न केला. अभ्यासासाठींच काढलेला हा दौरा होता आणि या दौऱ्यांत मीं जीं टिपणें काढलीं त्यांना आतां एका प्रबंधाचें स्वरूप आलें आहे.

माझा हा वैयक्तिक प्रयत्न कुणाला अगदींच तोकडा आणि बिनमहत्त्वाचा वाटेल. पण 'अमेरिका' म्हणजे काय हें विशद करून सांगण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर अपरिहार्यपणें एक विशिष्ट जबाबदारी येऊन पडते. ही 'जबाबदारी' नैतिक, राजकीय, सामाजिक आणि केवळ व्यावहारिक स्वरूपाची असते. केवळ

निसर्गसौंदर्याचा आस्वाद लुटण्यासाठीं, जगांतल्या कटकटींपासून कांहीं काळ तरी मुक्त होण्यासाठीं, सृष्टीचें अभिनव आणि भव्य स्वरूप पाहून थक्क होऊन जाण्यासाठीं स्पेनसारख्या देशांत किंवा उत्तरध्रुव प्रदेशांत सफर करणें वेगळें, आणि अमेरिकेचा प्रवास करणें वेगळें.

नायगारा धबधबा किंवा ग्रँड कॅन्यॉन दरी यांच्या रौद्रसुंदर भव्यतेनें आपलें अंतःकरण हेलावून टाकलें आणि त्या दृश्यांच्या स्मरणानें कांहीं काळ झोपसुद्धां हिरावून घेतली तरी अमेरिकेसंबंधीं जो मुख्य ठसा आपल्या मनावर खोलवर उमटतो तो अगदीं वेगळाच असतो. कोलोराडोमधील चकित करून सोडणारीं निसर्गदृश्यें, सान फ्रान्सिस्को किंवा न्यू ऑर्लिन्सच्या कांहीं भागांचें अनुपम सौंदर्य अत्यंत मनोज्ञ असलें तरी त्यांमुळें कांहीं आपलें अमेरिकेसंबंधींचें मत बनत नाहीं. अमेरिका म्हटल्याबरोबर सबंध मानवजातीच्याच भवितव्याचा विचार मनांत उभा राहतो. अनेक राज्यांचें मिळून बनलेलें तें एक संयुक्त संघराज्य आहे. अनेक प्राचीन राष्ट्रांचा तेथें मनोहर संगम झाला आहे. तेथील अर्थ-व्यवस्थेचा विस्तार खंडप्राय आहे. मति गुंग करून सोडणारी तंत्रज्ञानाची प्रगति, सर्वसामान्य जनतेचें आश्चर्य वाटण्याइतकें समृद्ध जीवनमान, वैयक्तिक आणि सामूहिक जीवनांतल्या असंख्य समस्या ह्या सर्व गोष्टी या खऱ्याखुऱ्या नवसमाजांत अंतर्भूत आहेत आणि त्यांचाच मनावर फार परिणाम घडून येतो. अमेरिकेला आजचें स्वरूप कसें प्राप्त झालें आणि इतर जगाच्या भवितव्याच्या दृष्टीनें अमेरिकेंतल्या घडामोडींचें महत्त्व काय हा प्रश्न मनासमोर उभा राहतो.

आजचे संघर्ष, प्रवृत्ति, विसंगति, अडचणी आणि आशा, आपल्या सुप्त शक्ति या साऱ्यांचें अधिक यथार्थ दर्शन घडविल्याबद्दल अमेरिकेविषयीं माझ्या मनांत कृतज्ञतेची भावना आहे. आधुनिक जगाच्या संदर्भात आपण नेमके कुठें आहोंत हें समजण्यासाठ अमेरिकेंतील प्रवासाचा फार उपयोग होतो. यापुढें आपल्याला समृद्ध जीवन जगायचें असेल, नवनवीन विचार व कलाकृति निर्माण

करायच्या असतील तर आपण सध्यांच्या औद्योगिक संस्कृतीशीं, अणुयुगाशीं निर्भयपणें समरस झालें पाहिजे. तसें केलें तरच आपल्याला भविष्यकाळांत प्रगतीची आशा आहे. अमेरिकेंत प्रवास केल्यानें आणि अमेरिकन जीवनाचें व संस्कृतीचें निरीक्षण केल्यानें आपल्या अंतर्मनाचीं अज्ञात क्षितिजें खुलीं होतात, मानवी जीवनाचें भवितव्य किती उज्ज्वल आहे याचा साक्षात्कार होतो. आणि मला वाटतें कीं अमेरिकेच्या प्रवासाचें हेंच सर्वांत मोठें श्रेय आहे. उद्यांच्या जगाचें हें ओझरतें दर्शन तुम्हांला भयचकित करून सोडतें.

अमेरिकेसंबंधीं अद्ययावत् माहिती असलेल्या वाचकाला या पुस्तकांत खूपच उणिवा आढळतील. पण आढळांत येणाऱ्या सर्वच विषयांवर आणि समस्यांवर एक मनुष्य ठाम मतें बनवूं शकेल, हें मला शक्य वाटत नाहीं. अमेरिकन जीवनपद्धतींतले अनेक पैलू असे आहेत कीं त्यांचें कांहींहि मूल्यमापन मला करतां आलेलें नाहीं. कांहीं पैलूंचें स्वरूप नीटपणें समजून घेण्याची मनांत फार इच्छा असूनहि मला तेवढा अवसर मिळाला नाहीं. या जीवनाच्या काहीं बाजू तर अशा होत्या कीं त्यांनीं मला गोंधळांत टाकलें. त्यांचा विचार मला दूर सारावा लागला; कारण एक तर त्या अनपेक्षितपणें मला दृग्गोचर झाल्या होत्या, आणि दुसरें म्हणजे त्यांचें खरें स्वरूप समजून घेण्यासाठीं आवश्यक असलेलें सखोल ज्ञान माझ्याजवळ नव्हतें. एका सामान्य परदेशी प्रवाशानें जें जें पाहिलें टिपलें त्याचें त्रोटक वर्णन म्हणजे माझा हा प्रवासवर्णनात्मक निबंध.

माझीं टिपणें पडताळून पाहण्यासाठीं आणि पूर्ण करण्यासाठीं पुढें साहजिकच मला अनेक संदर्भग्रंथांचें साहाय्य घ्यावें लागलें. जेथें जेथें मीं अन्य कोणाचें मत किंवा संबंधित विषयाच्या सखोल अभ्यासानंतर उपलब्ध झालेली माहिती उद्धृत केली आहे तेथें तेथें मीं मूळ ग्रंथाचा निर्देश केला आहे. इतिहासाच्या सर्वसामान्य सगळ्याच पुस्तकांत जी माहिती आढळते व जी सर्वांच्या परिचयाची आहे असें मानतां येईल अशी माहिती देतांना मात्र मीं मुद्दामच संदर्भ नमूद न करण्याचें धोरण स्वीकारलें आहे.

या निबंधांत उद्धृत केलेलीं बहुतेक मतें आणि पुरावे अमेरिकन निरीक्षकांनीं किंवा अभ्यासकांनीं व्यक्त केलेले नसून ते युरोपियन विचारवंतांच्या ग्रंथांतून घेतलेले आहेत हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

प्रस्तुतचा अभ्यासात्मक निबंध शक्य तितका निःपक्षपाती आणि पूर्वग्रहरहित व्हावा म्हणून मीं मुद्दामच ती निवड केली आहे.

जी. टी.

८७७४

प्रकरण पहिलें

# राष्ट्रीय आत्मपरीक्षण

हल्लींच्या प्रसिद्ध अमेरिकन कवींत ज्यांची प्रामुख्यानें गणना होते ते मि. आर्चिबाल्ड मॅक्लीश एकदां म्हणाले, "अमेरिकन असणें हा एक चमत्कारिक अनुभव आहे." खुद्द अमेरिकनांचेंच जर असें मत तर मग 'अमेरिकन माणूस' म्हणजे काय हें समजून घेण्यासाठीं आलेल्या परदेशीय पाहुण्याला अमेरिकन लोक किती चमत्कारिक वाटत असतील याची कल्पनाच केलेली बरी! स्वतःचें अस्तित्व आणि (बहुंशीं त्या अस्तित्वावरच अवलंबून असणारें) जगाचें भवितव्य याविषयीं जेव्हां जेव्हां अमेरिकन लोक विचार करीत असतील तेव्हां तेव्हां त्यांनाहि हें वैचित्र्य जाणवत असेल.

पूर्व किनाऱ्यापासून पॅसिफिकपर्यंत आणि उत्तरेपासून थेट दूर-दक्षिणेपर्यंत सबंध अमेरिकेंत मीं माझ्या पत्नीसह प्रवास केला. या प्रवासांत आम्हांला भिन्न वयाचे, व्यवसायांचे आणि वंशांचे कितीतरी सुसंस्कृत अमेरिकन भेटले. स्वतःच्या मनाचा विकास करणें हाच जीवनाचा प्रमुख हेतु होय, अशी त्या प्रत्येकाची भावना होती. ते सगळे मोकळ्या मनाचे आणि विविध विषयांची मनापासून आवड असणारे होते. त्यांच्यांतील प्रेम आणि माणुसकी यांनीं आम्हांला माहित केलें. इतक्या निर्व्याज प्रेमानें आणि प्रामाणिकपणें त्यांनीं आमचें स्वागत केलें कीं जगांतील अन्य देशांच्या प्रवासांत कोठेंहि आमचें असें स्वागत झाल्याचें आम्हांला स्मरत नाहीं. त्यांचे व्यवसाय, अमेरिकनांविषयींचीं आमचीं मतें, आमच्या शंका, अशा कितीतरी लहानमोठ्या प्रचलित प्रश्नांवर आम्ही मोकळे-पणानें बोललों. आणि जवळजवळ प्रत्येक वेळीं आमच्या संभाषणाचा ओघ अपरिहार्यपणें कांहीं मूलभूत स्वरूपाच्या प्रश्नांकडे वळे. या प्रश्नांचा अमेरिकनांना जणुं निदिध्यासच लागला आहे असें वाटे. "अमेरिका म्हणजे काय? तिचीं वैशिष्ट्यें कोणतीं? अमेरिकन संस्कृति आपल्याला कुणीकडे घेऊन जात आहे? आम्ही 'अमेरिकन' म्हणजे नेमके कोण? आम्ही कोठें जात आहोंत? आम्हांला नेमकें काय हवें आहे?" हे ते प्रश्न होत. त्यांच्यापैकींच कोणीतरी नेहमीं या

प्रश्नांकडे वळत आणि मग सर्व बाजूंनीं या प्रश्नांचा विचार करून समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न करीत.

वास्तविक मीं जें कांहीं ऐकलें होतें आणि वाचलें होतें त्यावरून अमेरिकन लोक म्हणजे आपल्या देशाची संपत्ति, सामर्थ्य, सामाजिक प्रगति यांतच समाधान मानणारे, चार साध्याभोळ्या श्रद्धा आत्मसंतुष्टपणें उराशीं कवटाळणारे असे असतील अशी माझी समजूत झाली होती. पण प्रत्यक्षांत मात्र मला आढळून आलें कीं अमेरिकन लोक वृत्तीनें कणखर आणि शरीरानें सुदृढ आहेत. त्यांच्या-पैकीं बहुतेकांच्यांत कांहीं तरी नवें आणि विधायक कार्य करण्याची शक्ति आहे. पण बऱ्याच वेळां त्यांना स्वतःविषयीं कोडें पडतें आणि ते अस्वस्थ होऊन जातात. जगांतील आपलें नेमकें कार्य कोणतें हें नेमकें समजावें यासाठीं त्यांचे मनःपूर्वक प्रयत्न चालू असतात. आध्यात्मिक उत्साह, अमर्याद आशावाद, आणि त्याबरोबरच आपल्याला न रुचणाऱ्या, दुःखद पेचप्रसंगांशीं झगडतांना मनांत निर्माण होणारी अनिश्चितता व संभ्रम यांचा एक वैशिष्ट्यपूर्ण संगम अमेरिकनांच्या या वृत्तींत मला आढळला.

विश्वविद्यालयांतील व्याख्यानें, प्रबंध, वृत्तपत्रांतील लेख, वाङ्मय आणि शिळोप्याच्या गप्पांसाठीं जमलेले चार लोक अशा सर्व पातळ्यांवर या विषयावर अव्याहत चर्चा होत असलेली मला पाहायला मिळाली.

स्वतःचें मनोविश्लेषण करण्यांत, आत्मशोधाच्या प्रयत्नांत, सबंध अमेरिका अविरत गढून गेलेली असते. मनुष्याच्या जीवनांतील गुंतागुंतीचें, समस्यांचें प्रथमदर्शन पाहून गांगरलेल्या आणि आपण कोण, कोठले, कोठें जाणार अशा विचारांच्या काहुरानें गोंधळून गेलेल्या एकाद्या नुकत्याच कळूं लागलेल्या मुलाची मला यावेळीं आठवण होते.

तरीहि केवळ तारुण्यांतील नैसर्गिक अस्वस्थतेचा आविष्कार असें या अस्वस्थतेचें स्वरूप नसण्याची शक्यता आहे. आधुनिक अमेरिकन जीवनाचें एक वैशिष्ट्य होऊन बसलेल्या या सामूहिक आत्मपरीक्षणाच्या संवयीचीं कारणें अधिक खोलवर दडलेलीं असतील. जुन्या युरोपमध्यें केव्हांहि झाले नाहींत इतक्या प्रचंड प्रमाणावर मानवी मूल्यांशीं प्रयोग करणाऱ्या अमेरिकन लोकांच्या मनांतील संघर्षांत आणि व्यथांत कदाचित् या संवयींचा उगम असेल. एका विद्वान् अमेरिकनाच्या उद्गारांची येथें आठवण होते. आत्मपरीक्षणाच्या या वैशिष्ट्या-बद्दल तो म्हणतो, "मानवी जीवनाचीं नवीं क्षितिजें प्रकाशांत यावीं यासाठीं एका सबंध संस्कृतीनें स्वतःच्या अस्तित्वाला धोका पत्करूनहि आत्मपरीक्षणास

उद्युक्त होण्याचें मनोधैर्य दाखविल्याचें उदाहरण इतिहासांत क्वचितच पाहावयास मिळतें."[1] अमेरिकन लोक खुषीनें हा धोका पत्करतात कीं एकादी दुर्दम्य अंतःप्रेरणा त्यांना असें आत्मपरीक्षण करण्यास उद्युक्त करते तें सांगतां येणार नाहीं. युरोपला उज्ज्वल प्राचीन इतिहासाचा आणि परंपरांचा जो समृद्ध वारसा मिळाला आहे त्याकडे पाहून अमेरिकनांच्या मनांत कदाचित् एकादा विशिष्ट गंड निर्माण झाला असावा. हे सगळे तर्क खरे असूं शकतील आणि ते तसे असले तर त्यांत कांहीं धोके आहेत हें विसरून चालणार नाहीं. आपल्या स्वभावाचें, प्रवृत्तींचें इतक्या बारकाईनें पृथक्करण करीत बसल्यानें व्यक्तीचा अथवा समाजाचा मौलिक जीवनोत्साहच संपुष्टांत येण्याचा संभव आहे. कदाचित् हें आत्मपरीक्षण म्हणजे नवीन आश्चर्यांची नांदीहि ठरण्याचा संभव आहे. कारण आत्मशोधाची ही ओढ मानवाच्या सदसद्विवेकबुद्धीचा निश्चितपणें विकास होत असल्याचेंहि सुचविते. त्यांच्या जुन्या पिढ्यांत जी संकुचित मनोवृत्ति आणि पोकळ बडेजाव मिरविण्याची प्रवृत्ति दिसे त्या दोहींचा अमेरिकनांनीं आतां त्याग केला आहे हेंच या अंतर्मुखतेंतून सिद्ध होत नाहीं काय? अशा प्रकारचें तत्त्वचिंतन करण्याची आवश्यकता भासणें हें मनाच्या सुज्ञाणतेचें गमक होय.

परदेशांतल्या लोकांचें आपल्याबद्दल काय मत आहे हें जाणून घेण्यास अमेरिकन लोक किती आतुर असतात हें या संदर्भात पाहणें फार उद्बोधक ठरेल. इंग्लंड आणि फ्रान्समधील विचारवंतांत जी एक प्रकारची आत्मसंतुष्टता आणि बेफिकिरी दिसते तिचा मागमूसहि अमेरिकेंत तुम्हांला आढळणार नाहीं. उलट खरे सुसंस्कृत आणि विचारवंत अमेरिकन आपल्या मतांहून भिन्न मतें ऐकण्यास नेहमीं उत्सुक असतात याची आपल्याला खात्री पटते. आपलीं आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यें अशा रीतीनें पारखून घेतां यावीं अशी त्यांची इच्छा असते. इतरांची जीवनपद्धति समजून घेतांना ते आपल्या जीवनपद्धतीवरील प्रतिकूल टीकेचेंहि स्वागत करतात. होय, परदेशीयांचे आपल्याबद्दल काय ग्रह आहेत हें जाणून घेण्याची त्यांना मोठी आवड आहे. अमेरिका आणि अमेरिकन लोक याबाबत युरोपमध्यें जें कांहीं मननीय साहित्य प्रकाशित होतें त्याचा ते आवडीनें अभ्यास करतात. परदेशांतील टीका त्यांच्या आत्मशोधपर शक्तींना चालना

१. विल्यम बॅरेट : 'इंट्रॉस्पेक्टिव्ह अमेरिका' (कॉन्फ्लुएन्स, ॲन इंटरनॅशनल फोरम), मार्च १९५२.

देते, स्वतःकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण त्यांना या टीकेमुळें मिळतो. थोडक्यांत म्हणजे ही टीका त्यांना त्यांच्या अंतर्मुखतेच्या लाडक्या छंदांत ढकलते, रममाण करून सोडते.

आमच्या टेक्सासच्या मुक्कामांतली एक रात्र मला आठवते. कांहीं कलावंतांच्या सहवासांत इकडच्या तिकडच्या गप्पा मारण्यांत आम्हीं बराच वेळ घालवला तरी आमच्या गप्पांचें मूळपद 'अमेरिका म्हणजे नेमकें काय?' हें होतें. पहाट उजाडली. या प्रशांत वेळेला औपचारिकपणानें कोणी वागत नाहीं, परस्परांचीं मनें अधिक चांगलीं समजूं लागतात आणि अंतःकरणांतले विचार प्रकट केले जातात. या अशा प्रसंगीं एक अमेरिकन चित्रकर्ती म्हणाली, "अमेरिका म्हणजे काय हें मला माहीत नाहीं पण एवढें मात्र मला ठाऊक आहे कीं इतरांचें प्रेम संपादन करण्याची अमेरिकेची इच्छा आहे." ही विदुषी बुद्धिमान्, खूप प्रवास केलेली आणि युरोपसंबंधीं समग्र ज्ञान असलेली अशी होती.

रात्रीच्या नीरव शांततेचा भंग करणाऱ्या आर्त किंकाळीसारखे तिचे वरील उद्गार उत्कट होते. अमेरिकनांचा आध्यात्मिक प्रश्न असें ज्याला आपण म्हणूं शकूं त्या प्रश्नाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण मला त्या चित्रकर्तीच्या उद्गारांनीं समजला. युरोपच्या मनांत आपल्याबद्दल प्रेम नाहीं असें अमेरिकेला वाटतें. युरोपबरोबरचें आपलें युद्धकालीन आणि युद्धोत्तर सहकार्य हा एक मुत्सद्देगिरीचा आणि व्यावहारिक आवश्यकतेचा भाग होता, केवळ सोयीसाठीं केलेली ती एकजूट होती आणि त्या एकजुटींतच भावी कटुतेची आणि अपेक्षा-भंगांचीं बीजें दडलेलीं होतीं अशी अमेरिकेची भावना आहे. युद्धकाळांत या दोन खंडांनीं केलेलें सहकार्य अथवा मैत्रीचे तह यांविषयीं चर्चा करण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं. मला जें पटलें आहे आणि मला जें सांगायचें आहे तें इतकेंच कीं जुन्या जगाशीं (युरोपशीं) अमेरिकेचे जे कांहीं संबंध आहेत ते अमेरिकेला समाधानकारक वाटत नाहींत. कोणीं तुम्हांला हें इतक्या स्पष्ट शब्दांत सांगणार नाहीं, पण अमेरिकेंत कांहीं काळ तुम्हीं वास्तव्य केलें तर तुम्हांलाच कळून येईल कीं युरोपबरोबर आपले अधिक निकटचे संबंध असावेत अशी अमेरिकेची आस आहे. इतिहासानें जे अनुभवी झाले आहेत, ज्यांची आध्यात्मिक आणि वैचारिक प्रगति समृद्ध आणि अथांग आहे अशा अटलांटिक महासागरपलिकडील युरोपवासीयांनीं आपल्याकडे अधिक सहानुभूतीनें, भावनात्मक दृष्टिकोणांतून पाहावें असें अमेरिकेला वाटतें.

व्यक्तीव्यक्तींतील किंवा राष्ट्राराष्ट्रांतील समंजस स्नेहभाव हा दुर्दैवानें एक दुर्मिळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........ वि: ........ नों: दि: ........



सद्गुण होऊन बसला आहे. केवळ विचार, ज्ञान आणि अंतःप्रेरणा एवढ्यांनीं हा स्नेहभाव निर्माण होत नाहीं. परस्परांच्या सुखदुःखांची अनुभवजात जाणीव, विशाल सहानुभूति आणि दुसऱ्या माणसाबद्दल आपुलकीचा दृष्टिकोण यांचीहि असा स्नेहभाव निर्माण होण्यासाठीं आवश्यकता असते. जगांतल्या सर्व पुढारलेल्या राष्ट्रांभोवतीं आज द्वेष, पूर्वग्रह आणि अंधपणें सत्य म्हणून स्वीकारल्या जाणाऱ्या विकृत कल्पना यांची तटबंदी उभी आहे. अमेरिका आणि बाह्य जग यांमधील अंतर आणि अमेरिकन जीवनपद्धतींतील भिन्नता यांमुळें तर या विकृत कल्पना आणि पूर्वग्रह अधिकच बळकट होतात. आपल्या जीवनपद्धतीवर एकांगी आणि अनुदार टीका केली जाते असें अमेरिकनांना पदोपदीं वाटत आलें आहे. केवळ चार दिवसांच्या सहलीखातर येणाऱ्या सामान्य युरोपीय प्रवाशांकडूनच नव्हे तर ख्यातनाम आणि बुद्धिवान् निरीक्षकांकडूनहि अशी टीका होते. आपल्या जीवनपद्धतींतील कांहीं भागाबद्दल गैरसमज पसरणें स्वाभाविक आहे पण अशा भागावरच हेतुपूर्वक अवास्तव भर देऊन टीका करण्यांत येते आणि अमेरिकन जो आपल्या जीवनाचा खराखुरा महत्त्वाचा व प्रातिनिधिक भाग मानतात त्याकडे मात्र खुशाल दुर्लक्ष करण्यांत येतें अशी अमेरिकनांची तक्रार आहे. भौतिकवाद, उपयुक्ततावाद, अतियांत्रिकीकरण, रॉबॉटिझम, एकसारखेपणा, प्रमाणबद्धता यांसारखीं ठोकळेबाज लेबलें अमेरिकन जीवनपद्धतीवर चिकटविलीं जातात आणि त्यामुळें अमेरिकन जीवनांत जो दुर्दम्य उत्साह, जी उत्स्फूर्तता, जी विविधता आणि अनावर लय आहे त्यांकडे परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांचें नकळत दुर्लक्ष होतें. त्यामुळें या अंतर्मुखतेला आणि त्यांतून उद्भवणाऱ्या चर्चेला कांहीं वेळां अतिरेकी तात्त्विक वादविवादाचें स्वरूप येतें. इतर सर्वजण आकसानें आपल्याविरुद्ध कारवाई करीत आहेत असा एकाद्या पक्षाचा ग्रह होतो तेव्हां तेव्हां हें वाग्युद्ध तक्रारीच्या आणि कटुतेच्या वातावरणांत लढलें जातें.

हा वाद कित्येक वर्षांपूर्वींपासूनचा आहे. १८४२ सालीं अमेरिकेहून परत आल्यावर चार्लस डिकन्स म्हणाला, "अमेरिकनांना वास्तव जगाचा एवढा हव्यास नसता आणि ते अधिक आदर्शवादी असते तर फार चांगलें झालें असतें." अलिकडच्या काळांत तर जागतिक परिस्थिति, राष्ट्राराष्ट्रांतील संबंध आणि सापेक्ष मूल्यें यांत आमूलाग्र बदल घडून आल्याचें आपल्याला पाहायला मिळालें. वर उल्लेखिलेला जुना वाद या नव्या परिस्थितींतील तिरस्कार, कटुता आणि द्वेष यांमुळें अधिकच विकोपाला गेला आहे. अशा परिस्थितींत आपण ड्यूहॅमेलसारख्यांनीं व्यक्त केलेलीं मतें विचारांत घ्यायचीं कीं आधुनिक समाजरचनेचा

विख्यात अभ्यासक—समतोल निर्णयांचा आणि उदारमतवादी—आन्द्रे सीगफ्रिड याचे निष्कर्ष ग्राह्य मानायचे? ड्यूहमेलच्या अमेरिकेवरील पुस्तकावरून[1] असें वाटतें कीं लेखक मनाच्या कोठल्यातरी अवघडलेल्या परिस्थितींत असावा त्यामुळें त्याला भोवतालच्या जगाचें सम्यक् दर्शनच झालेलें नाहीं.

आन्द्रे सीगफ्रिड आपल्या पुस्तकांत[2] म्हणतो, "व्यवहारांतल्या प्रात्यक्षिक स्वरूपाच्या गोष्टींतच अमेरिकन रमतो. 'व्यवहारवाद' या संज्ञेंत त्याच्या सुप्तशक्ति आणि त्याच्या मर्यादा चांगल्या व्यक्त होतात. केवळ 'जगत' असण्यांत त्याला समाधान वाटत नाहीं—नेहमीं आपण कांहींतरी करून दाखविलें पाहिजे अशी त्याची ईर्ष्या असते. ही कामगिरी नजरेंत भरण्यासारखी असली पाहिजे यावर मोठा कटाक्ष. विज्ञानाची उपासना करतांना तो प्रत्यक्ष संशोधनकार्यापेक्षां प्रयोगशाळें-तील उपकरणांचीच जास्त आस्थेनें दखल घेईल. धर्माच्या बाबतींतहि तसेंच. चर्चमधील स्तवन आणि मनन यांपेक्षां चर्चच्या भिंतींसाठीं लागणाऱ्या विटांबाबतच तो चिकित्सा दाखवील."

अर्थात् वरील दोन्ही उदाहरणें अतिशयोक्त अतएव न पटणारीं आहेत. पण तीं वारंवार उद्धृत केलीं जातात आणि त्यामुळें दोन्ही बाजूंमध्यें अविश्वास निर्माण करणारी तटबंदी अधिकच दुर्लंघ्य होते. तेव्हां अशा प्रकारचें लिखाण पूर्णपणें बाजूस सारून आपण जर अमेरिकेच्या आद्य वसाहतवाल्यांप्रमाणें खुल्या मनानें आणि डोळसपणें अमेरिकेकडे पाहिलें तरच खरी अमेरिका आपल्या दृष्टीस पडूं शकेल.

अमेरिकन संस्कृतीचे सर्व पैलू नीट पारखून घेण्यासाठीं खूप माहिती आणि अभ्यास यांची गरज आहे हें निर्विवाद होय. पण तरीहि पूर्वी केली गेलेली टीका ग्राह्य न मानतां, पूर्णपणें पूर्वग्रहरहित मनानें आपण हें मूल्यमापन केलें पाहिजे. तेथील प्रत्यक्ष जीवनच आपल्या परिणामांचा आलेख तुमच्या मनांवर कोरूं दे. युरोपला परततांना अमेरिकनांचें आत्मपरीक्षणाचें वेड ध्यानांत आणा आणि त्या संदर्भात स्वतःहि थोडे अंतर्मुख बना म्हणजेच प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि ऐकीव गोष्टींतून तुम्हांला काळेंगोरें निवडतां येईल.

1. Georges Duhamel : Scenes de la Vie Future, Paris 1930.
2. André Siegfried : Les Etats-Unis d'Aujourd'hui, Paris 1947.

प्रकरण दुसरें

# एक जुनें संभाषण : पुढें चालू

**पूर्वपक्ष** : न्यूयॉर्कमध्यें मला एक औद्योगिक क्षेत्रांतला कामगार भेटला. हा कामगार माझ्याच देशांतला, आमच्या प्रांतांतला होता. तो म्हणाला, "मी सुखी आहें. मला लागतात त्या गोष्टी माझ्याजवळ आहेत." आपल्या मालकीच्या गोष्टींची यादी त्यानें पुढें मांडली : स्वतःचें घर, हें तो हप्तेबंदीनें विकत घेत होता. हें घर आल्हाददायक, आरोग्याच्या दृष्टीनें उत्तम आणि प्रत्येक आधुनिक सुखसोयीनें सुसज्ज होतें : गार आणि गरम पाण्याचे नळ असलेली बाथरूम, घरभर उष्णता कायम टिकविण्याची व्यवस्था, विजेच्या शेगड्या आणि इतर माजघरांत उपयोगी पडणारीं यंत्रें, रेफ्रिजरेटर, टेलिफोन आणि रेडिओ. त्याची स्वतःची मोटर होती आणि लौकरच टेलिव्हिजन घेण्याचा त्याचा बेत होता. खाण्यापिण्याची चंगळ होती. उत्कृष्ट सरकारी शाळांत त्याचीं मुलें शिकत होतीं, लहान मुलांच्या क्लबाचीं आणि वाचनालयांचीं तीं सदस्य होतीं; शिवाय प्रयोग-शाळा, उद्यानें, पोहण्याचे तलाव, क्रीडांगणें येथेंहि त्यांना मुक्तद्वार होतें. आणि हायस्कूल शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत हें सारें त्यांना विनामूल्य मिळे. अगदीं शाळेच्या पुस्तकांसुद्धां. "त्यानंतर," त्या पित्यानें खुलासा केला, "तीं हुषार असतील तर शिष्यवृत्त्या मिळवून उच्च शिक्षण घेतील. शिकण्यांत विशेष डोकें चालत नसेल तर तीं माझ्याप्रमाणें आपल्या व्यवसायाला सुरवात करतील. मी आठवड्यांतले पांच दिवस काम करतों आणि दोन दिवस मला सुटी असते. मग मीं कां म्हणून तक्रार करावी?" "तुम्ही कोणते कर भरतां?" त्याला अधिक बोलकें करण्यासाठीं मीं विचारलें. "आठवड्याला सोळा डॉलर," त्यानें उत्तर दिलें. त्यावर मी म्हणालों, "अबब! हा कर खूपच आहे." पण तो कामगार माझ्याशीं सहमत झाला नाहीं. "हा कर जास्त मुळींच नाहीं. मला त्याबदल्यांत काय काय मिळतें तें जरा लक्षांत घ्या. मला जरी याहून अधिक कर भरायला सांगितलें तरी तें वाजवीच ठरेल. सरकारकडून ज्या सुखसोयींची आपण अपेक्षा करतों त्या पुरवणें सरकारला शक्य व्हावें म्हणून आपल्यापैकीं प्रत्येकानें

कांहीं तरी कर सरकारी तिजोरींत भरलाच पाहिजे." अशा तऱ्हेच्या गप्पागोष्टी निश्चितच उद्बोधक असतात. पुस्तकांतून किंवा आंकडेवारींतून जी केव्हांहि मिळूं शकणार नाहीं अशी सामाजिक परिस्थितीचें यथार्थदर्शन घडविणारी माहिती अशा संभाषणांतून आपल्याला मिळते. कामगार राजीखुषीनें कर देतो एवढेंच नव्हे तर मुळींच कुरकुर न करतां अधिकहि देण्याची त्याची तयारी आहे. सरकार आणि समाज यांतील आपण एक घटक आहोंत असें त्याला वाटतें. रूढ तात्त्विक अर्थानें तो सर्वसामान्य जनतेपैकीं एक नाहीं. एका नव्या दृष्टिकोणांतून जो सर्व गोष्टी जगापुढें मांडतो असा तो समाजाचा एक घटक आहे.

**उत्तरपक्ष** : हा कामगार म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नसून मिरासदार माणसाची छोटी आवृत्ति आहे. ज्या सधन कामगारवर्गाचा तो घटक आहे तसा कामगारवर्ग फक्त अत्यंत समृद्ध आणि प्रगत देशांतच निर्माण होऊं शकतो. ज्या राज्यव्यवस्थेखालीं एक भागीदार म्हणून भांडवलशाही समाजांतून अशा विशिष्ट प्रकारचा फायदा मिळवण्याची मुभा त्याला मिळते त्या राज्यव्यवस्थेबद्दल त्याला एक प्रकारची आत्मीयता वाटणें स्वाभाविकच आहे. औद्योगिक दृष्ट्या अमेरिका आज जगांतील सर्वांत सामर्थ्यवान् राष्ट्र आहे. आणि हा 'कामगार मध्यमवर्ग', मला वाटतें असा शब्दप्रयोग योजण्यास कांहीं हरकत नसावी, हें अमेरिकेचें सर्वांत प्रभावी वैशिष्ट्य होऊन बसलें आहे. पण अशा बाह्य लक्षणांनीं आपण फसतां कामा नये. हा कामगार कांहीं आम अमेरिकन जनतेचा प्रतिनिधि नाहीं. अमेरिकेंत तुम्हांला दारिद्र्य सांपडेल, गुहेसारख्या अंधाऱ्या वस्त्या आढळतील आणि असह्य गैरसोयी सहन करीत जीवन कंठणारे लोक भेटतील. दक्षिणेकडच्या संस्थानांतील गरीब निग्रो आणि त्याच भागांतील अनेक गरीब गोरे लोक कसे दैन्यावस्थेंत जगतात याची तुम्हांला कल्पना आहे काय? कांहीं मोठ्या औद्योगिक केंद्रांतील श्रमजीवी कुटुंबांच्या ओंगळ वस्त्या तुम्हीं कधीं पाहिल्या आहेत काय? मेक्सिको आणि प्युर्टोरिकोमधून देशांतर करून आलेले लोक अक्षरशः एका खुराड्यांत कोंबल्याप्रमाणें एकत्र राहतात तीं ठिकाणें तुम्हांला माहीत आहेत का?

**पूर्वपक्ष** : होय. या सर्व गोष्टी मीं पाहिल्या आहेत आणि त्या मला माहीत आहेत. अमेरिकेंत अजून खूप दारिद्र्य आहे यांत शंका नाहीं. पण दिवसेंदिवस ही हलाखी कमी कमी करण्यांत येत आहे. विपन्नावस्थेविरुद्ध अमेरिकन समाज लढा देऊं शकतो हें सिद्ध झालें आहे आणि तसा लढा सुरू आहे. कांहीं काळ लोटल्यावर हें दैन्य संपूर्णपणें नाहींसें करण्यांतहि समाज यशस्वी होईल. प्रत्येक

पिढीबरोबर अमेरिकन लोकांच्या सरासरी जीवनमानांत आश्चर्यकारक प्रगति होत आहे. आरोग्य, शिक्षण, मनोरंजनाचीं साधनें या सांस्कृतिक आणि सुखी जीवनांतील मूलभूत सोयींचा लाभ अमेरिकेंतील अधिकाधिक लोकांना मिळत आहे. खरें म्हणजे आपल्या या कामगाराच्या उदाहरणावरून सिद्ध होणाऱ्या सामान्य अमेरिकनाच्या जीवनमानाला जगांत कोठें तोड सांपडणार नाहीं. जगांत आजवर केव्हांहि इतका मोठा जनसमूह एवढ्या सुबत्तेंत नांदला नव्हता. आणि उदाहरणादाखल आपण हा जो कामगार घेतला आहे त्याला कोणत्याहि प्रकारचे खास वेगळे हक्क नाहींत हें लक्षांत घेतलें पाहिजे.

अगदीं सर्वच्या सर्व अमेरिकनांचा तो प्रतिनिधि नसेल, पण तो बहुसंख्यांचा प्रतिनिधि आहे एवढें निश्चित. आणि मग जर तो त्याच्या भोवतालच्या समाजरचनेंत एक प्रकारें भागीदार (शेअरहोल्डर) असेल, तर त्यांत बिघडलें कोठें? जर एखाद्या समाजांतले बहुसंख्य घटक त्या समाजव्यवस्थेंत भागीदार असतील आणि त्यांच्या वांट्याचा पूर्ण हिस्सा त्यांच्या पदरांत पडत असेल तर ती खऱ्या अर्थानें सामाजिक लोकशाही म्हटली पाहिजे. मग तुम्ही तिला नांव कोणतें कां द्या ना!

**उत्तरपक्ष :** जी व्यवस्था व्यक्तिगत नफ्यावर आधारलेली आहे तिला 'सामाजिक लोकशाही' मानणें कठीण आहे. सामान्य जनतेची प्रगति हें तिचें ध्येय नसून मूठभर लोकांचा फायदा हें तिचें लक्ष्य आहे. हे मूठभर लोक संख्येनें बरेच असले तरी ही समाजरचना अशा खास मिरासदार वर्गाचेंच हित पाहते. त्यांची कार्यक्षमता आणि उत्पादन वाढावें म्हणून आपल्या नोकरवर्गाला वाढतें वेतन देणें हेंच जर मालकांच्या सोयीचें असेल तर भांडवलशाही डावपेचांचाच तो एक भाग झाला. शिवाय विशिष्ट प्रकारच्या अमेरिकन अर्थव्यवस्थेमुळें अशी वेतनवाढ देणें मालकांना शक्य झालें आहे. पण एवढ्यानें कांहीं त्या समाजव्यवस्थेचें स्वरूप बदलत नाहीं किंवा ती न्याय्य ठरत नाहीं. डावपेचांच्या स्वरूपाच्या या सवलती अशाच सुरू राहतील आणि त्यांचे सुपरिणाम कायम टिकतील अशांतला मुळींच भाग नाहीं. तशी जरुरी निर्माण होईल तेव्हां मालक वर्गाकडून या सवलती रद्दबातल केल्या जातील.

**पूर्वपक्ष :** सामाजिक जीवनांत चिरकाल कायम राहणारें असें कांहींच नसतें. पण या तत्त्वावर बोट ठेवून अमेरिकेच्या संपन्नतेविषयीं भाकित करणें वाटतें तेवढें सोपें नाहीं. हा एक नवसमाज आहे, समाजशास्त्राच्या भाषेंत बोलावयाचें झालें तर हें एक नवें जग आहे, आणि युरोपमध्यें कोठेंच अशी परिस्थिति

उपलब्ध नसल्यानें युरोपांतील अनुभवांच्या प्रकाशांत आपल्याला अमेरिकेचें मूल्यमापन करतां येणार नाहीं. या नव्या रचनेचें वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप जाणण्याचा आणि तिचें नियंत्रण करणारे नवे स्वयंभू नियम समजून घेण्याचा आपण कसोशीनें प्रयत्न केला पाहिजे. अमेरिकन समाजरचना म्हणजे व्यक्तीचें कर्तृत्व, नफा मिळविण्याची स्वाभाविक प्रवृत्ति, लोकांच्या गरजा भागविण्यासाठीं उत्पादन आणि त्याबरोबरच सामाजिक कर्तव्यांची तीव्र जाणीव या सर्व गोष्टींचा संगम. या समाजरचनेंत आम्हां युरोपवासीयांना भांडवलशाही आणि साम्यवाद यांची विचित्र एकजूट आढळते. अद्वितीय अशा निश्चयात्मकतेनें आणि तितक्याच अजोड संघटनचातुर्यानें अमेरिकेच्या बहुविध शक्ति एकसूत्र होतात आणि देशाची संपत्ति समृद्धि वाढविण्याच्या कामीं त्यांची योजना होते. हा प्रयत्न इतक्या प्रचंड प्रमाणावर सुरू आहे कीं युरोपमधील जुन्या पारंपरिक अर्थ-रचनांची त्याच्याशीं कोणत्याहि बाबतींत तुलना करतां येणार नाहीं. अमेरिकन अर्थव्यवस्थेचे व्यवहार आतां अमेरिकेपुरतेच मर्यादित राहिले नसून तिचा व्याप इतर खंडांतहि विस्तारला आहे हें आपण जाणतोंच. अटलांटिकपासून पॅसिफिक महासागरापर्यंत आणि उत्तरध्रुवाकडील बर्फाळ प्रदेशापासून तों उष्णकटिबंधांतील मेक्सिकोच्या आखातापर्यंत अमेरिकन अर्थव्यवस्थेचा संचार आहे. युरोपभर पसरलेली अशी अफाट आणि तरीहि एकसंध बाजारपेठ लाभल्यामुळें साहजिकच उत्पादनाच्या साधनांनीं जगड्व्याळ स्वरूप धारण केलें आहे व शिकागो आणि न्यूयॉर्क येथील गगनचुंबी इमारती आणि सानफ्रान्सिस्कोंतील अजस्र पूल हीं या उत्पादनसामर्थ्याचीं वैभवशाली प्रतीकें झालीं आहेत. पण हा गाडा नीट चालू राहायचा असेल तर ज्या झपाट्यानें संपत्ति निर्माण होत आहे त्याच वेगानें तिचा विनियोग झाला पाहिजे. असा अवाढव्य विस्तार असलेली ग्राहकांची बाजारपेठ मिळवायची म्हणजे सर्वसामान्य लोकांचें जीवनमान एकसारखें वाढतें राहिलें पाहिजे. आपल्या नफ्यापैकीं शक्य तितका मोठा भाग आपल्या कामगार वर्गांत मजुरीच्या रूपानें वांटून टाकणें हेंच या प्रचंड अमेरिकन कंपन्यांच्या हिताचें असतें. अशा प्रकारें श्रमजीवी वर्गांनीं सुखवस्तूंसारखें राहावें आणि या कंपन्यांत निर्माण झालेला विविध प्रकारचा माल खरेदी करावा असें त्यांना उत्तेजन दिलें जातें. इकडे कामगारसुद्धां आपल्या कंपनीच्या उत्पादनांत जास्तींत जास्त वाढ व्हावी यासाठीं मनापासून झटत असतो, कारण तसें केल्यानें नफ्याचा वाढता हिस्सा आपल्या पदरांत पडण्याची त्याला आशा असते. मालक आणि मजूर, दुकानदार आणि गिऱ्हाईक, व इतर सहकारी घटकांतील परस्परसंबंध अशा

प्रकारचे अनेकविध आर्थिक आणि मानसशास्त्रीय प्रश्न या परिस्थितीशीं निगडित असतात. समाजांतल्या या वेगवेगळ्या थरांत परस्परावलंबन, परिस्थिति, समान हितसंबंध यांचे असंख्य दुवे निर्माण होतात आणि ते दुवे हळुहळू या सर्व थरांना एकत्र आणतात. कामाबाबतची शिस्त या सर्वांना सारखीच बंधनकारक असते. सामाजिक भेदांची तटबंदी किंवा आपल्या परिचयाचें असलेलें जमाती-जमातींमधील श्रेष्ठ-कनिष्ठ असें वर्गीकरण नामशेष होतें आणि अशा प्रकारचे भेदभाव नव्या जमान्यांत जुनाट ठरतात. लोक, निदान बहुसंख्य लोक तरी, दारिद्र्यमुक्त होतात आणि त्यांच्यांतला न्यूनगंड व कटु द्वेष नाहींसा होऊन उलट ते स्वतंत्र, आशावादी बनतात आणि आपल्या कर्तृत्वाची व हक्कांची त्यांना खात्री वाटूं लागते. एकमेकाबद्दल आदर निर्माण होतो. युरोपांतील जुन्या खानदानी वर्गांत आढळणारी चालीरीतींची मोहक आदब अमेरिकनांच्या वागण्यांत नसली तरी तुम्हांला असें आढळून येईल कीं अमेरिकन माणूस अत्यंत स्नेहशील आणि दुसऱ्याच्या सोयीगैरसोयीची जाणीव बाळगणारा आहे; मग तो कोणत्याहि व्यवसायांतला असो. स्वतःला आपल्या शेजाऱ्यापेक्षां तो कधींहि कमी लेखणार नाहीं किंवा अन्याय सहन करणार नाहीं. त्याच्या अंगीं योग्यता असेल आणि तो महत्त्वाकांक्षी असेल तर पुरेशा परिश्रमांच्या जोरावर तो समाजाचा नेता होऊं शकतो. स्वतःच्या कर्तबगारीनें औद्योगिक क्षेत्रांत श्रेष्ठत्व मिळविणारे बहुतेक सर्व अमेरिकन उद्योगपति अत्यंत गरिबींतून वर आले आहेत आणि या गोष्टीचा त्यांना स्वतःला फार अभिमान वाटतो. मजूर संघटनांनीं मिळविलेलें प्रभावी सामर्थ्य, आर्थिक क्षेत्रांत मक्तेदारी निर्माण होऊं नये म्हणून संघराज्याकडून होणारा हस्तक्षेप, सामाजिक, आर्थिक आणि इतर व्यवहारांत प्रतीत होणाऱ्या लोकशाही व पुरोगामी प्रवृत्ति या सर्वांचा परिणाम असा होतो कीं कोणताहि एक गट दुसऱ्यावर वर्चस्व गाजवून समाजाची घडी विस्कटवूं लागला तर या आक्रमणाला यशस्वी रीतीनें आळा घातला जातो. खूप तफावत आढळेल, पण तरीहि सरासरी उत्पन्नाची उंच पातळी आणि त्या दोघांना समान प्रमाणांत असणारे सामाजिक हक्क यांमुळें समाजाच्या सर्व व्यवहारांत सुखकर असें समतेचें वातावरण नांदत असतें. कित्येक प्रसंगीं तर अमेरिकेंत तुम्हांला असें वाटतें कीं जणूं कांहीं तुम्ही वर्गविहीन समाजांत वावरत आहांत.

**उत्तरपक्ष** : तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें अमेरिकेंत थोडीफार समता असलीच तर ती उत्पादनांतील प्रमाणबद्धता, समान चालीरीती आणि जीवनाचें यांत्रिकीकरण यांमुळें आली आहे. खंडप्राय अशा या देशांत तुम्ही पूर्व, पश्चिम, उत्तर,

दक्षिण, कोणत्याहि दिशेला जा, तुम्हांला तेच ते कंटाळवाणे हमरस्ते, एकासारख्या एक दिसणाऱ्या दुकानांच्या खिडक्या, कित्येकदां तर या दुकानांवरील पाट्यांवर तींच तीं नांवें आढळतात, एकच पोषाखपद्धति, ठरीव सांच्याचीं हॉटेलें, तींच तीं फळें, एकाच धर्तीचें संगीत, सिनेमे, इतकेंच काय पण लोकांच्या व्यवसायाची आणि मनोरंजनाची पद्धतहि अगदीं ठराविक असल्याचें आढळून येईल. जिकडे जावें तिकडे त्याच त्या अवाढव्य झगमगत्या भडक रंगांच्या जाहिराती लोकांना त्यांच्या दैनंदिन व्यवहारांत मार्गदर्शन करतांना दिसतात. यंत्रशाही आज तिथें अढळ आणि सर्वंकष बनली आहे. या यंत्रशाहीनें जीवनाचें प्रत्येक क्षेत्र काबीज केलें आहे, व्यक्तिगत आयुष्याच्या लहानसान बाबींतहि तिनें शिरकाव केला आहे. लोकांच्या सामाजिक आचारविचारांवरच नव्हे तर व्यक्तीच्या खाजगी जीवनावरहि आज ही यंत्रसत्ता प्रबळ वर्चस्व गाजवीत असते. अजस्र यंत्रें, वीज, इंजिनें ज्यांत नाहींत अशा जीवनाची कल्पनाहि आपण करूं शकत नाहीं. लोकांचा सगळा उत्साह, विचारशक्ति, सर्जनशीलता, कल्पकता या यांत्रिक प्रगतीचे कामीं खर्च होते आणि ही यांत्रिक प्रगति त्यांच्या नैतिक शक्तींना एकाच ध्येयाच्या मार्गावर नेऊन सोडते. तें ध्येय म्हणजे उत्पादन, संपत्ति आणि नफा यांत अमर्याद वाढ! या लोकसमूहाला कार्यप्रवण करणारी प्रेरणा कोणती? 'अमेरिकन जीवनमान' या संज्ञेनें सूचित होणाऱ्या सगळ्या सुखसोयी प्राप्त करून घेणें ही प्रत्येकाची आंतरिक इच्छा असते. स्पष्ट शब्दांत सांगायचें म्हणजे निव्वळ ऐष-आरामाच्या आसक्तीनें हा सगळा उद्योग चाललेला असतो. पराकोटीच्या भौतिक-वादाचा किती अविच्छिन्न आविष्कार हा! पूर्वीं होऊन गेलेल्या संस्कृतींचीं जीं जीं कांहीं मनोरम वैशिष्ट्यें होतीं त्या सर्वांचा अमेरिकन जीवनांतून लोप होत आहे. त्या संस्कृतींमधील वर्तन व नीतिमत्ता यांचा उच्च दर्जा, विचारसमाधींत शांतपणें निमग्न होण्याची तत्कालीन आवड, प्रत्येक व्यवहारांतील त्यांचा आल्हाद-दायक संथपणा, अत्यंत प्रगल्भ सौंदर्यमूल्यांबद्दल त्यांना वाटणारी आत्मीयता, कलाकौशल्याबद्दलचें त्यांचें प्रेम व त्यांची पारंगतता, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे नफ्याविषयींचें त्यांचें औदासीन्य या उदात्त गुणांची जोपासना कित्येक शतकें युरोप व भूमध्यसामुद्रिक प्रदेशांत होत आली होती! या संस्कृतींना प्रगल्भतेची वाटचाल किती मंदगतीनें करावी लागली! अखंड सुरू राहणाऱ्या एका जगड्व्याळ उत्पादनयंत्रानें बिनदिक्कतपणें या मूल्यांना बाजूस सारलें आहे. एका सांच्यांतून निघालेलीं, यांत्रिक स्वरूपाच्या दैनंदिन व्यवहारांत गढून गेलेलीं, आयुष्याच्या उच्च, कलात्मक पैलूंविषयीं संपूर्ण अज्ञानांत असणारीं माणसेंच

काय तीं उद्यांच्या जगांत शिल्लक उरतील. स्वतःचा बंगला, मोटार, रेफ्रिजरेटर, गरम आणि गार पाण्याचे नळ हें सगळें कांहीं प्रत्येकाजवळ असेल. उत्पादनाचा उच्चांक आणखी वर नेण्यासाठींच प्रत्येक जण नेटाचे प्रयत्न करतांना दिसेल पण सांस्कृतिक मूल्यांचा खरा अर्थ काय याचा मात्र सर्वांना विसर पडलेला असेल.

**पूर्वपक्ष :** अमेरिकन जीवनांतील सांचेबंदपणाबद्दल आणि नावीन्यहीनतेबद्दल मीं बरेंच ऐकलें होतें. पण ती सारी उथळ टीका आहे हें आतां मला उमगलें आहे. अमेरिकन जीवनांत भान हरपून टाकणारी अशी कितीतरी विविधता आहे. न्यू इंग्लंड ते कॅलिफोर्निया आणि दक्षिणेकडील सपाट सुपीक प्रदेशापासून ते मध्यपश्चिमेंतल्या डोंगरी मुलुखापर्यंत नुसतें भौगोलिक हवामानच बदलतें असें नाहीं तर सबंध सामाजिक वातावरणांतहि फरक आढळतो. अमेरिकेंत सर्वत्र आढळणाऱ्या यांत्रिक सुखसोयी मात्र कोणत्याहि प्रदेशांत अगदीं त्याच छापाच्या आढळतील. याबाबत अधिक निस्संदिग्ध स्पष्टीकरण करणें जरूर आहे, कारण हा मूलभूत स्वरूपाचा प्रश्न आतां अमेरिकेपुरताच मर्यादित राहिलेला नसून सर्व सुधारलेल्या राष्ट्रांपुढें तो उभा आहे. कोणत्या प्रकारची समाजरचना आपल्याला हवी तें आपण प्रथम स्पष्ट ठरवलें पाहिजे. मघाशीं तुम्ही जुन्या संस्कृतीमधल्या कांहीं उदात्त आणि मनोरम पैलूंबद्दल कांहींसें व्यथित होऊन बोललांत खरें पण त्यावेळीं एक गोष्ट आपण विसरलां. या ज्या सगळ्या उच्च सुखसोयींचा तुम्हीं उल्लेख केला त्या सुखसोयी फक्त मूठभर भाग्यवान् लोकांच्याच वांट्याला येत असत आणि त्याचवेळीं संख्येनें कितीतरी अधिक असणाऱ्या बहुजन समाजाला मात्र अत्यंत हलाखींत आपलें आयुष्य कंठावें लागत होतें. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या काळचे इटालियन उमराव किंवा १७ व्या व १८ व्या शतकांतले खानदानी फ्रेंच यांच्या चैनीमागें आणि भरभराटीमागें ज्या बिचाऱ्या दलित, असंघटित, गुरांसारख्या राबणाऱ्या असंख्य गुलामांचे कष्ट दडलेले होते त्या बिचाऱ्यांना मात्र आपण विसरतों. आधुनिक युरोपच्या सर्वोच्च कुलीनतेचें प्रतीक म्हणून आपल्याला व्हिक्टोरियाकालीन खानदानी इंग्लिश माणसाकडे बोट दाखवितां येईल. पण या खानदानी प्रगल्भतेमागचे—डिकन्सनें आपल्या कादंबऱ्यांतून अमर केलेले—दरिद्री लोक मात्र आपल्याला दिसत नाहींत. सोफोक्लिस, इक्टिनस, प्लेटो यांच्या वेळच्या वैभवकालीन अजरामर अथेन्सबद्दल बोलतांना एक गोष्ट मात्र आपण विसरतों आणि ती ही कीं या अथेन्सची ही सारी सुबत्ता तत्कालीन गुलामसंस्थेवर आधारलेली होती. अखेरपक्षीं अगदीं

साधा प्रश्न आपल्यापुढें शिल्लक उरतो. मूठभर लोकांना सत्तावान् आणि समृद्ध ठेवणाऱ्या उमरावी संस्कृतीचा अस्त झाला याबद्दल आपल्याला खेद वाटतो, कीं सर्वसामान्य लोकांचें जीवनमान सुधारावें अशी आपली इच्छा आहे? ही दुसरी गोष्ट जर आपल्याला हवी असेल तर त्यासाठीं मार्ग एकच. प्रचंड प्रमाणावरील औद्योगिक उत्पादन आणि त्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री! प्रत्येक नागरिकास त्याला हव्या असलेल्या सर्व वस्तु व सुखसोयी मिळून त्याची हलाखींतून, अंधेऱ्या, गलिच्छ राहणींतून मुक्तता झाली आहे, त्याला प्रतिष्ठा आणि सुख लाभलीं आहेत असा दिवस कधीं ना कधीं तरी उजाडावा अशी समाजाची इच्छा असेल तर त्यासाठीं या औद्योगिक उत्पादन-साधनांचीच कास धरली पाहिजे. असें केलें तरच नागरिकांना पुरेशा शैक्षणिक सवलती समाज उपलब्ध ठेवूं शकेल आणि ज्यांना इच्छा असेल त्यांना उच्च शिक्षणाची अनिर्बंध संधि देतां येईल. आणि या क्षेत्रांत अमेरिकेनें नवा उपक्रम केला आहे. सामान्य लोकांचें जीवनमान उंचावण्याचा एवढा महान् प्रयोग जगांत पूर्वी केव्हांहि झालेला नाहीं. नुसत्या तांत्रिक स्वरूपांत नव्हे तर खऱ्या अर्थानें लोकशाही आचरणांत आणण्याचा हा सर्वांत यशस्वी प्रयत्न आहे. या प्रचंड सामाजिक स्थित्यंतरांत तितक्याच गंभीर अशा कांहीं उणिवा आहेत यांत शंका नाहीं. पण तेवढ्यावरून या सबंध रचनेलाच 'रुक्ष' आणि 'भौतिकवादी' म्हणून हेटाळण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति मला बालिश आणि ढोंगी स्वरूपाची वाटते. ही अर्थहीन आणि बेजबाबदार बडबड आहे. दारिद्र्यमुक्त जीवन, दैनंदिन व्यवहारांतल्या सुखसोयी आणि मनाची स्थिरता या गोष्टी कांहीं माणसाला बिघडवत नाहींत. उलट त्या त्याची उन्नतीच करतात. पण या ध्येयापर्यंत पोचण्यासाठीं आपल्याला कांहीं किंमत—कदाचित् फार मोठी किंमत—द्यावी लागते. पण मला मात्र ती वाजवी वाटते. मोठ्या औद्योगिक समाजाची वैज्ञानिक सिद्धांतांवर असलेली भिस्त, उद्योगधंद्यांची यंत्रप्रधान संघटना, त्या समाजाची शिस्त, त्यांतल्या उत्पादनांतील प्रमाणबद्धता या सर्व गोष्टींशीं समरस होऊन त्या अंगवळणीं पाडणें हीच ती किंमत होय. अन्य कोणता मार्गच नाहीं. तेव्हां आपण आपला काय तो निर्णय घेऊं या. पण यंत्रशाही अपरिहार्यपणें सर्वंकष होऊन राहील असें मला मुळींच वाटत नाहीं. माणसाची स्वच्छंद प्रज्ञा केव्हांहि नष्ट होणार नाहीं. आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याचा आविष्कार करण्यासाठीं, आपल्या प्रतिभेच्या मुक्त विकासासाठीं, कल्पनाविलासासाठीं, काव्याचा आनंद लुटण्यासाठीं, स्वप्नांत रंगून जाण्यासाठीं आपल्या आयुष्यांत भरपूर अवसर ठेवणें ही

अगदीं त्याच्या हातची गोष्ट आहे. मानवी प्रगतीची जी अमर्याद शक्यता आज अमेरिकेंत पाहायला मिळते तिच्याकडे मुद्दाम डोळेझाक करण्यांत आपण आपल्या समकालीनांचें कांहींहि भलें करीत नाहीं. औद्योगिक युगाच्या गरजा आणि स्वतंत्रव्यक्तीच्या स्वाभाविक प्रवृत्ति यांचा, म्हणजेच परिस्थितिजन्य गरज आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचा, योग्य तो मेळ कसा राखायचा हा खरा प्रश्न आहे.

**उत्तरपक्ष :** जेथें प्रत्येक सेकंद पद्धतशीरपणें राबवला जातो, प्रत्येक हालचाल शास्त्रीय रीतीनें मर्यादित आणि संकलित करण्यांत येते अशी श्रमांचें पराकोटीचें वर्गीकरण करणारी खास अमेरिकन पद्धति जेथें प्रचलित आहे तेथें व्यक्तीच्याच काय पण कोणत्याहि प्रकारच्या स्वातंत्र्याची भाषा बोलतां येणार नाहीं आणि कोणाचा अशा स्वातंत्र्यावर विश्वासहि असणार नाहीं. आणि अमेरिकेंतल्या कोट्यवधि लोकांची आज हीच दशा आहे. येथें प्रत्येक औद्योगिक कामगाराचे हात आठवड्याचे चव्वेचाळीस तास एकच एक निर्बुद्ध क्रिया करण्यांत गुंतलेले असतात. त्याच्या स्वतंत्र विचाराला किंवा कर्तृत्वाला काडीचाहि वाव नसतो. आणि म्हणून हा कामगार म्हणजे एक मानवी यंत्र, हालचाल करणारा पुतळा, बनून राहतो. त्यानें स्वतंत्र न्हाणीघर, मोटार, टेलिव्हिजनसेट वगैरे अनेक गोष्टी मिळविल्या असतील पण स्वतःचें व्यक्तिमत्त्व, आपल्या व्यवसायाबद्दलचें प्रेम आणि अभिमान या गोष्टी मात्र तो गमावून बसला आहे. पूर्वीच्या कसबी कारागिराला आपल्या हत्याराविषयीं, काम करण्याच्या जागेविषयीं, वाटणारा जिव्हाळा, आपल्या नैपुण्याबद्दलचा आत्मविश्वास, त्याविषयींचीं रम्य कथा-गाणीं या बाबतींत आजचा कामगार संपूर्ण अनभिज्ञ आहे. उद्योगाच्या अफाट पसाऱ्यां-तलें तो एक व्यक्तित्वहीन, क्षुल्लक हत्यार झाला आहे. यांत्रिकता हा त्याचा दुसरा स्वभाव बनत आहे. त्याचें कामाव्यतिरिक्तचें शहरांतलें आणि घरांतलें जीवनहि असेंच यांत्रिक स्वरूपाचें होत जाणार. प्रचंड औद्योगिक प्रगतीचा हा परिणाम ! सबंध लोकसमूहाचें जीवनमान उंचावणाऱ्या खटाटोपांत व्यक्तिजीवन मात्र पायदळीं तुडवलें जाऊन नष्टप्राय होऊं लागतें. एकत्र राहणाऱ्या कीटक-समूहाची अवस्था जनतेला प्राप्त होते.

**पूर्वपक्ष :** सामाजिक सत्याला एकाहून अधिक पैलू असतात. जेथें तुम्हांला निराशामय यांत्रिकता आणि तितक्याच अधोगतीला पोंचलेल्या व्यक्ति आढळतात तेथेंच एकाद्याला मानवाची गुलामगिरींतून मुक्तता झालेली दिसेल. मानवी मनाचा आणि नैतिक व्यक्तित्वाचा अमर्याद विकास करण्याची शक्यता आणि आशा यांचा त्याला त्या परिस्थितींत साक्षात्कार होईल. लोकांचे श्रम शक्य तेवढे

हलके करावे, मानवी शक्तीचा अकारण होणारा व्यय थांबवावा आणि स्वतःची सर्वांगीण उन्नति करून घेण्यासाठीं त्यांना आवश्यक ती फुरसत आणि साधनें सहज मिळावीं अशी तरतूद करणें हा औद्योगिक उत्पादनाचा आणि त्यामागील निर्दोष संघटनेचा आद्य हेतु आहे. यंत्रांमुळें अशा प्रकारें जी मानवी श्रमशक्ति कामाच्या कचाट्यांतून मुक्त होईल त्या सामर्थ्याला योग्य वळण देणें आणि उच्च पातळीवरील जीवन जगण्यांत लोकांना मदत व मार्गदर्शन करणें हें शिक्षणाचें ध्येय आहे. आणि या ध्येयाच्या रोखानें पावलें टाकण्यास अमेरिकेंतील शिक्षण-पद्धतीनें सुरुवातहि केली आहे. मानवाला ज्ञात असणाऱ्या एकूण एक विषयांचें आणि कलांचें ज्ञान बहुसंख्य लोकांना देऊं शकेल अशा प्रकारें अमेरिकेंतल्या लोकशाही शिक्षणक्रमांची आंखणी करण्यांत आली आहे. अलिकडच्या कांहीं तपांतली प्रगति उल्लेखनीय आहे आणि ही प्रगति याच वेगानें पुढें होत राहिली तर या शिक्षणाच्या संस्कारांनीं तयार होणाऱ्या मनोभूमींत मानवतावादी संस्कृतीचा नवा उन्मेष प्रफुल्लित होऊं शकेल. अमेरिकन जीवनावर केल्या जाणाऱ्या सांचेबंदपणाच्या आरोपाला आणि 'कीटक-मानव' तर्कटाला उत्तर देण्यासाठीं आणखी कांहीं विवेचन मी करणार आहें. कुठें अत्यंत सुखपूर्ण जीवन जगणारा आणि महत्त्वाचे सर्व सामाजिक हक्क उपभोगणारा अमेरिकन कामगार आणि कुठें अहर्निश काबाडकष्ट करून जमाखर्चाची जेमतेम तोंडमिळवणी करूं शकणारा पूर्वीचा कारागीर! सामाजिक मानवी जीवनाच्या या दोन प्रतिनिधींमध्यें जमीनअस्मानाचा फरक आहे. आजचा कामगार आपल्या व्यवसायाशीं त्या कारागिरासारखा जखडला गेलेला नाहीं. आपल्या कलेबद्दल आत्मीयता बाळगणारा आणि खूप परिश्रम करणारा निपुण कारागीर म्हणून ज्याला तुम्ही गौरवतां त्या कारागिरानें आपलें तनमन त्या व्यवसायावरून ओवाळून टाकलेलें आहे हें तुम्ही विसरतां. त्याचा व्यवसाय हेंच त्याचें जीवनसर्वस्व. पण अमेरिकन कामगाराचें तसें नाहीं. त्याच्या वेळाचा आणि व्यक्तित्वाचा एक अगदीं अल्प असा भागच कारखान्यांतील कामापायीं खर्च होतो. कोणत्याहि क्षणीं, अगदीं विनामायास तो एक नोकरी सोडून दुसरी धरूं शकतो, कोठल्यातरी नव्या व्यवसायांत प्रवेश करूं शकतो किंवा पूर्वीच्याच व्यवसायांतल्या निराळ्या दालनांत आपलें कर्तृत्व अजमावूं शकतो. एवढेंच नव्हे तर पूर्वीच्या व्यवसायाहून सर्वस्वीं भिन्न अशा प्रकारच्या नव्या जीवनक्रमाला तो प्रारंभ करूं शकतो. अमेरिकेची अर्थरचनाच अशी आहे कीं कांहीं विशिष्ट दर्जाचें कौशल्य ज्याच्या अंगीं आहे त्याला आपला व्यवसाय बदलणें मुळींच अवघड जात नाहीं. अमेरिकन माणूस इतक्या वेळां

आपलें घर आणि व्यवसायक्षेत्र बदलतो कीं त्याची ती नाचानाच पाहून आपण केव्हां केव्हां विस्मयानें थक्क होऊन जातों! कारखान्याला रामराम ठोकून तो नांगर हातांत घेतो, किंवा गुरें पाळतो, मनांत आलें तर दुकान उघडतो, सरकारी नोकरींत शिरून अधिकारी होतो...काय हवें तें करतो! समाजाच्या एका वर्गांतून तो दुसऱ्या वर्गांत जातो; प्रयोगशाळेंतील संशोधकाचा व्यापारी बनतो, ऑफिस-मधील हरकामी पोऱ्या म्हणून नोकरीला सुरवात करून त्याच कारखान्याचा प्रमुख संचालक बनतो किंवा आपल्या देशाचा वकील म्हणून परदेशांत जातो! पुष्कळदां आपणाला असें वाटूं लागतें कीं स्वतःचा असा याचा कोणताहि खास व्यवसायच नाहीं : फेकाल तिथें स्वतःच्या पायावर उभा राहूं शकेल असा तो खंवीर, कर्तबगार पुरुष आहे. सामाजिक स्वातंत्र्याचा एक नवा आदर्श अमेरिकेंत विकसित होईल असें मला यामुळें वाटूं लागतें.

**उत्तरपक्ष** : मला अमेरिका आवडत नाहीं आणि तिच्यावर मी विश्वास ठेवूं शकत नाहीं.

**पूर्वपक्ष** : असल्या वादविवादांत कोणत्या ना कोणत्या क्षणीं एक पक्ष तर्कशुद्ध प्रतिपादनाला रजा देऊन आपल्या आवडी-नावडी, आपले पूर्वग्रह यांच्या आहारीं जायचा हें ठरलेलेंच आहे! चर्चेचा समारोप करतांना मी एवढेंच सांगूं इच्छितों कीं माझी अमेरिकेवर श्रद्धा आहे, कारण कीं माझी मानवावर श्रद्धा आहे! नाहींतरी 'अमेरिका' म्हणजेच मानवाच्या सुप्त भवितव्याचा एक आविष्कार! ज्याबद्दल माणसानें आशा आणि अभिमान बाळगावा असाच भविष्यकाळ आज त्याच्यापुढें उभा आहे!

प्रकरण तिसरें

# पैसा आणि चांगला नागरिक

अमेरिकेंत 'छन् छन्'ची—लक्षावधि डॉलरांची—भाषा सदैव कानीं पडते. आणि अमेरिकनांच्या या द्रव्याच्या वेडाबद्दल अमेरिकेबाहेर त्याहूनहि अधिक चर्चा सुरू असते. संस्कृति, जीवनमूल्यें, राहणीचें मान यांचें, इतकेंच नव्हे तर व्यक्तींचें सुद्धां, मूल्यमापन करतांना अमेरिकन लोक डॉलरची मोजपट्टी वापरतात असा एक सार्वत्रिक समज आहे. अमेरिकेबद्दल युरोपमध्यें व्यक्त केल्या जाणाऱ्या मतांत नेहमींच असणारा अतिशयोक्तीचा भाग वजा केला तरीसुद्धां वरील विधान अधिक काळजीपूर्वक तपासून पाहणें अगत्याचें आहे. अमेरिकेंत मूळ ज्या वसाहती स्थापन झाल्या त्यांच्या बुडाशीं आर्थिक कारणें होतीं हें सत्य अद्याप कोणत्याहि इतिहासकारानें नाकारल्याचें आमच्या ऐकिवांत नाहीं. हेतुपूर्वक व पद्धतशीरपणें ग्रेट ब्रिटननें अमेरिकेंत भांडवल गुंतवलें आणि वसाहतवाल्यांना आदेश दिला कीं ज्यांमधून ग्रेट ब्रिटनला आपला पूर्ण हिस्सा मिळूं शकेल असे द्रव्योत्पादनाचे मार्ग निर्माण करणें हेंच प्रमुख वैशिष्ट्य डोळ्यासमोर ठेवलें पाहिजे. अशा प्रकारें पैशाच्या प्रश्नाभोवतींच इतर सर्व प्रश्नांचा विचार केंद्रित झालेला असे. स्वतंत्रपणें आपलें जीवन उभारण्याचें पैसा हेंच आद्य वसाहतवाल्यांचें एकमेव साधन होतें. सर्वस्वीं अनोळखी अशा नव्या परिस्थितीमध्यें आपली योग्यता सिद्ध करून देण्याचा पैसा हाच एक मार्ग होता. तेथें परंपरा नव्हती, संघटित समाज नव्हता, कोणत्याहि प्रकारचे वर्गभेद नव्हते...होत्या फक्त धडपडणाऱ्या साहसी व्यक्ती आणि अत्यंत सुपीक पण नांगराचा स्पर्शहि न झालेली जमीन !

अनेक आश्चर्यकारक योगायोगांमुळें अमेरिकेचा सुरवातीचा इतिहास उल्लेखनीय ठरला आहे. १७७५ मध्यें मॅसाच्युसेट्सच्या काव्यानुकूल रणभूमीवर अमेरिकेन क्रांतीचा प्रारंभ झाला. आणि बारच्या जुन्या पद्धतीच्या बंदुकांतून ज्या फैरी झडल्या त्या जागतिक महत्त्वाच्या दोन घटनांची नांदी ठरल्या. पुढें जागतिक सामर्थ्य संपादन करणाऱ्या एका राष्ट्राचा जन्म आणि आधुनिक

लोकशाही प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याचा पहिला प्रयोग! जगाच्या भवितव्यावर अत्यंत अनपेक्षित प्रभाव पाडणारी आणखीहि एक घटना त्याच वर्षी घडली.

अटलांटिकच्या त्या किनाऱ्याला (इंग्लंडमध्यें) राहणारा एक स्कॉच तरुण, जेम्स वॅट, हा वाफेवर चालणारें इंजिन पूर्णावस्थेस आणीत होता. सुधारलेल्या मानवापुढें या इंजिनानें एक अगदीं अकल्पित असें नवें आर्थिक आणि सामाजिक आयुष्य उभें केलें. अशा प्रकारें अमेरिकन क्रांति व औद्योगिक क्रांति आणि यंत्रशास्त्राच्या दोन प्रबळ शक्ति एकदम अवतीर्ण झाल्या, आणि त्यांनीं जगाचें स्वरूप पार पालटून टाकलें.

अमेरिकन राष्ट्र आणि त्याची नियंत्रक सभा यांचा जन्म व विकास औद्योगिक प्रगतीच्या हातांत हात घालूनच झाला आहे. अर्थशास्त्र हा त्यांचा मार्गदर्शक तारा आहे. पूर्वींसुद्धां पैसा हेंच या वसाहतींचें मुख्य उद्दिष्ट होतें आणि आतां तर डॉलर हेंच अमेरिकेच्या सर्व विजयांचें प्रतीक झालें आहे. या जंगलमय खंडांतल्या उद्योगधंद्यांच्या चक्रांना गतिमान् करणारी ती एक तरफ आहे. जमीन नांगरून तिची नैसर्गिक शक्ति मानवी नियंत्रणाखालीं आणणाऱ्या नांगरांमागील प्रेरक शक्ति म्हणजे पैसाच. जमीन म्हणजे अमाप संपत्तीची खाणच! पैशाच्या जोरावर कालवे, पूल, बोगदे, लोहमार्ग आणि रस्ते तयार केले जातात. बंदरें आणि भरभराटलेलीं शहरें अस्तित्वांत येतात. पैशाच्या किमयेनें वाळवंटाचें आणि जंगलांचें मनुष्यवस्तीस योग्य अशा अद्ययावत् नगरींत रूपांतर होतें. होय, पैसा म्हणजे प्रगतीचें आणि सांस्कृतिक विकासाचें एक साधन, अशीच अमेरिकन लोकांची धारणा आहे. म्हणूनच स्वतःच्या मालकीची संपत्ति हा एक सद्गुण मानला जातो. पैसा मिळविणारी व्यक्ति अमेरिकन समाजाचा द्वेष ओढवून घेत नाहीं कीं समाजाची अशा व्यक्तीविरुद्ध खप्पा मर्जीहि होत नाहीं. मात्र हा पैसा प्रामाणिकपणानें मिळविलेला असला पाहिजे आणि उत्पादनवाढ व सामाजिक प्रगतीच्या कामीं त्याचा विनियोग झाला पाहिजे.

चालू शतकाच्या सुरवातीला तत्त्वज्ञानाचा जर्मन प्राध्यापक ह्यूगो मन्स्टरबर्ग यानें अमेरिकेच्या तत्कालीन स्थितीबद्दल 'द अमेरिकन्स' (न्यूयॉर्क १९१४) या आपल्या पुस्तकांत कांहीं मार्मिक विधानें केलीं आहेत. त्यावेळीं सबंध अमेरिकेवर भांडवलशाहीचा वादातीत पगडा होता. स्वतःच्या निढळाच्या घामानें जर त्यानें पैसा मिळवला असेल तरच अमेरिकन माणसाला त्याबद्दल अभिमान वाटतो असें मन्स्टरबर्गचें मत आहे. उदाहरणार्थ : 'हुंडा' ही संस्था त्या देशांत जवळ जवळ अज्ञात आहे. पैशासाठीं लग्न करण्याची युरोपांत सर्रास प्रचलित

असलेली चाल पाहून अमेरिकनांना कमालीचें आश्चर्य वाटतें. उलट श्रीमंत कुटुंबांत जन्मलेल्या मुलीनें निष्कांचन तरुणाशीं लग्न करणें व त्याच्याबरोबर हलाखींत दिवस काढणें ही तर अमेरिकेंत नित्याची गोष्ट आहे असेंच कोणताहि अमेरिकन तुम्हांला सांगेल. सासऱ्याकडून पैसे घेऊन आपल्या संसाराचा गाडा चालविणें हें त्या नवऱ्याला कमीपणाचें वाटेल. जो अमेरिकन आपल्या व्यवसायांत किंवा लोकहिताच्या क्षेत्रांत अत्यंत सालसपणें काम करीत नाहीं त्याला समाजांत मान मिळूं शकत नाहीं, मग तो कितीहि श्रीमंत असो. अमेरिकेच्या अर्थजीवनांत आदर्शवाद आहे असें या जर्मन पंडिताला आढळून आलें. अमेरिकेच्या आर्थिक उद्योगांमागें संपत्तीद्वारा समाजाची सेवा करण्याची प्रेरणा आहे. आपल्या अंगचें कर्तृत्व आणि साहसी वृत्ति यांच्या जोरावर व्यवसायांत अग्रेसरत्व मिळविण्याचा प्रत्येक अमेरिकन मनापासून प्रयत्न करील पण अशा मिळविलेल्या संपत्तीचा नुसता संचय करीत बसण्याकडे त्याची प्रवृत्ति असत नाहीं. सार्वजनिक हिताच्या कामांसाठीं तो मुक्तहस्तानें पैसे खर्च करतो, आणि जेव्हां त्याला धंद्यांत खोट येते तेव्हांसुद्धां तो खिलाडू वृत्तीनें तें नुकसान सोसतो. अमेरिकन माणसाच्या या स्वभाववैशिष्ट्याचें वर्णन करतांना (कांहींशा ऐसपैस शब्दांत) मन्स्टरबर्ग म्हणतो, "एकादा प्रतिभावान् चित्रकार आपलें चित्र मूल्यवान् व्हावें म्हणून जसे कष्ट घेतो तेच कष्ट अमेरिकन व्यापारी पैसा मिळवितांना घेतो. त्या कलावंताच्या चित्राला मिळणारी मोठी किंमत म्हणजे त्याची कला सर्वांना अत्यंत आवडल्याचें सूचक प्रतीक असतें." (हेन्री स्टील कोमेजर यांच्या 'अमेरिका इन् पर्स्पेक्टिव्ह' या पुस्तकांत मन्स्टरबर्गचें हें विधान उद्धृत केलें आहे.)

कोणताहि निःपक्षपाती निरीक्षक अमेरिकेवर हावरेपणाचा आरोप करूं शकणार नाहीं असें मला वाटतें. १९१४ सालच्या परिस्थितीपेक्षां सद्यःस्थितींत हें विधान अधिक प्रकर्षानें सार्थ ठरेल. संपत्तींत आणि आर्थिक नफ्यांत वाढ व्हावी यांसाठीं इतके सुसूत्र व कळकळीचे प्रयत्न जगांतल्या इतर कोणत्याहि देशांत सुरू असल्याचें दिसत नाहीं. आणि तरीहि अमेरिकेव्यतिरिक्त इतर कोणत्याच देशांत सामाजिक व सांस्कृतिक कार्यांसाठीं इतक्या अमर्याद उदारपणें आणि निःस्वार्थीपणें पैसे खर्च केले जात नाहींत.

लहानमोठे खाजगी व्यापारी व कारखानदार यांच्याकडून मिळालेल्या वर्गणीच्या आधारावर सुरू असणारीं कितीतरी विश्वविद्यालयें, वैज्ञानिक प्रयोग शाळा आणि धर्मांच्या विविध संस्था अमेरिकाभर विखुरलेल्या आढळतात. कलाप्रदर्शनें, वैज्ञानिक व ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयें, हजारों नाट्यगृहें, सांस्कृतिक,

शैक्षणिक आणि बलसंवर्धन क्षेत्रांत काम करणाऱ्या असंख्य संस्था या सर्वांना असेंच उदार साहाय्य मिळतें. एकाद्या वस्तुसंग्रहालयाच्या किंवा अन्य सामाजिक संस्थेच्या प्रवेशद्वारावर पुढील सूचनाफलक तुम्हांला अनेकदां आढळेल:

"संस्थेला ×××× लक्ष डॉलरची तूट येत आहे" (किंवा)

"आवश्यक दुरुस्त्या आणि तत्सम खर्चासाठीं संस्थेला अमुक अमुक रकमेची जरुरी आहे. ही रक्कम संस्थेला द्यावी अशी जनतेला विनंति आहे."

या सूचनेनंतर पुष्कळदां संस्था ज्या उदात्त कार्यासाठीं स्थापन झाली असेल त्या कार्याचें वाचकाला स्मरण करून देणारा मजकूर लिहिलेला असतो. जनतेच्या कर्तव्यबुद्धीलाहि त्यांत अनेकदां आवाहन केलेलें असतें. आणि जनताहि या आवाहनाची दखल घेते. कोणी आपली सारी जायदाद देऊन टाकतो तर कोणी अवघा एक डॉलर देऊं शकतो. आपापल्या ऐपतीप्रमाणें प्रत्येकजण साहाय्य करीत असतो. पैशांची आणि श्रमांची मदत करण्यासाठीं लोक आपणहून पुढें येतात. दातृत्वाची भावना त्यांच्या जीवनांत खोलवर रुजली आहे. अमेरिकेंत अगदीं सुरवातीपासून या दिशेनें शिक्षण देण्याचे जे सुजाण आणि अविरत प्रयत्न झाले आणि होत आहेत त्यांचें हें श्रेय होय. समाजऋणाची व त्याबाबतच्या स्वकर्तव्याची प्रत्येकाला जाणीव राहील असें योजनाबद्ध शिक्षण अमेरिकेंत सर्वांना मिळतें. 'आदर्श नागरिक' तयार करणें हें अमेरिकेचें सामाजिक ध्येय आहे.

अमेरिकेंत असतांना, आदर्श नागरिकाची तुमची व्याख्या काय, असें मी नेहमीं विचारीत असें. बहुतेकांना या व्याख्येची तितकीशी सुस्पष्ट कल्पना नसे. पण एक गोष्ट मात्र माझ्या ध्यानांत आली ती ही कीं नेहमीं सत्कार्य करीत राहण्याच्या ग्रीक कल्पनेशीं अमेरिकन लोकांची आदर्श नागरिकाची कल्पना मिळतीजुळती आहे. अमेरिकनांना अभिप्रेत असणाऱ्या 'सत्कार्य'-कल्पनेंत सामाजिक उपयुक्ततेचें स्थान मोठें आहे. 'चांगल्या नागरिकाच्या प्रतिज्ञा' या शीर्षकाखालीं माझ्या वाचनांत जो मजकूर आला तो अशा व्याख्येचा एक चांगला प्रयत्न आहे असें मला वाटतें. ही व्याख्या परिपूर्ण नसेल, पण तींत खूप अर्थ भरलेला आढळेल. १९५० सालीं कोणत्याशा स्मृतिदिनाच्या समारंभांत पेनसिल्वेनियामधील 'ॲलनटाउन' या शहरांतील नागरिकांनीं या प्रतिज्ञांचा अभिमानपूर्वक अंगीकार केला. त्या प्रतिज्ञा अशा:

"(१) सर्व निवडणुकांमध्यें मी मतदान करीन. (२) बोलावलें जाईल

त्या त्या वेळीं मी पंच (ज्यूरी) म्हणून काम करीन. (३) मी कायद्यांचा मान राखीन आणि त्यांचें पालन करीन. (४) समजूतदारपणें मी माझे सर्व कर भरीन. (५) मी शांततेसाठीं कार्य करीन. पण युद्धाचा प्रसंग आलाच तर मी माझें त्या प्रसंगींचें कर्तव्य पार पाडीन आणि राष्ट्रध्वजाचा आदर करीन. (६) वंश, वर्ग किंवा धर्म यांवर आधारलेल्या पूर्वग्रहांना मी मनांत थारा देणार नाहीं. (७) माझ्या समाजांतील शाळांच्या सुधारणांसाठीं मला करतां येण्यासारखे आहेत तेवढे सर्व प्रयत्न मी करीन आणि अशा प्रकारें देशाच्या मोफत सार्वजनिक शिक्षणपद्धतीला हातभार लावीन. (८) माझ्या समाजाचें दैनंदिन जीवन अधिकाधिक सुखकर व्हावें यासाठीं मी प्रयत्न करीन. (९) आदर्श नागरिकत्वाचीं तत्त्वें शिकविण्यास आणि ती आचरणांत आणण्यास मी माझ्या घरापासून प्रारंभ करीन."

वरीलपैकीं अखेरच्या तीन प्रतिज्ञा खास अमेरिकन स्वभाववैशिष्ट्यांच्या द्योतक आहेत. इतर प्रतिज्ञा थोड्याफार फरकानें सर्वच लोकशाही राष्ट्रांना समान आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. त्या सर्वत्र अगदीं काटेकोरपणें पाळल्या जातातच असें नाहीं. कायद्याचें पालन करणारा, प्रतिष्ठित, आपल्या नित्यव्यवसाया-नंतर उरणारा वेळ निःस्वार्थपणें सामाजिक कार्यासाठीं देणारा, शाळा-विश्वविद्यालयें यांच्या प्रगतीची आणि आपल्या बांधवांच्या शिक्षणाची काळजी वाहणारा आणि समाजोन्नतीच्या इतरहि अनेक कार्यांना साहाय्य देणारा, तो 'चांगला नागरिक' असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. या नागरिकांच्या मुलांवरहि हे संस्कार झालेले असतात. आपल्या बांधवांच्या उन्नतीसाठीं तो यथाशक्ति सव प्रकारच्या सार्वजनिक कार्यांत भाग घेत असतो. अमेरिकन माणूस म्हणजे उत्साहाचा मूर्तिमंत पुतळाच. आपली अमाप संपत्ति ज्याप्रमाणें तो सत्कार्यासाठीं खर्च करतो त्याप्रमाणें आपला हा उदंड उत्साहहि तो सत्कारणीं लावतो.

समाजाभिमुख संस्कृतींतील हा पुरुषोत्तम आणि इंग्लंडमधील परावलंबी 'सभ्य गृहस्थ' (Gentleman) हीं दोन परस्परविरोधी चित्रें आहेत. 'सुजाण अमेरिकन नागरिक' संपूर्णपणें स्वावलंबी आहे. अर्थात् समाजाचे हे दोन प्रतिनिधि अगदीं भिन्न वातावरणांत उत्क्रांत झाले आणि त्यामुळेंच त्या दोघांत एवढी तफावत आहे. दोघांचीं मूल्येंहि वेगळीं आहेत. 'चांगला नागरिक' हा सरकारी किताब नसला तरी ती एक सामर्थ्यशाली संस्था झाली आहे. असा नागरिक ही एक सामाजिक शक्ति झाली आहे. एकाद्या बड्या सरकारी

अधिकाऱ्याइतकाच आपलाहि प्रभाव हा अधिकारी पाहूं शकतो. सरकार आणि घटकराज्य यांच्या बरोबरीनें सुरू असलेले या नागरिकाचे लोकहिताचे निष्काम प्रयत्न पाहिले म्हणजे सामुदायिक हिताकरितां, सामाजिक स्थिरतेसाठीं आणि सामान्य लोकांच्या प्रगतीच्या दिशेनें व्यक्तीला लोकशाही पद्धतीनें प्रत्यक्षकार्य करणें कसें शक्य आहे हें समजतें.

# देश आणि स्वभाव

आपला मुख्य हेतु कांहीं अमेरिकेवर टीका करण्याचा नव्हता, यूरोपवर आणि एकंदर पाश्चात्य संस्कृतीवर भावी काळांत अमेरिकेचा काय परिणाम होईल यासंबंधीं निष्कर्ष काढणें एवढाच आमचा उद्देश होता असें अमेरिकन जीवनाचे युरोपांतले अभ्यासक वरचेवर स्पष्ट करतात. मग हे अभ्यासक द तॉकेव्हिले याच्याप्रमाणें अमेरिकेबद्दल स्नेहभाव बाळगणारे असोत किंवा जॉर्ज डयूहॅमेल-सारखे अतिरेकी टीका करणारे आणि अमेरिकेबद्दल मनांत द्वेष बाळगणारे आणि विरोधक असोत. राजकारण आणि सामाजिक अर्थशास्त्र या क्षेत्रांत अमेरिकेनें युरोपला कितीतरी मागें टाकलें आहे हें या अभ्यासकांना कळून चुकलें आहे. शेष जगासाठीं आतां अमेरिका प्रयोग करीत आहे, समस्या सोडवीत आहे, अपरिहार्यपणें इतर जुन्या राष्ट्रांशीं उद्भवणाऱ्या संघर्षाला तोंड देत आहे, प्रगतीच्या मूल्यमापनाचीं नवीं परिमाणें निर्माण करीत आहे....... कांहींना हीं परिमाणें कल्याणकारी वाटतात तर कांहीं भयानें त्यांचा अव्हेर करतात.

या दृष्टिकोणांतून पाहतांहि अमेरिकेमधील प्रवास अतिशय उद्बोधक ठरल्याशिवाय राहणार नाहीं. अमेरिकेंतून प्रवास करतांना जणुं कांहीं आपण एखाद्या परीकथेंतल्या विश्वांतून हिंडत आहों असें वाटतें. आपण भविष्यकाळांत तर अवगाहन करीत नाहीं ना या विचारानें मन झपाटतें. आपल्याला ज्ञात असणाऱ्या जीवनक्रमाच्या अतीत भासणारीं जीवनदृश्यें आपल्याला पाहायला मिळतात. पण अमेरिकेचें आजचें हें बहुरंगी स्वरूप नीट कळावें यासाठीं प्रथम ज्या अनोख्या परिस्थितीमुळें तिला ही विलक्षण विविधता प्राप्त झाली त्या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचा शोध घेतला पाहिजे. कारण ज्या परिस्थितीच्या मुशींत अमेरिका घडली तशी परिस्थिति युरोपच्या इतिहासांत आपल्याला कोठेंच आढळत नाहीं.

अमेरिकेविषयीं आपलें मत बनविण्यापूर्वीं त्या देशाच्या विस्ताराकडे एकदां

नजर टाकावी, हें आपल्या अनेकदां कानीं येणारें विधान आहे. आणि त्याची पुनरुक्ति येथें अस्थानीं ठरणार नाहीं इतकें तें महत्त्वाचें आहे. मूल्यमापनाची नेहमींचीं परिमाणें येथें कुचकामाचीं ठरतात कारण (युनायटेड स्टेट्स ऑफ) अमेरिका हें नांवाप्रमाणें खरोखरीच अनेक राष्ट्रांचें मिळून बनलेलें एक राष्ट्र आहे. एक स्वतंत्र खंड शोभेल अशी या देशाची लांबी रुंदी व भौगोलिक परिस्थिति आहे. नेहमींच वापरांत असणारे हे शब्दप्रयोग असतील कदाचित्, पण पुस्तकी सिद्धांत ठाऊक असणें निराळें आणि परिस्थितीचें प्रत्यक्ष अनुभवानें ज्ञान घेणें निराळें. आतां टेक्सासचेंच उदाहरण घ्या. सिनेमांत जें कांहीं दिसलें असेल किंवा वर्तमानपत्रांत कोठें वाचलें असेल त्यापलीकडे युरोपमधल्या सामान्य माणसाला या प्रदेशाची काय माहिती आहे? सबंध फ्रान्सपेक्षांहि टेक्सास विस्तारानें बराच मोठा आहे ही वस्तुस्थिति त्याच्या कधीं डोक्यांत आहे आली का? कॅलिफोर्निया, मॉंटाना आणि न्यू मेक्सिको हें प्रत्येक घटक राज्य इटलीपेक्षां मोठें आहे. कोलोरॅडो हें मध्यम आकाराचें राज्य घेतलें तरी तें ग्रेट ब्रिटनहून मोठें भरेल. स्वीडन आणि ग्रीस यांच्यामध्यें जितकें अंतर आहे, जवळजवळ तितकेंच अंतर मेन आणि फ्लॉरिडामध्यें आहे. माद्रिद ते मॉस्को या अंतरापेक्षां न्यूयॉर्क ते सान फ्रान्सिस्को हें अंतर मोठें आहे.

अमेरिकेची अपरंपार संपत्ति आणि तेथील उलाढालींचें स्वरूप यांचें रहस्य त्या देशाच्या खंडप्राय विस्तारांत आहे. हा अवाढव्य विस्तार हें अमेरिकेच्या उत्पादन-सामर्थ्यामागील एक महत्त्वाचें कारण आहे. मोटार एका वस्तीपासून दुसऱ्या वस्तीपर्यंत असे साठ साठ मैल अंतर कापीत गेली तरी शहर संपून मोकळें माळरान कां आढळत नाहीं तें या विस्तारावरून ध्यानांत येईल. चाळीस, सत्तर, एवढेंच काय पण शंभर शंभर मजल्यांच्या गगनचुंबी इमारती कशासाठीं हेंहि त्यामुळें उमगेल. यांतल्या कांहीं इमारती तर आयफेल टॉवरपेक्षांहि उंच आहेत. रोजचीं शंभरपानी वृत्तपत्रें, मोटारींचा सुळसुळाट, दररोज शेकडों गाड्यांची आवकजावक चालणारीं अचाट रेल्वे स्टेशनें या साऱ्यांचें कारण म्हणजे अमेरिकेचा अकटोपासून विकटोपर्यंतचा विस्तार! या विस्ताराच्या परिणामांनींच अमेरिकन जीवनाचें स्वरूप आणि तेथील भांडवलाची रचना निश्चित झाली आहे. युरोप म्हणजे लहानमोठ्या अशा सुमारें वीस स्वतंत्र राष्ट्रांची खिचडी आहे. त्यांच्यांत एकसारखे कलह सुरू असतात. प्रत्येकाची अर्थव्यवस्था वेगळी, चलनें निराळीं, ज्यानें त्यानें स्पर्धेच्या भीतीनें आपल्या देशांतर्गत बाजारपेठेसभोवतीं आयात निर्यात करांचे तट उभारलेले! अमेरिकाहि

या युरोपसारखी असती तर तिला आजचें वैभव व सामर्थ्य कधींहि प्राप्त झालें नसतें. कारण असे दहा तोंडें दहा दिशांना असलेले देश कधीं आजच्या अमेरिकेइतकें उत्पादन-सामर्थ्य व जीवनमान संपादन करतील हें सर्वथैव अशक्यच ! त्यांच्या स्थानिक लढयांचा विचार क्षणभर दृष्टीआड केला तरी त्यांचा आकारच असा टीचभर आहे कीं अमेरिकेच्या शतांशानेंहि मजल मारणें त्यांना शक्य नाहीं.

अशाच मोठ्या आकाराचे आणि जवळजवळ अथांग अशी नैसर्गिक संपत्ति असणारे इतर कांहीं देश आहेत. पण हें सगळें असलें तरी त्यांची अमेरिके-बरोबर कधींच तुलना होऊं शकणार नाहीं. उदाहरण घ्यायचें झालें तर ब्राझील हा देश आकारानें अमेरिकेहून मोठा आहे. नैसर्गिक संपत्तींतहि तो अमेरिकेपेक्षां समृद्ध ठरेल. तसें पाहतां अमेरिकेंत येण्यापूर्वीं शंभर वर्षें वसाहतवाले प्रथम ब्राझीलमध्यें गेले होते. अवघ्या चाळीस लक्ष लोकवस्तीच्या स्वातंत्र्ययुद्धकालीन (उत्तर) अमेरिकन संघराज्यानें आज लोकसंख्या सोळा कोटी होईपर्यंतच्या काळांत जी प्रगति केली ती करण्यास केवळ आकार आणि नैसर्गिक संपत्ति असून भागत नाहीं हेंच ब्राझीलच्या उदाहरणावरून सिद्ध होतें. अखेरपक्षीं माणसाचें कर्तृत्व, त्याचा स्वभाव, त्याची कुवत, त्याची जिद्द यांवरच त्याचें वैभव अवलंबून असतें हें यावरून निर्विवाद सिद्ध होतें.

ज्याच्याविषयीं आपल्याला अगदीं सर्वांगीण माहिती आहे अशा एकाद्या छोटया राष्ट्राचा सुद्धां स्वभाव यथार्थपणें रेखाटण्याचा प्रयत्न करणें हें एक महाकठीण काम आहे. कधीं कधीं तर खुद्द आपल्या देशांतले लोकच अशा अनपेक्षित रीतीनें वागतात कीं आपण क्षणभर दिङ्मूढ होऊन जातों. आणि त्यांच्याविषयींच्या आपल्या पूर्वीच्या मतांचा फेरविचार करणें आपल्याला भाग पडतें. लोकांचें असें वागणें ही मानवी जीवनांतील घडामोडींच्या उच्छृंखलतेची चुणुक होय. असें जर आहे तर मग अद्याप झपाटयानें उत्क्रांत होत असलेल्या, जेथें भिन्न भिन्न राष्ट्रांतील लोक एकत्र आले आहेत, ज्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमि वेगवेगळी आहे, अशा जगांतल्या एका अत्यंत मोठ्या देशाच्या राष्ट्रीय स्वभावाची व्याख्या करणें किती दुष्कर असेल याची कल्पनाच केलेली बरी ! पण ही अडचण लक्षांत घेऊनसुद्धां मला असें वाटतें कीं अमेरिकेला स्वतःचा असा विशिष्ट स्वभाव आहे. अमेरिकेची अशी कांहीं खास प्रवृत्ति आहे. जीवनाकडे आणि समाजाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोण आहे. खूपच गुंतागुंतीची पण सुसूत्र अशी आवडीनावडींची ठेवण आहे. उपजत प्रतिक्रिया

आहेत. विचारांची आणि कल्पनांची विशिष्ट पद्धति आहे. बऱ्यावाइटाच्या कल्पना आहेत. वागणुकीचे आडाखे आहेत. सर्वांच्या स्वभावांत अगदीं खोलवर मुरलेल्या अशा संवयी, चालीरीती आणि नीतिकल्पना आहेत.

अमेरिकन स्वभावाची सर्वस्पर्शी व्याख्या करण्याचा किंवा तद्विषयक एकादा सिद्धान्त मांडण्याचा माझा प्रस्तुत हेतु नाहीं. अमेरिकन स्वभावांतल्या कांहीं मुख्य पैलूंचें वैशिष्ट्य प्रत्यक्ष व्यवहारांतलीं उदाहरणें घेऊन विशद करण्याचा माझा प्रयत्न आहे. या स्वभावप्रवृत्तीचें स्वरूप आणि तें घडविणारे संस्कार यांचा त्रोटक इतिहास पुढील प्रकरणांत आढळेल. दैनंदिन जीवनक्रमांत या प्रवृत्तींचा प्रत्यय कसा येतो याची आणि ह्या जीवनक्रमाच्या कांहीं खास विशेषांची चर्चाहि या प्रकरणांतून केली आहे. अमेरिकन स्वभावाचें, निदान मला आकलन झालेल्या अमेरिकन स्वभावाचें, सुगम चित्र या प्रकरणांतून वाचकाला पाहायला मिळेल अशी मला आशा वाटते. मुख्यतः सहा मुद्द्यांकडे आपण विशेष लक्ष दिलें पाहिजे असें मला वाटतें. पहिला म्हणजे अमेरिकनांची ऐतिहासिक पार्श्वभूमि आणि 'राष्ट्र' या शब्दाचा अमेरिकन अर्थ. प्युरिटनांची अमेरिकन संस्कृतीवर पडलेली छाप हा दुसरा मुद्दा. आद्य वसाहतवाल्यांचें जीवन आणि एकसारखी विस्तृत होत जाणारी 'सरहद्द' हा तिसरा. चौथा मुद्दा : लोकशाहीची अमेरिकेची कल्पना. संघराज्याची भावना हा पांचवा मुद्दा. जागतिक समाजाकडे आणि जागतिक अर्थरचनेकडे झुकणारी, खंडाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत विस्तारलेली अशी एकसारखी वाढत जाणारी उत्पादनसंघटना निर्माण करण्याची अमेरिकनांची जिद्द हा शेवटचा सहावा मुद्दा.

वरील सहा मुद्दे म्हणजे अमेरिकन स्वभावाचा फक्त अंशात्मक भाग आहे याची मला जाणीव आहे. पण हे घटक मूलभूत स्वरूपाचे आहेत आणि त्यांपैकीं एकादा जरी गळता तरी मग अमेरिका ही अमेरिका राहिली नसती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलक्रमांक
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# नव्या मुशींत

अमेरिकन जगांत पाऊल टाकलें कीं प्रथम आपल्या मनावर ठसलेल्या अनेक व्याख्यांची फेरजुळणी करावी लागते. अशी पहिली व्याख्या म्हणजे 'राष्ट्र' या शब्दाची. नव्या (अमेरिकन) जगांत 'राष्ट्र' याला खूपच निराळा अर्थ प्राप्त झाला आहे.

जितक्या प्राचीन काळापर्यंतचा वेध मानवी बुद्धीला घेतां आला आहे त्या काळापासून जे एका रक्ताचे, एकच पूर्वेतिहास असलेले, समान परंपरांना मान देणारे, पूर्वकाळांतल्या विशिष्ट घटनांच्या समान स्मृति ज्यांच्या मनांवर ठसल्या आहेत असे, ज्यांचे पूर्वज एक, त्यांनीं भोगलेल्या हालअपेष्टा आणि मिळविलेले विजय यांचाहि ज्यांना सारखाच अभिमान अशा लोकसमूहाची वस्ती असणारा देश म्हणजे 'राष्ट्र' अशी राष्ट्र शब्दाची कल्पना आम्हां युरोपवासीयांत मध्ययुगाच्या उत्तरार्धापासून प्रचलित आहे. एकाच भूतकाळांत जिचीं पाळेंमुळें खोलवर रुजलीं आहेत अशी राष्ट्रीयत्व ही एक सामूहिक भावना आहे.

अमेरिकेंत कोठें कोठें आपल्याला सारखेपणा दिसतो तो निव्वळ स्थानिक स्वरूपाचा असतो किंवा नागरिकांच्या विशिष्ट गटापुरताच मर्यादित असतो, सबंध अमेरिकाभर तुम्हांला त्याचा प्रसार कधींच आढळणार नाहीं. आणि तरीहि अमेरिका हें एक 'राष्ट्र' आहे. विसाव्या शतकांत जेव्हां जेव्हां आणीबाणीचे प्रसंग निर्माण झाले तेव्हां तेव्हां आपल्या 'राष्ट्र'त्वाचें वादातीत आणि सामर्थ्य-शाली सत्यदर्शन तिनें जगाला घडविलें आहे व आपल्या अभेद्य एकजुटीची प्रतीति आणून दिली आहे. विविध राष्ट्रीयत्वाच्या व्यक्तींनीं मिळून बनलेल्या अमेरिकन जनतेच्या एकजुटींत आपण फाटाफूट निर्माण करूं शकूं अशा भ्रामक कल्पनेवर दुसरा विल्हेल्म आणि हिटलर यांनीं कांहीं मनोरथ रचले. जग जिंकण्याची या दोघांची महत्त्वाकांक्षा होती. अमेरिकेमध्यें अमेरिकन नागरिक म्हणूनच राहणाऱ्या ॲंग्लोसॅक्सन आणि जर्मन वंशांच्या जमातींत आपण यादवी माजवूं शकूं असा या दोघांचा बेत. पण या तर्कामधल्या गफलतीची त्यांना जबर किंमत द्यावी लागली. अमेरिकनांच्या एकजुटीमागचें रहस्य अखेरपर्यंत त्यांच्या

डोक्यांत शिरलें नसेल कदाचित्. एवढें मात्र खरें कीं अमेरिका हा एक अत्यंत थोर देश—किंवा अनेक देशांचा समूह—आहे आणि त्या देशांत अत्यंत दृढ अशी राष्ट्रीयत्वाची भावना रुजली आहे. पण या राष्ट्रीयत्वाचा उद्गम आणि त्याचें स्वरूप मात्र आपल्या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेहून फार वेगळें आहे. १७७६ सालीं आपलें स्वातंत्र्य घोषित करणाऱ्या तेरा वसाहतींत मुख्यतः इंग्लिशांचा भरणा होता. इतस्ततः विखुरलेले असे कांहीं इतर राष्ट्रांचे लोकहि अर्थातच त्यांत होते. पण त्यांची संख्या अल्प होती. न्यूयॉर्कमध्यें डच होते, पेनसिल्वेनियांत जर्मन, दक्षिण कॅरोलिनामध्यें फ्रेंच ह्युजिनॉट, इत्यादि. पण इंग्लिश बहुसंख्य होते आणि प्रादेशिक स्वभावावर त्यांची छाप पडली. भाषा इंग्लिश होती. चालीरीतीहि इंग्लिश होत्या. कायदा आणि अन्य संस्थाहि इंग्लंडच्या धर्तीवरच होत्या. राष्ट्राची त्यावेळची जाणीवहि खास इंग्लिश वळणाची होती. या राज्यक्रांतीच्या आधीं अवघ्या १५ वर्षांपूर्वी हे वसाहतवाले—त्यांत जॉर्ज वॉशिंग्टनहि होता—ग्रेटब्रिटनमधील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, जणुं कांहीं एकाच राष्ट्रांतले असल्याप्रमाणें, कानडावरील फ्रेंचांचें वर्चस्व नष्ट करण्यासाठीं लढले होते. राज्यक्रांतींत परिणत झालेल्या कांहीं आरंभींच्या घटना म्हणजे वसाहतवाल्यांतल्या मामुली चकमकी होत्या. इंग्लंडमध्यें आधींच्या शतकांत झालेलें यादवी युद्ध, आपल्या राजकीय हक्कांचें अतिक्रमण करणारा त्यांचा राजा याबद्दलच्या आठवणी त्यांच्या मनांत अजून ताज्या होत्या.

पण 'ब्रिटिश' गणल्या जाणाऱ्या या वसाहतवाल्यांत एक नवें, वैशिष्ट्यपूर्ण, स्वतंत्र असें राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व अगदीं त्या काळांतसुद्धां आकार घेत होतें. राज्यक्रांतीनें हें स्वरूप ठसठशीत स्वरूपांत प्रकट केलें. त्यावेळचे कांहीं कल आणि ठेवणी अजूनहि कायम आहेत आणि आजच्या अमेरिकेच्या स्वरूपांत त्यांचें फार महत्त्वाचें स्थान आहे हें मुद्दाम लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अमेरिकेंत स्थायिक झालेला एक फ्रेंच लेखक द क्रिवेकुर यानें १७७० ते १७८६ च्या दरम्यान जे तीन ग्रंथ लिहिले त्यांत वरील विधानाचा उत्तम पडताळा मिळतो. हे ग्रंथ इंग्लिश आणि फ्रेंच दोन्ही भाषांत पत्ररूपानें लिहिलेले आहेत. त्यांत लेखकानें या नवजात राष्ट्राविषयीं खूप माहिती आणि वर्णनें दिलीं आहेत. शांततेच्या आणि युद्धाच्या काळांत अमेरिकेंत काय परिस्थिति होती, तिचा लेखकाच्या मनावर काय परिणाम झाला हेंहि त्यानें सांगितलें आहे. स्वतंत्र बुद्धीनें केलेली टीकाहि त्यांत आहे. अमेरिकन लोकांची राष्ट्रीय आणि सामाजिक घडण यांसंबंधीं महत्त्वपूर्ण माहिती देणारे हे पहिले ग्रंथ होत.

आपल्या नव्या देशाचा लेखकाला अभिमान वाटतो आणि या देशाकडे तो अगदीं सुस्पष्ट व्यवहारी दृष्टिकोणांतून पाहतो. इंग्लंडमधून किंवा युरोपमधल्या इतर देशांतून वास्तव्यासाठीं अमेरिकेंत येणाऱ्या गरीब देशांतरिताची मनःस्थिति तो अगदीं साध्या शब्दांतून व्यक्त करतो. दारिद्र्य, विषमता, जुल्म, प्रबळांकडून दुर्बळांची केली जाणारी अवहेलना या सर्वांमुळें गांजलेला हा निर्वासित नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं अमेरिकेचा रस्ता धरतो. आणि तिथें हळूहळू ऊर्जितावस्थेला येतो. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय यांच्या उत्साहपूर्ण वातावरणांत प्रथमच त्याला मनुष्याचें आयुष्य जगायला सांपडतें आणि स्वतःच्या जीवनाबद्दल व कर्तृत्वाबद्दल नव्या विशाल आकांक्षा त्याच्या मनांत स्फुरण पावूं लागतात. आपलें कर्तृत्व दाखविण्यास आणि स्वतःची प्रगति करून घेण्यास चोहींकडे अमर्याद वाव आहे असें त्याला आढळतें. अंग मोडून काम करण्याची तयारी आणि देशाच्या कायद्याबद्दल आदर एवढें असलें म्हणजे पुरे. युरोपांत ज्याचें अस्तित्वहि कुणाच्या लेखी नव्हतें असा हा माणूस. मग ज्या देशानें त्याला नागरिकत्वाचे संपूर्ण हक्क दिले, आपल्या चिरसमृद्ध समाजाचा एक सन्माननीय घटक बनवलें त्या देशाबद्दल त्याला अनन्य प्रेम आणि निष्ठा कां नाहीं वाटणार ? राष्ट्रांतील कायद्यांशीं आणि संस्थांशीं नागरिकाचें असलेलें नातें अशा शुद्ध राजकीय स्वरूपांत आपल्याला इतिहासांत अमेरिकन देशभक्तीचें दर्शन घडतें. आपले जुने देश सोडून नव्या देशांत आलेल्या व्यक्तींना जोडणारा हा एक दुवा आहे.

द क्रिव्हेकुरनें आपल्या द्रष्ट्या प्रज्ञेनें १७८१ मध्यें लिहिलेला पुढील उतारा पाहा :—"अमेरिकन—हा नवा माणूस—म्हणजे नेमकें काय आहे ? तो एक युरोपवासीय तरी आहे किंवा तिथल्या रहिवाशांचा वंशज तरी आहे. मी तुम्हांला असा एक मनुष्य दाखवूं शकेन कीं ज्याचे आजोबा इंग्लिश होते, बायको डच होती, मुलानें फ्रेंच युवतीशीं लग्न केलें आणि चार नातवंडांच्या चारहि बायका निरनिराळ्या देशांतल्या आहेत. आपल्या सर्व प्राचीन चालीरीती आणि पूर्वग्रह सोडून दिलेला असा हा अमेरिकन आहे. एका नव्या जीवनपद्धतीचा त्यानें अंगीकार केला आहे, नव्या शासनसंस्थेच्या कायद्यांचें तो पालन करतो, आणि एक नवी जबाबदारी पार पाडतो. या सर्वांमधूनच त्याला नव्या चालीरीतीहि मिळतात. विशाल अमेरिकेनें त्याला आपला म्हणून जवळ केल्याबरोबर तो अमेरिकन होतो. अनेक राष्ट्रांमधून आलेल्या व्यक्ति इथें मानववंशाच्या एका नव्या मुशींत ओतल्या जातात; या नव्या मानवांचे श्रम आणि भवितव्य

एक दिवस जगांत आश्चर्यकारक बदल घडवून आणतील. अमेरिकन हे (मानवाला कल्याणाकडे नेणारे) पाश्चिमात्य यात्री आहेत. कला, विज्ञान, धडाडी आणि उद्योग हे पूर्वेकडे उत्कर्ष पावलेले गुणविशेष त्यांच्यापाशीं आहेत. सबंध जगावर ते आपला प्रभाव पाडतील." (लेटर्स फ्रॉम ॲन अमेरिकन फार्मर, लंडन १७८२. लेखक : द क्रिवेकुर.)

स्वातंत्र्ययुद्ध संपलें तेव्हां अमेरिकेची लोकसंख्या चाळीस लक्ष होती असें इतिहासावरून कळतें. त्यापैकीं ३५ लक्ष गौरवर्णीय आणि त्यांतले ७५ ते ९० टक्के ब्रिटिश वंशाचे होते. राज्यक्रांतीनंतर वाढत्या संख्येनें निर्वासित येऊं लागले. या नव्या नागरिकांतहि अधिक भरणा उत्तर युरोपमधून येणाऱ्यांचा असे आणि ते बहुतेक जण प्रॉटेस्टंट पंथाचे असत. १८७० ते १८८० पर्यंत ही रीघ सुरू होती.

इंग्लिश आणि स्कॉच लोक मोठ्या संख्येनें येत राहिले. आपल्याच देशांत वास्तव्याला निघाल्यासारखे ते येत आणि जीवनक्रमाशीं ते अगदीं सहजगत्या समरस होत. राजकीय आणि सांस्कृतिक भिन्नता, परस्परविरोधी हितसंबंध या विषयांवरील मतामतांचा गलबला सतत कानावर येत असला तरी उल्लेखनीय गोष्ट ही कीं इंग्लिश किंवा स्कॉच माणसाला अमेरिकेंत गेल्यावर आपण परक्या देशांत आलों आहोंत असें वाटत नाहीं आणि त्याला परक्यासारखे वागविलेंहि जात नाहीं. आपल्याच देशांतलें परंतु खूप दूरचें शहर पाहण्यासाठीं एखाद्यानें जावें तसें इथें घडतें.

मोडणींत आणि बोलण्याच्या पद्धतींत खूप फरक असले तरी अमेरिकेची भाषा इंग्लिशच आहे. अमेरिकेंतलीं प्रचलित शिक्षणतत्त्वें, कायदे, चालीरीती ग्रेट ब्रिटनमधून येणाऱ्या प्रवाशाला नवख्या वाटत नाहींत. बॉस्टन, न्यू हेवन किंवा फिलाडेल्फिया या जुन्या शहरांतली रचना, वातावरण आणि शिल्प अगदीं इंग्लंडचा भास करून देणारीं आहेत. न्यूयॉर्कमध्यें बँकांच्या इमारती असलेल्या विभागांत, तिथल्या जगप्रसिद्ध पण अरुंद ' वॉल स्ट्रीट 'वर तर आपण लंडनमध्यें आहोंत असें वाटतें; इमारतींची उंची मात्र लक्षांत घ्यायची नाहीं. जॉर्जटाउन सारख्या ठिकाणीं सुद्धां—हवामान आणि झाडें-फुलें यांचा फरक असला तरी—किंचित् इंग्लंडची छटा आढळते. स्वातंत्र्ययुद्धांतील सरसेनापति आणि अमेरिकन संघराज्याचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन व्हर्जिनियांत माउंट व्हर्नॉन येथें आपल्या रम्य निवासस्थानीं राहत असे. अशा या इतिहासप्रसिद्ध माउंट व्हरनॉन-मधील निसर्गदृश्यें, घरें, शेतें पाहिलीं कीं अठराव्या शतकांत रंगवलेल्या इंग्लिश

निसर्गचित्रांची आठवण होते. त्याची इच्छा असेल तर ब्रिटिश प्रवासी अमेरिकन कुटुंबांत छान समरस होऊं शकतो. त्याला नुसता अमेरिकनच नाहीं तर पिढीजाद अमेरिकन होतां येतें.

भाषेची अडचण असूनसुद्धां जर्मन, स्कँडिनेव्हियन आणि उत्तर युरोपांतल्या लोकांनीं विनासायास अमेरिकन जीवन अंगवळणीं पाडलें आहे आणि ते कामसू, निष्णात, प्रत्येक बाबतींत उपयुक्त असे उत्तम नागरिक झाले आहेत. आयरिशांची भिन्न विचारसरणी, कॅथॉलिक चर्चवरील त्यांची निष्ठा, इंग्लंडबद्दल त्यांच्या मनांत सदैव जागृत असणारी संशयवृत्ति यांमुळें आयरिशांना मात्र अमेरिकेंतल्या परिस्थितीशीं मिळतें घेणें जरा कठिण गेलें. पण भाषा एकच आणि आयरिशांचा उत्साही स्वभाव यांमुळें ते बाकीच्या लोकांपासून दूर राहिले नाहींत. लवकरच ते सर्व क्षेत्रांत—विशेषतः राजकारणांत—अगदीं मोकळेपणानें मिसळले.

अब्राहाम लिंकनच्या वेळची अमेरिका या सर्व पैलूंची मिळून बनलेली होती. तदनंतर १९ व्या शतकाच्या अखेरीअखेरीस आणखी निर्वासित येऊन दाखल झाले. प्रथम तुरळक तुरळक आणि मग प्रचंड लोंढ्यानें. दक्षिण व ईशान्य युरोपमधून ते आले. त्यांत इटालियन, पोल, ग्रीक, रशियन, ज्यू...सगळे होते. ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्यांतले प्रजाजनहि होते. विसाव्या शतकाच्या सुरवातीला आलेल्या स्थलांतरितांतहि या दक्षिण व ईशान्य युरोपीयांचाच मोठा भरणा होता. त्यांच्या पुनर्वसनांतून अनेक सामाजिक आणि मानसशास्त्रीय अशा अवघड समस्या निर्माण झाल्या. या निर्वासितांचें पूर्वीच्या देशांतलें जीवनमान अमेरिकनांच्या जीवनमानापेक्षां खूपच निकृष्ट होतें. त्यामुळें हे निर्वासित आणि आपलें वेतनमान कायम टिकविण्यासाठीं अधीर झालेले संघटित अमेरिकन कामगार यांच्यांत भयानक संघर्ष निर्माण झाले. नवागतांचा शैक्षणिक दर्जाहि खूप खालचा होता. या अशिक्षितांचा अमेरिकन संस्कृतीवर अनिष्ट परिणाम होईल अशी सनातनी अमेरिकनांना धास्ती वाटूं लागली. हे निर्वासित आणि उत्तरेकडील प्रॉटेस्टंट संस्कारांत वाढलेले आद्य अमेरिकन यांच्या मनोरचनेंतहि खूप भिन्नत्व होतें. त्यांचे रीतिरिवाज अमेरिकनांना नवखे होते. त्यांचा जम बसत होता तोहि अगदीं मंदगतीनें. त्यामुळें अनेक अडचणी उद्भवत. अगदीं दुसऱ्या पिढींत सुद्धां त्या कायम होत्या. आईवडील व मुलांमधील वेबनाव, कौटुंबिक शोकान्तिका, प्रथम प्रथम तरुणांच्या उत्तम नागरिकत्वाच्या आड येणारा न्यूनगंड, यांपासून तों अगदीं भग्न कौटुंबिक जीवनांतून उद्भवणाऱ्या गुन्हेगारी-पर्यंत ! पण या प्रश्नाला दुसरीहि बाजू आहे. या भिन्न-भिन्न राष्ट्रीय प्रवाहांनीं

अमेरिकेच्या समृद्धतेंत मोलाची भर घातली हें नाकारतां येणार नाहीं. केवळ त्यांच्या जीवनोत्साहाचा आणि नव्या जगावरील दृढ श्रद्धेचाच नव्हे तर त्यांच्या बौद्धिक गुणांचाहि अमेरिकेला खूप उपयोग झाला. भिन्न भिन्न स्वभावांच्या आणि आवडीनिवडींच्या लोकांमधून अनेक कुशाग्र प्रज्ञेच्या तरुण व्यक्ति पुढें आल्या आणि आजच्या सर्वसंग्राहक अमेरिकन समाजांतहि हेंच अनेक-पैलू व्यक्तित्व आढळतें. याचें नेहमींच्या अनुभवांतलें एक उदाहरण म्हणजे अमेरिकन संगीत. दक्षिण आणि पूर्व युरोपमधून आलेल्यांनीं जर त्यावर आपापल्या देशांतल्या संगीताचे संस्कार केले नसते तर अमेरिकन संगीताला आजच्या इतकें महत्त्व कधींहि प्राप्त झालें नसतें.

१८२० ते १९२० या कालखंडांत तीन कोटींहून अधिक लोक अमेरिकेंत येऊन स्थायिक झाले. त्यांतील बहुतेक जण ओसंडत्या लोकसंख्येच्या तत्कालीन युरोपांतून आले होते. पहिल्या महायुद्धानंतर हा लोंढा थोपवण्यांत आला. कारण आतां अमेरिकेच्या पश्चिम भागांत पूर्वीसारखा अफाट निर्जन भूभाग शिल्लक राहिला नव्हता. १९०० सालानंतर कांहीं थोडा वैराण प्रदेश सोडल्यास अमेरिकेचा बहुतेक सर्व मुलुख खाजगी शेतें-मळे आणि इस्टेटी यांच्यांत वांटला गेला होता. पूर्वीप्रमाणें येतील तितक्या नव्या परदेशी कामगारांना सामावून घेण्याचें सामर्थ्य औद्योगिक कारखान्यांत आणि सरकारी खात्यांत राहिलें नव्हतें. वाढत्या वैभवाकडे अमेरिका झपाट्यानें वाटचाल करीत होती हें खरें, पण म्हणून सदासर्वकाळ जगांतल्या सर्व दलितांना आश्रयाचें मुक्तद्वार आपण खुलें ठेवूं शकूं असें तिला वाटेना. चिनी लोकांची कॅलिफोर्नियांत फारच गर्दी होऊं लागल्यानें १८८२ सालापासूनच चिन्यांना अमेरिकाप्रवेशास मज्जाव करण्यांत आला होता. अर्थात् ही बंदी वांशिक कारणांसाठीं होती. १९१७ पासून निरक्षर निर्वासितांना अमेरिकेचे दरवाजे बंद झाले. नंतर १९२१ मध्यें कोटा पद्धत अस्तित्वांत आली. १९१० सालीं अमेरिकेंत प्रवेश केलेल्या निर्वासितांच्या राष्ट्रवार संख्येवर ही कोटा पद्धति आधारली होती. पुढें ही आंकडेवारी रद्द झाली आणि १८९० सालचे आंकडे आधार मानण्यांत येतील असें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें. ज्या सामाजिक आणि मानसशास्त्रीय कारणांचा उल्लेख पूर्वीं केला आहे त्या कारणांमुळेंच या बदललेल्या सनाचा जुन्या वसाहतवाल्यांच्या राष्ट्रबांधवांना फायदा मिळाला. पुढें राष्ट्रवार प्रमाण तेंच राखण्यांत आलें पण आंत घ्यावयाच्या निर्वासितांच्या संख्येंत मात्र कपात करण्यांत आली. म्हणजे आमचा देश जेथें सगळ्या राष्ट्रांचें मिश्रण झालें आहे असा एक उकळता बुधला आहे असें अमेरिकन लोक

स्वदेशाविषयीं नेहमीं म्हणतात. फक्त मानवशास्त्र, वंशशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अभ्यासकांनाच नव्हे तर तुमच्या-माझ्यासारख्या जीवनाच्या सामान्य निरीक्षकांनाहि अत्यंत मनोरंजक वाटेल असा हा विषय आहे. युरोपांतल्या सर्व जुन्या राष्ट्रांच्या नागरिकांनीं एका नव्या जीवनपद्धतीचा (त्या जीवनपद्धतींत आलेल्या इंग्लिश भाषेसकट) अंगीकार केला. युरोपच्या कानाकोपऱ्यामधून त्यांनीं उत्स्फूर्तपणें अमेरिकेकडे धाव घेतली आणि १९२० पर्यंत त्यांना कोटा पद्धतीनें किंवा इतर कोणत्याहि प्रकारें अडवण्यांत आलें नाहीं. तेथें हे लोक एकमेकांत अनेक प्रकारें संमिलित झाले. परस्परांवर त्यांचा प्रभाव पडला, रोटीबेटीव्यवहार झाले, आणि अखेर त्यांनीं एका नव्या राष्ट्राला जन्म दिला. या नव्या राष्ट्राला स्वतःचें असें एक व्यक्तिमत्त्व होतें आणि तारुण्यसुलभ चैतन्यानें व उत्साहानें तें राष्ट्र फुललेलें होतें. "आम्ही सारे तिसऱ्या पिढीचे आहोंत," असें विख्यात अमेरिकन मानवशास्त्रज्ञ मार्गारेट मीड आपल्या एका पुस्तकांत म्हणते. ('अँड कीप युअर पावडर ड्राय' : अॅन अॅन्थ्रापॉलॉजिस्ट लुक्स अॅट अमेरिका. न्यूयॉर्क, १९४२). आजच्या अमेरिकन जीवनांतल्या प्रमुख प्रवृत्ती या तिसऱ्या पिढीच्या—आद्य वसाहतवाल्यांच्या नातवंडांच्या—प्रवृत्ती आहेत, असाच, मला वाटतें, तिच्या म्हणण्याचा आशय असावा. आजचा अमेरिकन हा इतर हजारों-लाखों अमेरिकनांसारखाच आहे. पूर्वपिढ्यांमधील शैक्षणिक मागासलेपणा, अनागर चालीरीती, मानसिक कुचंबणा आणि कौटुंबिक जीवन भग्न करणारे अनेक प्रकारचे गंड यांपासून हा तिसऱ्या पिढीचा नागरिक सर्वस्वीं मुक्त आहे. एवढेंच नव्हे तर सामाजिक आणि मानसशास्त्रीय दृष्ट्या तो अत्यंत तरुण आणि विलक्षण जीवनोन्मुख आहे, किती पराक्रम करूं आणि किती नको असें त्याला वाटतें, आपल्या जगाचें नंदनवन करून टाकण्यास तो उत्सुक आहे, नव्या नव्या गोष्टी त्याला शिकायच्या आहेत, कोणत्याहि साहसास त्याची तयारी आहे आणि सर्वांत महत्त्वाचा वृत्तिविशेष म्हणजे सर्जनशील कृतींत रममाण होऊन जाणें त्याला आवडतें. या तिसऱ्या पिढीअखेर अमेरिकेच्या उकळत्या बुधल्यांतील मिश्रण-क्रिया पूर्ण होऊन थांबली आहे असें दिसून येतें.

हें नवें राष्ट्र आपल्या स्वतःचा असा एक वेगळा जीवनक्रम निर्माण करीत आहे. पण परिस्थितीच्या वाऱ्यावादळामुळें अमेरिकन किनाऱ्यावर आलेल्या निर्वासितांना आपल्याबरोबर युरोपमधील रूढींचा, परंपरांचा जो कांहीं वारसा कळत वा नकळत आपल्याबरोबर या देशांत आणलीं त्या युरोपी संचिताचा अमेरिका आतां त्याग करीत नाहीं. अमेरिकन शहरांत शेक्सपीअरचें स्मारक

पाहून कोणालाहि आश्चर्य वाटायला नको. वॉशिंग्टनमध्यें कॉंग्रेसच्या इमारतीपासून जवळच सुप्रसिद्ध 'फॉल्गर शेक्सपीअर लायब्ररी' आहे. ही एक सुसज्ज संशोधनसंस्था असून तींत मोठें ग्रंथालय आणि वस्तुसंग्रहालय आहे. हुबेहूब एलिझाबेथकालीन वाटेल असें नाट्यगृहहि या संस्थेच्या इमारतीला जोडूनच बांधण्यांत आलें आहे. कुठेंहि सहज फेरफटका करायला निघालांत तरी तुम्हांला डान्टे, शिलर किंवा वेर्दी यांचे पुतळे आढळूं शकतील. रेसीन, कोसियुस्को, नेपोलियन, नेल्सन, वेलिंग्टन, ह्यूगो, बिस्मार्क या नांवांचीं गांवेंहि अमेरिकेंत आहेत. जणूं कांहीं भूतकाळाचा मागोवा घेत, हे युरोपीय नरश्रेष्ठ आमचेच पूर्वज आहेत असें अमेरिकेला म्हणायचें आहे. आपल्या पूर्वेतिहासांतील अनेक पैलू आपल्याला युरोपीय संस्कृतींतून मिळाले आहेत हें मान्य करण्याची अमेरिकेची नेहमींच तयारी असते. तेथें लॅकोनिया नांवाचें गांव आहे, ॲटिका नांवाचे दोन जिल्हे आहेत, 'आर्केडिया' नांवाचीं पांच स्थळें आहेत, गांवें आणि जिल्हे मिळून सात 'अथेन्स' आहेत! अमेरिकन नकाशाभर पॅरिस, बर्लिन, व्हिएन्ना, लंडन, ऑक्स्फर्ड, वॉर्सा, रोम, फ्लॉरेन्स, सिरॅक्यूज, माद्रिद, तोलेदो अशीं नांवें विखुरलीं आहेत. केव्हां केव्हां तर प्रवासी आश्चर्यचकित होऊन विचार करूं लागतो कीं, "खरोखरच 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' म्हणजे अखेर एकदांचें प्रत्यक्षांत उतरलेलें 'युनायटेड स्टेट्स ऑफ युरोप' तर नाहीं ना? हे युरोपीय देश परस्परांशीं एकजीव होऊन एक नवें राष्ट्र म्हणून अमेरिकेच्या रूपानें या भिन्न भौगोलिक स्थळीं जन्माला आले आहेत इतकेंच!" इंग्लंडची स्वातंत्र्यप्रिय, प्रयोगशील, मानवतावादी परंपरा, आणि जर्मनीची कांटेकोर कार्यपद्धति, संघटना, कडक शिस्त यांचा एक मोठा चमत्कारिक असा संगम आपल्याला अमेरिकन जीवनांत कधीं कधीं पाहायला मिळतो. अनिर्बंध, उच्छृंखल अशा आयरिश मनोवृत्तीमध्यें संथपणा आणि अंतर्मुखता या स्कॅंडिनेव्हियन स्वभावाच्या छटा उतरून ती सौम्य झाल्याचें दिसेल. या मिलाफांतच कधीं कधीं तुम्हांला लॅटिन प्रदेशांतली विशिष्ट तर्कपद्धति आणि तशांतच स्लाव्ह माणसाची संशोधनप्रवण अधीरता यांचेहि रंग मिसळलेले दिसतील. कधीं कधीं युरोपच्या जुन्या राष्ट्रांबरोबर अमेरिकेचें जें साहचर्य घडलें त्याच्या खुणा एकदम प्रकाशांत येतील. संगीतांतल्या कांहीं स्वरमेळांचीं नांवें स्लाव्ह आणि इटालियन भाषांतलीं आहेत, लष्करांत अनेक जर्मन नांवें आहेत, आणि नौदलांत अलिकडे भरती झालेल्यांत कांहींचीं नांवें ग्रीक आहेत असें मला सांगण्यांत आलें.

पृथक् व्यक्तींच्या बाबतींतहि वरील सर्व प्रक्रिया घडतांना पाहून मोठी गंमत

वाटते. ज्या अमेरिकनांबरोबर मीं या मुद्द्याची चर्चा केली त्यांपैकीं बहुतेक व्यक्तींच्या मनांत कोठल्या ना कोठल्या तरी 'माझ्या देशा'ची स्मृति अत्यंत जिव्हाळ्यानें जतन करून ठेवलेली आहे असें मला आढळून आलें. मग हा मायदेश म्हणजे (अमेरिकन त्याला 'ओल्ड कंट्री' म्हणून संबोधतात) स्कॉटलंड किंवा आयर्लंड, नॉर्वे किंवा बव्हेरिया, जिथून त्यांचे पूर्वज अमेरिकेंत आले असतील तो कोणताहि देश असूं शकेल. अमेरिकनांच्या संभाषणांत तुम्हांला 'ओल्ड कंट्री' हा शब्दप्रयोग खूपदां ऐकायला मिळेल : त्यांच्या भावविश्वांत या शब्दप्रयोगाला एका मानबिंदूचें स्थान आहे. सबंध पिढ्यांच्या अंतरानें, वाढत्या शिक्षणामुळें, ऐतिहासिक व ललित कृतींच्या वाचनांतून 'ओल्ड कंट्री'ला हळूहळू निराकार आदर्श बिंदूचें स्थान मिळालें आहे आणि त्याला एक प्रकारचें काव्यात्म सौंदर्य व तेज लाभलें आहे. एकाच मुलाचे एक आजोबा इंग्लिश वसाहतवाल्यांचे वंशज असतात तर दुसरे जर्मनींतून १८४८ मध्यें आलेल्या राजकीय निर्वासितांपैकीं असतात. एक आजी स्वीडनमधली तर दुसरी सिसिलींतली. आणखी मागें गेलांत तर तुम्हांला कळेल कीं या कुटुंबाचा एक पूर्वज फ्रेंच होता आणि त्याची आई पोलिश होती. असे गंगाजमनी पूर्वज असलेल्या व्यक्तीला म्हणायचें तरी काय? तो एक साधा अमेरिकन आहे. त्याचा मूळ देश गतकालाच्या पटलांत विरून गेला आहे. अनेक राष्ट्रप्रवाहांच्या संगमांत त्याचा मूळ देश विलीन झाला आहे. आतां अनेक राष्ट्रांचें कडबोळें असलेला युरोप हाच त्याचा मूळ देश!

वेगवेगळ्या वेळीं अमेरिकेंत स्थलांतरितांचे जे अनेक गट आले त्यांकडे नजर टाकली तरच आपल्याला 'राष्ट्र' या शब्दाचा अमेरिकेच्या संदर्भातला खरा अर्थ कळूं शकेल. दारिद्र्य, हुकुमशाही किंवा युद्धें यांच्या कचाट्यांतून सुटून आलेला हा स्थलांतरित स्वातंत्र्यदिनापूर्वीं आला, एकोणिसाव्या शतकांत आला, कीं अगदीं अलिकडे आला याला महत्त्व नाहीं. स्वेच्छेनें तो आला ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. बहुतेकांबाबत तर असें आढळतें कीं त्यांना येण्याची उत्कट ओढ लागली होती. अमेरिकेला जाणें हेंच त्यानें आयुष्यांतलें एक ध्येय ठरवून टाकलें होतें. धार्मिक, राजकीय आणि सामाजिक दडपशाहींतून आणि छळांतून आपली सुटका करून घेण्याचा त्यानें निश्चय केला होता. हलाखींतून त्याला बाहेर पडायचें होतें. व्यक्तिस्वातंत्र्य मिळवायचें होतें. जगांत कांहींतरी करून दाखवायचें होतें. त्याच्या कर्तृत्वाला अनिर्बंध वाव देणाऱ्या नव्या सार्वजनिक कायदेकानूंना आणि शासनसंस्थांना त्यानें मनःपूर्वक मान्यता दिली. आणि

एकदां या संस्था अस्तित्वांत आणल्यानंतर त्या अबाधित राखण्यासाठीं परिश्रम करण्याची आणि निकराची झुंज देण्याची त्याची सिद्धता होती.

अशा प्रकारें अगदीं सुरवातीपासूनच नागरिक आणि संघराज्य यांचे संबंध नागरिकानें स्वेच्छेनें केलेल्या दडपणरहित करारावर आधारलेले होते. आणि हेंच अमेरिकेच्या राष्ट्रीय ऐक्याचें रहस्य आहे. मुख्यत्वेंकरून नागरिक आणि संघराज्य यांच्या संबंधाशीं या रहस्याचा अर्थ निगडित आहे. स्वातंत्र्यप्रेम आणि जबाबदारीची व एकजुटीची जाणीव यांचा तर्कशुद्ध आणि व्यवहार्य मेळ तेथें घातला गेला आहे. आणि हेंच अमेरिकन राष्ट्राचें स्वरूप : आपल्या सामाजिक जीवनाचा नियंत्रक असा सर्वोच्च, अनुल्लंघनीय कायदा म्हणून जो अमेरिकन राज्यघटनेचा अनन्य निष्ठेनें स्वीकार करतो तो नागरिकांचा जनसमुच्चय म्हणजेच अमेरिकन राष्ट्र. मग या नागरिकांचे पूर्वज कोठले कां असेनात! अमेरिकन राज्यघटना आणि तिच्याकडून नियंत्रित केलें जाणारें व तिचें प्रतीक असणारें संघराज्य यांबद्दल प्रत्येक अमेरिकनाला वाटणाऱ्या निष्ठेंतून आणि प्रेमांतून अमेरिकेची राष्ट्रभावना व्यक्त होते. मूळ देशाशीं, युरोपीय इतिहासाशीं, तिथल्या वंशांशीं असलेले सर्व संबंध या बुद्धिप्रधान व संपूर्ण खुषीच्या एकनिष्ठेपुढें विनम्र होतात. त्या मूळ देशाशीं जर संघराज्याचें युद्ध सुरू झालें तर त्या मूळ देशाविरुद्ध हत्यार उपसण्यांत हा निर्वासित पुत्र जराहि कुचराई करणार नाहीं. इंग्लंडविरुद्ध प्रथम हत्यार उचलणारे वसाहतवाले इंग्लिश होते हें आपण विसरतां कामा नये.

या राष्ट्रीय जाणिवेंत आणखीहि एक धागा अनुस्यूत आहे : सबंध राष्ट्राला आपल्या भविष्यकालाबद्दल वाटणारा जवळजवळ आंधळा पण अढळ विश्वास. समान भूतकाळ हा युरोपियन राष्ट्रांना जोडणारा दुवा आहे, तर समान भविष्यानें अमेरिका एकसंध झाली आहे.

# भिन्न परंपरा आणि त्यांचा संयोग

मागील प्रकरणांत 'राष्ट्र' या शब्दाबाबत जें विवेचन केलें आहे त्यावरून अमेरिकन लोकांचे आपल्या गतकाळाशीं कांहींच भावनात्मक अनुबंध नाहींत असा समज कोणीं करून घेऊं नये. एका अमेरिकन अशा परंपरेची स्थापना आणि संवर्धन करण्याचे प्रयत्न देशभर सुरू आहेत. संघराज्याच्या इतिहासाशीं ज्या ज्या वस्तूचा, वास्तूचा किंवा स्थळाचा संबंध जोडतां येतो—स्मारकें, प्रार्थनामंदिरें, ऐतिहासिक घटना घडलेलीं स्थळें किंवा तेथील अवशेष—त्या सर्वांची आदरपूर्वक जपणूक करण्याची दक्षता तें तें राज्य, तेथील नगरपालिका, शिक्षणसंस्था आणि जनता यांच्याकडून घेतली जाते.

अशा असंख्य उदाहरणांपैकीं 'व्हॅली फोर्ज'चें उदाहरण मला प्रामुख्यानें सांगावेंसें वाटतें. फिलाडेल्फियाजवळ ही एक टेकड्यांची रांग आहे. १७७७-७८ मध्यें जॉर्ज वॉशिंग्टनच्या सैन्यानें या प्रदेशांत तळ दिला होता. त्या सालीं कडाक्याची थंडी पडली आणि या फौजेंतले एकदशांश सैनिक गारठून मृत्युमुखीं पडले. या जागीं प्रत्यक्ष रणकंदन कधींच झालें नाहीं. त्या वर्षीची इतके बळी घेणारी ती भयानक थंडी आणि उपासमार यांच्या आठवणीनें या जागेला अजरामर केलें आहे. एक राष्ट्रीय पूजास्थान समजून दरवर्षी दहा लक्षांहून अधिक लोक 'व्हॅली फोर्ज'ला भेट देतात. त्या ऐतिहासिक छावणीची ही जागा सरकारनें ताब्यांत घेऊन तेथें एक अभिनव स्मारक तयार केलें आहे. अमेरिकन लोक त्याला 'नॅशनल पार्क' म्हणतात. छावणीच्या जागेवरील शेतकऱ्यांच्या झोपड्यांची डागडुजी करून त्यांचें वस्तुसंग्रहालयांत रूपांतर करण्यांत आलें आहे. पूर्वीच्या सर्व तटबंद्यांना डागडुजी करून तेव्हांसारखें स्वरूप देण्यांत आलें आहे. आसमंतांतल्या प्रदेशांतूनहि दिसेल अशी स्मारक-कमान एका टेकडीवरच्या माथ्यावर उभारण्यांत आली आहे. दुसऱ्या एका टेकडीवर एक चर्च बांधलें आहे आणि त्यांत त्या घातवर्षाची आठवण करून देणारीं सगळीं निशाणें आणि अवशेषात्मक इतर वस्तु जमविण्यांत आल्या आहेत. खिडक्यांच्या बिलोरी

काचांवर वॉशिंग्टनचें जीवन आणि स्वातंत्र्य-युद्धांतील कांहीं प्रसंग चित्रित केले आहेत. प्रार्थनामंदिरांतून महान् संत आणि प्रेषित देवदूतांना जें स्थान असतें तेंच स्थान या चर्चमध्यें या राष्ट्रवीरांना मिळालें आहे व लोकशाही हाच येथें पूजन केला जाणारा खरा धर्म आहे. फौजेची प्रत्येक तुकडी नेमक्या कोणत्या ठिकाणीं होती हें दाखविणाऱ्या छोट्या पाट्या येथें सर्वत्र लावलेल्या आढळतात. जेथें जेथें हे सैनिक राहिले आणि मृत्युमुखीं पडले असें ऐतिहासिक पुराव्यानें निश्चित करतां आलें त्या त्या जागीं लाकडी ओंडक्यांचीं घरें आणि मातीच्या झोपड्या अगदीं तत्कालीन स्वरूपांत उभारल्या आहेत आणि अजूनहि बांधल्या जात आहेत.

आपल्या गतकाळाची स्मृति लोकांच्या मनावर ठसावी म्हणून अमेरिकेंतल्या सर्व मोठ्या शहरांतलीं ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयें कसोशीनें प्रयत्न करतात आणि त्यांत माणसांची सतत रीघ लागून राहिलेली असते. अगदीं प्रथम वसाहत करण्यास आलेले लोक, त्यांच्या रेड इंडियनांबरोबर झालेल्या लढाया, येथपासून तों थेट आजपर्यंतच्या इतिहासांतल्या राष्ट्रीय महत्त्वाच्या वस्तु, आणि त्या त्या प्रदेशांतील जमातींचा इतिहास दर्शविणारीं साधनें या वस्तुसंग्रहालयांत असतात. अमेरिकन स्वातंत्र्यसंग्रामांतल्याच नव्हे तर पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांतल्या सैनिकांचेहि गणवेश, तलवारी, निशाणें येथें तुम्हांला पाहायला मिळतील. थोर व्यक्तींच्या घरांतल्या वस्तु, फर्निचर, पोशाख आणि फोटोहि त्यांत मांडलेले असतात. गेल्या शतकाच्या अखेरीस कोलोरॅडो राज्याचा विकास करण्यांत ज्या टॅबोर कुटुंबानें अत्यंत उल्लेखनीय आणि महत्त्वाची कामगिरी बजावली त्या कुटुंबांतल्या अनेक वस्तु अशा एका वस्तुप्रदर्शनांत जतन करून ठेवलेल्या आहेत. अमेरिकेच्या पहिल्या अध्यक्षाची पत्नी मार्था वॉशिंग्टनपासून तों श्रीमती रुझवेल्ट यांच्यापर्यंत सर्व अध्यक्ष-पत्नींच्या झग्यांचा एका प्रदर्शनांत संग्रहि केलेला आहे. शालेय विद्यार्थ्यांना या सर्व संग्रहालयांतून नेऊन आणणें हा अमेरिकेंतल्या शैक्षणिक कार्यक्रमाचा एक भाग आहे. अमेरिकेंत जन्मलेलीं आजचीं प्राथमिक शाळांतलीं मुलेंसुद्धां आपल्या इतिहासाविषयीं बोलतांना इतक्या सहजपणें 'आमचा कोलंबस' असा ख्रिस्तोफर कोलंबसचा निर्देश करतात कीं, तें पाहून आपण आश्चर्यचकित होतों. अगदीं शुद्ध ग्रीक वंशाचीं, दुसऱ्या पिढींतलीं, मुलें अत्यंत ठामपणें 'त्यांच्या' इतिहासाबद्दल आणि 'त्यांच्या' अध्यक्षांबद्दल (म्हणजे वॉशिंग्टन, जेफर्सन आणि अब्राहाम लिंकन यांच्याबद्दल) बोलतांना मीं ऐकलें आहे.

अमेरिकेची ही सामावून घेण्याची शक्ति तेथें प्रत्यक्ष जाऊन पाहिल्याशिवाय कळणार नाहीं. अगदीं उत्स्फूर्तपणें, आपोआप ती आपला प्रभाव पाडीत असते. तिचें मुद्दाम शिक्षण देण्याची आवश्यकताच नाहीं. जणुं कांहीं अमेरिकेच्या सबंध हवेंतच ही एकात्म भावना भरून राहिलेली आहे. वागण्याच्या पद्धतींवर, चालीरीतींवर आणि इंग्लिश उच्चारांवरच ही शक्ति प्रभाव पाडते असें नव्हे तर माणसाच्या बौद्धिक आणि नैतिक दृष्टिकोणांतच ती आमूलाग्र फरक घडवून आणते.

नव्यानें आलेल्या रहिवाशांना आणि त्यांच्या मुलांना अमेरिकेशीं मेळ बसवतांना ज्या अनेक सामाजिक व मानसशास्त्रीय पेचप्रसंगांतून जावें लागलें त्यांचा मीं यापूर्वी निर्देश केला. विशेषतः दक्षिण आणि ईशान्य युरोपमधून आलेल्यांना कोणत्या अडचणींना तोंड द्यावें लागलें तें मीं सांगितलें. निर्वासितांच्या इतर गटांनाहि अमेरिकेशीं एकरूप असतांना अशाच अडचणी कांहीं प्रमाणांत सहन कराव्या लागल्या. आणि तरीहि सबंध कुटुंबांतच आपल्यांत कांहीं तरी न्यून आहे अशी भावना पसरल्यामुळें निर्माण झालेल्या या अडचणींचा दुसऱ्या पिढीच्या राष्ट्रीय जाणिवेवर थोडासुद्धां परिणाम झाल्याचें दिसत नाहीं. निर्वासित माता-पित्यांचीं हीं मुलें स्वतःला १०० टक्के अमेरिकन मानतात. आपण सर्वतोपरी उत्कृष्ट अमेरिकन नागरिक झालों नाहीं असें समाजाला चुकूनहि वाटूं नये या दृष्टीनें ते आपल्या प्रत्येक कृतीची काळजी घेतात.

बऱ्याच निरीक्षणानंतर माझें असें मत बनलें आहे कीं, युरोपमधील सुशिक्षित कुटुंबांतील मुलें नव्या परिस्थितीशीं खूपच अधिक सुलभतेनें मिळतें घेतात. तीं अमेरिकेंतील सुसंस्कृत समाजांत सहजतेनें वावरतात. अशिक्षित आणि गरीब कुटुंबांच्या वागण्यांत जो बुजरेपणा व संकोच आढळतो तसा त्यांच्या वागणुकींत दिसत नाहीं. या मुलांनीं त्यांचें बहुतेक सर्व आयुष्य युरोपमध्येंच काढलेलें असतें पण तरीहि तीं नव्या वातावरणाशीं चटकन् तन्मय होऊन जातात. कित्येकदां तर त्यांच्या घरांतील वडिलधाऱ्यांचा सुद्धां त्यांच्या या बदलाला विरोध असतो. युरोप-मधील सुशिक्षित, श्रीमान् अशा फ्रेंच आणि ग्रीक कुटुंबांत जन्म घेतलेलीं मुलें जेव्हां अमेरिकेंत गेल्यावर 'अमेरिकन' बनूं लागलीं तेव्हां त्यांना घरांतल्या मोठ्या माणसांनीं कसा प्रखर विरोध केला याचीं कांहीं उदाहरणें माझ्या माहितीचीं आहेत. कायम राहण्याच्या उद्देशानें कांहीं हे पालक अमेरिकेंत आलेले नव्हते. यूरोपमधल्या आपल्या जुन्या वातावरणाची त्यांना विलक्षण ओढ होती, तिथल्याच चालीरीती त्यांनीं सुरू ठेवल्या होत्या, आणि आपल्या घरांतसुद्धां मायदेशाबद्दल जिव्हाळ्याचें असें वातावरण राखण्याचा प्रयत्न करीत. एक दिवस मात्र मुलें बंड करून उठलीं,

आईवडिलांचा अट्टाहास त्यांनीं झुगारून दिला, आणि बाहेरच्या कोणींहि त्यांच्या मनांत तसें भरवून दिलें नसतांना त्यांनीं चक्क सांगून टाकलें कीं 'या क्षणापासून आम्ही अमेरिकेचे आहोंत आणि दुसरा कोणताहि देश आम्ही मानीत नाहीं.' या स्वरूपाचे कौटुंबिक पेचप्रसंग अमेरिकेंत हरघडी पाहायला मिळतात. चांगलें समजूं लागल्यानंतर अमेरिकेंत गेलेल्या तरुण विद्यार्थ्यांतसुद्धां अमेरिकेबद्दलचा हा विलक्षण मोह प्रकर्षानें निर्माण होण्याची शक्यता असते. मला वाटतें हें मुख्यतः दोन कारणांमुळें घडून येतें :

त्यांपैकीं पहिलें 'राष्ट्र' या भावनेच्या अमेरिकन अर्थाशीं निगडित आहे. हा अर्थ कोणता हें यापूर्वीं विशद केलें आहेच. इंग्लंड, फ्रान्स किंवा जर्मनी-सारख्या युरोपमधल्या जुन्या देशांत आपण जाऊन वास्तव्य करूं शकतों, तेथल्या बौद्धिक वातावरणाचा आपल्यावर कांहींसा परिणामहि घडून येतो, तेथल्या चाली-रीतींची आपल्याला संवय होते इतकेंच काय पण नागरिकत्वाचे हक्कहि आपल्याला मिळतात. पण तरीसुद्धां आपण केव्हांहि खरे इंग्लिश, फ्रेंच किंवा जर्मन होत नाहीं. येथें आपल्याला अत्यंत अगत्यानें व आतिथ्यशीलतेनें वागविण्यांत येत आहे, आपल्या सुरक्षेचीहि जबाबदारी सरकारनें घेतली आहे, पण तरीसुद्धां या देशाशीं स्नेह जडलेले आपण एक परदेशी आहोंत ही भावना सदैव मनांत कुठें तरी राहतेच. आपण त्या राष्ट्राचे खरेखुरे घटक होऊंच शकत नाहीं कारण एकवंशत्व हा जो संबंध राष्ट्रीयत्वाचा आधार, त्यांतच मुळीं आपण उणे असतों. युरोपीय मनांत 'राष्ट्र' याबद्दल जी कल्पना आहे ती अत्यंत संकुचित आणि मर्यादित आहे. नागरिकत्वा-पासून ती संपूर्णपणें अलग आहे. उलट अमेरिकेंत मात्र 'राष्ट्र' या शब्दाला एक अत्यंत विशाल अर्थ प्राप्त झाला आहे. नव्यानें येऊन स्थायिक होऊं पाहणाऱ्यांवर आज तिथें कितीहि निर्बंध घातलेले असले तरी या राष्ट्रभावनेंतल्या विशालतेवर त्यांचा परिणाम झालेला नाहीं. युरोपांतल्या सगळ्या देशांतून आलेल्या लोकांची मिळून अमेरिका झाली आहे, इतकेंच नव्हे तर आपल्या देशांतले लोकसुद्धां त्यांत आहेत असें अमेरिकेंत नव्यानें आलेल्या तरुणाला अल्पावधींतच कळून येतें. एकच पूर्वेतिहास असल्याचा अनुबंध नव्हे तर आपण सर्व अमेरिकन आहोंत या जाणिवेचा अनुबंध त्यांना एकात्म बनवतो. या तरुणाला जेव्हां नागरिकत्व मिळतें तेव्हां तोहि त्यांच्यांतलाच एक होतो. निराळ्या शब्दांत सांगायचें म्हणजे ज्याचे पूर्वज युरोपांतल्या कोणत्या तरी 'ओल्ड कंट्री'मधले आहेत पण ज्यानें स्वतः अमेरिकेशीं आणि अमेरिकन राज्यघटनेशीं एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली आहे असा तो एक अमेरिकन

बनतो. यावरून स्पष्ट होईल कीं हें कांहीं केवळ वंशानें किंवा जन्मानें ठरणारें राष्ट्रीयत्व नाहीं. हा एक स्वतंत्र इच्छेनें घेतलेला निर्णय आहे. अर्थात् कोणत्याहि व्यक्तीस नागरिकत्वासाठीं आधीं अमेरिकन सरकारची मान्यता असावी लागते. कांहीं अटी या करारांत गृहीत धरलेल्या असतात, पण त्यांवर कुणाच्या सहीची गरज नसते. पण या कराराच्या बदल्यांत आपलें सर्वस्वच व्यक्ति राष्ट्रासाठीं द्यावयास तयार होते. अमेरिका म्हणजे असीम भविष्यकाल असलेला अफाट देश आहे असेंच कुणाच्याहि मनावर ठसतें, आणि अमेरिकेबद्दल आकर्षण वाटण्याचें हें दुसरें कारण होय. ही भावना बरोबर असो कीं चूक असो, पण आजचीं युरोपियन मुलें अशा वातावरणांत वाढतात कीं फक्त आपल्या देशाचेंच नव्हे तर सबंध युरोपचें भवितव्य अत्यंत अस्पष्ट, निराशाजनक, अस्वस्थ करून सोडणारें आणि वाटेंत अनंत दुर्लंघ्य अडचणी असलेलें आहे अशीच त्यांची पक्की समजूत झालेली असते. आणि अशा परिस्थितींतून एकदम अमेरिकेंतल्या सर्वस्वीं निराळ्या वातावरणांत जाऊन पडणाऱ्या तरुणाच्या प्रतिक्रिया विलक्षण प्रकर्षाच्या न झाल्या तरच नवल! त्याला खरोखरच धक्का बसतो. आपण कशाकशाला मुकत होतों याचाच साक्षात्कार होतो ना त्याला! अर्थात् पूर्वीं त्याला या उणिवांची जाणीवहि नव्हती—पण म्हणून काय झालें? तसें पाहिलें तर गेल्या शतकाच्या अखेरीसच अमेरिकेंत नव्या वसाहती होण्याचें थांबलें. पण हा देश अद्याप तरुण आहे. अफाट जीवन-भवितव्य त्याच्यापुढें पसरलें आहे. चैतन्यानें आणि प्रगतिशीलतेनें ओलांडत असलेलें असें हें जीवन आहे.

अमेरिकेंतल्या पश्चिमेकडच्या अफाट मोकळ्या माळरानांकडे पाहून तर तेथें अद्याप केव्हांहि मनुष्याचें वास्तव्य झालेलेंच नसावें असें वाटतें. जणुं कांहीं आजहि आपण आद्य वसाहतवाल्यांच्या घोड्यांच्या टापा ऐकतों आहोंत असा भास होतो. जेथें पाहावें तेथें विस्ताराला, प्रगतीला—आणि मुख्य म्हणजे कृतीला भरपूर वाव आहे असें आढळून येतें. अज्ञात—कदाचित् देदीप्यमान—भवितव्याकडे अमेरिकन कला झपाट्यानें धाव घेत आहे. विज्ञानाची आतां कोठें सुरुवात झाली आहे आणि अधिकाधिक माणसांची या क्षेत्रांत निकडीची गरज आहे. सध्यां अमेरिकेंत कितीहि शास्त्रज्ञ असले तरी त्यांहून अधिक हवे आहेत. आपल्या क्षेत्रांत विशेष कांहीं चमक दाखविणाऱ्या कोणत्याहि परदेशीय विद्यार्थ्याला अमेरिकेंत कायमचें येऊन राहण्याचें निमंत्रण मिळतें. विद्यापीठांतील पदव्या व इतर अनेकविध कामांचा अनुभव त्याला मिळेलच. शिवाय स्वतःची

कार्यक्षमता वाढवून यशाचें शिखर गांठण्यासाठीं अनुकूल परिस्थितीहि त्याला लाभेल. जगांतील सर्वांत सामर्थ्यवान् राष्ट्राच्या उच्च सुशिक्षित समाजाचा एक घटक होण्याची ही संधि आपल्या व्यावसायिक कारकिर्दीला नुकतीच सुरुवात केलेला कोणता तरुण नाकारील? हें बाकीचें वैभव क्षणभर दृष्टीआड केलें तरी अमेरिकेचा तारुण्यसुलभ आशावाद, आत्मविश्वास आणि साहसप्रियता यांनीं परदेशांतले तरुण आनंदानें धुंद होऊन जातात. आपल्या प्रज्ञा वाढत आहेत आणि आपलीं क्षितिजें विशाल होत आहेत असें ह्यांना क्षणोक्षणीं जाणवतें. आपणसुद्धां या प्रचंड उद्योगांत सामील व्हावें, या नव्या जगाचा घटक बनावें आणि या महान् उद्बोधनाची लाट आपल्याला कुठपर्यंत घेऊन जाते तें पाहावें असें त्यांना वाटतें. पण अमेरिकन जीवनाची ही तीव्र उत्कटताच अनेकांना भोवली आहे. अव्याहत पुढें धाव घेणाऱ्या तिच्या पिसाट वेगांत सांपडून अनेक जण पार कोलमडले. पण एकदां ज्यांच्या मनांत पश्चिम दिशेनें आगेकूच करणाऱ्या आद्य वसाहतकारांबद्दल अद्भुत आकर्षण निर्माण झालें आहे अशा युरोपियनांना हे धोक्याचे कंदील कधींहि नाउमेद करूं शकणार नाहींत.

प्रकरण सात

# प्यूरिटन आणि त्यांचें कार्य

अमेरिकन वसाहती स्थापन करण्यामागें इंग्लंडचे हेतु मुख्यतः निश्चितपणें व्यापारी स्वरूपाचे होते. अन्य ध्येयें मनांत बाळगून आलेल्यांची संख्या त्या मानानें फारच कमी होती. युरोपांतील अंतर्गत यादवी, छळ, युद्ध आणि सर्वंकष दडपशाही व जुलमी राजवट यांनीं गेलीं अनेक शतकें, आणि अगदीं आजसुद्धां, अनेकांना निवाऱ्यासाठीं अमेरिकेकडे धाव घेण्यास प्रवृत्त केलें आहे. सर्व धार्मिक आणि राजकीय हक्कांचा पुन्हा लाभ व्हावा किंवा ते नव्यानेंच हातीं यावे ही या स्थलांतरितांची मनीषा असे. इंग्लंडमधील यादवी युद्धाच्या वेळचा एक चमत्कृतिपूर्ण विशेष असा कीं स्टयूअर्ट घराण्याच्या जाचाला कंटाळून बाहेर पडलेल्या प्यूरिटनांनीं अमेरिकेच्या 'न्यू इंग्लंड' राज्यांत वस्ती केली होती तर क्रॉमवेलच्या प्यूरिटन हुकुमशाहीनें गांजलेल्या राजनिष्ठ लोकांनीं 'व्हर्जिनिया' हा आपला बालेकिल्ला बनविला होता. आणखीहि अशीं उदाहरणें आहेत. असेंहि दृष्टोत्पत्तीस येतें कीं इंग्लंडमधल्या सरकारांनीं या स्थलांतरी प्रवृत्तीकडे वक्र दृष्टीनें पाहिलें नाहीं. आपल्या अस्तित्वाला धोक्याची असणारी ही ब्याद अटलांटिक समुद्रापलिकडे गेली तर तें त्यांना हवेंच होतें. मग तेथें हे लोक कसेहि राहोत आणि कोणत्याहि देवाची पूजा करोत. आपला व्यापार आणि मिळणारे कर यांखेरीज अन्य कशाचेंच लंडनला सोयरसुतक नव्हतें.

निश्चयात्मकता, विवेक, उत्साह आणि धिमेपणा या आपल्या गुणांमुळें प्यूरिटन लोक पूर्व किनाऱ्यावरील बाकीच्या वसाहतवाल्यांपेक्षां सरस ठरले हें सूर्यप्रकाशाइतकें सत्य आहे. राजकीय आणि धार्मिक हेतूंसाठीं अटलांटिक ओलांडण्यास उद्युक्त झालेल्यांत प्यूरिटनच जास्त होते.

एका महान् कार्याच्या पूर्ततेसाठीं जन्माला आलेले आपण यात्रिक आहोंत असें ते समजत. रानटी अमेरिकन खंड सुसंस्कृत करणें आणि बायबलच्या शिकवणुकीप्रमाणें वागून आपल्या पूर्वींच्या जगापेक्षां चांगलें असें जग तेथें निर्माण करणें हेंच तें महान् कार्य, अशी त्यांची श्रद्धा होती. तीं पोलादी

निश्चयाचीं माणसें होतीं. अंगीकृत कार्यावरील विलक्षण निष्ठेच्या जोरावर त्यांनीं बॉस्टनमध्यें आणि आजूबाजूच्या प्रदेशांत जाज्वल्य श्रद्धेचें आणि स्वातंत्र्याचें वातावरण निर्माण केलें. बायबलवर परमश्रद्धा असणाऱ्या या गटानें प्रखर नीतिनियम आंखले आणि ते इतरांप्रमाणेंच स्वतःवर सुद्धां कटाक्षानें बंधनकारक ठरविले. हे प्यूरिटन चुकूनसुद्धां हसत नसत, काळा पोशाख वापरीत. मितव्ययी, मद्यपान निषिद्ध मानणारी, हट्टी आणि सदैव गंभीर मनःस्थितींत असणारी अशी ही जमात होती. सत्य आणि सदाचार यांच्या नांवाखालीं कुणालाहि फांसावर लटकवण्याची किंवा त्याचा शिरच्छेद करण्याची, इतकेंच नव्हे तर वेळप्रसंगीं जराहि कुचराई न करतां स्वतःचेंसुद्धां प्राणार्पण करण्याची त्यांची सदैव तयारी असे.

बायबलच्या आदेशाचें श्रद्धापूर्वक पालन करण्यासाठीं ते निःसंदिग्धपणें मानवी समतेचा पुरस्कार करीत आणि कुणापुढेंहि नतमस्तक होत नसत. युरोप-मधील आपल्या पारंपरिक सत्ताधारी वर्गाचें त्यांनीं आपल्या समाजव्यवस्थेंतून उच्चाटन केलें होतें. उमरावांना किंवा चर्चच्या महंतांना त्यांच्या जगांत अस्तित्व नव्हतें. जुनी राजसत्ता आणि चर्च यांचा ऐष-आराम व झगमगाट या उन्मत्तपणाच्या आणि अन्यायाच्या खुणा आहेत, तें सैतानाचें काम आहे, असें ते मानीत. आद्य खिश्चनांचा साधेपणा आणि बंधुभाव हे त्यांचे आदर्श होते. आपल्या आयुष्याशीं निगडित होऊन राहिलेल्या अशा आपल्या जमातीचीच सत्ता ते मान्य करीत. प्यूरिटन जमातीची सत्ता एकाच वेळीं धार्मिक, राजकीय, सामाजिक, नैतिक होती......साक्षेपानें तिचें स्वरूप लोकशाही आणि सर्वव्यापी असें होतें. आपलें सामूहिक जीवन सुसंघटित करण्यासाठीं हे प्यूरिटन एकत्र येत आणि त्यांच्या व्यक्तिगत वर्तणुकीवर नियंत्रण ठेवण्याचा व त्यांच्या कृतींना मार्गदर्शन करण्याचा अधिकार या समाजाचा असे. लोकशाहीचें आधुनिक इतिहासांतील हें पहिलें बीज. त्याच्याभोवतालीं संरक्षणासाठीं पोलादी चौकट होती. सतराव्या शतकांत इंग्लंड सोडून न्यू इंग्लंडमध्यें आलेल्या या प्यूरिटनांविषयीं लिहितांना द तोकव्हिले म्हणतो: "प्राचीनांच्या स्वप्नींहि नसेल अशी समर्थ आणि सुसज्ज लोकशाही जुन्या सरंजामशाही समाजाच्या गाभ्यांतून अवतीर्ण झाली"[१]

आज अमेरिकेंत एकूण लोकसंख्येपैकीं एक लहानसा गटच प्यूरिटन पंथाचा आहे. हा पंथ आतां पूर्वींइतका आग्रही आणि कर्मठ राहिलेला नाहीं. पण तो

१. [Alexis de Tocquevelle : De la Democratie en Amerique, Paris 1951]

९८७४

अस्तित्वांत आहे हें मात्र अमेरिकेंत सर्वत्र अगदीं स्पष्टपणें जाणवतें. प्यूरिटन सत्तेच्या त्या उत्कर्षकाळांतील शिक्षणपद्धतींतून विशुद्ध आणि तेजस्वी शीलाचीं व ज्यांना विरोध करण्यास कोणीहि धजणार नाहीं अशा प्रखर व्यक्तिमत्त्वाचीं अनेक माणसें निर्माण झालीं. हे सर्वच प्यूरिटन न्यू इंग्लंड प्रदेशांत राहिले नाहींत. हळूहळू ते संघराज्याच्या इतर भागांत पसरले. पॅसिफिक किनाऱ्या-पर्यंतच्या दूरवरच्या प्रदेशांत त्यांनीं वस्ती केली, आणि या टोकापासून त्या टोकापर्यंत सबंध देशावर आपल्या वास्तव्याचा प्रभाव पाडला. अमेरिकेंतील प्रत्येक चर्चनें कांहीं ना कांहीं प्रमाणांत प्यूरिटन परंपरा आत्मसात् केल्या आहेत असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. त्यांच्या धार्मिक कायदेकानूंत तसें नसेल पण जीवनाविषयींच्या पाहण्याच्या दृष्टिकोणांत तरी प्यूरिटन छटा आढळते. आजसुद्धां बायबल हें अमेरिकेंत सर्वांत जास्त वाचलें जाणारें पुस्तक आहे. इतर सर्व प्रकाशनांपेक्षां बायबलचा खप कितीतरी अधिक आहे. दरवर्षी बायबलच्या कांहीं कोटी प्रती खपतात. चर्च, तेथली रोजची प्रार्थना आणि तेथें जमणाऱ्या समाजाकडून तसेंच छोट्या चॅपेलमध्यें जाणाऱ्या लोकांच्या गटाकडून केलीं जाणारीं विविध सत्कार्यें या सर्व गोष्टींना अमेरिकेंत युरोपांतल्यांपेक्षां अधिक महत्त्व असल्याचें दिसून येतें. दर रविवारीं नियमितपणें चर्चमध्यें जाणाऱ्यांचें प्रमाण अमेरिकेंत फार मोठें आहे. नव्या काळाचा या उपस्थितीवर कांहींहि परिणाम झालेला नाहीं. राजकारणांतसुद्धां धार्मिक प्रवृत्तींच्या खुणा दिसतात. कोणत्याहि गंभीर राजकीय वादविवादांत, देवाला आवाहन, प्रार्थना, बायबल-मधील वचनांचे दाखले यांचा नेहमींच समावेश असतो. विषय जितका अधिक महत्त्वाचा तितकाच वक्त्याच्या भाषणांत नैतिक बाजूवर जोर अधिक. धर्माच्या संदर्भांत त्यानें त्या विषयाची चर्चा करणें अगदीं स्वाभाविक अशीच स्वतःची व त्याच्या श्रोतृवर्गाची भावना असते. स्वातंत्र्य आणि लोकशाही यांच्या परंपरेंत धर्म हा अविभाज्य घटक आहे अशी लोकांची दृढ भावना आहे. अमेरिका नीट कळण्यासाठीं आपण ध्यानांत घेतलें पाहिजे कीं तेथें धर्मसंस्थेनें केव्हांहि प्रतिक्रांतिकारी प्रवृत्तींशीं सोयरिक केलेली नाहीं. उलटपक्षीं धर्म म्हणजे एक लोकशाही चळवळ आहे, स्वातंत्र्य आणि प्रगतीचें तें निशाण आहे ही जाणी व अमेरिकनांनीं सदैव मनांत जागृत ठेवली आहे.

पण धर्माच्या या प्रभावाहून अगदीं वेगळी व स्वतंत्र, अर्थपूर्ण गोष्ट अशी कीं अमेरिकनांच्या जीवनांतील प्यूरिटन मनोवृत्तीचा एक आंतला थर त्यांच्या प्रत्येक कृतींत दृग्गोचर होतो. त्यांच्या कुटुंबविषयक विचारांत, काम करण्याच्या पद्धतींत,

शिक्षणक्षेत्रांत, समाजाचें आणि शासनसंस्थेचें नियमन करणाऱ्या लोकशाही तत्त्वांत आणि, अलबत, आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील अमेरिकेच्या धोरणांतसुद्धां हा प्यूरिटन दृष्टिकोण प्रतीत होतो. लोकांच्या मनोरचनेवर आपला ठसा उमटवून गेलेली आणि सबंध देशाच्या वातावरणांत भरून राहिलेली अशी ही गोष्ट आहे. कित्येकदां व्यक्तींच्या चेहऱ्यांवरसुद्धां ती प्रतीत होते. वूड्रो विल्सन, किंवा अगदीं अलिकडचे हॅरी ट्रुमन घ्या. त्यांच्या डोळ्यांत, ओठांच्या ठेवणींत, संभाषणांतील एकाद्या सूचक वाक्प्रयोगांत आवाजांत, कोठेंतरी, त्यांची सत्त्वशील मनोवृत्ति, पूर्वजांपासून चालत आलेली कणखर निश्चयात्मकता, सबंध जगाला चांगल्या जीवनाचे पाट देण्याची व अधःपातापासून वांचविण्याची उत्कट ओढ यांचा आपल्याला साक्षात्कार होतो. प्यूरिटन पंथ म्हणजे कॅल्व्हिनचीं तत्त्वें आचरणांत आणण्याची अँग्लोसॅक्सन पद्धत होय. इतरहि पद्धती आहेत; पण ही पद्धत त्यांपैकीं एक महत्त्वाची होय. कॅल्व्हिन-तत्त्वांवर अधिष्ठित असलेलीं इतर प्रार्थनामंदिरें अमेरिकेंत आहेत पण त्यांच्यावरहि प्यूरिटन दृष्टिकोणाचा थोडाफार परिणाम आहेच. एक तत्त्वप्रणाली म्हणून कॅल्व्हिनवाद केवळ धार्मिक हेतूंपुरताच मर्यादित नाहीं, प्रत्यक्ष व्यवहाराकडेहि त्याचें लक्ष आहे. येशू ख्रिस्ताची शिकवण दैनंदिन जीवनांत उतरविण्याचा या पंथाचा हेतु आहे. विरोधाला तोंड देऊन, पद्धतशीर, संघटित प्रयत्नांनीं देशाचें आणि समाजाचें संपूर्णपणें ख्रिस्तीकरण करणें हें त्याचें उद्दिष्ट आहे. व्यक्तीनें सर्वसंगपरित्याग करून केवळ स्वतःच्या मोक्षप्राप्तीसाठीं तपश्चर्येला लागणें किंवा गूढ तत्त्वचिंतनांत मग्न होऊन जाणें कॅल्व्हिनवादाला मान्य नाहीं. माणसानें जगावें, कार्य करावें, निर्मिति करावी, संघटित व्हावें, आणि इतरांनाहि शिकवावें,...पण हें सारें कांहीं अनुल्लंघ्य ख्रिश्चन आचारतत्त्वांच्या चौकटींत राहून करावें अशी कॅल्व्हिनपंथाची मनीषा आहे. 'दैवी पूर्वयोजने'नुसार ज्या तत्त्वांमुळें मनुष्य मुक्त होतो किंवा कर्म-चक्रांत अडकतो त्या तत्त्वांचीहि शिकवण या पंथांत देण्यांत येते. आतां हा पंथ पूर्वयोजनेचा मेळ स्वातंत्र्याशीं कसा घालतो हा धर्मशास्त्राचा विषय आहे आणि त्यांत शिरायची मला भीति वाटते हें कबूल केलें पाहिजे. त्यावर वाद घालून न्याय करणें मला जमणार नाहीं आणि शिवाय तें प्रस्तुत निबंधविषयालाहि सोडून होईल. हें तत्त्वसूत्र अमेरिकेंत कशा रीतीनें आचरणांत आणलें जातें हें आपल्याला जाणून घ्यायचें आहे. अमेरिकेच्या सार्वजनिक जीवनावर त्याचे काय परिणाम घडले आहेत, कोणती मुरड पडली आहे, त्यामुळें इतर तत्त्वांचा घाटहि कसा बदलला आहे आणि त्याहिपुढें जाऊन सबंध अमेरिकन संस्कृतीवर या पंथाच्या

शिकवणुकीची काय प्रक्रिया झाली आहे तें आपल्याला पाहायचें आहे.

या पंथाचा एक परिणाम म्हणजे कांहीं विशिष्ट लोकांत—कॅल्व्हिन पंथाच्या सच्च्या अनुयायांत—असणारी 'आपण ईश्वराचे प्रेषित असून एक अत्यंत उदात्त कार्य पूर्ण करण्यासाठीं आपला जन्म आहे' ही श्रद्धा. मानवाच्या आत्म्याला सद्गति मिळवून देण्यासाठीं, जगांतील असत्प्रवृत्तींचा बींमोड करून सत्प्रवृत्तींना विजय मिळवून देण्यासाठींच आपली योजना असल्यानें आपल्याला कॅल्व्हिनपंथांत जन्म मिळाला असें त्यांना मनोमन वाटतें. याहिपलिकडे जाऊन क्रॉमवेलनें म्हटल्याप्रमाणें 'देवावर अचल विश्वास ठेवा आणि आपली तरवार नेहमीं परजलेली राहूं द्या' अशी या कॅल्व्हिनवाद्यांची वृत्ति असते. लढाईसाठीं सदैव सिद्ध असलेल्या या 'प्रेषितां'ना आपले बांधव व सबंध जग यांची सुधारणा घडवून आणण्याची, त्यांना आपल्या पंथाची दीक्षा देण्याची, मानवी संबंधांत योग्य व न्याय्य काय यासंबंधींचीं आपलीं मतें शक्य झाल्यास लादण्याची अतीव ओढ लागून राहिलेली असते. नव्हे, तें आपलें कर्तव्यच आहे असें त्यांना वाटत असतें. पोपसारखेंच आपलेंहि कांहीं अवतारकार्य आहे असें वाटणाऱ्या अनेक व्यक्ति अमेरिकेंत आढळतात. पुष्कळदां धर्माशीं त्याचा कांहींहि संबंध असत नाहीं. राष्ट्रांतील प्रमुख व्यक्तींत किंवा सामान्य लोकांच्या गटांतहि जगाला सुजाण करावें, समाजाची उन्नति करावी ही भावना आढळते. वूड्रो विल्सनप्रणीत चौदा कलमें, प्रेसिडेंट रूझवेल्टनें जगाला केलेलीं आवाहनें किंवा उद्घोषिलेलीं चार स्वातंत्र्यें, लीग ऑफ नेशन्स आणि यूनो यांच्या स्थापनेमागील भावना या सर्व गोष्टी वर उल्लेखिलेल्या कर्तव्यभावनेच्याच द्योतक आहेत. सर्व अन्यायाचें निराकरण करण्यासाठीं किंवा प्रत्येक सद्गुणाचें संरक्षण करण्यासाठीं म्हणून ज्या अगणित संस्था अमेरिकेंत आहेत त्याहि याच भावनेच्या निदर्शक आहेत. कोणत्याहि धर्मप्रसारासाठीं नव्हे तर विशालवृत्ति व नीतिधैर्य यांची वाढ व्हावी म्हणून, कसलाहि फायदा न घेतां, अमेरिकनांकडून परदेशांत चालविलीं जाणारीं महाविद्यालयें या वृत्तींतूनच निर्माण झालीं आहेत.

तेव्हां, वर सांगितल्याप्रमाणें, या प्रेषितांचें आद्य कर्तव्य म्हणजे सदाचरणी राहणें आणि जगांतील दुष्ट शक्तींशीं झुंजणें. पण अमेरिकेंत या तत्त्वांना कांहीं वेगळी अर्थच्छटा आली आहे. एच. बी. पार्क्स या हल्लींच्या एका लेखकाचें म्हणणें असें कीं "माणसानें ज्यावर मात करायला हवी अशा बाह्य निसर्गावर माणसाचें लक्ष जसजसें जास्त जास्त केंद्रित होऊं लागलें तसतसा स्वतःमधील दुष्ट

प्रवृत्तींवरचा त्याचा भर कमी कमी होऊं लागला."[१] दुष्टता ही आपल्या आत्म्यांतच जखडली गेलेली एक शक्ति आहे आणि म्हणून फक्त आंतरिक प्रतिकारानेंच तिचें दमन करतां येईल अशी युरोपांतील धर्मांची भावना आहे; तर दुष्टपणा हा बाह्य जगाशीं, त्यांतल्या हिंस्रतेशीं निगडित आहे असेंच प्रत्येक निष्ठावान् अमेरिकन नागरिक मानतो. पहिल्या वसाहतकारांपासून सर्व अमेरिकन या दृष्टिकोणाचे आहेत. कॉटन मेथर हा एक पूर्वीचा अमेरिकन धर्मवेत्ता 'एकेकाळीं सैतानाच्या कब्जांत असलेल्या प्रदेशामध्यें वास्तव्य करणारे देवाचे लोक' असा प्यूरिटनांचा उल्लेख करतो. प्यूरिटन लोक रेड-इंडियनांना सैतानाचे हस्तक समजत आणि त्याच दृष्टिकोणांतून त्यांच्याविषयींचें धोरण ठरवीत. युरोपच्या धार्मिक अस्वस्थतेचा अमेरिकेंत लोप झाला आणि दुष्टपणा ही एक मानवी मनाच्या बाहेरची अशी शक्ति मानण्यांत येऊं लागली. निर्जन भूभाग वसाहतीखालीं आणण्याचा, निसर्गाच्या शक्ति काबूत आणण्याचा, वन्य जमातींशीं लढा देण्याचा, बायबलनें सांगितलें आहे त्या धर्तीवर नव्यानें एका खिस्ती धर्मांची संघटना करण्याचा, मिळालेला आदेश असा कॅल्व्हिनच्या शिकवणुकीचा अर्थ केला जाऊं लागला. या पंथाच्या लोकांना कॅल्व्हिनवाद म्हणजे मतस्वातंत्र्य, उत्साहपूर्ण कृति आणि अखेरपक्षीं आशावाद यांचा पुरस्कार करणारा पंथ वाटूं लागला. ईश्वरावर श्रद्धा ठेवून योग्य तें करीत राहणाऱ्यांना अंतिम विजयाबद्दल मुळींच शंका बाळगण्याचें कारण नाहीं अशी त्यांची श्रद्धा बनली. सदैव लोकहिताचीं विधायक कार्यें करून प्रत्येकानें खिस्ती धर्मावरील आपल्या निष्ठेची सत्यता पटविली पाहिजे अशी सर्वत्र आढळणारी श्रद्धा हा अमेरिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण वातावरणांत आचरल्या जाणाऱ्या कॅल्व्हिन पंथाचा आणखी एक पैलू होय. अशा वातावरणांत चर्च म्हणजे अत्यंत उदात्त बाबींपासून तों साध्यासुध्या गोष्टींपर्यंत संस्कृतींतल्या प्रत्येक क्षेत्रामधील आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणारा समाजाचा एक क्रियाशील घटक होऊन राहिलें आहे. आणि म्हणूनच चर्च समाजाच्या आध्यात्मिक आणि भौतिक प्रगतींत साहाय्य करण्याचा, समाजाला नैतिक मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करीत असतें. जगांतल्या बहुतेक धर्मांचे लोक 'पैसा म्हणजे सैतानाची करणी' असें मानतात. पण अमेरिकेंत मात्र पैसा म्हणजे देवाची सेवा करण्याचें, 'चांगल्या नागरिका'चे आदर्श साकार करण्याचें एक साधन समजलें जातें. होय, पैसा म्हणजे 'दैवी पूर्वयोजने'चें एक ठळक चिन्ह असेंहि म्हणतां येईल.

१. Henry Bamford Parke : **The American People : Their Civilization and Character.** London, 1949.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

प्यूरिटन माणूस ऐहिक यशाचा आणि संपत्तीचा अव्हेर करीत नाहीं. वैराग्य त्याला पटत नाहीं. उलट बायबलच्या नियमांचें उल्लंघन न करतां मिळविलेली संपत्ति म्हणजे दैवी देणगीचाच सार्थ प्रत्यय आहे असें तो मानतो. या प्रवृत्तींत आतां नुसती धार्मिक झांक राहिलेली नाहीं. समाजांत प्रचलित असलेल्या सर्व नीतिविषयक कल्पनांवर तिचा प्रभाव पडला आहे. बेकायदेशीर-पणें किंवा अप्रामाणिकपणें न वागतां निव्वळ स्वतःच्या प्रयत्नांच्या व परिश्रमांच्या बळावर मिळविलेली संपत्ति म्हणजे कष्टाला आलेलें दृश्य फळ एवढीच कांहीं संपत्तीबद्दल समजूत राहिलेली नाहीं. तिला अधिक महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. ही संपत्ति म्हणजे एक नैतिक बक्षीस आहे असें अमेरिकन लोक मानतात. "अपयश म्हणजे पुरेशा भलेपणानें न वागल्यामुळें येणारा कलंक, असा अमेरिकनाचा अपयशाविषयींचा दृष्टिकोण असतो," असें मार्गारेट मीडनें स्पष्ट नमूद केलें आहे. "सद्वर्तन आणि सत्फलप्राप्ति यांचा या जगांत निश्चितपणें अन्योन्य संबंध आहे अशी श्रद्धा बाळगणारा पंथ" या शब्दांत मार्गारेट मीडनें प्यूरिटन पंथाचें सार सांगितलें आहे. आणि म्हणूनच अमेरिकेंत केव्हांहि पाऊल न टाकलेले कॅल्व्हिन व क्रॉमवेल हेच एक प्रकारें पहिले थोर अमेरिकन, अमेरिकन संस्कृतीचे आद्यजनक होते असें आपण आजहि म्हणूं शकूं. कॅल्व्हिन व क्रॉमवेल होऊन गेल्याला आज कांहीं शतकें लोटलीं आहेत. पण त्यानंतरच्या काळांत सतत सुरू राहिलेल्या कल्पनासाहचर्यामुळें त्यांचे आदेश आजहि अमेरिकन लोकांच्या जाणिवेंत, व त्याहूनहि अधिक महत्त्वाचें म्हणजे त्यांच्या अन्तर्मनांत, अनुस्यूत आहेत.

*प्रकरण आठवें*

# पश्चिम सरहद्दीवरील साहस

सतराव्या शतकाच्या आरंभापासून तों एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचीं सुमारें तीनशें वर्षें एका सतत विस्तारत्या भूभागांत अमेरिकन राष्ट्र साकार आणि विकसित होत होतें. पश्चिमेकडे दूरवरपर्यंत अफाट निर्जन व समृद्ध भूमि पसरली असून ती शोधून मनुष्यवस्तीखालीं आणण्याचें, जंगलें तोडण्याचें, तेथें मशागत करून शेतें पिकविण्याचें व अशा रीतीनें मानवाच्या सुखसोयींकडे तिचा उपयोग करून घेण्याचेंच तेवढें कार्य करायचें आहे अशी त्या काळीं भावना होती. अधिकृतपणें तर पश्चिमेकडील ही भूमि पूर्वींच अमेरिकेच्या सीमेंत समाविष्ट झाली होती. गेल्या शतकाच्या मध्यास जेव्हां अमेरिकेचें निशाण पॅसिफिकच्या किनाऱ्यावर फडकलें त्या क्षणापासूनच हा पश्चिमप्रदेश अमेरिकन संघराज्याचा भाग बनला. पण प्रत्यक्षांत मात्र नंतरचीं कित्येक वर्षें रॉकी पर्वतांच्या पलिकडला प्रदेश अर्धवट रानटी स्थितींत आणि कायदा व सुव्यवस्था यांचें अधिराज्य स्थापन होऊं न शकलेला असाच राहिला. म्हणून या प्रदेशांना नंतरचीं अनेक वर्षें अमेरिकन लोक 'सरहद्द' असेंच संबोधीत असत.

अमेरिकेच्या आरंभकाळचीं तीनशें वर्षें सरहद्द म्हणून एकादी सरळ, सुस्पष्ट रेषा नव्हती. नेहमीं बदलणारा अगदीं स्वतःचें असें खास वातावरण व विचार-सरणी इतकेंच नव्हे तर स्वतंत्र प्रादेशिक काव्यसंपदा असणारा जवळजवळ अमर्याद असा तो प्रदेश होता. अमेरिकन जीवनपद्धतींतून निर्माण झालेले असे खरेखुरे अमेरिकन लोक त्या प्रदेशांत राहत. जुन्या ज्ञात राज्यांपासून सुरवात करून ज्यांनीं पश्चिमेकडील प्रदेशावर स्वामित्व मिळविलें तेच हे लोक. आज त्यांना अमेरिकन लोककथांत आणि लोकगीतांत अद्भुतरम्य स्थान मिळालें आहे. हळूहळू या सरहद्दप्रदेशांत सुधारणेचीं पहिलीं पावलें उमटूं लागलीं. भटक्या रेड-इंडियनांना एकसारखी माघार घेणें भाग पडलें. नवीन स्थापन झालेल्या स्थानिक शासनसंस्थेनें जमिनीबाबत कायदेशीर हक्कांच्या सनदी देण्यास सुरवात केली आणि अत्यंत उत्सुकतेनें वसाहतवाल्यांनीं या सनदी खरेदी केल्या. जसजसा

प्यूरिटन माणूस ऐहिक यशाचा आणि संपत्तीचा अव्हेर करीत नाहीं. वैराग्य त्याला पटत नाहीं. उलट बायबलच्या नियमांचें उल्लंघन न करतां मिळविलेली संपत्ति म्हणजे दैवी देणगीचाच सार्थ प्रत्यय आहे असें तो मानतो. या प्रवृत्तींत आतां नुसती धार्मिक झांक राहिलेली नाहीं. समाजांत प्रचलित असलेल्या सर्व नीतिविषयक कल्पनांवर तिचा प्रभाव पडला आहे. बेकायदेशीरपणें किंवा अप्रामाणिकपणें न वागतां निव्वळ स्वतःच्या प्रयत्नांच्या व परिश्रमांच्या बळावर मिळविलेली संपत्ति म्हणजे कष्टाला आलेलें दृश्य फळ एवढीच कांहीं संपत्तीबद्दल समजूत राहिलेली नाहीं. तिला अधिक महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. ही संपत्ति म्हणजे एक नैतिक बक्षीस आहे असें अमेरिकन लोक मानतात. "अपयश म्हणजे पुरेशा भलेपणानें न वागल्यामुळें येणारा कलंक, असा अमेरिकनाचा अपयशाविषयींचा दृष्टिकोण असतो," असें मार्गारेट मीडनें स्पष्ट नमूद केलें आहे. "सद्वर्तन आणि सत्फलप्राप्ति यांचा या जगांत निश्चितपणें अन्योन्य संबंध आहे अशी श्रद्धा बाळगणारा पंथ" या शब्दांत मार्गारेट मीडनें प्यूरिटन पंथाचें सार सांगितलें आहे. आणि म्हणूनच अमेरिकेंत केव्हांहि पाऊल न टाकलेले कॅल्व्हिन व क्रॉमवेल हेच एक प्रकारें पहिले थोर अमेरिकन, अमेरिकन संस्कृतीचे आद्यजनक होते असें आपण आजहि म्हणूं शकूं. कॅल्व्हिन व क्रॉमवेल होऊन गेल्याला आज कांहीं शतकें लोटलीं आहेत. पण त्यानंतरच्या काळांत सतत सुरू राहिलेल्या कल्पनासाहचर्यामुळें त्यांचे आदेश आजहि अमेरिकन लोकांच्या जाणिवेंत, व त्याहूनहि अधिक महत्त्वाचें म्हणजे त्यांच्या अन्तर्मनांत, अनुस्यूत आहेत.

# पश्चिम सरहद्दीवरील साहस

सतराव्या शतकाच्या आरंभापासून तों एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतचीं सुमारें तीनशें वर्षें एका सतत विस्तारत्या भूभागांत अमेरिकन राष्ट्र साकार आणि विकसित होत होतें. पश्चिमेकडे दूरवरपर्यंत अफाट निर्जन व समृद्ध भूमि पसरली असून ती शोधून मनुष्यवस्तीखालीं आणण्याचें, जंगलें तोडण्याचें, तेथें मशागत करून शेतें पिकविण्याचें व अशा रीतीनें मानवाच्या सुखसोयींकडे तिचा उपयोग करून घेण्याचेंच तेवढें कार्य करायचें आहे अशी त्या काळीं भावना होती. अधिकृतपणें तर पश्चिमेकडील ही भूमि पूर्वीच अमेरिकेच्या सीमेंत समाविष्ट झाली होती. गेल्या शतकाच्या मध्यास जेव्हां अमेरिकेचें निशाण पॅसिफिकच्या किनाऱ्यावर फडकलें त्या क्षणापासूनच हा पश्चिमप्रदेश अमेरिकन संघराज्याचा भाग बनला. पण प्रत्यक्षांत मात्र नंतरचीं कित्येक वर्षें रॉकी पर्वतांच्या पलिकडला प्रदेश अर्धवट रानटी स्थितींत आणि कायदा व सुव्यवस्था यांचें अधिराज्य स्थापन होऊं न शकलेला असाच राहिला. म्हणून या प्रदेशांना नंतरचीं अनेक वर्षें अमेरिकन लोक ‘ सरहद्द ’ असेंच संबोधीत असत.

अमेरिकेच्या आरंभकाळचीं तीनशें वर्षें सरहद्द म्हणून एकादी सरळ, सुस्पष्ट रेषा नव्हती. नेहमीं बदलणारा अगदीं स्वतःचें असें खास वातावरण व विचार-सरणी इतकेंच नव्हे तर स्वतंत्र प्रादेशिक काव्यसंपदा असणारा जवळजवळ अमर्याद असा तो प्रदेश होता. अमेरिकन जीवनपद्धतींतून निर्माण झालेले असे खरेखुरे अमेरिकन लोक त्या प्रदेशांत राहत. जुन्या ज्ञात राज्यांपासून सुरवात करून ज्यांनीं पश्चिमेकडील प्रदेशावर स्वामित्व मिळविलें तेच हे लोक. आज त्यांना अमेरिकन लोककथांत आणि लोकगीतांत अद्भुतरम्य स्थान मिळालें आहे. हळूहळू या सरहद्दप्रदेशांत सुधारणेचीं पहिलीं पावलें उमटूं लागलीं. भटक्या रेड-इंडियनांना एकसारखी माघार घेणें भाग पडलें. नवीन स्थापन झालेल्या स्थानिक शासनसंस्थेनें जमिनीबाबत कायदेशीर हक्कांच्या सनदी देण्यास सुरवात केली आणि अत्यंत उत्सुकतेनें वसाहतवाल्यांनीं या सनदी खरेदी केल्या. जसजसा

काळ लोटूं लागला तसतसा पश्चिम प्रदेशांतील खळबळीचा, अस्थिर जीवनक्रम शांततापूर्ण व कायद्याचें पालन करणारा असा होऊं लागला. वसाहतवाल्यांमागोमाग धर्मगुरु, शिक्षक, वकील, वृत्तपत्रकार, बँकर आणि सुसंघटित पोलिस दल यांचाहि प्रवेश झाला. तात्पुरतीं म्हणून बांधलेलीं साधीं, लाकडी ओंडक्यांचीं घरें जाऊन तिथें प्रार्थनामंदिरें, कोर्टें, शाळा आणि तुरुंग असलेलीं लहान, स्वच्छतापूर्ण गांवें निर्माण झालीं. एवढी प्रगति झाली तेव्हां पुन्हा वसाहतवाल्यांपैकीं विशेष साहसी आणि उत्साही रहिवासी हातांत बंदूक सरसावून व घोड्यावर टांग टाकून किंवा नुकत्याच सुरू झालेल्या मालगाडीवजा रेल्वेंतून पश्चिम क्षितिजाच्या रोखानें आगेकूच करीत. असें करतांना ते जणुं नव्या संकटांना आमंत्रणच देत असत पण या संकटांमुळें नाउमेद न होतां उलट त्यांची नवीन प्रदेश जिंकण्याची लालसा अधिकच बळावत असे. तो अज्ञात विस्तीर्ण प्रदेश जिंकण्याच्या, नवी भूमि आपल्या अंमलाखालीं आणण्याच्या, रेड-इंडियन, हिंस्र श्वापदें व प्रत्यक्ष निसर्गाच्या भयानक विरोधाशीं झुंझण्याच्या कल्पनेनें ते धुंद होऊन जात. पूर्वीच्या प्रदेशांइतकाच जंगलमय आणि कायदा व सुव्यवस्था यांचा जिथें मागमूसहि नाहीं असा एक नवा सरहद्द प्रदेश या साहसी लोकांना खुला झाला. साहस, दरोडेखोरी आणि जमावाची गुंडगिरी यांच्या बातम्या रोजच्या रोज कानावर येत. जिकडे तिकडे जुगाराचे अड्डे निर्माण झाले. अहोरात्र नाचतमाशांचा धांगडधिंगा सुरू असणाऱ्या दारूच्या गुत्त्यांत तर बंदुकांच्या आणि ठोसाठोशीच्या मारामाऱ्या हीं एक नित्याचीच बाब होऊन बसली. पण कांहीं काळानंतर असल्या रानटी जिण्याचा त्यांना कंटाळा आला, त्यांच्यांतल्या सामाजिक प्रवृत्ति आपला प्रभाव पाडूं लागल्या आणि आपल्या जीवनपद्धतींत कांहींतरी सुव्यवस्था स्थापन करण्याचें त्यांनीं ठरविलें. या नव्या शासनसंस्थेला न जुमानणाऱ्या अनेक बंडखोरांना फांसावर लटकाविण्यांत आलें आणि कित्येकांना बाहेर हुसकून लावण्यांत आलें.

या आरंभकाळाच्या स्मृतींना आतां अमेरिकेंत अत्यंत काव्यात्म पौराणिक आणि स्वरूप प्राप्त झालें आहे व साहित्यिकांचा आणि नाटककारांचा तो एक आवडता विषय होऊन बसला आहे. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाच्या या गोष्टींनीं मुलांमध्यें उत्साह संचारतो आणि मोठ्यांनाहि त्यापासून नेहमींच स्फूर्ति मिळत राहील. 'वेस्टर्न' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या चित्रपटांची अफाट लोकप्रियता आपण विसरतां कामा नये. या चित्रपटांनीं सबंध अमेरिकेला आणि खरें सांगायचें म्हणजे सबंध जगाला वेड लावलें आहे. एकोणिसाव्या शतकांतील जीवनक्रम पडद्यावर आणणाऱ्या या पश्चिमदिग्विजय-कथा म्हणजे

जागतिक सिनेसृष्टीचा एक महत्त्वाचा घटक आहे. युरोपच्या, विशेषतः इंग्लंड आणि फ्रान्सच्या, इतिहासावर आधारलेल्या अमेरिकन चित्रपटांच्या मानानें हे 'वेस्टर्न' चित्रपट कथानकाच्या दृष्टीनें साधे असतील पण इतर चित्रपटांत आढळणारा चकचकीत खोटेपणा त्यांत नसतो. या 'वेस्टर्न' चित्रपटांतील घटना अवास्तव वाटत नाहींत. युरोपियन इतिहासाची हॉलिवुड स्टुडिओंत तयार झालेली आवृत्ति इतकी रसहीन आणि सत्यापासून दुरावलेली असते कीं इतिहासाविषयीं थोडाबहुत जिव्हाळा वाटणाऱ्या कोणत्याहि प्रेक्षकवर्गाला त्यांतील नाटकीपणा खटकतो. पण 'वेस्टर्न' चित्रपट मात्र इतक्या कल्पकतेनें तयार केलेले असतात कीं त्यांतील अखेर सत्याचा होणारा विजय आणि दुष्टांचा पाडाव पाहून आपल्याला सुद्धां हर्ष वाटतो. वसाहतवाल्यांची ही दीर्घकाळ सुरू राहिलेली पश्चिमयात्रा म्हणजे मूळ अमेरिकन वसाहतींचीच अंतर्गत आवृत्ति होय. उलट हें पश्चिमसाहस मूळ वसाहतींच्या हकीकतींपेक्षां अधिक चित्तथरारक होतें, आणि अमेरिकन राष्ट्रजीवनांत या घटनेच्या चिरकाल टिकतील अशा खुणा उमटल्या आहेत. ज्या सरहद्दीवरील वातावरणांत हे सततोद्योगी लोक निर्माण झाले त्या वातावरणाचा परिणाम पूर्वीच वसाहत झालेल्या इतर प्रदेशांवरहि झाल्याखेरीज राहिला नाहीं. एवढेंच नव्हे तर या वातावरणानें कोणत्याच प्रदेशांत कसलाहि सांचेबंदपणा येऊं दिला नाहीं. त्यानें या प्रदेशांना कित्येक शतकें नित्य बदलत्या स्वरूपांत ठेवलें. १९०० सालापर्यंत हा प्रभाव कायम टिकला आणि तेव्हांपासून त्या वातावरणाचा अमेरिकन मनावर इतका खोल ठसा उमटला आहे कीं अमेरिकन परंपरेचें तें एक वैशिष्ट्य होऊन बसलें आहे. या परंपरांनींच अमेरिकन स्वभाव घडवला आहे.

प्रथमपासूनच दणकट शरीरप्रकृति आणि बेदरकार मनोवृत्ति या सरहद्दीवरील जीवनाच्या अवश्यभूत गोष्टी होत्या. असामान्य चिकाटी आणि काटकपणा अंगीं बाणवण्याखेरीज या सरहद्दीवरील रहिवाशांना गत्यंतरच नव्हतें. समोर पसरलेल्या जंगलावर मात करून तेथें आपलें घर उभारण्यासाठीं या गुणांची जोड अनिवार्यच होती. कणखर तरुण मन, कल्पकता, खंबीर आत्मविश्वास आणि आशावाद यांच्यावांचून तिथें चालण्यासारखें नव्हतें. जो सर्वांत अधिक साहसी, वाकबगार आणि चिवट असे तेवढाच तेथें टिकून राहूं शकत असे आणि यशस्वी होत असे. एका नव्या, कल्पक आणि दुर्दम्य अशा मानवसमूहाला जन्म देणाऱ्या पश्चिम प्रदेशाचें स्वरूप हें असें होतें.

नजरेसमोर अमर्याद पसरलेला निर्जन गवताळ प्रदेश आणि या नव्या जगांत

व्यक्तिविकासाला व कर्तृत्वाला मिळणारें अनिर्बंध क्षेत्र यांनीं त्यांचा उत्साह, त्यांचें साहस, त्यांचें वैयक्तिक कर्तृत्व दशगुणित होई आणि त्यांत स्वातंत्र्यप्रेमाची बहुमोल जोड मिळे. त्यामुळें जीवनाकडे एका अभिनव दृष्टिकोणांतून पाहणारी चैतन्यपूर्ण मनोवृत्ति सबंध राष्ट्र व्यापून राही. अमेरिकन लोकांच्या प्रचंड योजना, आश्चर्यकारक बांधकाम, शास्त्रीय प्रगति आणि संघटनेची व नवीन उपक्रमांची त्यांची विलक्षण हातोटी यांत आजहि आपल्याला या मनोवृत्तीचें प्रतिबिंब पाहायला मिळतें. निरंकुश कल्पकता, अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राजकारण या क्षेत्रांतील भावी कार्याविषयींचे विशाल संकल्प—थोडक्यांत म्हणजे खास अमेरिकेची म्हणून जी वैशिष्ट्यपूर्ण मनोरचना आहे त्या मनोरचनेवर या गतकालीन प्रभावाचे अनंत उपकार आहेत.

अमेरिकन स्वभावांतल्या इतर अनेक लहानमोठ्या स्वभावविशेषांचा उगम आपणांला या आरंभींच्या वसाहतकाळांत झाल्याचें आढळेल. संपन्न मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून शारीरिक श्रमांकडे पाहण्याची व त्यांना मान देण्याची भूमिका आणि अधोगतीकडे नेणाऱ्या निष्क्रियतेबद्दल वाटणारा तिटकारा यांचा उदाहरण म्हणून उल्लेख करतां येईल. शारीरिक श्रमांना रजा देऊन एकादा तरी दिवस तसाच वायां दवडणें या आद्य वसाहतवाल्यांना चालण्यासारखें होतें काय? कामाविषयींची ही निष्ठा हा कांहीं केवळ नैतिक शिकवणुकीचा प्रभाव नाहीं. इंग्लिश लोक पहिल्यांदा वसाहतीसाठीं आले तेव्हांपासून अस्तित्वांत असलेल्या कायद्यांनीं हा परिणाम घडवून आणण्यास साहाय्य केलें आहे. व्हर्जिनियांतील एका जुन्या कायद्यांत अशी तरतूद आहे कीं जर एकादा मनुष्य आळशीपणानें वेळ घालवतांना आढळला तर त्याला सक्तीनें कामास लावलें जाईल व अशा कामाची त्यास मजुरी मिळेल. "तो आपलें वर्तन सुधारील याची खात्री पटेपर्यंत"[1] ही सजा चालू राहील, असेंहि या कायद्यांत म्हटलें आहे. हा कायदा ज्यानें निर्माण केला त्यानेंच अमेरिकेच्या आजच्या सामाजिक जाणिवेचा पाया घातला असें म्हटलें पाहिजे.

तरी केवळ अंग मोडून काम करणें एवढेंच त्या काळीं पुरेसें नव्हतें. त्या आद्य वसाहतकाराला एकाच वेळीं अनेक प्रकारचीं कामें उरकावीं लागत आणि तीं सर्व कामें उत्तम पार पडणें फार जरुरीचें असे. त्या जंगली जमिनींतून उदरनिर्वाहाइतकें मिळवायचें म्हणजे कितीतरी गोष्टी ताबडतोब कराव्या लागत :

१. 'द एपिक ऑफ अमेरिका', न्यूयॉर्क १९३१. लेखक : जेम्स ट्रस्लो ॲडम्स.

झाडें तोडावीं लागत, रस्ते, घरें, व पूल बांधणें आवश्यक असे, जमिनीची मशागत, गुरांची देखरेख, फर्निचर तयार करणें यांखेरीज नव्या वसाहतीसाठीं आवश्यक असणारे कित्येक इतर उद्योग करावे लागत. आणि हें सगळें चालू असतांनाच सामाजिक संघटनप्रयत्नांत आणि स्थानिक शासनयंत्रणा स्थापन करण्यांत व्यत्यय आणणाऱ्या रेड-इंडियनांबरोबर अहोरात्र लढाया खेळाव्या लागत. कित्येकदां हीं दोन्ही कामें एकाच माणसावर येऊन पडत आणि त्यांपैकीं कोणत्या कामाला प्राधान्य द्यावें याचा त्याच्यापुढें पेच पडत असे. स्वसामर्थ्य सिद्ध करून दाखविण्याची आपल्या पूर्वजांचीच खुमखुमी त्याच्याहि रक्तांत खेळत असल्यामुळें माघार घेणें व आपण कमकुवत असल्याची कबुली देणें त्याच्या कोशांतच नव्हतें. तत्कालीन जीवनांतले सततचे बदल आणि त्या लोकांचा हरहुन्नरीपणा यांचें प्रतिबिंब आपल्याला आजच्या अमेरिकन समाजाच्या क्रियाशीलतेंत, व्यवहारकौशल्यांत, नव्या परिस्थितीशीं चटकन् जुळवून घेण्याच्या प्रवृत्तींत आढळतें.

त्यावेळचें सरहद्दीवरचें जीवनच असें धकाधकीचें होतें कीं युरोपमधील नाजुक चालीरीती, फॅशन्स इत्यादींचा त्याग करणें—नव्हे, या चालीरीती पाळणें हा गुन्हा आहे असें मानणें—त्या काळच्या वसाहतवाल्यांना भाग पडलें. त्यांनीं सामाजिक वागणुकीचा आपला असा एक स्वतंत्र सांचा निर्माण केला. ही जीवनपद्धति अधिक नैसर्गिक, व्यवहार्य, आणि बरीचशी ओबडधोबड पण पूर्णपणें सडेतोड होती. अमेरिकनांशीं निकट परिचय होऊन त्यांच्या जीवनक्रमाशीं आपली नीट ओळख झाली म्हणजे त्यांच्या ज्या उल्लेखनीय गुणविशेषांचा आपल्यावर मोह पडतो ते सारे गुण या नव्या जीवनपद्धतींत अनुस्यूत आहेत; त्यांचा उमदा उत्साह, मनाचा मोकळेपणा, त्यांचा दिलदारपणा आणि आदरातिथ्य, इतरांना मदत आणि साहाय्य करण्याची त्यांची तत्परता, त्यांचा जिव्हाळा, निराळा अनुभव येईपर्यंत सर्वजण प्रामाणिकच आहेत अशा विश्वासानें वागण्याची त्यांची पद्धत आणि एकाद्याचा अप्रामाणिकपणा सिद्ध झाल्यावर त्याच्याबद्दल अत्यंत कठोर दृष्टिकोण स्वीकारण्याचा त्यांचा शिरस्ता हीं सगळीं वैशिष्ट्यें अमेरिकन जीवनपद्धतींत आरंभापासून चालत आलीं आहेत. या सद्गुणांच्या आणि दुसऱ्याशीं विश्वासानें वागण्याच्या पण विश्वासघात झाल्यास कडक शासन करण्याच्या जोरावरच आद्य अमेरिकन समाज संघटित राहूं शकला. सरहद्दीवरील प्रत्येक वसाहतकाराचा आंतरिक आशावाद एक नैतिक सद्गुण म्हणून ओळखला जाऊं लागला. सामूहिक मैत्रीच्या भावनेंतून निर्माण होणारा

नैसर्गिक स्नेहभाव आणि आपल्या सहकाऱ्यांबद्दल वाटणारी आत्मीयता हे गुण आदरणीय ठरले. निराशावाद, द्वेषबुद्धि किंवा कोणतीहि विध्वंसक विचारसरणी समाजविरोधी अतएव त्याज्य समजली जाऊं लागली. अमेरिकनांत अगदीं पहिल्यापासून प्रामुख्यानें आढळणारें व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलचें प्रेम आणि सर्वांना समान मानण्याची भावना या सरहद्दीवरील घटनांमुळें अधिकच दृढ झाली हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हे नुसते पुस्तकी सिद्धान्त नव्हते तर प्रत्यक्ष जीवनांतून आलेले ते प्रगाढ सामूहिक प्रत्यय होते. कोण कोठें जन्माला आला, त्याच्या पूर्वजांचे किताब कोणते होते, त्यांचा सामाजिक दर्जा काय होता या गोष्टींना यत्किंचितहि महत्त्व उरलें नाहीं. या चौकशा करणाऱ्याचें त्या काळीं हसें झालें असतें. स्वतःची व्यक्तिगत लायकी, बंदूक आणि कुऱ्हाड चालविण्यांतील कौशल्य, जंगलांतील जमीन शेतीखालीं आणण्याची त्याची धमक, नैसर्गिक संकटांविरुद्ध झुंजण्याची त्याची कुवत, जंगली अस्वलें आणि गोऱ्यांचीं कातडीं सोलून काढण्यासाठीं टपून बसलेले रेड-इंडियन यांना सामना देण्याची त्याची सिद्धता, नवा समाज आणि नवी संस्कृति निर्माण करण्यांत त्याच्याकडून होणारें साहाय्य यांवरून प्रत्येकाचें श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व ठरूं लागलें. स्वतंत्र आणि समान हक्क असणारी एक व्यक्ति म्हणूनच प्रत्येकजण आपल्या आयुष्यास प्रारंभ करी. असीम असा पश्चिमप्रदेश हातीं आल्यानें हर्षित झालेल्या आणि बायबलाच्या मूलभूत तत्त्वांचें पालन करणाऱ्या या वसाहतकारांनीं अमेरिकेच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक संस्थांना नवचैतन्य आणि नवें सामर्थ्य मिळवून दिलें.

*प्रकरण नववें*

# लोकशाही

मीं अमेरिकेंत जसजसा प्रवास केला आणि त्यांच्या उज्ज्वल इतिहासांतल्या कथा-काव्यांचा माझ्या मनावर जसजसा परिणाम होऊं लागला तसतसें मला वाटूं लागलें कीं येथली लोकशाही या भूमींतूनच तर निर्माण झालेली नाहीं ? येथील अनिर्बंध जीवनाचा हा उत्स्फूर्त आविष्कार तर नव्हे ? होय, ही लोकशाही प्रथम अशीच निर्माण झाली असली पाहिजे आणि नंतर तिला आजच्या तात्त्विक सिद्धांतांत गोवलें असलें पाहिजे. समाज सुसंघटित करण्यासाठीं आपल्या लाकडी घराघरांतून सभा भरविणारे ते आद्य अमेरिकन रहिवासी माझ्या नजरेसमोर तरळूं लागले. हिंस्र श्वापदांचा सुळसुळाट असलेल्या आणि प्राणघातासाठीं टपलेल्या रानमांजरासारख्या सावध व चपळ रेड-इंडियनांचा मुक्त संचार असलेलीं दाट अरण्यें, पर्वतांच्या रांगा आणि गवताळ प्रदेश यांनीं वसाहतवाल्यांना वेढलें होतें. आकस्मिक अराजक आणि विनाश टाळायचा असेल तर आपण स्वतःवर कांहीं निर्बंध घालून घेतले पाहिजेत आणि त्यांचें कटाक्षानें पालन केलें पाहिजे हें या वसाहतवाल्यांनीं ओळखलें. आपल्या अद्याप अस्पष्ट अशा अधिकारमर्यादांत राहून चटकन् निर्णय घेऊं शकेल असा एका खंबीर नेता आपल्याला लाभणें आवश्यक आहे हें त्यांना कळून चुकलें. हा नेता दूरच्या एकाद्या सरकारनें नेमलेला असो कीं नागरिकांनीं निवडलेला असो, तत्कालीन परिस्थितीच अशी होती कीं आपलें नेतृत्व टिकविण्यासाठीं त्याला सदैव जनतेच्या संमतीवर अवलंबून राहणें भाग पडे. आपल्या सर्व कृत्यांसाठीं तो जनतेला जबाबदार असे. म्हणून असा नेता अत्यंत कर्तबगार असला पाहिजे अशी सर्वांची इच्छा असे, त्याचीं कर्तव्यें अनेकविध होतीं आणि त्याचे अधिकारहि अर्थातच खूप मोठे होते, पण त्याला या अधिकारांचा दुरुपयोग करतां येण्याजोगी परिस्थिति नव्हती. कारण जनतेबरोबरच इतर कांहीं आध्यात्मिक प्रभावांचेंहि त्याच्यावर नियंत्रण होतें. बायबलप्रणीत तत्वें, स्वातंत्र्य व समता यांवरील श्रद्धा, न्याय्य बाजूचा पुरस्कार करण्याची आंतरिक प्रेरणा, वैयक्तिक आयुष्य अत्यंत शिस्तबद्ध ठेवण्याची प्रॉटेस्टंट

प्रथा, अँग्लोसॅक्सनांच्या प्रभावानें मनावर ठसलेली सामाजिक कर्तव्यांविषयींची श्रद्धा, हीं सारीं तत्त्वें नेतृत्वाचें नियमन करीत. लॅटिन अमेरिकेंत मात्र या प्रभावांचा संपूर्ण अभाव होता. अमेरिकन लोकशाहीची अत्यंत नैसर्गिक आणि सौष्ठवपूर्ण वाढ होण्यास या तत्त्वांचें साहाय्य झालें असलें पाहिजे हें मला उमगूं लागलें. अमेरिकेची शासनयंत्रणा सुस्थिर आणि सामर्थ्यशाली आहे, पण राज्यघटनेविरुद्ध थोडीसुद्धां हालचाल करण्याचा विचारहि तिच्या मनाला शिवणार नाहीं. कारण विशाल लोकशाही स्वातंत्र्याची या शासनसंस्थेला कल्पना आहे आणि आपल्यावर राज्यकारभारविषयक कांहीं नियमांचें आणि जनतेचें कधींहि झुगारतां येणार नाहीं असें राजकीय नियंत्रण आहे याची तिला जाणीव आहे. या दोहोंच्या सहज मिलाफामुळेंच अमेरिकन लोकशाहींत एक प्रकारची प्रमाणबद्धता आढळते.

अर्थात् आधींच स्पष्ट केल्याप्रमाणें माझ्या मनांत चमकून गेलेल्या अनेक कल्पनांपैकीं कांहीं मीं वर मांडल्या आहेत. या परिस्थितीमागचीं ऐतिहासिक सत्यें बरींच गुंतागुंतीचीं आहेत आणि असें दोनचार वाक्यांत त्यांचें विश्लेषण करतां येणार नाहीं. त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती-इतकाच युरोपमधील कांहीं तत्त्वप्रणालींचा अमेरिकेंतील संस्थांच्या विकासावर परिणाम झाला. बारकाईनें अभ्यास केल्यावर आढळून येतें कीं या साऱ्या विकासावर महान् इतिहासाचा—इंग्लंडच्या इतिहासाचा—दाट प्रभाव पडला आहे. या प्रभावाचे परिणाम कधीं प्रकर्षानें तर कधीं अभावानें दिसून येतात. इंग्लंडविरुद्धच्या आपल्या निषेध-भावनांचें साकार स्वरूप म्हणूनच अमेरिकन प्रजासत्ताक अस्तित्वांत आलें हें खरें असलें तरी त्याच वेळीं समृद्ध इंग्लिश परंपरांतून अमेरिकेनें अनेक प्रगल्भ मूल्यांचा वारसा मिळविला! एकाच अँग्लोसॅक्सन विचारपद्धतींतून आजच्या या युगांतील ग्रेट ब्रिटन व अमेरिका या अत्यंत भिन्न स्वरूपाच्या लोकशाही शासनव्यवस्था निर्माण व्हाव्या ही एक आश्चर्य-जनक घटना आहे. ब्रिटनमधील लोकशाही प्रत्यक्ष अनुभवांतून विकास पावलेली आणि पार्लमेंटरी पद्धतीची आहे. कोणत्याहि पुस्तकी तत्त्वांचा आधार न घेतां अनेक शतकें चालत आलेल्या प्रथांच्या प्रकाशांत इंग्लंडचा राज्यकारभार चालतो. याउलट अमेरिकन लोकशाही दुर्लंघ्य अशा लिखित राज्यघटनेंतील तत्त्वांवर आधारलेली आहे. अध्यक्षीय नेतृत्व आणि बुद्धिवाद यांवर तिची मूलभूत श्रद्धा आहे. इंग्लंडमधून अनेक वकिलांनीं आणि धनिक वसाहतवाल्यांनींच आपलें इंग्लिश नागरिकत्व सोडून एका नव्या देशप्रेमाचा अंगीकार केला आणि अमेरिकन सरकारच्या सद्यःस्वरूपाचा घाट निश्चित केला. नव्या खंडांतील संकटमय

परिस्थितींत या वसाहतवाल्यांनीं जुन्या इंग्रजी परंपरांचें पुनरुज्जीवन केलें. या आद्य अमेरिकनांच्या आचार-विचारांचा ठसा आजहि अमेरिकन समाजरचनेंत स्पष्टपणें पाहायला मिळतो.

दर चार वर्षांनीं साजऱ्या होणाऱ्या एका वॉशिंग्टनमधील समारंभास आम्ही उपस्थित होतों. चोहों बाजूंस सुंदर उद्यानें असलेल्या कॅपिटॉल इमारतीमागील एका चौकांत अत्यंत गंभीरपणें अनेक लोक जमले होते. हिवाळ्यांतील ती एक रम्य सकाळ होती. संघराज्याच्या राजधानींतलीं अनेक निशाणें डौलानें फडफडत होतीं आणि सूर्यकिरणांच्या प्रकाशांत सबंध शहर कसें चकाकत होतें. एका लाकडी व्यासपीठावर संघराज्याचे अनेक अधिकारी साध्या पोशाखांत उभे होते. त्यांतच जुना आणि नवा असे दोन्ही अध्यक्ष होते. आणि त्या मेळाव्यांत सुद्धां बायबल हातांत घेऊन उभा असलेला प्युरिटन संस्कारांचा मुख्य न्यायाधीश उठून दिसत होता. व्हाइट हाउसपासून दोन्ही अध्यक्ष उघड्या मोटारींतून आले होते. समारंभ सुरू झाला. मुख्य न्यायाधीशानें नव्या अध्यक्षासमोर बायबल धरलें आणि अध्यक्षानें राष्ट्रनिष्ठेची शपथ घेतली. शपथविधीनंतर आपल्या पत्नीचें चुंबन घेऊन अध्यक्ष जनसमूहाकडे वळला आणि स्वतः तयार केलेली प्रार्थना त्यानें मोठ्यानें वाचली. कोणत्या तत्त्वांवर आपली श्रद्धा आहे आणि आपण आपल्या राज्यकारभाराची उभारणी करणार आहोंत हें त्या प्रार्थनेंत नमूद केलें होतें. या तत्त्वांना आपली अनुमति सूचित केल्यावर गर्दी ओसरूं लागली. समारंभ संपल्यानंतर अस्तंगत अध्यक्ष पुन्हा एक साधा नागरिक बनला आणि त्यानें 'कॅपिटॉल' या राज्यकारभार केंद्राची रजा घेतली. जमलेल्या गर्दीपैकींच आतां तो एक होता. थोड्या वेळानें तो रेल्वे स्टेशनवर गेला, आणि एका साध्या गाडीनें आपल्या राज्यांत परतला. हा सर्व प्रकार इतका साधा आणि संयत होता कीं त्या वातावरणांत प्राचीन ग्रीसची आणि रोमची कांहीं छटा प्रतीत झाल्यावांचून राहिली नाहीं. या लोकशाहीच्या प्रत्येक अंगोपांगांत अगदीं हाच स्पृहणीय साधेपणा, व्यक्तिगत शिस्त आणि परस्परांबद्दल आदराची भावना आढळून येईल. आठवड्यांतील कोणत्याहि दिवशीं एका ठराविक वेळीं कोणालाहि 'व्हाइट हाउस'-मध्यें जातां येतें. या आटोपशीर आकाराच्या इमारतींत अक्षरशः कुणालाहि मज्जाव नाहीं. येथेंच अमेरिकेचा सर्वोच्च नेता राहतो, काम करतो आणि विचारविनिमयासाठीं सभा बोलावतो. तेथें जाण्यासाठीं तुम्हांला खास परवाना काढावा लागत नाहीं, ओळखपत्र दाखवावें लागत नाहीं, एवढेंच नव्हे तर तुम्ही कुठें निघालां आहांत याचीहि तेथें चौकशी केली जात नाहीं. तुम्ही व्हरांड्यांत हिंडूं

प्रथा, ॲंग्लोसॅक्सनांच्या प्रभावानें मनावर ठसलेली सामाजिक कर्तव्यांविषयींची श्रद्धा, हीं सारीं तत्त्वें नेतृत्वाचें नियमन करीत. लॅटिन अमेरिकेंत मात्र या प्रभावांचा संपूर्ण अभाव होता. अमेरिकन लोकशाहीची अत्यंत नैसर्गिक आणि सौष्ठवपूर्ण वाढ होण्यास या तत्त्वांचें साहाय्य झालें असलें पाहिजे हें मला उमगूं लागलें. अमेरिकेची शासनयंत्रणा सुस्थिर आणि सामर्थ्यशाली आहे, पण राज्यघटनेविरुद्ध थोडीसुद्धां हालचाल करण्याचा विचारहि तिच्या मनाला शिवणार नाहीं. कारण विशाल लोकशाही स्वातंत्र्याची या शासनसंस्थेला कल्पना आहे आणि आपल्यावर राज्यकारभारविषयक कांहीं नियमांचें आणि जनतेचें कधींहि झुगारतां येणार नाहीं असें राजकीय नियंत्रण आहे याची तिला जाणीव आहे. या दोहोंच्या सहज मिलाफामुळेंच अमेरिकन लोकशाहींत एक प्रकारची प्रमाणबद्धता आढळते.

अर्थात् आधींच स्पष्ट केल्याप्रमाणें माझ्या मनांत चमकून गेलेल्या अनेक कल्पनांपैकीं कांहीं मीं वर मांडल्या आहेत. या परिस्थितीमागचीं ऐतिहासिक सत्यें बरींच गुंतागुंतीचीं आहेत आणि असें दोनचार वाक्यांत त्यांचें विश्लेषण करतां येणार नाहीं. त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती-इतकाच युरोपमधील कांहीं तत्त्वप्रणालींचा अमेरिकेंतील संस्थांच्या विकासावर परिणाम झाला. बारकाईनें अभ्यास केल्यावर आढळून येतें कीं या साऱ्या विकासावर महान् इतिहासाचा—इंग्लंडच्या इतिहासाचा—दाट प्रभाव पडला आहे. या प्रभावाचे परिणाम कधीं प्रकर्षानें तर कधीं अभावानें दिसून येतात. इंग्लंडविरुद्धच्या आपल्या निषेध-भावनांचें साकार स्वरूप म्हणूनच अमेरिकन प्रजासत्ताक अस्तित्वांत आलें हें खरें असलें तरी त्याच वेळीं समृद्ध इंग्लिश परंपरांतून अमेरिकेनें अनेक प्रगल्भ मूल्यांचा वारसा मिळविला! एकाच ॲंग्लोसॅक्सन विचारपद्धतींतून आजच्या या युगांतील ग्रेट ब्रिटन व अमेरिका या अत्यंत भिन्न स्वरूपाच्या लोकशाही शासनव्यवस्था निर्माण व्हाव्या ही एक आश्चर्य-जनक घटना आहे. ब्रिटनमधील लोकशाही प्रत्यक्ष अनुभवांतून विकास पावलेली आणि पार्लमेंटरी पद्धतीची आहे. कोणत्याहि पुस्तकी तत्त्वांचा आधार न घेतां अनेक शतकें चालत आलेल्या प्रथांच्या प्रकाशांत इंग्लंडचा राज्यकारभार चालतो. याउलट अमेरिकन लोकशाही दुर्लंघ्य अशा लिखित राज्यघटनेंतील तत्त्वांवर आधारलेली आहे. अध्यक्षीय नेतृत्व आणि बुद्धिवाद यांवर तिची मूलभूत श्रद्धा आहे. इंग्लंडमधून अनेक वकिलांनीं आणि धनिक वसाहतवाल्यांनींच आपलें इंग्लिश नागरिकत्व सोडून एका नव्या देशप्रेमाचा अंगीकार केला आणि अमेरिकन सरकारच्या सद्यःस्वरूपाचा घाट निश्चित केला. नव्या खंडांतील संकटमय

परिस्थितींत या वसाहतवाल्यांनीं जुन्या इंग्रजी परंपरांचें पुनरुज्जीवन केलें. या आद्य अमेरिकनांच्या आचार-विचारांचा ठसा आजहि अमेरिकन समाजरचनेंत स्पष्टपणें पाहायला मिळतो.

दर चार वर्षांनीं साजऱ्या होणाऱ्या एका वॉशिंग्टनमधील समारंभास आम्ही उपस्थित होतों. चोहों बाजूंस सुंदर उद्यानें असलेल्या कॅपिटॉल इमारतीमागील एका चौकांत अत्यंत गंभीरपणें अनेक लोक जमले होते. हिवाळ्यांतील ती एक रम्य सकाळ होती. संघराज्याच्या राजधानींतलीं अनेक निशाणें डौलानें फडफडत होतीं आणि सूर्यकिरणांच्या प्रकाशांत सबंध शहर कसें चकाकत होतें. एका लाकडी व्यासपीठावर संघराज्याचे अनेक अधिकारी साध्या पोशाखांत उभे होते. त्यांतच जुना आणि नवा असे दोन्ही अध्यक्ष होते. आणि त्या मेळाव्यांत सुद्धां बायबल हातांत घेऊन उभा असलेला प्युरिटन संस्कारांचा मुख्य न्यायाधीश उठून दिसत होता. व्हाइट हाउसपासून दोन्ही अध्यक्ष उघड्या मोटारींतून आले होते. समारंभ सुरू झाला. मुख्य न्यायाधीशानें नव्या अध्यक्षासमोर बायबल धरलें आणि अध्यक्षानें राष्ट्रनिष्ठेची शपथ घेतली. शपथविधीनंतर आपल्या पत्नीचें चुंबन घेऊन अध्यक्ष जनसमूहाकडे वळला आणि स्वतः तयार केलेली प्रार्थना त्यानें मोठ्यानें वाचली. कोणत्या तत्त्वांवर आपली श्रद्धा आहे आणि आपण आपल्या राज्यकारभाराची उभारणी करणार आहोंत हें त्या प्रार्थनेंत नमूद केलें होतें. या तत्त्वांना आपली अनुमति सूचित केल्यावर गर्दी ओसरूं लागली. समारंभ संपल्यानंतर अस्तंगत अध्यक्ष पुन्हा एक साधा नागरिक बनला आणि त्यानें 'कॅपिटॉल' या राज्यकारभार केंद्राची रजा घेतली. जमलेल्या गर्दीपैकींच आतां तो एक होता. थोड्या वेळानें तो रेल्वे स्टेशनवर गेला, आणि एका साध्या गाडीनें आपल्या राज्यांत परतला. हा सर्व प्रकार इतका साधा आणि संयत होता कीं त्या वातावरणांत प्राचीन ग्रीसची आणि रोमची कांहीं छटा प्रतीत झाल्यावांचून राहिली नाहीं. या लोकशाहीच्या प्रत्येक अंगोपांगांत अगदीं हाच स्पृहणीय साधेपणा, व्यक्तिगत शिस्त आणि परस्परांबद्दल आदराची भावना आढळून येईल. आठवड्यांतील कोणत्याहि दिवशीं एका ठराविक वेळीं कोणालाहि 'व्हाइट हाउस'-मध्यें जातां येतें. या आटोपशीर आकाराच्या इमारतींत अक्षरशः कुणालाहि मज्जाव नाहीं. येथेंच अमेरिकेचा सर्वोच्च नेता राहतो, काम करतो आणि विचार-विनिमयासाठीं सभा बोलावतो. तेथें जाण्यासाठीं तुम्हांला खास परवाना काढावा लागत नाहीं, ओळखपत्र दाखवावें लागत नाहीं, एवढेंच नव्हे तर तुम्ही कुठें निघालां आहांत याचीहि तेथें चौकशी केली जात नाहीं. तुम्ही व्हरांड्यांत हिंडू

शकतां, दिवाणखान्यांत किंवा मेजवानीच्या खोलींत प्रवेश करूं शकतां. तेथलें फर्निचर, मौल्यवान् वस्तु, चित्रें निरखूं शकतां. अर्थात् गुप्तपणें तुमच्यावर कोणाचें तरी लक्ष असेल पण तुम्हांला कुणी अडथळा करणार नाहीं. वरच्या मजल्यावरील अध्यक्षाच्या खाजगी खोल्यांत मात्र खुला प्रवेश नाहीं. एक दिवस आम्ही संघराज्याच्या कायदेमंडळाची 'कॅपिटॉल' ही भव्य, प्रशस्त इमारत पाहावयास गेलों होतों. या इमारतीला अनेक प्रवेशमार्ग आहेत. त्यांपैकीं कोठल्यांतून आंत जायचें असें आम्हीं तेथल्या रखवालदाराला विचारलें तेव्हां तो म्हणाला, "कोणत्याहि दारांतून 'कॅपिटॉल'मध्यें जाण्याची आपणांस मुभा आहे." तेथें सुद्धां कोणताहि नागरिक आपल्या घरांतल्याप्रमाणें पूर्ण मोकळे-पणानें वावरूं शकतो. तेथल्या प्रत्येक वस्तूवर त्याचीच मालकी चालत आली आहे. ओबडधोबड लाकडी घरांत राहणाऱ्या पूर्वजांच्या वेळेपासून अध्यक्ष आणि साधा नागरिक यांचा दर्जा समान गणला गेला आहे. प्रत्येक काळांत त्या त्या वेळचे नेते हे कांहीं सार्वजनिक कार्य पार पाडण्यासाठीं ठराविक मुदतीनें निवडून दिले जात असत. त्यांची विचारसरणी, त्यांचे हक्क इतर नागरिकांसारखेच असतात. निवडणुकीची मुदत संपली म्हणजे जुना अध्यक्ष पुन्हा एकदां साधा नागरिक बनतो. सर्वांनाच हें ठाऊक असतें आणि त्यामुळें प्रत्येक नागरिक कसा शांत, विवेकी, सर्वांविषयीं सदिच्छा बाळगणारा वाटतो. स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल, देशाबद्दल आणि आपल्या विशिष्ट प्रकारच्या सरकारबद्दल त्याला आत्मविश्वास वाटतो.

* * *

इंग्लंडच्या इतिहासाचा अमेरिकेवर कसा प्रभाव पडला आहे हें आपण बघितलें. १६०७ मध्यें पहिल्या इंग्लिश वसाहतवाल्यांनीं व्हर्जिनियामध्यें जेम्स-टाउन हें शहर वसवलें. पुढील कांहीं वर्षांत, १६१९ सालीं, तर त्यांनीं तेथें एक छोटें हाउस ऑफ कॉमन्स निर्माण केलें. या प्रतिनिधिगृहाकडे स्थानिक स्वरूपाचे कायदे करण्याचा अधिकार असे. १६२० मध्यें अमेरिकन इतिहासांतली दुसरी एक महान् घटना घडून आली. जगविख्यात 'मे फ्लॉवर' या गलबतानें आपला प्रवास पूर्ण केला आणि आपल्या प्यूरिटन यात्रेकरूंना घेऊन हें गलबत मॅसाच्युसेट्सच्या अरण्यमय किनाऱ्याला लागलें. किनाऱ्यावर उतरण्यापूर्वी त्यांनीं एक हक्क व कर्तव्यविषयक मसुदा तयार केला होता आणि हा मसुदा म्हणजेच अमेरिकेच्या सर्व लोकशाही परंपरांची कोनशिला असें मानलें जातें.

"आम्ही......उपस्थितांच्या साक्षीनें......हा मसुदा स्वीकृत करतों आणि त्याअन्वयें स्वतंत्र राजकीय अस्तित्व असलेली नागरिकांची एक संघटना निर्माण

करून त्यांत सामील होतों. आमचे व्यवहार सुरळित चालावेत आणि आमचें संरक्षण व्हावें यासाठीं ही संघटना आहे. हीं उद्दिष्टें साध्य व्हावीं यासाठीं न्याय्य व समानतेचे कायदे करण्याचा, वटहुकूम काढण्याचा, घटना तयार करण्याचा, अधिकाराच्या जागा निर्माण करण्याचा, आणि वसाहतीच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक वाटेल तसतसा त्यांत बदल करण्याचा आम्हांस अधिकार आहे. हे कायदे आम्ही स्वतः मानूं व त्यांचें पालन करूं असें आम्ही वचनपूर्वक नमूद करतों."

जुलमाच्या कचाट्यांतून मुक्त होऊन आलेल्या प्यूरिटनांनीं अशा प्रकारें अगदीं पहिल्या क्षणापासून, अमेरिकन भूमीवर पाऊल टेकण्यापूर्वींच, पूर्ण जाणिवेनें लोकनियंत्रित राज्यकारभाराची आणि समान हक्कांची मुहूर्तमेढ रोवली.

या कल्पनांच्या जोडीला मुरब्बी राजकीय अनुभवहि या वसाहतवाल्यांनीं बरोबर आणला होता. द तोकव्हिले म्हणतो त्याप्रमाणें 'लोकशाही संस्थांचें बीज' असणारी स्थानिक स्वराज्यपद्धति ट्यूडर राजांच्या वेळेपासूनच इंग्लंडमध्यें चांगली दृढमूल झाली होती. त्या कालापासूनच लोकाभिमुख राज्यकारभाराच्या कल्पनेचा उगम झाल्याचें स्पष्टपणें पाहावयास मिळतें. एक विशिष्ट आध्यात्मिक संस्कृति, धार्मिक व राजकीय विषयांवर वादविवाद करण्याची प्रवृत्ति, सभांची आवड, अनेक बाबतींत सार्वजनिक चर्चा व खुलें मतदान घेण्याची पद्धति इत्यादि अनेक रीतिविशेष प्यूरिटनांबरोबर अमेरिकेंत आले. लवकरच सगळ्या वसाहतींनीं आपापल्या स्थानिक लोकसभा स्थापन केल्या.

बहुतेक वसाहतींत जरी राजानें नेमलेल्या गव्हर्नरच्या हातींच राज्यकारभार-विषयक सत्ता होती तरी तेथील शासनयंत्रणा भिन्न भिन्न प्रकारच्या होत्या. इतर कांहीं वसाहतींत गव्हर्नर लोकांनीं निवडलेला असे किंवा राजाच्या हुकमानें खास अधिकार प्राप्त झालेला एक बडा उमराव असें त्याचें स्वरूप असे. लोकसभांचे कायदेविषयक अधिकार तितकेसे सुस्पष्ट नव्हते आणि त्यामुळें गव्हर्नरशीं किंवा लंडनमधील राजसत्तेशीं मतभेद होण्याचे अनेक प्रसंग उद्भवत. हे कायदेविषयक अधिकार वाढत राहिले. ज्या गव्हर्नरांनीं अधिकारातिक्रम केला असें वसाहत-वाल्यांना वाटलें त्या त्या गव्हर्नरांविरुद्ध स्थानिक स्वरूपाचीं अनेक बंडें झालीं.

अशा प्रकारें अँग्लो-अमेरिकनांनीं एक अद्वितीय असें सार्वजनिक जीवन निर्माण केलें. कायदे तयार करण्याचा आणि राज्यकारभाराचा अनुभव मिळविला. पूर्वीं कोणत्याहि राष्ट्राला केव्हांहि लाभलें नव्हतें असें राजकीय स्वातंत्र्य संपादन केलें. राजकीय जागृतीच्या दृष्टीनें तर हा जगांतील सर्वांत अग्रेसर समाज बनून राहिला आणि तेथील संस्था उत्स्फूर्तपणें खऱ्या लोकशाहीच्या ध्येयाप्रत मार्गक्रमण

करूं लागल्या. द तोकव्हिले लिहितो, "आधुनिक राज्यघटना ज्या तत्त्वांवर आधारलेल्या आहेत तीं सर्वसामान्य तत्त्वें न्यू इंग्लंड संस्थानाच्या कायद्यांत प्रथम सुस्पष्टपणें विशद केलेलीं आढळतात. १७ व्या शतकांत युरोपमध्यें या तत्त्वांचें कोणाला आकलनहि नव्हतें आणि ब्रिटनमध्यें तीं अत्यंत सदोषपणें अंमलांत आणलीं जात. सार्वजनिक स्वरूपाच्या कार्यांत भाग घेण्याचा जनतेचा अधिकार, करांबाबत खुलें मतदान, सरकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी, व्यक्तिस्वातंत्र्य आणि खटला चालवितांना ज्यूरी नेमण्याची पद्धत हीं तीं तत्त्वें होत."

अत्यंत महत्त्वपूर्ण अशी अमेरिकन राज्यक्रांति ज्या कारणांमुळें घडून आली तीं कारणें आपल्याला अगदीं मामुली वाटतील. हा संघर्ष टाळूं न शकणाऱ्या किंवा त्याच्या परिणामांची कांहींच कल्पना करूं न शकणाऱ्या लंडनमधील राजसत्तेच्या अदूरदर्शित्वाचें आपल्याला प्रथमदर्शनींच आश्चर्य वाटूं लागतें. पण अधिक अभ्यास केल्यावर या पेचप्रसंगांचें मूळ कारण स्पष्ट होईल. राजकीय आणि सामाजिक संघटनांच्या क्षेत्रांत या वसाहतींनीं आपल्या मायदेशापेक्षां कितीतरी प्रगति केली होती. सरंजामशाही युरोपमध्यें आढळणाऱ्या वर्गभेदांचें या वसाहतींनीं उच्चाटन केलें होतें. आधुनिक लोकशाही शासनसंस्था ज्या मूलतत्त्वांवर आधारलेल्या आहेत त्या तत्त्वांची जाणीव या वसाहतवाल्यांना झाली होती आणि हीं तत्त्वें कांहीं प्रमाणांत प्रत्यक्षांत उतरविण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला होता. ते राजाला मानीत होते पण नव्या जगाच्या कल्पनांपुढें 'राजा' ही कल्पना त्यांना जुनाट वाटूं लागली होती. अधिकाधिक स्वातंत्र्याची त्यांना तहान लागून राहिली होती आणि ब्रिटिश सत्तेशीं त्यांचा कधीं ना कधीं संघर्ष होणें अटळ होतें. ब्रिटिश सत्तेच्या मूलभूत तत्त्वांत जुलमी साम्राज्यवाद प्रतीत होत होता. इंग्लंडमधील सरकार वसाहतवाल्यांनीं निवडलेलें नव्हतें आणि कोणताहि स्वाभिमानी मनुष्य मान्य करणार नाहीं असे खास हक्क या सरकारला होते. मूठभर उमरावांच्या हातीं सर्व सत्ता देऊन सामान्य जनतेला दास्यांत ठेवणारी समाजव्यवस्थाहि अमेरिकनांच्या दृष्टीनें अत्यंत मागासलेपणाची व बुरसटलेली होती. म्हणूनच तात्कालिक कारणें घडलीं नसतीं तरी केव्हां ना केव्हां ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका यांच्यांत दुरावा निर्माण होणें अपरिहार्य होतें असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. 'मे फ्लॉवर'च्या आगमनाबरोबर व्यक्तिस्वातंत्र्याचें जें चैतन्य निर्माण झालें तें ४ जुलै १७७६ च्या स्वातंत्र्याच्या घोषणेनें संघटित राजकीय व नैतिक विचारसरणीच्या उच्च पातळीवर नेऊन बसवलें आणि या

पुरोगामी कृत्यामुळें ओढवणाऱ्या संकटांना अमेरिकन लोक भिणार नाहींत हेंहि या घोषणेनें जगाला दाखवून दिलें.

'मे फ्लॉवर' आल्यानंतर दीडशें वर्षांनीं स्वातंत्र्याची घोषणा पुकारली गेली. सर्वांगीण उन्नतीच्या प्रयत्नांचीं हीं दीडशें वर्षें होतीं. या कालखंडांत अमेरिकन जनतेला राजकीय क्षेत्रांत जवळ जवळ संपूर्ण स्वातंत्र्य होतें. लॉके, मॉंटेस्क्यू आणि रूसो यांच्या राजकीय तत्त्वप्रणालींचा त्या वेळच्या पश्चिम युरोपवर बराच प्रभाव होता. आपल्या नव्या राष्ट्राच्या आकांक्षा काय आहेत तें थॉमस जेफर्सननें नीट जाणलें होतें. आपल्या अभिजात आणि बंदिस्त शैलीनें त्यानें अत्यंत सुसूत्रपणें एकाच निबंधांत आपलें मनोगत व्यक्त केलें. राजकीय आणि सामाजिक तत्त्व-चिंतकांनीं आपल्या मननानें व व्यासंगानें जी वैचारिक प्रगति केली ती जेफर्सननें समर्पक व सोप्या शब्दांत आपल्या राष्ट्राच्या वतीनें जगासमोर मांडली. अशा प्रकारचा इतिहासांतील हा पहिलाच प्रयत्न होय :

"पुढील सत्यें स्वयंसिद्ध आहेत असें आम्ही मानतों : देवानें निर्माण केलेल्या सर्व माणसांना समान हक्क असले पाहिजेत. परमेश्वराकडून मिळालेले त्यांचे विशिष्ट हक्क हिरावून घेण्याचा कोणालाहि अधिकार नाहीं. जगण्याचा हक्क, स्वातंत्र्य आणि सुखप्राप्तीचे प्रयत्न करण्याची मुभा हे ते विशिष्ट हक्क होत. या हक्कांचें संरक्षण करण्यासाठींच मानवसमाजांत शासनसंस्था स्थापन केल्या जातात. प्रजेच्या अनुमतींतूनच या शासनसंस्थांना त्यांचे अधिकार प्राप्त होतात..."

लोकांच्या हक्कांची घोषणा करणाऱ्या पुढील परिच्छेदांत जेफर्सन राज्यक्रांतीला कायदेशीर स्वरूप देतो. आपल्या नैसर्गिक मानवी हक्कांवर अतिक्रमण करूं पाहणारें कोणतेंहि सरकार 'बदलण्याचा किंवा त्याचें उच्चाटन करण्याचा' लोकांचा हक्कच आहे, असें त्याचें प्रतिपादन आहे. पुढें तेरा वर्षांनीं सुरू झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमागील व तदनंतरच्या सर्व लोकशाही क्रांतियुद्धांमागील ध्येयप्रणाली जेफर्सनच्या या छोट्या पुस्तिकेंत अत्यंत सुगम भाषेंत साररूपानें मांडलेली आढळते.

स्वातंत्र्याची घोषणा, राज्यघटना, आणि मूलभूत हक्कांचा कायदा यांद्वारें अमेरिकेनें सरकारचे अधिकार आणि जनतेचें स्वातंत्र्य यांचा कौशल्यपूर्ण समतोल साधल्याचें दिसून येतें. आज जगांत अस्तित्वांत असणाऱ्या लोकशाही पद्धतीच्या शासनसंस्थांपैकीं सर्वांत जुन्या शासनसंस्थेचीं तीं आधारभूत प्रतीकें आहेत. या शासनव्यवस्थेंत अनेक निरनिराळ्या प्रकारचे दोष आहेत हें कोणी नाकारूं शकणार

नाहीं पण त्याचबरोबर या शासनव्यवस्थेचें असामान्य ऐतिहासिक यशहि कोणाला नाकारतां येणार नाहीं.

या व्यवस्थेंतील दोषांची नेहमींच मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आली आहे आणि आजहि ती होत असते. ही शासनव्यवस्था फार गुंतागुंतीची आहे आणि अनेकदां अमुक एक प्रश्न सोडवितांना त्यासाठीं खास नेमलेल्या खात्याकडून दुसऱ्या खात्याच्या अधिकारांवर आक्रमण होतें. राज्यकारभार चालविणाऱ्या खात्यांतील बहुतेक नोकऱ्या अगदीं डळमळीत असतात कारण त्या राजकीय बदलांवर अवलंबून असतात. सनदी नोकरांमधील या अशाश्वतीच्या भावनेमुळें आपल्या कामांत निष्णात, अनुभवी व धडाडीनें निर्णय घेणाऱ्या लोकांचा अभाव राज्यकारभाराच्या अनेक क्षेत्रांत अत्यंत तीव्रतेनें जाणवतो. लांचलुचपत अजून सार्वजनिक जीवनांतून लोप पावलेली नाहीं. अत्यंत प्रचंड प्रमाणावर घडलेल्या भ्रष्ट व्यवहारांच्या बातम्यांनीं किंवा तत्संबंधींच्या अफवांनीं सबंध देश हादरण्याचे प्रकार अनेकदां घडतात. याहिपुढें जाऊन मी असें म्हणूं इच्छितों कीं आपल्या देशाच्या कायदेविषयक परंपरांची जाणीव असलेली कोणतीहि युरोपीय व्यक्ति अमेरिकेच्या न्यायव्यवस्थेचा सहजासहजीं स्वीकार करणार नाहीं. कारण अमेरिकेंत न्यायाधिशांची आणि सरकारी वकिलांचीसुद्धां निवडणूक होते. जणूं कांहीं आपण पार्लमेंटांतील जागेसाठीं उभे आहोंत अशा रीतीनें हे (भावी) न्यायाधीश आणि सरकारी वकील निवडणूक प्रचाराच्या मोहिमा उघडतात. अमेरिकेच्या कांहीं घटक राज्यांत तर पोलिसदलांतले अधिकारीसुद्धां लोकांकडून निवडले जातात. आपल्यापुढील फिर्यादी किंवा आरोपी हा अखेरपक्षीं एक मतदार आहे आणि त्याच्या व त्याच्या मित्रांच्या व नातेवाइकांच्या मतांनींच आपलें आसन पुढील निवडणुकींत कायम राहणार कीं नाहीं हें ठरणार आहे ही गोष्ट हे अधिकारी केव्हां तरी विसरूं शकतील काय? आपल्या राजकीय मित्रांचा मुलाहिजा न राखतां कधींतरी तें रोमन न्यायाधिशांप्रमाणें निःपक्षपाती न्यायदान करूं शकतील काय? सार्वजनिक जबाबदारीच्या जागा संभाळणाऱ्या या अधिकाऱ्यांपैकीं अनेक जण संशयातीत असतात यांत शंका नाहीं. पण आपल्या कार्याविषयीं ज्यांना पुरेशी तळमळ आणि निष्ठा नाहीं असेसुद्धां बरेच लोक या जागांसाठीं निवडले जातात हें आपणापैकीं कुणीहि सांगूं शकेल.

या विशिष्ट पद्धतीचें पुस्तकीं समर्थन करणें अगदीं सोपें आहे. न्यायाधीश निवडण्याची ही पद्धत म्हणजे राज्याच्या तीन प्रमुख सत्तांचें विकेंद्रीकरण करण्याच्या तत्त्वाचाच कांटेकोर आविष्कार आहे. कुठल्याहि खऱ्या लोकशाहीप्रवण जनतेला

संघटित नोकरशाहीबद्दल जो अविश्वास वाटतो त्याचा सुसंगत परिणाम म्हणजे सार्वजनिक क्षेत्रांतल्या बहुसंख्य नोकऱ्यांचें हें डळमळीत स्वरूप. पण प्रत्यक्षांत मात्र या परिस्थितीमुळें कार्यक्षमता अपरिहार्यपणें कमी होते आणि सरकारी नोकरांमधील नैतिक सचोटी क्षीण बनते. अर्थात् प्रत्येक खात्याच्या कारभारांत अशा कांहीं चांगल्या आणि कांहीं वाईट बाजू असणारच. आजकालच्या दिवसांत दोहींचेंहि प्रमाण बरेंच वाढलें आहे. कित्येकदां मध्यवर्ती सरकार राज्यकारभारांतील हे दोष सुधारण्याचे अत्यंत यशस्वी प्रयत्न करतें, पण तेवढ्यानें कांहीं हे दोष दिसून न येण्याइतके कमी होत नाहींत.

उलटपक्षीं अमेरिकन राज्यघटनेबाबत अत्यंत अभिमानास्पद वैशिष्ट्य असें कीं अठराव्या शतकाच्या अखेरीपासून आजतागायत या घटनेंतील तरतुदी सातत्यानें अभंग राहिल्या आहेत, त्यांची केव्हांहि अवज्ञा झालेली नाहीं. आजच्या युगांत हें यश अद्वितीय आहे. १८६१ च्या यादवी युद्धानें किंवा दोन जागतिक महायुद्धांनींसुद्धां या घटनेच्या आदेशांना धक्का पोंचला नाहीं. बाह्यतः ही राज्यघटना अपरिवर्तनीय वाटली तरी तिचा अत्यंत स्वाभाविक व संथ विकास होत आला आहे. गरज पडली तेव्हां तेव्हां तिनें जीवनाच्या बदलत्या परिस्थितीशीं जमवून घेतलें आहे. लोकशाही शासनयंत्रणा कोणतेहि अडथळे न येतां आपलीं कर्तव्यें पार पाडूं शकेल, लोकांचें सार्वभौमत्व अबाधित राहील, राजकीय स्वातंत्र्यांचा निर्वेध उपभोग घेतां येईल, आणि सरकारच्या प्रत्येक कृतीवर नियंत्रण राखूं शकेल अशी अधिकारांची विभागणी अमेरिकेमध्यें दृढमूल झाली आहे. दीर्घ मुदतीच्या योजना आंखूं शकेल आणि त्या निश्चयपूर्वक व सुसंगतपणें पार पाडूं शकेल अशी प्रबळ व सुस्थिर मध्यवर्ती सत्ता निर्माण होण्यास वरील अधिकारव्यवस्थेची फार मदत झाली. आणीबाणीच्या प्रसंगीं मध्यवर्ती सत्ता सर्वाधिकार स्वतःकडे घेऊं शकते पण आजपर्यंत केव्हांहि या सत्तेनें राष्ट्रीय परंपरांशीं एकनिष्ठ राहण्याच्या आपल्या शपथेस बाध येईल असें वर्तन केलेलें नाहीं. उत्तर अमेरिकेंतील विस्तीर्ण नवे प्रदेश वसाहतीखालीं आणतांना कांहीं विशिष्ट मर्यादा पाळल्या जाव्यात म्हणून त्याबाबत मध्यवर्ती सत्तेनें मार्गदर्शन केलें आणि आज अमेरिकनांचें जीवन पूर्वी केव्हांहि नव्हतें इतकें समृद्ध असण्याचें श्रेयहि या शासनव्यवस्थेलाच दिलें पाहिजे.

या सर्व अनुभवांतून गेल्यामुळें आणि लोकशाही तत्त्वांच्या प्रभावामुळें अमेरिकेंत एक प्रकारचें नीतिमत्तेचें वातावरण निर्माण झालें आहे आणि अमेरिकन भूमीवर पाय टेकल्या क्षणापासून या वातावरणाचा आपल्यावरहि

परिणाम होऊं लागतो. आमच्याजवळ नुसतें एक विशिष्ट प्रकारचें सरकार नाहीं, त्याहून खूप मूलगामी असें कांहीं आहे, असें म्हणणें म्हणजे अतिशयोक्ति नव्हे हें येथें नमूद करावेंसें वाटतें. अमेरिकन जीवनाला या प्रेरणेचें बाळकडू मिळालें आहे, त्यांचा स्वभाव प्रेरणेनें घडविला आहे, आणि दैनंदिन व्यवहारांत अमेरिकन लोक ज्या प्रकारें एकमेकांशीं वागतात त्या वर्तणुकीवरहि या प्रेरणेचा प्रभाव दिसून येतो. लोकशाहीबद्दल अशी खरीखुरी उत्कट आणि विशाल आत्मीयता इतर कोणत्याहि देशांत आम्हांला आढळली नाहीं. मानवी जीवनाच्या आणि संस्कृतीच्या सर्वोच्च विकासाचें प्रतीक असें या लोकशाहीचें स्वरूप आहे. सामाजिक भेदांचा इतका अभाव, सर्व लोकांमध्यें इतकी समतेची आणि बंधुत्वाची भावना या गोष्टी आम्हांला इतरत्र कुठेंहि आढळल्या नाहींत. द तोकव्हिलेनंतर अमेरिकन संस्थांच्या स्वरूपाचा सखोल अभ्यास करणारा सर्वांत प्रसिद्ध लेखक लॉर्ड ब्राइस म्हणतो, "अमेरिकेंत एक प्रकारची दयाशीलता आहे, परस्परांबद्दल बंधुभाव आहे, एका माणसानें दुसऱ्या माणसाशीं जें सहकार्य करायला हवें त्या कर्तव्याची जाणीव आहे. जगांत इतरत्र कोठेंहि ही जाणीव इतकी दृढ असलेली दिसत नाहीं."[१]

अमेरिकन जीवनाला आणि इतिहासाला स्फूर्ति देणारी आणि त्यांना मार्गदर्शन करणारी लोकशाहीची ही प्रेरणा समजण्यास कांहीं अवघड नाहीं. तिच्या मूलभूत कल्पना सुपरिचित आहेत आणि आपल्याला तर कदाचित् त्या अगदींच सर्व-सामान्य वाटतील. विसाव्या शतकांत युरोपांत जेव्हां प्रचंड उलाढाली सुरू होत्या त्यावेळीं तर आपल्यापैकीं अनेकांना हीं लोकशाही तत्त्वें जुनाट आणि पायाहीन भासलीं असतील. पण या तत्त्वांचें खरें मूल्य त्यांच्या नवीनतेंत नाहीं. अमेरिकन लोक ज्या दृढनिश्चयानें या तत्त्वांवर श्रद्धा ठेवतात व त्यांचें पालन करतात त्यांत त्यांचें खरें मूल्य आहे. या नितान्त श्रद्धेकडे पाहिलें म्हणजे हींच तत्त्वें चिरंतन आहेत आणि आधुनिक युरोप ज्यांना सत्य समजून चालतें तीं तत्त्वें अखेरपक्षीं चूक आहेत असा साक्षात्कार युरोपमधील व्यक्तीच्या श्रान्त मनाला होतो. राजकारणी जगाच्या कुटिल डावपेचांतच गुरफटून न राहतां या तत्त्वांनीं एक उच्च पातळी गांठली आहे व त्यांतून एक अत्यंत प्रभावी व सर्वांना पटेल अशी नैतिक विचारसरणी निर्माण झाली आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे या तत्त्वांचें मूल्य अधिक चांगल्या रीतीनें समजू शकेल.

१. जेम्स ब्राइस : द अमेरिकन कॉमनवेल्थ. न्यूयॉर्क, १९००.

एक नीतिमान् देश म्हणून अमेरिकेचा नेहमीं उल्लेख होण्याचें कारण असें कीं सुष्टता आणि दुष्टता यांत मूलतःच भिन्नत्व आहे अशी अमेरिकेची श्रद्धा आहे. अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं सगळेच अमेरिकन नैतिक तत्त्वांचें पालन करतात आणि कधीं चुका करीतच नाहींत. उलट आपले चित्रपट, आपलीं पुस्तकें, वृत्तपत्रें यांतून ते स्वतःच्या समाजांतील उणिवांवर कठोर टीका करण्यांत अग्रेसर असतात. अमेरिकेंत गुन्ह्यांचें प्रमाण फार मोठें आहे ही गोष्ट जगभर माहीत आहे. पण एक लोकसमूह या नात्यानें अमेरिकन लोकांची नैतिकतेवर श्रद्धा आहे, मानवी जीवनांत वाईट आणि चांगल्या अशा दोनहि गोष्टी असून त्या एकमेकापासून सर्वस्वीं भिन्न आहेत असेंच अमेरिकन लोक मानतात. लोकशाही म्हणजे साकार झालेला सद्गुण असा त्यांचा दृष्टिकोन आहे. लोकशाहीची केवळ राजकीय बाजू त्यांना अभिप्रेत नसते. 'जीवनाचा एक मार्ग' म्हणून ते लोकशाहीकडे पाहतात. या जीवनक्रमावर ख्रिस्ताच्या शिकवणुकीची दाट छाया पडलेली असून प्रॉटेस्टंट-पंथीयांपासून अंगांत बाणलेली कर्तव्यतत्परता त्यांत उठून दिसते. जो सुवर्णनियम पुढें ठेवून घटक राष्ट्रांनीं आणि व्यक्तींनीं आपल्या दैनंदिन व्यवहारांना मुरड घालायची तो नियम असा : ज्यावेळीं संघराज्य एखाद्या जुलमी सत्तेविरुद्ध किंवा हुकुमशहाविरुद्ध लढाई करण्यांत गुंतलेलें असेल त्यावेळीं सामान्य सैनिकानें विनातक्रार मध्यवर्ती सरकारच्या आदेशांचें पालन करायचें. याचें कारण त्या सैनिकाला ठाऊक असतें. जगांतील सत् मूल्यांचें आपण रक्षण करीत आहोंत आणि दुष्ट शक्तींशीं झुंज घेत आहोंत याबद्दल त्याची मनोमन खात्री पटलेली असते. माणुसकी, बुद्धिवाद आणि आशावाद हीं या प्रवृत्तीचीं तीन प्रमुख वैशिष्ट्यें आहेत असें सारांशरूपानें म्हणतां येईल. व्यक्ति-स्वातंत्र्य हें जीवनांतील एक सर्वोच्च तत्त्व असून त्याचे कांहीं जन्मसिद्ध हक्क आहेत; आणि स्वातंत्र्य व समता यांच्याशीं हे हक्क निगडित आहेत. प्रत्येक संघटित सत्तेनें व्यक्तीचा आणि तिच्या निसर्गसिद्ध हक्कांचा मान राखलाच पाहिजे. लोकांना सुरक्षिततेची आणि प्रगतीची हमी देणें हेंच सरकारचें आणि समाजाचें ध्येय असतें. ही प्रगति बुद्धिवादी मार्गानें घडवून आणायची असते. स्वतंत्र आणि बुद्धिवादी व्यक्ति कोणत्याहि बेजबाबदार, बुद्धीला न पटणाऱ्या किंवा 'बाबावाक्यं प्रमाणम्' याखेरीज ज्या गोष्टीला इतर कोणतेंहि समर्थन नाहीं अशा गोष्टीपुढें मान तुकवणार नाहीं. कोणतेहि पूर्वग्रह मनांत न बाळगतां तो जीवन जगतो आणि निसर्गाचे मूलभूत नियम शोधून काढतो. मानवी जीवन अधिक प्रगत व्हावें यासाठीं तो निसर्गाच्या शक्तींवर प्रभुत्व मिळवितो आणि त्यांचा उपयोग

करून घेतो. तर्क आणि न्याय यांच्या कसोटीवर घासून तो समाजाला अनुरूप असे नैतिक नियम निर्माण करतो. सरकारनें अंमलांत आणण्याचे कायदे कोणते तेंहि ठरवून देतो. मतपरिवर्तनानें तो तंटे सोडविण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटीं मतपेटीद्वारा सार्वजनिक जीवन सुसंघटित करतो. शिक्षणानें माणसाची बौद्धिक आणि नैतिक पातळी उंचावण्याचा तो प्रयत्न करतो. प्रत्येक व्यक्तीची योग्यता वाढावी असा त्याचा ध्यास असतो, कारण प्रत्येकांत प्रगति घडून येण्याची नेहमींच शक्यता असते. जर एकाद्या देशांतील जनता सुसंस्कृतपणाचे बाबतींत हिणकस असेल तर सामाजिक जीवनाकडे आणि शिक्षणाकडे त्या देशांत अत्यंत शोचनीय दुर्लक्ष झालें आहे असाच त्याचा अर्थ आहे आणि या परिस्थितींत ताबडतोब सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. सुसंघटित लोकशाही आणि उत्तम शिक्षणपद्धति यांच्या साहाय्यानें जगांतील प्रत्येक राष्ट्र अमर्याद प्रगति करूं शकेल आणि समृद्ध व सुखी होऊं शकेल. राष्ट्राच्या किंवा व्यक्तीच्या आयुष्यांत हा कांहीं दैवगतीवर अवलंबून असलेला भाग नाहीं. आपली उन्नति आपल्याच हातीं आहे.

स्वातंत्र्य आणि समता यांचा जेव्हां अमेरिकन लोक उच्चार करतात तेव्हां ते कांहीं नुसत्या हवेंतल्या सिद्धांतांविषयीं बोलत नसतात. अत्यंत सुस्पष्ट अशीं कांहीं नैतिक आणि व्यावहारिक मूल्यें त्यांना अभिप्रेत असतात. राज्यकारभार चालविणारे सरकारी अधिकारी निवडून देण्याचा नागरिकांचा हक्क लोकशाही स्वातंत्र्यांतच समाविष्ट आहे. ही निवड कांहीं विशिष्ट मुदतीपुरतीच असते. प्रचलित कायद्यांनुसार निवडून आलेल्यांना कांहीं अधिकार प्राप्त होतात. या अधिकाऱ्यांवरसुद्धां कायद्यांचें नियंत्रण असतें. सर्व कायद्यांबद्दलचें आणि करां-बद्दलचें आपलें मत प्रत्यक्षपणें किंवा प्रतिनिधींमार्फत व्यक्त करण्याचा हक्कहि लोकशाहीमध्यें प्रत्येक नागरिकाला मिळतो. प्रत्यक्षांत मात्र व्यक्तीची मानसिक प्रगल्भता, कायद्याच्या कक्षेंत राहून तो करीत असलेले व्यवसाय, सरकारी अधिकाऱ्यांच्या लहरी कृत्यांविरुद्ध नागरिकाला मिळणारें संरक्षण आणि बहुमत-वाल्या पक्षाकडून त्याच्यावर अन्याय होऊं नये यासाठीं कायद्यांत असलेल्या उपाय-योजना यांवरच लोकशाही राष्ट्रांतील संस्थांचे दैनंदिन व्यवहार अवलंबून असतात. मानवी हक्कांच्या कायद्यांत (बिल ऑफ राइट्समध्यें) पुढील मूलभूत हक्कांचा समावेश आहे:—धर्मस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, मुद्रणस्वातंत्र्य (यांतच हल्लीं रेडिओ आणि टेलिव्हिजन यांना मिळणाऱ्या अमर्याद स्वातंत्र्याचाहि समावेश होतो), सभा भरविण्याचा हक्क, वरिष्ठ सत्तेकडे अर्ज करण्याचा हक्क, आणि

त्यांबरोबरच व्यक्तिजीवनाच्या सुरक्षिततेचा आणि स्वातंत्र्याचा हक्कहि त्यांत नमूद आहे. व्यक्तीची असीम उन्नति, तिच्या अंगच्या सृजनशक्तींचा विकास आणि तिचें सुख हींच लोकशाही स्वातंत्र्याचीं अंतिम ध्येयें होत. हाच लोकशाही स्वातंत्र्याचा गर्भित अर्थ. अर्थात् हीं ध्येयें साध्य करतांना इतरांच्या हक्कांवर केव्हांहि आक्रमण होऊं न देण्याचें तत्त्व येथें गृहीत धरलें आहे.

अर्थात् स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांतील 'सर्व माणसें समान आहेत' या पहिल्या तत्त्वाचा अर्थ असा नाहीं कीं सगळयांचें कर्तृत्व समान असतें आणि सर्वांना आयुष्यांत यशहि समान मिळतें. कारण असें गृहीत धरणें मानवी स्वभावाविरुद्ध होईल. किंवा सर्व व्यक्तींचीं वैयक्तिक स्वभाव वैशिष्ट्यें एका समान पातळीवर आणायचीं असाहि त्याचा अर्थ नव्हे. ज्याला अमेरिकन 'विकासाची समान संधि' म्हणून संबोधतात तो या समतेचा खरा अर्थ आहे. वंशपरंपरा हक्कांच्या पूर्वकालीन मिरासदारीला मज्जाव, सर्वांना समान राजकीय आणि वैध हक्क, आणि आपल्या प्रत्येक घटकाला विकासाची समान संधि उपलब्ध करून देण्याचें समाजावर असलेलें बंधन या सर्व गोष्टी वरील समानतेंत अभिप्रेत आहेत. व्यक्तीला स्वतःच्या शिक्षणाची आणि जीवनांतील व्यवसायाची आवडीप्रमाणें आंखणी करण्याची संधि देणें आणि सगळ्या सार्वजनिक सुखसोयी त्याला उपलब्ध ठेवणें हीं समाजाचीं कर्तव्यें मानलीं आहेत. आणि एवढें सगळें केल्यावर मग पुढील उन्नति त्या त्या व्यक्तीच्या योग्यतेवर अवलंबून राहील. व्यक्तींच्या कर्तृत्वांत आणि आवडीनिवडींत कधींच सांचेबंदपणा किंवा समानता नसते. त्यामुळें एक प्रकारची नैसर्गिक विषमता उत्पन्न होते. पण जोंपर्यंत प्रत्येक व्यक्तीला समान सामाजिक परिस्थितीमधून आत्मविकासाची संधि देण्यांत येत आहे तोंपर्यंत ही नैसर्गिक विषमता न्याय्यच मानली पाहिजे.

हेंच राज्यक्रांतीपासून आजपर्यंत अमेरिकेच्या इतिहासाचें मार्गदर्शक तत्त्व ठरलें आहे. कदाचित् आद्य वसाहतवाल्यांच्या समाजांत हें तत्त्व अत्यंत विशुद्ध स्वरूपांत आढळेल. पश्चिम सरहद्दीवरल्या त्या प्रदेशांत प्रत्येकास विकासाची समान संधि मिळेल अशीच परिस्थिति त्यावेळीं होती. प्रत्येकाला तेथें भरपूर वाव होता. स्वतःची जमीन असणाऱ्या स्वतंत्र शेतकऱ्यांची एक छोटी आदर्श कृषिक लोकशाही आपण आपल्या देशांत निर्माण करूं अशी त्या वेळच्या उदारमतवादी अमेरिकनांची मनीषा होती. या शेतकऱ्यांत एकजूट आणि शेजाऱ्याच्या हक्कांविषयीं आदर असणेंहि त्यांना अभिप्रेत होतें. थॉमस जेफर्सन आणि अँड्र्यू जॅक्सन या दोन थोर अध्यक्षांनीं हें स्वप्न साकार करण्याच्या कार्यासाठीं स्वतःला

वाढून घेतलें आणि म्हणूनच नैर्ऋत्येकडील राज्यांत व्यापार आणि बँकांचें भांडवल प्रचंड प्रमाणांत वाढत चाललें होतें ही गोष्ट त्यांना मुळींच रुचली नाहीं. एका ठिकाणीं केंद्रित झालेलें हें भांडवल देशाच्या स्वाभाविक विकासाची घडी विस्कटून टाकील अशी त्यांना धास्ती वाटत होती. कांहींशा गैरसमाजाच्या दृष्टिकोनांतून ते अमेरिकेच्या भविष्यकाळाचा विचार करीत होते. कांहीं मूठभर व्यक्तींच्या हातीं खूप मोठी आर्थिक आणि सामाजिक सत्ता एकवटून मग कालांतरानें हे लोक सामान्य जनतेपेक्षां जास्त हक्क असलेल्या कुटुंबांचा एक नवा वर्ग तर निर्माण करणार नाहींत ना अशी त्यांना काळजी वाटे. म्हणूनच या दोन अध्यक्षांनीं भांडवलदारीकडे झुकूं पाहणाऱ्या प्रवृत्तींची लाट थोपवून धरण्याचे प्रयत्न केले.

पण तरीहि मोठ्या प्रमाणावरील भांडवलशाही ही एकोणिसाव्या शतकांतील एक ऐतिहासिक गरज होऊन बसली आणि कोणतेहि सरकारी उपाय हें स्थित्यंतर टाळूं शकले नाहींत. भांडवलशाहीनें स्वातंत्र्याच्या पुकाराची जोड घेतली आणि समतेच्या तत्त्वांना दुय्यम स्थान मिळालें. किंबहुना आपल्या हितसंबंधांच्या आड येणार नाहीं अशा प्रकारेंच त्यांनीं समतेच्या तत्त्वाचा अर्थ लावला. एवढ्या अफाट प्रदेशांत घडून आलेला विकास, त्यांतील नैसर्गिक संपत्तीचा मानवी प्रगतीसाठीं करून घेतलेला उपयोग, देशाची यंत्रप्रधान संस्कृति—या सर्वांचें श्रेय भांडवलशाहीच्या सामर्थ्याला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. अनेक धाडसी प्रयत्नांनंतर अखेर दोन महासागरांना जोडणारे रेल्वेमार्ग तयार करण्यांत त्यांनीं मिळविलेलें यश ही अमेरिकनांची सगळ्यांत असामान्य आणि आश्चर्यजनक कामगिरी म्हटली पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दहा वर्षांना (या दहा वर्षांना 'रोअरिंग नाइन्टीज' असें म्हणतात) तर कुबेराला लाजवील अशी संपत्ति अमेरिकेजवळ सांचली. नव्या उद्योगपतींनीं तर इतकें अमाप धन मिळवलें कीं त्याचीं वर्णनें अद्भुत कथांसारखीं वाटूं लागलीं. याउलट राज्यघटनाकारांच्या स्वप्नींहि नसलेला असा एक नवा लोकसमाज या सुमारास अस्तित्वांत आला होता. हाच नव्या औद्योगिक युगांतला कामगार-समाज. आतां 'सरहद्द' अस्तित्वांत राहिली नव्हती. स्वतंत्र, तरुण शेतकऱ्याला अमर्याद संधि देणारें सुवर्णयुग आतां भूतकाळांत जमा झालें होतें. मोठ्या शहरांतील फूटपाथवर, व्हँडरबिल्ट, रॉकफेलर, मॉर्गन यांसारख्या आधुनिक कुबेरांनीं बांधलेल्या आलिशान इमल्यांच्या आडोशाला हलाखींत जीवन कंठणाऱ्या निर्वासितांचे पुंजके दाटीवाटीनें राहत असल्याचें आणि फुटीर प्रवृत्ति वाढीला लावीत असल्याचें

दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें. आजवर कायम टिकलेला अमेरिकन समाजांतील समतोलच धोक्यांत होता. उगवत्या विसाव्या शतकाच्या क्षितिजावर एका भयानक पेचप्रसंगाच्या आणि लौकरच सुरू होणाऱ्या तीव्र वर्गयुद्धाच्या पूर्वखुणा दूरदर्शी व्यक्तींनीं हेरल्या. स्वतःची दुर्दशा होऊं न देतां या नव्या शतकांतील वादळांना तोंड देऊं शकण्याइतकी अमेरिकन लोकशाही सामर्थ्यवान् आहे का, हा एकच प्रश्न त्यांना अस्वस्थ करीत होता.

कोणत्या मार्गांनीं अमेरिकेनें आजपर्यंतची वाटचाल केली आणि यापुढें ती कोणत्या मार्गानें जाईल हा वादग्रस्त प्रश्न आहे. पण या मार्गक्रमणांत तिला तिच्या उदंड संपत्तीची अतोनात मदत झाली याबद्दल मात्र कुणाचें दुमत नाहीं. अमेरिकेच्या नैसर्गिक संपत्तीचा व्यापच इतका मोठा होता कीं त्यामुळें खाजगी भांडवलदारी पूर्णपणें नष्ट न करतां तिला केवळ कांहीं नियंत्रणांत ठेवणें शक्य झालें. अमेरिकेनें आपलें राष्ट्रीय उत्पन्न जनतेच्या अधिकांत अधिक घटकांमध्यें वांटलें आणि त्यायोगें सामान्य जनतेचें जीवनमान सुधारण्यास मदत केली. अर्थात् राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं राज्यकारभार चोखपणें चालवल्याशिवाय आणि जनतेच्या सर्व थरांत एक प्रकारची सामाजिक शिस्त बाणल्याशिवाय नुसत्या आर्थिक उपायांनीं हा इतक्या गुंतागुंतीचा आणि बिकट प्रश्न सुटूं शकला नसता हें तितकेंच उघड आहे. पुन्हा एकदां मानवी घटक निर्णायक ठरला. या मानवी घटकाचें कार्य म्हणजेच अंगीकृत ध्येयाला साजेशा उदात्त चारित्र्याच्या नेत्यांनीं आणि केवळ स्वतःच्या हक्कांबाबतच नव्हे तर आपल्या कर्तव्यांबाबतहि जागरूक असणाऱ्या जनतेनें केलेलें कार्य.

भांडवलाचें केंद्रीकरण आणि आर्थिक मक्तेदाऱ्यांचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं म्हणून गेल्या शतकाच्या अखेरीस अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहानें पहिले 'अँटिट्रस्ट' (अनेक उद्योगधंद्यांनीं एकत्र येऊन एक गट निर्माण करण्याला विरोध करणारे) कायदे पास केले. विसाव्या शतकाच्या सुरवातीस हेंच धोरण थिओडोर रूझवेल्ट, टॅफ्ट आणि विल्सन या तीन अध्यक्षांनीं अधिक कसोशीनें पुढें चालविलें. पण १९२९ सालच्या जागतिक मंदीची झळ लागेपर्यंत आणि तदनंतरच्या कांहीं वर्षांतील भयानक दुष्परिणाम अनुभवास येईपर्यंत किती गंभीर आणि विदारक प्रश्न आपल्यापुढें आ वासून उभे आहेत याची अमेरिकेला कल्पनाच आली नाहीं. अध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्टप्रणीत 'न्यू डील' नें आपल्या तंत्रविज्ञानप्रधान आणि ध्येयवादी स्वरूपानें लोकशाहीविषयक कल्पनेंतच सुधारणा घडवून आणली.

रूझवेल्ट स्वतः आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षाचा आढावा घेणाऱ्या

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

पुस्तकांत 'शांततामय क्रांतीचें आणि अमेरिकन लोकशाहीच्या प्रगल्भतेचें एक द्योतक' असा 'न्यू डील'चा उल्लेख करतो.[१] तो पुढें म्हणतो, सतत तीन पिढ्या आर्थिक घडामोडी अशा रीतीनें सुरू होत्या कीं प्रचंड वेगानें अहर्निश वाढत असलेली संपत्ति कमी कमी व्यक्तींच्या हातीं केंद्रित होत होती. संपत्तीची अशी मिरासदारी निर्माण करणारी परिस्थितीच पालटून टाकणें आणि अत्यंत डळमळीत झालेला आर्थिक व सामाजिक समतोल पुन्हा प्रस्थापित करणें अत्यंत जरुरीचें आहे, असें प्रतिपादन रूझवेल्टनें केलें आहे. देशाच्या आर्थिक जीवनांत न्यायाचें वातावरण निर्माण करण्यासाठीं आपल्या हातांतील राजकीय सत्तेचा उपयोग करण्याची त्याची प्रतिज्ञा आहे. त्यानेंच कांहीं वर्षांनीं चार स्वातंत्र्यांची घोषणा केली. दारिद्र्यांतून मुक्तता हें त्यांपैकीं एक स्वातंत्र्य होतें आणि या विशिष्ट स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यांत रूझवेल्टनें अठराव्या शतकापासून चालत आलेल्या निसर्गसिद्ध हक्कांनाच दुजोरा दिला.

सरकारी हस्तक्षेपाच्या उपायांनीं समाजाचा आर्थिक समतोल पुन्हा स्थिर-स्थावर करण्याचा प्रयत्न न्यू डीलनें केला. 'अँटिट्रस्ट' कायदे आणखी कडक केले, सरकारी पातळीवरून स्पर्धा करून भाव खालीं आणले, बेकारीला आळा घालण्यासाठीं व आर्थिक सुस्थिरता येण्यासाठीं सार्वजनिक निधींचा वापर केला. न्यू डीलनें एक नवें करविषयक धोरण अंमलांत आणलें आणि कामगारांना व शेतकऱ्यांना सारखाच फायद्याचा ठरेल असा एक कायदाहि केला. समाज विकासाच्या दूरगामी योजनाहि 'न्यू डील'नें सुरू केल्या. एकोणिसाव्या शतकांत जेव्हां भांडवलदारांचा गट अत्यंत प्रभावी होता तेव्हां आर्थिक उद्योगांतील निरंकुशता असा स्वातंत्र्याचा अर्थ केला जाऊं लागला आणि त्यामुळें समतेचें तत्त्व निष्प्रभ होत चाललें. ही परिस्थिति अत्यंत धोक्याची होती. 'समान संधी'च्या तत्त्वाला लोकशाही मूल्यांच्या प्रभावळींत पुन्हा एकदां योग्य तें प्रमुख स्थान प्राप्त करून देण्याच्या हेतूनेंच 'न्यू डील'ची रचना करण्यांत आली होती. आर्थिक मक्तेदाऱ्यांचें उच्चाटन करणें, जास्तींत जास्त व्यक्तींमध्यें भांडवलाचें वांटप करणें, जनतेच्या दरडोई उत्पन्नांत आणि क्रयशक्तींत झपाट्यानें वाढ करणें, लोकांचें जीवनमान समाधानकारक पातळीपर्यंत उंचावणें, त्यांना सुरक्षितता मिळवून देणें, शिक्षणाची सोय करणें आणि विशेष चमक दाखविणाऱ्यांना उच्च शिक्षणासाठीं मदत करणें ही 'न्यू डील'चीं कांहीं उद्दिष्टें होतीं.

---

१. 'ऑन अवर वे', न्यूयॉर्क, १९३४. लेखक फ्रँकलिन डी. रूझवेल्ट.

राजकीय हक्क, बौद्धिक स्वातंत्र्य आणि वैयक्तिक जीवनाची सुरक्षितता यांबाबत स्वातंत्र्याचें तत्त्व पाळलें जात होतें. आर्थिक बाबतींत तेवढे अडथळे निर्माण झाले होते. याचाच अर्थ असा कीं, जेव्हां सामाजिक समतोल बिघडतो किंवा राष्ट्राची समृद्धि धोक्यांत येते त्यावेळीं स्वातंत्र्याचें तत्त्व पूर्णपणें व्यवहारांत उतरवतां येत नाहीं.

रूझवेल्ट युग संपलें असून त्यावेळच्या घोषणाहि आतां ऐकूं येत नाहींत, पण हातीं घेतलेले नवे हक्क अमेरिकन लोक केव्हांहि सोडणार नाहींत हें अगदीं उघड आहे. अमेरिकेंतल्या मजूर संघटनांची शक्ति किती जबरदस्त आहे हें ज्यानें पाहिलें असेल त्याला त्याच्या हक्कांच्या शाश्वतीची खात्री पटेल, आणि पुढें कोणत्याहि पक्षाचें सरकार अधिकारावर येऊन अमेरिकन समाज 'न्यू डील'-च्या मूलभूत तत्त्वांशीं एकनिष्ठ राहील. म्हणजेच राष्ट्रीय उत्पन्न जास्तींत जास्त व्यक्तींमध्यें विभागून सर्वांचेंच जीवनमान सतत वाढतें राखण्याचा हा समाज प्रयत्न करील. क्रांतिकारी वर्गयुद्धांच्या मूळ कारणांवरच अमेरिकेंतील प्रस्तुत समाजरचनेनें तोडगा शोधून काढला आहे. या वर्गकलहांऐवजीं आज तिथें विविध सामाजिक गटांत एक सामान्य, कायदेशीर स्पर्धा सुरू असते. हे गटहि अखेरपक्षीं एका मोठ्या समाजांतील भागीदार असतात.

पुढील कांहीं वर्षांत जो अंतर्गत प्रश्न अमेरिकेला सोडवावा लागणार आहे तो वेगळाच आहे. पुन्हा एकदां सबंध देशाला ग्रासून टाकणारी आर्थिक मंदी टाळण्याचें सामर्थ्य सध्यांच्या अर्थरचनेंत आहे काय? या प्रश्नाचें अजून कोणालाच ठामपणें उत्तर देतां आलेलें नाहीं. पण अमेरिकन राष्ट्र अद्याप तरुण आहे, या देशाचें वैभवयुग आज ऐन उमेदींत आहे हें दृष्टीआड करणें अन्यायाचें ठरेल. या राष्ट्राची प्रकृति अत्यंत निकोप आहे, त्याचे अंगीं अपार उत्साह, शोधकबुद्धि, परिस्थितीशीं जुळतें घेण्याचें कौशल्य, सर्जनशीलता आणि श्रद्धा आहे याचीं असंख्य उदाहरणें दाखवतां येतील.

प्रकरण दहावें

# राजकीय पक्ष

दोन राजकीय पक्षांद्वारें अमेरिकेंत लोकशाहीचे व्यवहार चालतात. या दोन्ही पक्षाच्या नांवांचा अर्थ सारखाच होतो. 'रिपब्लिकन' आणि 'डेमोक्रॅट'. त्यांच्यांतील फरक काय, त्यांचे परस्पर संबंध कसे असतात आणि त्यांचा समतोल कसा राहतो हें समजणें युरोपियनांना फार अवघड जातें. पण सर्वसामान्य अमेरिकनाला तरी या गोष्टी चटकन् उमगतात का? अनेक सुशिक्षित आणि महत्त्वाच्या जागीं काम करणाऱ्या अमेरिकनांना मीं या दोन पक्षांमधील फरक स्पष्ट करण्यास सांगितलें. त्यांनीं मोघम, भोंगळ आणि कांहीं प्रसंगीं तर परस्परविरोधी उत्तरें दिलीं. त्यांचीं उत्तरें ऐकून मला वाटूं लागलें कीं कोणत्याहि विशिष्ट तत्त्वप्रणालीसाठीं त्यांनीं आपला पक्ष निवडला नसून सत्तेवर आल्यानंतर तो पक्ष अधिक चांगल्या रीतीनें राजकारभार चालवूं शकेल या ढोबळ श्रद्धेनेंच ते त्यांत सामील झाले आहेत. आपला पक्ष अधिक प्रबळ आहे आणि तोच निवडून येण्याची जास्त आशा आहे एवढाच अंदाज त्यांनीं घेतला होता. पण त्यांच्या पक्षाचें नेमकें म्हणणें काय हें त्यांनीं आम्हांला कधींहि विशद करून सांगितलें नाहीं. त्यांच्या बाबतींत पक्षाची निवड हा कांहीं अमुक अमुक सैद्धांतिक दृष्टिकोणांचा प्रश्न नव्हता. भोवतालच्या परिस्थितींतील अनेक विचित्र, शब्दांनीं नीट व्यक्तसुद्धां करतां येणार नाहींत अशा घटनांचा विचार करून त्यांनीं आपला पक्ष ठरवलेला असतो. कित्येकदां हे घटक असंबद्ध किंवा परस्परविरोधीहि असूं शकतात. इंग्लंडमधील हुजूर आणि मजूर पक्ष, किंवा फ्रान्स व जर्मनीमधील प्रबळ राजकीय पक्ष कांहीं विशिष्ट ध्येयवादांवर आधारलेले आहेत. पण या युरोपांतील राजकीय पक्षांशीं अमेरिकेंतील पक्षांचें फारच थोडें साम्य आढळतें. अमेरिकेंत आपल्याला कांहीं राजकीय आणि सामाजिक शक्ति पिढ्यानुपिढ्या एक गट स्थापन करून नांदतांना आढळतात. या गटांचे कांहीं स्थानिक आणि राष्ट्रीय स्वरूपाचे हितसंबंध आणि आकांक्षा असतात. भौगोलिक मर्यादा, परंपरा, पूर्वेतिहास, स्थानिक चालीरीती, अनेक वर्षें चालत आलेलीं वितुष्टें, भावनिक

अनुबंध, वशिलेबाजी आणि अशा अनेक राजकीय महत्त्वाच्या गोष्टींचा प्रभाव या गटांवर पडलेला असतो.

अमेरिकेंत राजकीय आणि सामाजिक तत्त्वप्रणालीच नाहींत असा याचा अर्थ नव्हे. पण या तत्त्वप्रणालींचा प्रभाव अत्यंत वेगळ्या प्रकारें दिसून येतो. आपल्या तत्त्वप्रणालीबाबतच्या मतभेदांवर जर अमेरिकनांना चर्चा करायची असेल तर त्या कामीं त्यांना आपल्या रिपब्लिकन किंवा डेमोक्रॅट पक्षांच्या व्यासपीठांचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. तत्त्वप्रणाली वेगळी आणि पक्षीय राजकारण वेगळें हें नीट ध्यानांत घेतलें पाहिजे. म्हणून एकाच विचारांचे लोक भौगोलिक, ऐतिहासिक किंवा कांहीं अन्य कारणांमुळें वेगवेगळ्या राजकीय पक्षांत सामील होतात किंवा निराळ्या शब्दांत सांगायचें म्हणजे एकाच पक्षाच्या अनुयायांची विचारसरणी अगदीं भिन्न असूं शकते.

तात्त्विक दृष्टिकोणांतून आजच्या स्थितींत अमेरिकनांचे तीन विभाग कल्पितां येतील : कॉंझर्व्हेटिव्ह, लिबरल, आणि रॅडिकल. कॉंझर्व्हेटिव्ह युरोपमधील उजव्या गटांच्या धर्तीचे आहेत. 'लिबरल' किंवा 'प्रोग्रेसिव्ह' म्हणून संबोधले जाणारे लोक युरोपमधल्या सुवर्णमध्यवादी पक्षांसारखे आहेत. सध्यांच्या समाज-व्यवस्थेंत आमूलाग्र बदल घडून आला पाहिजे असें मानणाऱ्या लोकांना 'रॅडिकल' ही संज्ञा दिली जाते. आर्थिक क्षेत्रांत सरकारी हस्तक्षेपाचा जे पुरस्कार करतात अशांना अमेरिकेंत 'लिबरल' म्हटलें जातें यांत कित्येकांना विरोधाभास आढळेल. परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत आंतरराष्ट्रीयतावादी आणि तटस्थतावादी असे आणखी दोन भेद अमेरिकेंत प्रचलित आहेत. तटस्थतावाद्यांचा आग्रह असा कीं अमेरिकेनें पुनश्च एकोणिसाव्या शतकांतील परराष्ट्रीय धोरणाचा अंगीकार करावा, म्हणजेच तिनें युरोपमधील देशांच्या कलहांपासून शक्य तितकें अलिप्त राहावें आणि त्यांच्याखातर कोणतीहि महत्त्वाची जबाबदारी अंगावर घेऊं नये. याउलट आंतरराष्ट्रीयतावाद्यांचें म्हणणें असें कीं यापुढें तटस्थतावाद म्हणजे एक धोक्याचें शेखमहंमदी स्वप्नरंजन ठरेल, युरोपपासून किंवा बाकीच्या जगापासून फटकून राहणें अमेरिकेला यापुढें अशक्य आहे आणि म्हणूनच विश्व-समाजांतील एक घटक या नात्यानें अमेरिकेनें जास्तींत जास्त जबाबदारी शिरावर घेतली पाहिजे.

तत्त्वप्रणालींच्या बाबतींत राजकीय पक्षांच्या मनांत असा गोंधळ असल्यामुळेंच राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय संकटांच्या वेळीं शासनसंस्थेचा प्रमुख—त्याच्या अंगीं पुरेसा खंबीरपणा आणि धडाडी असेल तर—धोरण ठरविण्याबाबतचीं सूत्रें

स्वतःच्या हातीं घेऊं शकतो. एकाद्या प्रश्नावर अध्यक्ष विरोधी पक्षांतील त्याच्याशीं जुळणाऱ्या विचारसरणीच्या प्रतिनिधींचें सहकार्य मिळवतो, काँग्रेसमध्यें वैयक्तिक बहुमत प्रस्थापित करतो आणि त्याला सर्वांत योग्य वाटणारें धोरण अंमलांत आणतो. या वैशिष्ट्यपूर्ण व अपूर्व अशा राज्ययंत्रणेचें काम कसें चालतें हें आपण सर्वांनीं पाहिलें आहे आणि त्या यंत्रणेचें स्वरूपहि आपल्याला माहीत आहे आणि म्हणूनच अमेरिकेचा अध्यक्ष चारित्र्यवान् आहे कीं नाहीं ही गोष्ट अमेरिकेच्या भवितव्याच्या दृष्टीनें—आणि आतां तर जागतिक भवितव्याच्या दृष्टीनें—अत्यंत महत्त्वाची गोष्ट होऊन बसली आहे.

दोन्ही राजकीय पक्षांतले मतभेद संघराज्याच्या स्थापनेपासून चालत आलेले आहेत. त्याहि आधीं, जॉर्ज वॉशिंग्टनच्या वेळेलाच, दोन भिन्न राजकीय प्रवाह दिसूं लागले होते. वॉशिंग्टनचे दोन महत्त्वाचे सहकारी—अलेक्झँडर हॅमिल्टन आणि थॉमस जेफर्सन—या दोन प्रवाहांचे अध्वर्यु होते. मध्यवर्ती सरकार अधिक भक्कम आणि समर्थ करण्याचा हॅमिल्टनचा मनोदय होता तर उलट केंद्रीय सरकारच्या हातीं इतकी प्रचंड सत्ता एकवटणें हें कांहीं चांगलें लक्षण नाहीं ही जाणीव जेफर्सनला अस्वस्थ करीत होती. 'घटक राज्यांचे हक्क' सुरक्षित राखण्याचे आणि त्यांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार केंद्र सरकार स्वतःकडे घेऊं पाहत होतें ही गोष्ट तर त्याला मुळींच पसंत नव्हती. अशा प्रकारें सत्तेचें केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण यांतील राजकीय संघर्षाच्या मुद्द्यांवर अमेरिकनांत प्रथम दोन तट निर्माण झाले. आणि विकेंद्रीकरण (अमेरिकेचा अफाट विस्तार लक्षांत घेतां संघराज्यापुढें हा प्रश्न निर्माण होणें स्वाभाविकच होतें हें कुणासहि पटेल.) कालांतरानें या संघर्षांतच मतभेदांच्या इतर मुद्द्यांची भर पडत गेली. सत्तेच्या केंद्रीकरणास अनुकूल असलेल्यांना देशांत शिस्तबद्ध जनतेवर राज्य करणारें समर्थ सरकार असावें असें वाटत होतें. व्यक्तीच्या हक्कांवर सरकारकडून केव्हांहि अतिक्रमण होतां कामा नये अशी विरोधकांची भूमिका होती. साहजिकपणेंच ते कामगारवर्गाचे पक्षपाती आणि प्रबळ सत्तेबद्दल मनांत अविश्वास बाळगणारे होते.

केंद्रीकरणवाद्यांची वृत्ति न्यू इंग्लंडच्या कडक प्यूरिटन परंपरांना आणि व्यापारी व पेढीवाल्यांच्या नव्या भांडवलशाहीला शोभेल अशीच होती. दुसऱ्या मताच्या लोकांचा शेतकऱ्यांना पाठिंबा होता आणि कॅथॉलिक निर्वासितांसारख्या अल्पसंख्याकांच्या बाजूनें बोलण्याची त्यांची सदैव तयारी असे. विरोधी पक्षाचे लोक अमेरिकन उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळावें म्हणून संरक्षक कर बसविण्याची

मागणी करीत तर या लोकांचा खुल्या व्यापाराला पाठिंबा होता आणि शेतकरी हाच राष्ट्राच्या अर्थजीवनाचा आधार आहे असें ते मानीत.

हॅमिल्टनच्या पक्षाला फेडरॅलिस्ट पक्ष म्हणत. कांहीं काळ कार्य करीत राहून पुढें हा पक्ष विसर्जन पावला. 'व्हिग' हें इंग्लिश नांव धारण करणाऱ्या एका पक्षानें त्याची जागा घेतली पण हाहि पक्ष अल्पजीवी ठरला. अखेर, यादवी युद्धाचा भडका उडण्यापूर्वी, अब्राहाम लिंकनच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षांत या सगळ्या पक्षांच्या संकलित परंपरा एकत्र झाल्या.

जेफर्सनचा पक्ष आरंभीं आरंभीं स्वतःला 'रिपब्लिकन-डेमोक्रॅटिक' म्हणवीत असे. पण नंतर त्यानें आपल्या नांवाचा उत्तरार्ध तेवढा कायम ठेवला आणि विरोधी पक्षाला वापरायला मिळावा म्हणून पूर्वार्धाचा त्याग केला. अँड्रयू जॅक्सनच्या अध्यक्षतेखालीं डेमोक्रॅटिक पक्षानें अत्यंत यशस्वी आणि शांततापूर्ण क्रांतीची कारकीर्द उपभोगली. बरोबर शंभर वर्षांनीं फ्रँकलिन रूझवेल्ट अध्यक्ष असतांना याच इतिहासाची पुनरावृत्ति झाली. जॅक्सनच्या नेतृत्वाखालीं जनता प्रथमच खऱ्या अर्थानें सत्ताधीश झाली आणि सबंध संघराज्यांत तिनें लोकशाहीच्या लोकप्रिय तत्त्वांचा प्रसार केला.

नंतर एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास डेमोक्रॅटिक पक्षाला एका नाट्यपूर्ण कालखंडांतून जावें लागलें. त्याचें अस्तित्वच कोलमडून टाकूं पाहणाऱ्या एका वावटळींत संघराज्य सांपडलें होतें. निग्रोंच्या गुलामगिरीवर दक्षिणेंतल्या घटक-राज्यांनीं आपली अर्थरचना आणि सामाजिक संपन्नता आधारली होती. गुलाम-गिरीला एक असह्य आणि अनैतिक स्वरूपाची बुरसटलेली प्रथा ठरवून उत्तरे-कडच्या घटकराज्यांनीं कायद्यानें तिचें उच्चाटन केलें होतें. हें दुहीचें विष या तरुण राष्ट्राच्या जीवनांत भिनलें. कोणत्याहि आधुनिक पाश्चिमात्य राष्ट्राप्रमाणें उत्तर अमेरिकेला लोकशाही आणि सरंजामशाही यांचा हा दक्षिणेंत सुरू असलेला अनैसर्गिक संकर सहन होण्यासारखा नव्हता. उत्तर अमेरिकेची वाढती राजकीय आणि आर्थिक सत्ता पाहून दक्षिण अमेरिकेंतील राज्यांना धास्ती वाटूं लागली. केव्हां ना केव्हां तरी संघराज्य आपल्याला आपल्या समाजरचनेंत बदल करण्याचा आदेश देणार याविषयीं त्यांना शंका उरली नाहीं. धडधडत्या छातीनें हीं राज्यें त्या क्षणाची वाट पाहत होतीं. पण असा क्षण येण्यापूर्वींच परिस्थितीचीं सूत्रें आपल्या हातीं घेण्याचें या दक्षिण संस्थानांनीं ठरवलें. अकरा दक्षिण संस्थानें संघराज्यापासून अलग झालीं आणि त्यांनीं आपलें स्वतंत्र प्रजासत्ताक स्थापन केलें. याची परिणति भयानक यादवी युद्धांत झाली.

या संघर्षांत रिपब्लिकन पक्षाची विचारसरणी सुस्पष्ट होती. ती म्हणजे : संघराज्यावरील अविचल निष्ठा. दक्षिण संस्थानांचें संघराज्यापासून फुटून निघण्याचें कृत्य बेकायदेशीर, बंडखोरीचें आणि देशद्रोहाचें असून त्याबद्दल त्यांना राष्ट्रीय सैन्याच्या जोरावर योग्य तें शासन केलेंच पाहिजे अशी रिपब्लिकन पक्षाची ठाम भूमिका होती. नेहमीं 'घटकराज्यांच्या हक्कांचा' पुरस्कार करणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षापुढें अत्यंत गंभीर पेचप्रसंग उभा राहिला. या पक्षांत अपरिहार्य-पणें दोन तट पडले. दक्षिण संस्थानांतल्या डेमोक्रॅट-पक्षीयांनीं नव्या सत्तेची बाजू घेतली. उत्तरेंतील डेमोक्रॅट संघराज्याशीं एकनिष्ठ राहिले पण त्यांचें हें परिस्थितिजन्य सहकार्य रिपब्लिकनांना संशयास्पद वाटूं लागलें. अमेरिकेच्या इतिहासांतील या विशिष्ट प्रसंगीं संघराज्याचें संरक्षण करून आणि ज्या लाजिर-वाण्या प्रथेंतून हा संघर्ष निर्माण झाला ती प्रथा नष्ट करून रिपब्लिकन पक्षानें ऐतिहासिक आणि सामाजिक प्रगतीचा झेंडा फडकत ठेवला हें निर्विवाद होय. रिपब्लिकन पक्षानें ज्याचा अभिमान बाळगावा असें हें महान् ऐतिहासिक कर्तृत्व आहे. युद्ध संपल्याबरोबर पुन्हा डेमोक्रॅटिक पक्षांत ऐक्य प्रस्थापित झालें. पण पुढें दीर्घकालपर्यंत या पक्षांतील एका गटावर गुलामगिरी कायम राखण्यासाठीं राष्ट्रीय ऐक्याविरुद्ध लढल्याचा आरोप होत राहिला. उलट उत्तरेंतल्या रिपब्लिकनांनीं नंतर कांहीं वर्षेंपर्यंत दक्षिण संस्थानांवर जें लष्करी वर्चस्व लादलें त्यांतून अपरिहार्यपणें कांहीं अमानुष, अन्यायाचीं आणि लाजिरवाणीं कृत्यें घडलीं व तेथील लोकांच्या मनांत रिपब्लिकनांबद्दल तिरस्काराची भावना निर्माण झाली. ही भावना आजहि कायम आहे.

यादवी युद्ध संपल्यापासून तों पहिल्या महायुद्धापर्यंत कोणत्या कारणांनीं या दोन पक्षांत दुही राहिली तें शोधून काढणें सोपें नाहीं. कारण 'संघराज्य' आणि "घटक राज्यांच्या हक्कां'चा प्रश्न तर अस्तित्वांतच राहिला नव्हता. प्रजा-सत्ताकाच्या संघटनेंत पुन्हा समतोल स्थापन करण्यांत आला होता. गुलामगिरी नष्ट करण्यांत आली होती. इतिहासाच्या प्रगतीपुढें दक्षिण संस्थानांनीं मान तुकवली होती. भांडवलशाही आणि स्वतंत्र शेतकऱ्यांची व जमिनीवर समान हक्क असणाऱ्यांची लोकशाही यांच्यांतला जुना वादहि इतिहासजमा झाला होता. देशाची नैसर्गिक संपत्ति उपयोगांत आणून यंत्रक्षेत्रांतील प्रगतीला उत्तेजन देण्याच्या अनिर्बंध उत्साही प्रयत्नांतून भांडवलशाहीचें अस्तित्व प्रतीत होत होतें. भिन्नत्वाची एकच गोष्ट या दोन पक्षांत शिल्लक राहिली, आणि ती म्हणजे त्यांच्या पूर्वस्मृति !

गेल्या शतकाच्या अखेरीसच एका लेखांत लॉर्ड ब्राइसनें भाकित केलें कीं हें ऐक्य फार काळ टिकणार नाहीं, लोकांना विभागणारा कोणता तरी एक नवीन प्रश्न निर्माण होईल आणि अमेरिकेच्या भावी राजकारणाचा तो प्रमुख प्रश्न होऊन बसेल. आर्थिक क्षेत्रांतील सरकारी हस्तक्षेपाचा तो प्रश्न होय. पण या प्रश्नावर कोणतीहि ठाम भूमिका स्वीकारण्याची कुठल्याच पक्षाची तयारी नव्हती. मग परिस्थिति जेव्हां त्यांना कोणता तरी एक निर्णय पक्का करण्याची सक्ति करील तेव्हां हे पक्ष काय करतील? कांहींशा अनिश्चिततेनंतर हा मार्मिक राजकीय निरीक्षक सुचवतो कीं रिपब्लिकन पक्ष नेहमींच सरकारच्या हक्कांचा आणि अधिकारांचा पुरस्कार करीत आला असल्यानें तो यावेळींहि सरकारी हस्तक्षेपाचेंच समर्थन करील हें जास्त संभाव्य आहे. ब्राइस म्हणतो, "डेमोक्रॅट पक्षापेक्षां रिपब्लिकन पक्षाचाच सरकारी हस्तक्षेपाकडे जास्त कल आहे." पण पुढें प्रत्यक्ष घडलेल्या घटनांतून मात्र या विधानाची सत्यता सिद्ध झाली नाहीं हें आपल्याला ठाऊकच आहे. कारण अखेरपक्षीं रिपब्लिकन पक्षांत भांडवलदारांचा प्रभाव वरचढ ठरला आणि आपल्या हितसंबंधांना बाध आणणाऱ्या सरकारी हस्तक्षेपाला या गटाकडून पाठिंबा मिळणें शक्य नव्हतें. पुढें एक डेमोक्रॅटिक अध्यक्ष 'न्यू डील' योजना देशासमोर ठेवील आणि त्यायोगें अमेरिकन प्रवृत्तीला केव्हांहि मानवली नसती एवढी सत्ता संघसरकारच्या हवालीं करील ही कल्पना तरी यादवी युद्धानंतरच्या काळांत कोणाच्या मनाला शिवली असेल काय?

थिओडोर रूझवेल्ट, टॅफ्ट आणि विल्सन या चालू शतकांतील पहिल्या तीन अध्यक्षांनीं स्थूलमानानें हेंच राजकीय सूत्र पुढें चालविलें. या अध्यक्षांपैकीं पहिले दोघे रिपब्लिकन होते आणि तिसरा डेमोक्रॅट होता. त्यांचें धोरण कांहींसें उदार 'अँटी-ट्रस्ट' स्वरूपाचें होतें. विल्सनच्या कल्पक पण नावीन्यपूर्ण आंतरराष्ट्रीय धोरणामुळें पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस या दोन पक्षांत तीव्र मतभेद निर्माण झाले. १९१९ च्या तहावर अमेरिका सही करणार काय? तिचीच मानसकन्या असलेल्या आणि तिच्याच परंपरांतून निर्माण झालेल्या 'लीग ऑफ नेशन्स' संघटनेंत अमेरिका सामील होणार काय? रिपब्लिकनांनीं या कल्पनांना विरोध केला आणि तटस्थतावादाचें निशाण उभारलें. अध्यक्षाला डेमोक्रॅट पक्षाचा पाठिंबा होता. त्यांतील अधिक दूरदर्शी लोकांनीं ताबडतोब ओळखलें कीं अमेरिकेनें उत्साहानें भाग घेतला नाहीं तर 'लीग ऑफ नेशन्स' हें जन्ममृत बालक ठरेल. त्यांनीं हेंहि जाणलें कीं बाह्य जगाशीं सहकार्य केल्यानेंच अमेरिकेंत शांतता आणि समृद्धि कायम राखतां येईल. एक तीव्र संघर्ष निर्माण

झाला आणि अखेर रिपब्लिकनांनीं त्यांत विजय मिळवला. पण ऐतिहासिक प्रगतीचें निशाण मात्र यावेळीं डॅमोक्रॅट पक्षाच्या हातांत होतें. पुन्हा जागतिक मंदीनें निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देणारें धोरण आंखण्याची जबाबदारी डेमोक्रॅट पक्षावरच येऊन पडली.

आज या दोन पक्षांचें स्थूलमानानें पुढीलप्रमाणें वर्णन करतां येईल:—

हॅमिल्टन आणि लिंकन यांचीं नांवें घेऊन आणि देशाच्या ऐक्यासाठीं व लोकशाहीच्या ध्येयांसाठीं त्यांनीं जे लढे दिले त्यांची आठवण करून रिपब्लिकन पक्ष लोकांना आवाहन करतो. पारंपरिक म्हणून अमेरिकेंत जें जें कांहीं आहे त्या सगळ्याचें प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे आपला पक्ष असें रिपब्लिकन लोक मानतात. सनातन्यांना आणि उदारमतवाद्यांना ते आपल्यापैकींच मानतात पण त्यांचा कल सामाजिक सनातनवादाकडे अधिक आहे आणि ते सरकारी हस्तक्षेपाच्या विरुद्ध आहेत. शक्य होईल तों सरकारनें हस्तक्षेप करण्याचें टाळावें असें या पक्षाचें मत आहे. दक्षिण संस्थानें सोडलीं तर देशाच्या इतर सर्व भागांतले भांडवलदार आणि इंग्लिश परंपरांचीं अमेरिकन कुटुंबें या पक्षांत आहेत. परराष्ट्रीय धोरणाबाबत तटस्थतावाद आणि आंतरराष्ट्रीयतावाद या मुद्द्यांवर या पक्षांत तीव्र मतभेद आहेत.

जेफर्सन आणि जॅक्सन यांच्याच मार्गानें डेमोक्रॅट जात असतात पण विशेषतः विल्सन आणि फ्रँकलिन रूझवेल्ट यांच्या आधुनिक परंपरेशीं ते आपलें जवळचें नातें सांगतात. पराकोटीचें भिन्नत्व असलेल्या घटकांचा मिळून हा पक्ष बनला आहे. त्यांत आपल्याला दक्षिणेकडील गुलामगिरीचें समर्थन करणारे कट्टर प्रतिक्रांतिकारी आढळतील तसेंच मार्क्सवादाशीं मिळत्या-जुळत्या विचारसरणीचे लोकहि सांपडतील. उत्तरेकडील यांकी सैन्यानें आपल्यावर दीर्घकाळ वर्चस्व गाजविलें आणि आपल्या घरादारांचा विध्वंस केला या गोष्टीचा विसर दक्षिण संस्थानांतल्या गुलाम मालकांच्या व यादवी युद्धांत मर्दुमकी गाजवलेल्या वीरांच्या वंशजांना अद्याप पडलेला नाहीं आणि त्यांनीं उत्तर संस्थानांना त्याबद्दल मनांतून क्षमाहि केलेली नाहीं. त्यामुळें पिढ्यानुपिढ्या हे लोक डेमोक्रॅट पक्षाच्या बाजूनें मतदान करतात. स्वाभाविकपणेंच ते देशातील अत्यंत सनातनी गटापैकीं मानले जातात. इतकें झालें तरी आज डेमोक्रॅट पक्षांत सरकारी हस्तक्षेप आणि प्रगतिपर कायदे यांना पाठिंबा देणाऱ्या मंडळींचेंच वर्चस्व आहे. परराष्ट्रीय धोरणाच्या बाबतींत अमेरिकन ज्याला आंतरराष्ट्रीयतावाद म्हणतात त्या धोरणाला या पक्षाचा एकवट पाठिंबा आहे.

राजकीय दृष्ट्या दक्षिण अमेरिका दीर्घकाळपर्यंत कट्टर 'डेमोक्रॅटिक' होती आणि म्हणूनच तिला 'कट्टर दक्षिण' असें उपनांव प्राप्त झालें. तेथील या टोकापासून त्या टोकापर्यंतचे सर्व रहिवासी डेमोक्रॅटिक पक्षाला मतें देत; कांहीं ऐतिहासिक कारणांसाठीं तर बाकीचे पक्षाच्या प्रगतिपर सामाजिक धोरणासाठीं. अगदीं अलिकडे मात्र तेथें आधुनिक औद्योगीकरणास सुरवात झाल्यानें राजकीय स्वरूपाचे बदलहि दृष्टोत्पत्तीस आले आहेत. अमेरिकेंतील इतर भागांप्रमाणेंच दक्षिणेंतहि आपल्याला कांहीं कांहीं प्रदेश असे आढळतात कीं तेथें दोन्ही पक्षांच्या बाजूनें मतदान होतें. या स्थित्यंतरावर अनेक प्रकारचीं मतें प्रदर्शित केलीं जातात. देशाचें राजकीय स्वरूप सुस्पष्ट होण्यासाठीं सर्व सनातनी घटकांनीं एका पक्षांत आणि सर्व पुरोगामी विचाराच्या लोकांनीं दुसऱ्या पक्षांत सामील होण्याची वेळ येऊन ठेपली आहे, अशीं मतें अनेकांनीं वृत्तपत्रांतून व्यक्त केलीं आहेत. हें म्हणणें तर्कशुद्ध असेल पण आज अनेक पिढ्या चालत आलेल्या राजकीय पक्षनिष्ठेंत असा एकदम बदल घडून येणें अत्यंत असंभवनीय आहे. या दोन्ही पक्षांजवळ कोणताहि निश्चित स्वरूपाचा तात्त्विक कार्यक्रम नाहीं आणि दोन्हीकडे विविध प्रकारचे सामाजिक घटक एकत्र आल्याकारणानें या पक्षांत एक प्रकारचा लवचिकपणा आला आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे वर उल्लेखिलेला राजकीय बदल कसा अशक्य आहे हें अधिक चांगल्या रीतीनें पटतें. पक्षांच्या कार्यक्रमांत असा लवचिकपणा असणें ही सध्यांच्या झपाट्यानें बदलणाऱ्या काळांत एक स्वागतार्ह गोष्ट मानली पाहिजे. कांहीं ठराविक राजकीय-सामाजिक मूल्यांवर आधारलेल्या पक्षांपेक्षां या पक्षांत लवचिकपणा अधिक असल्यानें बदलत्या परिस्थितीशीं चटकन् जमवून घेणें आणि आपल्या धोरणांचा फेरविचार करणें त्यांना सोपें जातें. म्हणूनच दोन्ही पक्षांना भवितव्याची आशा असते. अर्थात् आत्तांच याबाबत कांहीं निश्चित मत बनवणें घाईचें ठरेल.

प्रकरण अकरावें

# संघराज्यवाद

स्वातंत्र्ययुद्धानंतर अमेरिकन क्रांतीला सोडवावा लागलेला सर्वांत अवघड प्रश्न म्हणजे राष्ट्रीय ऐक्याचा प्रश्न होता यांत शंका नाहीं. त्या तेरा बंडखोर वसाहती म्हणजे तेरा स्वतंत्र सार्वभौम राज्यें होऊन राहिल्या होत्या. हें प्रत्येक राज्य दुसऱ्याहून अगदीं भिन्न होतें; कारण प्रत्येकानें स्वतःची अशी विशिष्ट जीवनाची परिस्थिति, ध्येयें आणि सुस्पष्ट हितसंबंध निर्माण केले होते. त्यांच्यांत तंटा उत्पन्न करतील असे अनेक मतभेद होते आणि त्यांतून स्थानिक स्वरूपाच्या लढायाहि अनेकदां उद्भवत असत. परस्परांबद्दल मनांत संशयभाव बाळगणारीं हीं तेरा प्रकारचीं तेरा राज्यें एकत्र आणून त्यांना एका राजकीय घटकांत सांधणें ही कांहीं सोपी गोष्ट नव्हती. त्यांच्यांतील समान संस्कृति आणि समान भाषा या गोष्टी अशा ऐक्यास पोषक होत्या खऱ्या, पण तेवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. जो खरोखरच अंतर्गत कलह आणि अराजक टाळूं शकेल असा नागरिकांचा एक प्रगत वर्ग या ऐक्यासाठीं आवश्यक असतो. अशा प्रकारच्या क्रांत्यांनंतर अनेक देशांपुढें हा प्रश्न उभा राहिला आहे. अशा एका जबाबदार सुसंस्कृत, दूरदृष्टीच्या आणि बुद्धिमान् वर्गालाच लोकशाही संघराज्याची समन्वयी कल्पना सुचली. नंतरची गरज म्हणजे राजकीय दृष्ट्या समंजस आणि लोकशाही तंत्राशीं सुपरिचित असलेली जनता. पण अमेरिकेंत या सर्व गोष्टी असतांनासुद्धां घटक राज्यांचें एकत्रीकरण घडून येण्यासाठीं तिला यादवी युद्धाच्या अग्निदिव्यांतून जावें लागलें.

आधींपासून अस्तित्वांत असलेल्या आणि संस्कृतीचा पश्चिमेकडे प्रसार झाल्यानंतर अस्तित्वांत यावयाच्या अशा दोन्ही प्रकारच्या प्रांतांची स्वायत्तता सुरक्षित ठेवणें हें सर्वांत महत्त्वाचें काम होतें. त्याबरोबरच बाह्य संकटांपासून या घटकांचें संरक्षण करूं शकेल असें समर्थ आणि सर्वांच्या हितास पोषक अशी सुसूत्रता त्यांच्या जीवनांत निर्माण करूं शकेल असें सुज्ञ मध्यवर्ती सरकार अधिकारावर असणें हीहि एक आवश्यक बाब होती. इंग्लंड हें अमेरिकन परंपरांचें मुख्य स्फूर्तिस्थान असलें तरी त्याचा इथें कांहीं उपयोग होण्यासारखा

नव्हता. सबंध युरोपच्या इतिहासांत संघराज्याला उपयुक्त ठरेल असा एकहि समाधानकारक दाखला नव्हता, त्यामुळें अमेरिकनांना स्वतःलाच असा आदर्श निर्माण करावा लागला.

अखेर त्यांनीं वरवर पाहतां परस्परविरोधी वाटणाऱ्या तत्त्वांचा आणि प्रवृत्तींचा चतुर मेळ घडवून आणला. उदाहरणार्थ, सीनेटमध्यें प्रत्येक राज्याचे दोन प्रतिनिधि असतात, मग त्या राज्याची लोकसंख्या कितीहि असो. याउलट प्रतिनिधिगृहांत प्रत्येक राज्यातर्फे किती सभासद जायचे हें मात्र त्या त्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असतें. द तोकव्हिले यानें म्हटल्याप्रमाणें सीनेटची विशिष्ट घडण आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या तत्त्वावर करण्यांत आलेली प्रतिनिधिगृहाची रचना यामुळें घटक राज्यांच्या स्वातंत्र्याचें तत्त्व अबाधित राहतें. कायदेशीरपणें संघराज्याच्या अधिकाराखालीं येणाऱ्या कांहीं बाबी सोडल्या तर अमेरिकन राज्यघटनेनें आंखून दिलेल्या नियमांच्या चौकटींत राहून आपापला कारभार हाकण्यास घटक राज्यें पूर्णपणें मुखत्यार आहेत. एक कायदेशीर घटक म्हणून प्रत्येक राज्यापर्यंतच नव्हे तर प्रत्येक नागरिकापर्यंत केंद्रसत्तेचा अधिकार पोंचतो. अशा प्रकारें प्रत्येक अमेरिकन एकाच वेळीं दोन राज्यघटना, दोन कायदेमंडळें, दोन न्याययंत्रणा आणि दोन पोलिस संघटनांच्या अंमलाखालीं येतो. हल्लींच्या काळीं संघराज्याच्या क्षेत्रांत आणि अधिकारांत इतकी वाढ झाली आहे कीं शंभर वर्षांपूर्वी त्याची कुणाला कल्पनाहि करतां आली नसती. तरी अजूनहि घटक राज्यांचें अधिकारक्षेत्र खूप विस्तृत आहे आणि स्थानिक स्वरूपाच्या विविध कायद्यांना, वटहुकुमांना, संस्थांना, सामाजिक व वैध प्रयोगांना तेथें भरपूर वाव आहे. अमेरिकेंत वकिलाचें काम कांहीं सोपें नाहीं. कारण त्याला सतत भिन्न भिन्न आणि अनेकदां परस्परविरोधी अशा कायद्यांचा आणि कोर्टांच्या निर्णयांचा मेळ बसवून कायद्याचें एक विशिष्ट सूत्र तयार करावें लागतें. फारसें वावगें ठरणार नसेल तर या सूत्राला आपण "अंतर्गत दिवाणी आंतरराष्ट्रीय कायदा" असें नांव देऊं शकूं. पण ही गुंतागुंतीची रचना सामाजिक जीवनाच्या दैनंदिन व्यवहारांत मात्र कोणत्याहि प्रकारें अडचणी उत्पन्न करीत नाहीं. लॉर्ड ब्राइस म्हणतो, "हें संघराज्य म्हणजे केवळ घटक राज्यांचा समुच्चय नव्हे. हीं राज्यें संघराज्याचीं केवळ घटक नाहींत तर आणखीहि कांहीं आहेत." कायद्याच्या कलमांचा सुज्ञतेनें आणि लवचिकपणें अर्थ लावल्यामुळें आणि व्यक्तिवैशिष्ट्यें व उत्स्फूर्तता यांना पूर्ण वाव दिल्यामुळें अमेरिकनांनीं इतिहासांत प्रथमच एवढ्या प्रचंड प्रमाणावर एक संघराज्य यशस्वीपणें चालवून दाखविलें आहे. या अनेक घटक राज्यांच्या

आकांक्षांत आणि विशाल संघराज्याच्या आकांक्षांत त्यांनीं एक प्रकारचें समतोल ऐक्य राखलें आहे.

एका आधींच्या प्रकरणांत मीं उल्लेख केल्याप्रमाणें नव्या अध्यक्षाच्या शपथ-विधीचे दिवशीं आम्हांला संघराज्यभावनेचें एक अत्यंत हृद्य आणि मनोहर उदाहरण पाहावयास मिळालें. या दिवशीं व्हाइट हाउसवरून एक जल्लोषपूर्ण मिरवणूक नेण्याची प्रथा आहे. अध्यक्ष स्वतः या मिरवणुकीच्या मानवंदनेचा स्वीकार करतो. हल्लींच्या युगांतील हा एक अत्यंत भव्य आणि असामान्य सोहळा असतो. खास हा सोहळा पाहण्यासाठीं म्हणून दूरवरच्या देशांतून अमेरिकेस यावें इतका तो प्रेक्षणीय असतो. अत्यंत उल्हासपूर्ण आणि हास्यमय वातावरणांत सुमारें पांच तास हा समारंभ सुरू असतो. लष्करी वैभव, नाट्यपूर्ण ऐतिहासिक देखावे, लोककथांचा व लोककाव्यांचा आविष्कार, धुंद करणारें संगीत व नृत्य, राजकीय सभा आणि ज्या योगें अमेरिकेचें विविधरूपी दर्शन घडवतां येईल असें समारंभाच्या संचालकांना वाटतें ते ते सर्व प्रकार यांचा एक मनोहर संगम या मिरवणुकींत आपल्याला पाहायला मिळतो. या मिरवणुकीची शोभा केवळ अवर्णनीय अशी होती. प्रतीकात्मक देखावे, पुष्पालंकार आणि रंगीबेरंगी पोशाखाचीं माणसें यांनीं ठेचून भरलेल्या भडक रंगांच्या अठ्ठेचाळीस मोटारी या मिरवणुकीच्या अग्रभागीं होत्या. प्रत्येक मोटार एकेका संस्थानाचें प्रतिनिधित्व करीत होती. त्यांच्याबरोबर अनेक संस्थांचे प्रातिनिधिक गट आणि बँडचे ताफे चालले होते. त्या दोहोंमध्यें लष्करी फौजा आणि सैनिकी शिक्षणाच्या अकादमींमधील सैनिक यांच्या सोळा ओळींच्या पृथक् तुकड्या शिस्तबद्ध कवाईत करीत चालल्या होत्या. त्यांपैकीं कांहींचे मागें त्यांचीं वृंदवाद्यपथकें आणि आनंदातिशयानें नृत्य करणाऱ्या युवतींचे गट होते. हर प्रकारचे स्थानिक आणि ऐतिहासिक पोशाख व गणवेश यांचें प्रदर्शन आमच्या समोरून सरकत होतें. १६२० सालचा प्युरिटनांचा गंभीर काळा पोशाख, १८ व्या शतकांतले केसांचे टोप, जॉर्ज वॉशिंग्टनच्या काळचे गणवेश, रेड इंडियन टोळ्यांचीं भडक रंगाच्या पिसांनीं नटलेलीं नेत्रदीपक शिरोभूषणें, गुराख्यांचे उमदे घोडे, कमरेपासून गुडघ्यापर्यंत लोंबणारे स्कॉच लोकांच्या वंशजांचे भडक चट्ट्यापट्ट्यांचे झगे या सर्वांनीं मिळून त्या मिरवणुकीला अपूर्व अशी शोभा आणली होती. या सगळ्याच्या भरीला त्या मिरवणुकींत दोन शृंगारलेले हत्ती आणि पूर्वीं कधींहि घडवली गेली नसेल अशा अजस्र आकाराची एक अणु-तोफ यांचाहि समावेश केला होता. या अद्भुतरम्य मिरवणुकींतील विविधरंगी

दृश्यांमधून स्वतंत्र घटक राज्यांचें सामर्थ्यवान् संघराज्याशीं असलेलें सहकार्य सूचित होत होतें. १८६१ सालीं फुटून निघालेल्या दक्षिण राज्यांचे गणवेश आणि निशाण त्या झगमगत्या मिरवणुकींत पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. जुन्या आयरिश बंडखोरांना ब्रिटिश राष्ट्रकुलाच्या मिरवणुकींत स्थान देण्यासारखा किंवा आल्सेशियन स्वराज्याच्या आंदोलकांना पॅरिसमध्यें १४ जुलैला होणाऱ्या समारंभांत स्थान देण्यासारखा विचित्र वाटला मला हा प्रकार. अशा गोष्टींबद्दल सहिष्णुता दाखवणें युरोपियन मनाला अद्याप जमलेलें नाहीं. पण त्या दिवशीं राजधानीच्या इमारतींत मला याहूनहि अधिक आश्चर्यकारक दृश्य पाहायला मिळायचें होतें. या भव्य इमारतींतून हिंडतांना आम्ही एका अर्धवर्तुळाकार, अभिरुचिसंपन्न अशा हॉलमध्यें आलों. प्रत्येक घटक राज्यानें आपल्या थोर पुरुषांचे पुतळे या हॉलमध्यें ठेवले आहेत. तेथें अमेरिकन इतिहासांतील सुप्रसिद्ध व्यक्तींपैकीं जेफर्सन डेव्हिस आणि जनरल रॉबर्ट ई. ली यांचे पुतळे आम्हांला आढळले. सैन्यबळावर ज्याचा निःपात करण्यांत आला त्या फुटीर प्रजासत्ताकाचा जनरल रॉबर्ट ली हा अध्यक्ष आणि सरसेनापति होता. त्या प्रशस्त हॉलमधल्या फक्त या दोन पुतळ्यांनाच फुलांचे हार घालण्यांत आले होते हें पाहून आम्ही चकित झालों.

आपल्या स्थानिक प्रदेशाबद्दल निष्ठा व अभिमान, पूर्वेतिहासाच्या स्मृति, आपलें स्वतंत्र सरकार असावें अशी आवड, या छोट्या प्रांतांचें स्वभाववैशिष्ट्य असणाऱ्या सर्व गोष्टी येथील लोकांच्या मनावरहि खोल ठसल्या आहेत आणि त्यांच्या जाणिवेवर या गोष्टींचा गहिरा ठसा उमटला आहे या सत्याकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. (आतां त्यांपैकीं कांहीं प्रांत युरोपमधल्या अत्यंत महत्त्वाच्या देशांहून सुद्धां आकारानें मोठे आहेत ही गोष्ट वेगळी.) पण पूर्वीच्या सगळ्या फुटीर प्रवृत्ति मात्र आतां नामशेष झाल्या आहेत. या प्रवृत्तींचा कोणीं जाणून बुजून त्याग केला नसतांनाहि आज कित्येक वर्षांपूर्वीपासून कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत त्यांचें उदात्तीकरण झालें आहे. संघराज्याच्या विशाल क्षेत्रांत या प्रवृत्ति गुण्यागोविंदानें नांदत आहेत. या मुद्द्याचा विचार केला म्हणजे या बाबतींत अमेरिका युरोपच्या खूपच पुढें आहे हें आपल्याला कबूल करावें लागेल.

ही ऐक्यभावना अमेरिकनांच्या विचारसरणीचा अविभाज्य भाग होऊन बसली आहे. आपल्या स्वतःच्या देशांतल्या एकाद्या विशिष्ट किंवा सर्वसामान्य घटनेकडेच नव्हे तर सबंध जगांतल्या घडामोडींकडे अमेरिकन लोक याच दृष्टि-कोणांतून पाहतात. ही गोष्ट सतत लक्षांत ठेवली नाहीं तर अमेरिकन लोकांच्या

इच्छा आणि आकांक्षा कोणालाच नीट समजूं शकणार नाहींत. चालू शतकांत युरोप अनेक लहानमोठ्या, स्वतंत्र, सार्वभौम राज्यांत विभागला गेला आहे. आपापल्या संकुचित भौगोलिक मर्यादांतच हीं राष्ट्रें जखडून राहिलीं आहेत. या देशांनीं आपापल्या सरहद्दींभोवतीं उभारलेली भक्कम तटबंदी आणि संरक्षक करांच्या भिंती या सगळ्या खटाटोपाचा अर्थच अमेरिकेला कळूं शकत नाहीं. या देशांत कोठली तरी जुनाट, मागासलेली, सरंजामशाहीच्या धर्तीची जीवनपद्धति असावी असा त्यांना संशय येतो. आपलें उदाहरण डोळ्यासमोर ठेवून युरोप एका निशाणाखालीं ब्रिटनीपासून क्रेटपर्यंत आणि अँडल्यूशियापासून बर्फाळ स्कँडिनेव्हियापर्यंत एकच संघराज्य कां निर्माण करीत नाहीं असा प्रश्न अनेकदां त्यांच्या मनांत डोकावतो. आपापल्या समाजांची आणि अर्थव्यवस्थांची आमूलाग्र फेररचना करण्यासाठीं, सर्वांचेंच जीवनमान वरच्या पातळीवर नेण्यासाठीं आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्या सबंध संस्कृतीचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं अशा संघराज्याचा किती नामी उपयोग होईल याचें आकलनच युरोपियनांना होत नाहीं का? उज्ज्वल भवितव्याच्या या संधीकडे दुर्लक्ष करून तसेंच जाणून बुजून दारिद्र्यांत, गोंधळांत, भीतिपूर्ण वातावरणांत, शतकानुशतकें चालू राहिलेल्या वैमनस्यांत खितपत पडणें युरोपांतील लोकांना रुचतें तरी कसें?

युरोपच्या जीवनक्रमाबद्दल अमेरिकन लोक जेव्हां असा ग्रह करून घेत असतात त्यावेळीं तेथील इतिहासाच्या मूलभूत मर्माकडेच त्यांचें दुर्लक्ष झालें आहे असें वाटतें. फ्रान्स आणि जर्मनी म्हणजे कांहीं आकारानें टेक्सासहून लहान असे केवळ दोन भौगोलिक घटक नाहींत, तर इतिहासकालापासून पूर्णतया विभक्त असलेले ते जागतिक महत्त्वाचे स्वतंत्र देश आहेत. या देशांच्या जाणिवेवर त्यांच्या भूतकाळाचा बौद्धिक आणि आध्यात्मिक ठसा किती खोलवर उमटलेला आहे त्याची या नव्या जगांतील (अमेरिकेंतील) रहिवाश्यांना नीटशी कल्पना येणार नाहीं. पूर्वस्मृतींच्या या ओझ्यामुळें आपल्या कोणत्याहि हक्कांचा, अधिकारांचा किंवा निसर्गदत्त प्रदेशाचा त्याग करणें या राष्ट्रांना शक्य होत नाहीं. न्यूयॉर्क शहरापेक्षांहि ज्यांची लोकवस्ती कमी आहे अशा राष्ट्रांची ठाम श्रद्धा असते कीं एक महान् ऐतिहासिक भवितव्य पूर्ण करण्यासाठीं आपला जन्म आहे. आपलें अलग अस्तित्व, स्वभावविशेष आणि राष्ट्रीय संस्कृति चिरकाल टिकविणें हेंच तें भवितव्य, असें युरोपमधील लोक मानतात. युरोपच्या प्रश्नाची चर्चा करतांना अमेरिकन लोक निव्वळ राजकीय आणि आर्थिक स्थितींतून उद्भवणाऱ्या आणि

जे एक दिवस तर्कशुद्ध पद्धतींनीं सोडवतां येतील अशा तांत्रिक प्रश्नांवरच आपलें सगळें लक्ष केंद्रित करतात. अत्यंत अडाणीपणाचे आणि मानसशास्त्रीय दृष्ट्या अगम्य अशा गुंतागुंतीचे असंख्य अडथळे युरोपियन संघराज्य साकार होण्यांत फार मोठ्या प्रमाणांत आड येत आहेत या सत्यस्थितीकडे ते दुर्लक्ष करतात.

दुसरें म्हणजे, अमेरिकनांत जो गुण भरपूर प्रमाणांत आहे त्याचा युरोपियनांत संपूर्ण अभाव आहे: ज्याप्रमाणें पर्वतशिखरावर उभ्या असलेल्या माणसापेक्षां विमानांतून अंतराळांत भ्रमण करणाऱ्याला अधिक विशाल प्रदेश न्याहाळतां येतो त्याप्रमाणें विशाल दृष्टिकोणाचे अमेरिकन संकुचित दृष्टीच्या युरोपियनांपेक्षां अधिक व्यापकतेनें विचार करूं शकतात. केवळ एका राज्यांतल्या नव्हे तर सबंध खंडांतल्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक प्रश्नांवर अमेरिकन लोक उपाय शोधून काढतात. व्यापक प्रमाणावर कोणताहि प्रश्न समजून घेणें आणि त्यावरील उपाय कार्यवाहींत आणणें हा अमेरिकन प्रवृत्तीचा सर्वोत्कृष्ट विशेष आहे. युरोपियन माणसांत हा गुण आढळत नाहीं. युरोपीयांना अद्याप गांठतां आलेली नाहीं अशी उच्च पातळी अमेरिकनांनीं गांठली आहे; आणि ती गांठण्याच्या उद्देशानेंच सबंध जागतिक संस्कृतीनें भावी काळांत अपरिहार्यपणें आपल्या प्रगतीचे प्रयत्न केले पाहिजेत हें आजहि स्पष्ट दिसत आहे.

१८३१ सालीं द तोकव्हिले हा तरुण लोकशाहीचा अभ्यास करण्यासाठीं अमेरिकेस गेला. तेथील लोकशाहीच्या रचनेचा अभ्यास करून त्यावरून युरोपांत कोणत्या प्रकारची उत्क्रांति होणें शक्य आहे हें त्याला पाहावयाचें होतें. आज अमेरिकेला जाणाऱ्या कोणत्याहि माणसानें तेथील संघराज्याची कल्पना समजून घेण्यावर सर्वांत अधिक भर दिला पाहिजे. कारण असें केलें तरच तो अमेरिकन संस्कृतीचें आणि अमेरिकन मनोवृत्तीचें योग्य प्रकारें रसग्रहण करूं शकेल. मग त्याला अधिक सुस्पष्ट दृष्टिकोणांतून युरोपच्या पूर्वापार प्रश्नाचाहि नीट विचार करतां येईल. भविष्यकाळाचें ओझरतें तरी दर्शन झाल्याच्या समाधानानें त्याला परत फिरतां येईल.

प्रकरण बारावें

# संघटनकौशल्य आणि त्याचें जागतिक महत्त्व

कांहींशी चाकोरीबाहेरची शब्दयोजना करून मला असें म्हणावेंसें वाटतें कीं अमेरिकन ऐक्याला एक आडवा आणि एक उभा असा दुहेरी अर्थ आहे. स्थानिक स्वरूपाचीं राज्यें ज्या संघभावनेनें एकत्र येऊन एक सर्वोच्च राज्य निर्माण करतात त्या सांघिक संबंधाला मी 'उभें' ऐक्य म्हणेन; या घटक राज्यांच्या अंतर्गत मर्यादांमध्यें, अमेरिकन जनतेचें प्रतीक अशा या विस्तीर्ण संगमक्षेत्रांत अनेक जुन्या युरोपीय राष्ट्रप्रवाहांचा जो संगम झाला आहे त्याला मी 'आडवें' ऐक्य असें नांव देईन. अमेरिकन जीवनाचे हे दोन पैलू भावी जगाच्या जीवनपद्धतीचीं सूचक चिन्हें आहेत असें म्हणणें म्हणजे निव्वळ कल्पनाविलास ठरणार नाहीं. पुढें निर्माण व्हावयाच्या आंतरराष्ट्रीय समाजाच्या या केवळ पूर्वखुणा होत. नित्य नवीन मार्ग निर्माण करणाऱ्या इतिहासाचे हे आपल्या डोळ्यासमोर चाललेले प्रयोग आहेत.

एका ऐतिहासिक प्रतीकांतून हें ऐक्य सूचित होतें. हें प्रतीक म्हणजे तांत्रिक प्रगतीचा सर्वोच्च बिंदु नाहीं. पण तरीहि या प्रतीकाची इतिहासरम्य शक्ति अद्याप कमी झालेली नाहीं. एका महासागरापासून दुसऱ्या महासागरापर्यंत ग्रेट लेक्सपासून दक्षिण किनाऱ्यापर्यंत सबंध अमेरिकेला एकसंध करून तिला आजचें स्वरूप प्राप्त करून देणारी 'रेल्वे' हेंच तें प्रतीक होय. बाह्य जगाशीं असलेला संबंध तुटून दाट जंगलांत राहणाऱ्या आद्य वसाहतवाल्यांनीं पहिल्या आगगाडीचें किती हर्षपूर्ण स्वागत केलें त्याचें रोमांचकारी चित्रण कांहीं चित्रपटांत आपल्याला पाहायला सांपडतें. घणाघणा वाजणाऱ्या घंटा आणि कर्कश शिट्ट्या यांच्या कोलाहलांत रंगीबेरंगी निशाणांनीं सजविलेली गाडी जेव्हां नव्या संस्कृतीचा सारा अवखळ उत्साह, सामर्थ्य आणि आशावाद आपल्याबरोबर घेऊन येते त्या प्रसंगींची आवेशपूर्ण धांदल आपण पडद्यावरील दृश्यांच्या रूपानें अनुभवली आहे. रेल्वेनें आणलेल्या उत्साहाचें उधाण त्या सर्व निर्जन, जंगलमय प्रदेशांत हां हां म्हणतां पसरतें. जंगलें तोडलीं जातात, जमिनींची नांगरणी होते, जिकडे तिकडे

नवीं घरें निर्माण होतात आणि चैतन्याच्या प्रकाशानें कोपरान् कोपरा उजळून निघतो. "जीवन, स्वातंत्र्य, आणि सुखसमृद्धीचे प्रयत्न" हे जेफर्सनचे शब्द आहेत. पहिल्या धूर ओकणाऱ्या इंजिनानें या तिन्ही गोष्टी आपल्याबरोबर आणल्या.

अमेरिकेच्या नसांनसांतून धडधडणारा उत्साह आपल्या कोणत्याहि मोठ्या अमेरिकन रेल्वे स्टेशनामध्यें अनुभवायला मिळतो. रेल्वे स्टेशनांत हिंडणें हा एक अगदीं नित्याचा आणि नीरस अनुभव असल्यानें त्यांत असें लिहिण्याजोगें काय आहे असें कुणाला वाटलें तर तें स्वाभाविक आहे. पण तरीहि मला कबूल केलें पाहिजे कीं कांहीं अमेरिकन स्टेशनांत मला जीं भव्य दृश्यें दिसलीं तीं माझ्या स्मृतींतून कधींहि पुसलीं जाणार नाहींत.

आगगाडी ही पूर्वीपासून आजपर्यंत अमेरिकेच्या दळणवळणाच्या जाळ्यांतलें मुख्य साधन ठरली आहे आणि तिचें हें महत्त्व नेहमींच कायम राहील. राष्ट्राला नवचैतन्य, सर्जनशीलता, संपत्ति आणि प्रगति यांचा लाभ करून देणारी ही जीवनरेखा आहे. सगळ्या जगालाच जणुं तिनें वेढून टाकलें आहे. रेल्वे बंद पडली म्हणजे जणुं जगाचाच अंत ओढवेल असा विचार मनांत येतो. कांहीं रेल्वे स्टेशनांचा विस्तार अचाट मोठा आहे. दिवसाकांठीं शेकडों गाड्या पराकोटीच्या यांत्रिक नियमितपणानें येतात आणि जातात. जणुं कांहीं एक सेकंदसुद्धां वाया जाऊं नये यासाठीं त्यांची सारी धडपड असते. तेथील मोठ्या दालनांतून, भुयारी रेल्वेकडे जाणाऱ्या आणि तेथून येणाऱ्या दरवाज्यांमधून आणि स्टेशन-वरच्या असंख्य दुकानांच्या दारांतून माणसांचे प्रचंड लोंढे एकसारखे येत-जात असतात. एक मिनिटहि वायां न घालवतां तिकिट-खिडक्यांतलीं यंत्रें माणसांच्या कधींहि न संपणाऱ्या रांगांना तिकिटें देत असतात. झगमगत्या बिजेरी जाहिराती पदोपदीं तुम्हांला मार्गदर्शन करायला तत्पर असतात आणि दूरध्वनिक्षेपकालाहि क्षणभरसुद्धां खळ नसतो. विद्युत्किरणांनीं नियंत्रित केलेले दरवाजे तुम्ही समोर येतांच उघडतात. या चक्रव्यूहांत कोणीहि रस्ता चुकत नाहीं. कारण तिथली प्रत्येक व्यवस्था आणि रचनाच अशी आहे कीं कमींत कमी शब्दांत आणि कमींत कमी श्रमांत तुमचें काम व्हावें. एखाद्या आधुनिक कारखान्यांतल्या-प्रमाणें सगळ्या क्रिया कशा सुरळित सुरू असतात. लढाईला निघणाऱ्या सराईत शिपायाप्रमाणें प्रत्येकजण स्टेशनमधील त्या जनसागरांत सामील होऊन व्यवस्थित पणें, जराहि न बिचकतां सर्व क्रिया कशा करतो याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. इतक्या चोखपणें हे सगळे व्यवहार पार पाडणारा हा सर्वशक्तिमान् नियंता आहे तरी कोण असा प्रश्न मनांत उभा राहतो. पण इथें कुणी सूत्रधार नाहीं कीं

नियंता नाहीं. हें प्रचंड यंत्र अगम्य रीतीनें आपोआप सुरू असल्यासारखें वाटतें. तें चालविणारा कोणी शासक तेथें नसतो. जादूप्रमाणें हा सारा व्याप चालविणारी आणि अमेरिकेंत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेली अशी एकच गोष्ट तेथें असते... ती म्हणजे संघटना!

अमेरिकेचें तें एक चटकन् डोळ्यांत भरणारें वैशिष्ट्य असल्यामुळेंच मीं रेल्वे स्टेशनाचा उल्लेख केला. कचेऱ्यांतून आणि कारखान्यांतून हें संघटन-कौशल्य कसें प्रतीत होतें याचा नीट अभ्यास केला तर आपल्याला अधिकाधिक आश्चर्य वाटूं लागतें. टेलर किंवा फोर्ड यांसारख्या अजब कर्तृत्वाच्या व्यक्तींनीं उद्योगधंद्याच्या एकेका क्षेत्रांत या संघटनकौशल्याच्या जोरावर कशी किमया घडवून आणली यावर मोठमोठे ग्रंथ लिहिले गेले आहेत. जेथले नागरिक अत्यंत तंग वातावरणांत एकसारखे कोठली ना कोठली तरी अर्थशून्य क्रिया करण्यांत गढून गेलेले असतात असें वेगचक्रांत सांपडलेलें एक राष्ट्र असा अमेरिकेचा अनेकदां उल्लेख केला जातो. पण प्रत्यक्षांतील अनेक उदाहरणें घेऊन हा निष्कर्ष चुकीचा आहे हें सिद्ध करून देतां येईल. दूर अंतरांचा प्रश्न आणि शहरांत मोटारींच्या गर्दीमुळें रहदारींत उत्पन्न होणाऱ्या अडचणी जर क्षणभर बाजूला ठेवल्या तर असें स्पष्टपणें सांगतां येईल कीं सर्वसामान्य अमेरिकन माणसाला दमछाक होण्यासारखी दगदग मुळींच करावी लागत नाहीं. चाळीस तासांच्या आठवड्यांत कामाचे दिवस फक्त पांच असतात. सामान्यतः शुक्रवारीं संध्याकाळपासून तों सोमवारीं सकाळपर्यंत सर्व कामें बंद असतात. सार्वजनिक वाहतुकीचीं साधनें आणि दैनंदिन व्यवहाराला आवश्यक असणारीं तत्सम कामें यांचा तेवढा या नियमाला अपवाद असतो. कामाच्या वेळीं डायरेक्टर, कारकून आणि कामगार आपापलीं कामें संथपणें, सहज आणि कसलीहि घाई किंवा विशेष प्रयत्न न करतां करीत असतात. विविध क्रियां-मधील संकलन आणि संघटनेंतील अचूकपणा यांचाच हा परिणाम. नेमून दिलेल्या कामांत तो मागें पडत असल्याशिवाय कुणीहि घाईगर्दीनें काम करण्याची आवश्यकता नसते. अशा या समाजरचनेंत वक्तशीरपणा हें एक नीतितत्त्व होऊन बसलें आहे. या बाबतींत जराहि चूक होणें हा एक कलंक समजला जातो आणि अशा प्रकारची चूक करणारे विश्वास टाकण्यास सर्वस्वीं अपात्र गणले जाण्याची शक्यता असते.

इंग्लिशांची प्रयोगशीलता, जर्मन लोकांची हातीं घेतलेलें काम अत्यंत निर्दोषपणें तडीस नेण्याची निश्चयात्मकता, आणि प्रॉटेस्टंटपंथीयांची व्यक्तिगत

शिस्त यांचा त्रिवेणी-संगम अमेरिकेच्या संघटनप्रवृत्तींत मुख्यत्वानें आढळतो. हे तीनहि गुणविशेष बाहेरून अमेरिकेंत आले आणि युरोपमधील राष्ट्रांना कधींहि ज्ञात नव्हता अशा अभिनव प्रकारानें त्यांचा तेथें मिलाफ साधण्यांत आला. वसाहतवाल्यांच्या साहसी मनोवृत्तीनें अमेरिका खंडाच्या अफाट विस्ताराशीं उत्स्फूर्तपणें मिळतें घेतलें. भोवतालच्या परिस्थितीनें त्यांच्या मनांवर आणि स्वभावावर संस्कार केले आणि त्यांच्यांत आज आपल्याला आढळून येणारी विशाल दृष्टि निर्माण केली. कोणतीहि व्यापारी योजना, राज्यकारभारविषयक अथवा तांत्रिक प्रकल्प इतक्या व्यापक प्रमाणावर संकल्पिला आणि विकसित केला जातो कीं या प्रकल्पाच्या निर्मात्यांचीं मनें अत्यंत थोड्या वेळांत सर्व ४८ राज्यांतील परिस्थितीचा मनोमन मागोवा घेऊन येत असलीं पाहिजेत असें वाटूं लागतें. या व्यापक प्रमाणावरच अमेरिकन समाजाचे व्यवहार सुरू राहिले पाहिजेत. व्यापार, बँका, उद्योगधंदे, टेलिफोन, सैन्य या प्रत्येकाला एका प्रचंड प्रकल्पाचें स्वरूप येणें अपरिहार्यच आहे. आणि हे प्रकल्प नीट चालवे म्हणून त्यांच्या जोडीला तितकीच मोठी आणि कार्यक्षम संघटना असावी लागते. कामाची पद्धत, प्रत्येक विभागाचा अचूकपणा, श्रम आणि वेळ यांची बचत या सर्वांची शास्त्रशुद्ध आणि काळजीपूर्वक सांगड घातली पाहिजे. कारण त्यांची मूळ योजना इतकी परिपूर्ण असते कीं कार्यपद्धतींत कोठें थोडीशी चूक झाली तरी त्याचे गंभीर परिणाम घडून येतात. एखाद्या अजस्र यंत्रांतला बारीकसा स्क्रू बिघडला तरी तें जसें नादुरुस्त होतें तसेंच येथेंहि घडून येतें. कांहीं मिनिटांचा उशीर जरी बाह्यतः अगदींच बिनमहत्त्वाचा वाटला तरी तेवढ्यामुळें देशाच्या दूरवरच्या भागांतील कामांतसुद्धां गंभीर स्वरूपाचे बिघाड उत्पन्न होऊं शकतात.

वसाहतीचीं घटक राज्यें झालीं आणि घटक राज्यांचें संघराज्य बनलें. या प्रत्येक स्थित्यंतराच्या अनुभवामुळें संघटनेची कल्पना प्रगल्भ होत गेली. विसाव्या शतकांतील तंत्रकौशल्याचा विकास आणि देशांचें व खंडांचें परस्परावलंबित्व यामुळें संघटनचातुर्याला जोराची चालना मिळाली असून त्यानें आतां अमेरिकेच्या सीमा ओलांडल्या आहेत. कोणावर प्रभुत्व गाजविण्याची अमेरिकेची इच्छा नाहीं. उलटपक्षीं युरोपचा परंपरागत साम्राज्यवाद, सातासमुद्रापलीकडे पसरलेलीं साम्राज्यें, वसाहती आणि संरक्षणाखालील प्रदेश या सगळ्या गोष्टी अमेरिकनांना मागासलेपणाच्या आणि नव्या मनूशीं विसंगत अशा वाटतात. युरोपांतील कडेकोट बंदोबस्तांत राहणाऱ्या मत्सरग्रस्त राष्ट्रांचें जसें अमेरिकेला आश्चर्य वाटतें

नियंता नाहीं. हें प्रचंड यंत्र अगम्य रीतीनें आपोआप सुरू असल्यासारखें वाटतें. तें चालविणारा कोणी शासक तेथें नसतो. जादूप्रमाणें हा सारा व्याप चालविणारी आणि अमेरिकेंत अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेली अशी एकच गोष्ट तेथें असते... ती म्हणजे संघटना!

अमेरिकेचें तें एक चटकन् डोळ्यांत भरणारें वैशिष्ट्य असल्यामुळेंच मीं रेल्वे स्टेशनाचा उल्लेख केला. कचेऱ्यांतून आणि कारखान्यांतून हें संघटन-कौशल्य कसें प्रतीत होतें याचा नीट अभ्यास केला तर आपल्याला अधिकाधिक आश्चर्य वाटूं लागतें. टेलर किंवा फोर्ड यांसारख्या अजब कर्तृत्वाच्या व्यक्तींनीं उद्योगधंद्याच्या एकेका क्षेत्रांत या संघटनकौशल्याच्या जोरावर कशी किमया घडवून आणली यावर मोठमोठे ग्रंथ लिहिले गेले आहेत. जेथले नागरिक अत्यंत तंग वातावरणांत एकसारखे कोठली ना कोठली तरी अर्थशून्य क्रिया करण्यांत गढून गेलेले असतात असें वेगचक्रांत सांपडलेलें एक राष्ट्र असा अमेरिकेचा अनेकदां उल्लेख केला जातो. पण प्रत्यक्षांतील अनेक उदाहरणें घेऊन हा निष्कर्ष चुकीचा आहे हें सिद्ध करून देतां येईल. दूर अंतरांचा प्रश्न आणि शहरांत मोटारींच्या गर्दीमुळें रहदारींत उत्पन्न होणाऱ्या अडचणी जर क्षणभर बाजूला ठेवल्या तर असें स्पष्टपणें सांगतां येईल कीं सर्वसामान्य अमेरिकन माणसाला दमछाक होण्यासारखी दगदग मुळींच करावी लागत नाहीं. चाळीस तासांच्या आठवड्यांत कामाचे दिवस फक्त पांच असतात. सामान्यतः शुक्रवारीं संध्याकाळपासून तों सोमवारीं सकाळपर्यंत सर्व कामें बंद असतात. सार्वजनिक वाहतुकीचीं साधनें आणि दैनंदिन व्यवहाराला आवश्यक असणारीं तत्सम कामें यांचा तेवढा या नियमाला अपवाद असतो. कामाच्या वेळीं डायरेक्टर, कारकून आणि कामगार आपापलीं कामें संथपणें, सहज आणि कसलीहि घाई किंवा विशेष प्रयत्न न करतां करीत असतात. विविध क्रियां-मधील संकलन आणि संघटनेंतील अचूकपणा यांचाच हा परिणाम. नेमून दिलेल्या कामांत तो मागें पडत असल्याशिवाय कुणीहि घाईगर्दीनें काम करण्याची आवश्यकता नसते. अशा या समाजरचनेंत वक्तशीरपणा हें एक नीतितत्त्व होऊन बसलें आहे. या बाबतींत जराहि चूक होणें हा एक कलंक समजला जातो आणि अशा प्रकारची चूक करणारे विश्वास टाकण्यास सर्वस्वीं अपात्र गणले जाण्याची शक्यता असते.

इंग्लिशांची प्रयोगशीलता, जर्मन लोकांची हातीं घेतलेलें काम अत्यंत निर्दोषपणें तडीस नेण्याची निश्चयात्मकता, आणि प्रॉटेस्टंटपंथीयांची व्यक्तिगत

तसेंच या साम्राज्यांचेंहि वाटतें. आपल्या देशांतील औद्योगिक ज्ञानाचा इतर देशांतहि प्रसार व्हावा असें अमेरिकेला वाटतें. शक्य तों सगळ्या देशांत आपल्यासारख्या प्रयोगसिद्ध आणि सुसंकलित कार्यपद्धती प्रचारांत याव्या आणि त्यांतून सर्वत्र वाढती सुव्यवस्था व मेळ निर्माण व्हावा अशी अमेरिकेची इच्छा आहे. हेंच अमेरिकेचें राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ध्येय असावें. आपण यापुढें एकाकी राहूं शकणार नाहीं, आपल्या सुरक्षिततेसाठीं आणि अर्थव्यवस्थेच्या भल्यासाठीं आपल्याला इतर देशांच्या सहकार्याची गरज आहे, इतरत्र कुठेंहि घडून येणाऱ्या उत्पाताचा परिणाम आपल्यावरहि झाल्याशिवाय राहणार नाहीं हें अमेरिकेला कळून चुकलें आहे. आतां सर्वांत सुज्ञपणाची गोष्ट म्हणजे सबंध जगांत, किंवा जगाच्या शक्य तेवढ्या भागांत, सुव्यवस्था निर्माण करणें हेंहि तिनें ओळखलें असल्यामुळें त्या दिशेनें ती प्रयत्न करीत आहे. इतर देशांवर कब्जा मिळविण्यानें कुठलेच राजकीय किंवा आर्थिक प्रश्न सुटणार नाहींत हें अमेरिका पूर्णपणें जाणते. शिवाय कुणावर आक्रमण करणें हें मुळीं अमेरिकेच्या स्वभावांतच नाहीं आणि म्हणूनच आक्रमण करण्यास ती उत्सुक नाहीं. पण जरी तिला आक्रमणाची ओढ असती तरी तिनें तो मार्ग चोखाळला नसता. कारण आजच्या जगांत आक्रमण ही एक अडगळींत फेकून देण्यायोग्य विचारसरणी आहे असेंच तिनें मानलें असतें. यापुढें आक्रमणांतून हर प्रकारचीं संकटें उद्भवतील, आणि विजय मिळाल्यानें तात्पुरता फायदा झाला तरी शाश्वत निश्चितता लाभणार नाहीं. म्हणून ऐच्छिक सहकार्य आणि सुव्यवस्था हा एक उपाय शिल्लक उरतो.

धीरगंभीर व्यक्तिमत्त्वाच्या प्रेसिडेंट विल्सननें पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस अत्यंत स्पष्ट शब्दांत जगाला सर्व प्रश्न सोडविण्याचा एकमेव उपाय म्हणून संघराज्याचें तत्त्व स्वीकारण्याचा आदेश दिला. आपल्या तत्त्वांच्या उपयुक्ततेवर या 'लीग ऑफ नेशन्स'च्या निर्मात्याची अविचल श्रद्धा होती. भविष्यकालाच्या आकलनाच्या बाबतींत तो आपल्या समकालीनांच्या कितीतरी पुढें होता, पण फोल स्वप्नरंजनांच्या पायावर आपल्या आशांचे मनोरे रचण्याकडे त्याचा कल होता. तत्कालीन सत्यांशीं आपली विचारसरणी जुळती करून घेण्याची आणि आवश्यक ती तडजोड करण्याची त्याची तयारी नव्हती. तो सद्यःस्थितीपलीकडे पाहणारा होता आणि इतरांनींहि तसें करावें अशी त्याची अपेक्षा होती. त्यानें तसें करणें शक्य नसलें तरीहि त्यांनीं आपल्यावर विश्वास टाकावा आणि आपलें ऐकावें असा त्याचा आग्रह असे. कारण तसें न केल्याबद्दल त्यांना कोणतें भयानक शासन मिळणार होतें याची फक्त आपल्याला पूर्ण कल्पना आहे अशी त्याची दृढ समजूत

होती. त्याचा प्रयोग सर्व बाजूंनीं फसला तरी इतिहासांतील तो एक प्रगतीचा टप्पा आहे यांत शंका नाहीं. कारण संघराज्याचें तत्त्व सर्वंध जगाला लागू करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. हें पाऊल टाकण्याची धडाडी फक्त अमेरिकेचा अध्यक्षच दाखवूं शकला असता. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटीं पुन्हा हा प्रयोग करण्यांत आला आणि आजपर्यंत त्यानें कांहीं प्रसंगीं जागतिक पातळीवर तर कांहीं वेळां त्याहून संकुचित स्वरूपांत टिकाव धरला आहे. या प्रयोगानें आजपर्यंत कांहीं विशेष साध्य करून दाखविलें नसलें तरी त्यामागील ऐक्याची भावना अद्याप विरून गेलेली नाहीं. हातांत एक अत्याधुनिक शस्त्र घेऊन अमेरिका आज जगाच्या अग्रभागीं उभी आहे. राष्ट्राराष्ट्रांतील संबंधांत लोकशाही संघराज्याच्या सूत्राला प्राधान्य मिळण्यासाठीं आधुनिक पद्धतीच्या संघटनकौशल्याचा प्रत्येक क्षेत्राला आणि देशाला लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न करणें हेंच तें शस्त्र होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ विः ....................
क्रमांक ........................ नोंः दिः ..................

प्रकरण तेरावें

# शिक्षणविषयक विचार

इतर कोणत्याहि राष्ट्रापेक्षां अमेरिकन लोकांची शिक्षणावर अधिक श्रद्धा आहे. इतर आवश्यक संस्थांपैकींच एक असा त्यांचा शिक्षणसंस्थेबद्दलचा दृष्टिकोण नाहीं. आयुष्याला वळण देण्यांत आणि ऐतिहासिक उत्क्रांतीचें स्वरूप घडविण्यांत शिक्षणाचें महत्त्व फार मोठें आहे असें ते मानतात. शाळा म्हणजे राष्ट्र, समाज, संस्कृति यांचा पाया आहे, असा त्यांचा विश्वास आहे. मानवाच्या प्रगतीची ज्योत अखंड तेवत ठेवणारी ती संस्था आहे असें त्यांना वाटतें. राष्ट्राराष्ट्राला स्वतंत्र असें कांहीं 'भवितव्य' आहे हें त्यांना मान्य नाहीं. मग या भवितव्याची तुम्ही जीवशास्त्रीय, ऐतिहासिक, आध्यात्मिक किंवा अन्य कोणत्याहि प्रकारें व्याख्या करा. आणि अशा कोणत्याहि विशिष्ट श्रद्धेला कवटाळणें अमेरिकेच्या स्वभावाला धरून होणार नाहीं. कारण अमेरिकन लोकच मुळांत सगळ्या राष्ट्रांतून आलेले आहेत आणि त्यांनीं येतांना हीं तथाकथित 'भवितव्यें' आणि आनुवंशिक गुणावगुण यांचा वारसा बरोबर आणला आहे. व्यक्तिगत किंवा राष्ट्रीय स्वभावरचनेंत अखेरचें आणि अपरिहार्य असें कांहीं नाहीं, ही स्वभावरचना भोवतालच्या सामाजिक वातावरणांतील अनेकविध प्रभावांमुळें एकसारखी बदलत असते, अशी त्यांची विचारसरणी आहे. आणि असा बदल घडवून आणणाऱ्या घटकांत त्यांच्या मतें शाळेला सर्वांत प्रमुख स्थान आहे. त्या त्या वेळीं प्रचलित असलेली सामाजिक परिस्थिति, लहान मुलांवर केले जाणारे संस्कार आणि त्यांचा शैक्षणिक दर्जा यांचा प्रभाव इतका विलक्षण आहे कीं, या तीन गोष्टी चांगल्या असतील तर बौद्धिक आणि नैतिक दृष्ट्या कमी प्रतीचीं असलेलीं राष्ट्रंसुद्धां उन्नत होऊं शकतात, आणि उलटपक्षीं या तीन बाबी निकृष्ट असतील तर महान् आणि विख्यात राष्ट्रांचीहि अधोगति होऊं शकते. अमेरिकेच्या सामाजिक मनामध्यें वंशपरंपरा चालत आलेल्या राष्ट्रीय किंवा कौटुंबिक किताबांना व पदव्यांना शून्य किंमत असण्याचें कारण हेंच.

फ्रान्स म्हणजे कोठीच्या रखवालदारांचें राष्ट्र आहे, असें काउंट केसरलिंग एकदां

विनोदानें म्हणाला होता. त्याच चालीवर किंचित् अतिशयोक्ति करून असें म्हणतां येईल कीं, अमेरिका हें शिक्षकांचें राष्ट्र आहे. एका विशिष्ट प्रकारें अमेरिकन शाळेचा प्रभाव सर्वव्यापी आहे. अमेरिकेचे थोर नेते लिंकन, विल्सन किंवा फ्रँकलिन रूझवेल्ट हे आपापल्या परीनें शिक्षकच होते. मूलभूत उद्योग-धंद्यांची संघटना या आपल्या आवडीच्या उद्योगांतून शैक्षणिक महत्त्वाचे निष्कर्ष काढण्याची फोर्डची मनीषा होती. अमेरिकेंतील प्रार्थनामंदिरांचा मुख्य हेतु शैक्षणिकच आहे. अत्यंत कौतुकास्पद रीतीनें जोपासण्यांत आलेलीं वस्तुसंग्रहालयें आणि प्रदर्शनेंहि शैक्षणिकच आहेत. जिथें जिथें म्हणून अमेरिकन लोक एकत्र येऊन त्यांचा एक समाज-गट निर्माण होतो तिथें तिथें ते प्रथम एक विकास-संस्था आणि स्वतंत्र शाळा स्थापन करतात.

राज्यसरकार, म्युनिसिपालिटी आणि समाज यांच्याकडून शाळांच्या अडचणींचा अत्यंत आस्थापूर्वक आणि उदारपणें विचार केला जातो. सबंध समाजाला ज्यांच्या-बद्दल आत्मीयता असते अशा गोष्टींमध्यें शाळा प्रमुख असते. तिथें प्रत्येकाला शाळेबद्दल अभिमान वाटतो. सरकारी अधिकारी, सामाजिक संस्था आणि नागरिक शाळांच्या स्थितीबद्दल सदैव जागरूक असतात. अमेरिकन शाळांची समृद्धता नजरेंत भरण्यासारखी असते. शाळांच्या आवारांत आपल्याला जिकडे तिकडे सूर्य-प्रकाशांत चकाकणाऱ्या सुंदर इमारती आढळतात. या इमारती आंतून अत्यंत प्रशस्त आणि सुशोभित असतात. भोवतालीं मनोहर उद्यानें, क्रीडांगणें आणि पोहण्याचे तलाव असतात. या इमारतींत ग्रंथालयें, प्रयोगशाळा, सुतारकाम, लोहार-काम यांसारख्या हस्तव्यवसायांसाठीं दालनें आणि विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचीं व त्यांच्या मनोरंजनाचीं अद्ययावत् साधनें या सर्व सोयी आढळतात. शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा जन्मसिद्ध हक्क मानला जातो आणि अशा प्रकारें समान संधीच्या तत्त्वाला प्रत्यक्ष प्रयोगाची जोड मिळते. कोणत्याहि प्रकारची कुचराई न करतां प्रत्येक नागरिकाला प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण देणें, शक्य तितक्या अधिक लोकांना उच्च शिक्षण देणें, आणि ज्यांना त्याची खरी आवड असेल त्यांना वैज्ञानिक क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविण्यास अवसर देणें हें आपलें कर्तव्यच आहे असें अमेरिकन समाज मानतो. कर, ऐच्छिक वर्गणी, फंड आणि देणग्या यांद्वारा जमणारा अफाट पैसा अमेरिकेंत वरील उद्दिष्टें साधण्यासाठीं खर्च केला जातो. चालू शतकांत अमेरिकेनें सार्वत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रांत किती आश्चर्यजनक प्रगति केली आहे तें पुढील सरकारी आंकडेवारीवरून कळून येईल. १९०० सालीं १३·३ टक्के लोक निरक्षर होते. १९३० सालीं हा

दा. क. ८८८४

आंकडा अवघ्या ६ टक्क्यांवर आला. आणि १९४७ मध्यें तर फक्त २·७ टक्के लोक निरक्षर होते. म्हणजे अमेरिकेंतून निरक्षरतेचें जवळजवळ उच्चाटनच झालें आहे असें मानण्यास हरकत नाहीं. आज एकूण मुलांपैकीं ७० टक्के मुलें हायस्कूलच्या अखेरच्या वर्गापर्यंत जातात. १९०० सालीं जेमतेम ८·४ टक्के विद्यार्थी हा पल्ला गांठीत असत.[१] यावरून आपण बिनधोकपणें असें म्हणूं शकतों कीं जें हायस्कूल शिक्षण या शतकाच्या सुरुवातीस फक्त सुखवस्तु स्थितींतील मुलांनाच घेतां येत असे तें आज आम जनतेपर्यंत पोंचलें आहे.

अमेरिकन राज्यघटनेनुसार सार्वजनिक शिक्षणाच्या क्षेत्रांत केंद्रीय सरकारला कसलेहि अधिकार नाहींत, हें लक्षांत घेण्यासारखें आहे. मध्यवर्ती सरकार शिक्षणविषयक सर्व घडामोडींची फक्त माहिती मिळवितें, आणि त्यांत शक्य ती सर्व सुसूत्रता आणण्यास मदत करतें. शिक्षण ही घटक राज्यांच्या कक्षेंतील बाब आहे, त्यामुळें निरनिराळ्या अठ्ठेचाळीस शिक्षण खात्यांकडून अठ्ठेचाळीस राज्यांतलें शिक्षण नियंत्रित केलें जातें आणि त्यासाठीं अठ्ठेचाळीस स्वतंत्र शैक्षणिक कायदे अंमलांत असतात. अर्थात् या सर्व तरतुदींमध्यें कांहीं नियम सारखेच आहेत, आणि या सर्व नियमांची मिळून सर्व अमेरिकाभर प्रचलित असणारी अशी एक शिक्षणपद्धति तयार होते. प्रत्येक राज्य स्वतःच्या प्रदेशांतील शाळा चालवतें आणि प्राथमिक व हायस्कूल शिक्षण मोफत देतें. पाठ्य पुस्तकें आणि इतर अनेक शैक्षणिक साधनें विद्यार्थ्यांना मोफत देण्यांत येतात. सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण सक्तीचें आहे आणि ही वयोमर्यादा वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कांहीं राज्यांनीं ही मर्यादा १८ पर्यंत वाढवलीहि आहे. प्रत्येक राज्याचें स्वतंत्र विद्यापीठ आहे.

हायस्कूल शिक्षणाचें स्वरूप असें व्यापक झालें असल्यानें जनतेच्या सर्व प्रकारच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी त्यावर येऊन पडते. आज या हायस्कुलांत विविध विषयांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. तरुणांना प्रत्येक व्यवसायाचें आणि जीवनक्रमाचें शिक्षण देणें हें या संस्थांचें कर्तव्य असतें. म्हणून उच्च शिक्षणासाठीं मुलांना पात्र बनविणारें सर्वसामान्य शिक्षण त्यांना देणें हा जरी हायस्कुलांचा मुख्य उद्देश असला तरी एकाच अमेरिकन प्रशालेंत व्यापारी, तांत्रिक आणि शेतीविषयक शिक्षणक्रम आढळू शकतात.

---

१. *Education in the U.S.A.* (Federal Security Agency, Washington, 1951);
*Meet the U.S.A.* (Institute of International Education New York, 1952).

या शाळांची सांस्कृतिक पातळी हळूहळू सुधारत असली तरी अजून त्यांना फ्रान्समधील 'लायसी'चा किंवा जर्मनींतील 'जिम्नॅशियम'चा उच्च दर्जा प्राप्त झालेला नाहीं. खुद्द अमेरिकनसुद्धां ही गोष्ट कबूल करतील, पण त्याचबरोबर ते तुमच्या ध्यानांत आणून देतील कीं अत्यंत गुंतागुंतीच्या अशा अनेक सामाजिक आणि राष्ट्रीय घटकांच्या शैक्षणिक गरजा भागविण्याची जबाबदारी अमेरिकेच्या हायस्कूल शिक्षणावर आहे. या हायस्कुलांमधून समाजाच्या सर्व गरजा पुरविणारें व्यावहारिक आणि पुस्तकी शिक्षण तर दिलें गेलेंच पाहिजे; शिवाय त्यांनीं प्रत्येक विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा मानसिक आणि शारीरिक विकासहि घडवून आणला पाहिजे. स्वतःच्या प्रेरणेनें काम करण्यास, निरनिराळे प्रश्न सोडविण्यास आणि जबाबदारी अंगावर घेण्यास या प्रशालांनीं विद्यार्थ्याला साहाय्य केलें पाहिजे व त्याच्या बौद्धिक कुवतीची चाचणी घेऊन त्याला भावी आयुष्यांतील धकाधकीला तोंड देण्यासाठीं तयार केलें पाहिजे. सामाजिक जीवनाचेंहि त्याला शिक्षण दिलें जातें आणि त्यानें सांघिक कार्यक्रमांत भाग घ्यावा व दैनंदिन व्यवहारांत लोकशाही तत्त्वें आचरणांत आणावीं अशी त्याच्याकडून अपेक्षा केली जाते. या सर्व कारणांसाठींच त्याला खेळ, संगीत, वाङ्मयमंडळें, नाट्यमंडळें, वक्तृत्व, नियतकालिकासाठीं लेख लिहिणें अशा अभ्यासक्रमाबाहेरील चळवळींत भाग घेण्याचें उत्तेजन दिलें जातें. अशा प्रकारें एक झोपेचा वेळ सोडला तर बाकीचा सबंध वेळ शाळा त्याला व्यग्र ठेवते व त्याच्या सर्व सुप्त शक्तींचें जोपासनाकेंद्र बनतें. शाळा विद्यार्थ्यांचें कर्तृत्व वाढीला लावून त्याला चटकन् निर्णय घेण्यास शिकविते व हें सारें करतांना तो समाजाचा एक उपयुक्त घटक बनावा अशीच तिची दृष्टि असते. राष्ट्रीय संस्कृतीची अंतःप्रवृत्तीच सदैव जागृत ठेवणारें असें आणखी एक कार्य अमेरिकेंतील शाळा सुजाणपणें पार पाडतात. या शाळांतून सर्वांना ऐक्यभावना आणि एकमेकांशीं सहकार्य करण्याचें शिक्षण दिलें जातें. कोलंबिया विद्यापीठाचे प्रा. डी. डब्ल्यू. ब्रॉगन यांनीं लिहिलें आहे : "या शाळा मुलांना शिक्षण देण्याहूनहि अधिक कांहीं कार्य करीत आहेत. या शाळेंत शिकत असतांना मुलें अमेरिकेंत कसें राहावें याचें ज्ञान एकमेकांपासून मिळवीत असतात."[१] एका विशिष्ट जीवनक्रमाचें शिक्षण देणें हें अमेरिकन शाळांचें मुख्य ध्येय असल्याचें आढळतें. आपल्या राष्ट्राबद्दल निष्ठा आणि आत्मीयता या अनुबंधांशीं या जीवनक्रमाचा अखेरपक्षीं अत्यंत निकटचा संबंध

१. डी. डब्ल्यू. ब्रॉगन : **दक्षिण अमेरिकन कॅरॅक्टर**, न्यूयॉर्क, १९४४.

असतो. या दोन्ही क्रिया एकदमच सुरू असतात. शिक्षण आणि भाषेचें ऐक्य यांमुळें त्यांचीं जुनीं भिन्न राष्ट्रीयत्वें एकमेकांत मिसळून जातात आणि त्यांतून 'सबंध अमेरिकेच्या अशा पूर्वस्मृती, भावना आणि लोककथा' यांचें संचित अमेरिकेला मिळतें.

युरोपपेक्षां अमेरिकेंतील विद्यापीठें अधिक व्यापक क्षेत्रांत कार्य करीत असतात. एकाद्या सुसंघटित समाजासारखें या विद्यापीठांचें स्वरूप असतें. त्यांतील बहुतेक विद्यार्थी शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंतच्या काळांत विद्यापीठाच्या वसतिगृहांतच राहतात. त्यांपैकीं बहुतेक इमारती आणि त्यांच्या सभोवतींचें वातावरण इतकें चेतोहर असतें कीं आपोआपच पाहणाऱ्याच्या मनोवृत्तींत एक प्रकारची रम्य प्रसन्नता फुलते. प्रत्येक विद्यापीठाच्या आवारांत सर्व धर्मांच्या आणि पंथांच्या लोकांना खुलें असें एक चर्च असतें; एक किंवा अधिक चित्र-नाट्यगृहें, वस्तुसंग्रहालयें, ग्रंथालयें, वृंदवादक संघ, संगीतमंडळें, व्याख्यानमंदिरें, सभागृहें, क्लब, क्रीडांगणें, आखाडे आणि उद्यानें यांनीं परिपूर्ण अशीं हीं विद्यापीठें असतात. या विद्यापीठांचा प्रभाव फार मोठा असतो. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर त्या शहरांतल्या सर्व नागरिकांना या विद्यापीठांचा सांस्कृतिक व कलाकेंद्रांसारखा उपयोग होतो.

प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे संबंध मित्रत्वाचे असतात. जणुं कांहीं समकालीन असल्याप्रमाणें ते अनेकदां एकत्र खेळ खेळतांना आढळतात. कोणत्याहि विशिष्ट कल्पना किंवा विचारसरणी विद्यार्थ्यांच्या मनावर लादणें हा विद्यापीठांचा हेतु नसतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिविकासाला आणि कर्तृत्वाला बौद्धिक आणि सामाजिक क्षेत्रांत सर्व प्रकारें वाव देण्यावर या विद्यापीठांचा भर असतो. विद्यापीठ हें केवळ अध्ययनकेंद्र न राहतां मोठ्या समाजांच्या धर्तीवर वसलेलें तें एक छोटें गांवच असतें. तरीहि तेथील वातावरणच इतकें आनंदी असतें कीं पुढें आयुष्यांत त्या आठवणींनीं विद्यार्थी हरखून जातात, आपल्या या विद्यामंदिरासंबंधींच्या बारीकसारीक घडामोडींकडे सुद्धां आस्थेनें लक्ष देतात, आणि शक्य असेल तें सर्व साहाय्य पैशांच्या किंवा श्रमांच्या रूपानें करण्यास सदैव तयार असतात. स्वच्छ सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघणाऱ्या कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या प्रांगणांत किंवा मायामी विद्यापीठाच्या नव्या इमारतींत उभें राहून सभोवतालीं पसरलेली नंदनवनासारखी अनुपमेय शोभा न्याहळतांना अनेकदां आमच्या मनांत विचार आला कीं या सगळ्या सौंदर्यपूर्ण वातावरणाचा मोह आवरून पुस्तक उघडण्याचा विचार तरी या सतेज अंगकांतीच्या सौष्ठवपूर्ण युवक-युवतींच्या मनांत डोकावत

असेल काय ? पण हे विद्यार्थी अभ्यासहि करतात खरे. त्यांचा सगळ्यांचा अभ्यास किंवा ग्रहणशक्ति सारखीं नसेल, पण प्रत्येक विद्यार्थी---अगदीं एकसुद्धां अपवाद न करतां---आपल्या विद्यापीठावर प्रेम करायला आणि सामूहिक जीवनाच्या आणि सहकार्याच्या तत्त्वांचा अंगीकार करायला शिकतो एवढें मात्र निश्चित.

अमेरिकेंत विद्यापीठांचे तीन प्रकार आहेत: सरकारकडून चालविलीं जाणारीं, चर्चच्या नियंत्रणाखालील आणि खाजगी शिक्षणसंस्थांचीं विद्यापीठें. सर्वांत अधिक नामवंत विद्यापीठें या तिसऱ्या गटांत मोडतात. अर्थात् या विविध विद्यापीठांतली शैक्षणिक पातळी, अभ्यासक्रमांचें स्वरूप आणि विद्यापीठाचा लौकिक यांत बराच फरक असतो. अमेरिकेंतील बहुतेक सर्व विद्यापीठें केवळ युरोपमधील विद्यापीठांत मिळणारें शिक्षण देऊन थांबत नाहींत. प्रत्येक अमेरिकन विद्यापीठांत अनेक प्रात्यक्षिक व्यवसायांचे, ललित कलांचे, वनस्पतिसंवर्धनाचे, आणि शेती, जंगल-व्यवस्था, गुरांच्या शस्त्रक्रिया यांसारख्या व्यवहारांतल्या कौशल्यांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. बहुतेक विद्यापीठांतून व्यापारी शिक्षणहि दिलें जातें. त्यांत नुसतें अर्थशास्त्र आणि व्यापार एवढेंच शिकवलें जात नाहीं; त्यांच्या जोडीला धंद्याची जुळवणी, दैनंदिन कारभार आणि संबद्ध विषयहि शिकवले जातात. त्याचप्रमाणें आंतरराष्ट्रीय घडामोडींचा अभ्यास करणाऱ्या संस्था आणि वृत्तपत्रविषयक व नाट्य-विषयक शिक्षण देणाऱ्या शाळा अमेरिकन विद्यापीठांच्याच संलग्न घटक म्हणून काम करतांना आढळतील. अलीकडे जागतिक घडामोडी आणि प्रत्येक खंडाचा इतिहास या विषयांना विशेष महत्त्व दिलें जातें. आजच्या तरुणांना विशेष आवडेल असें सर्व प्रकारचें सामान्य ज्ञान त्यांना देणें हा विद्यापीठांचा मुख्य हेतु असतो आणि त्याबरोबरच त्यांना त्यांच्या आवडत्या धंद्याचें किंवा सामाजिक कार्याचें अद्ययावत् ज्ञान अत्यंत आधुनिक पद्धतींनीं दिलें जातें. अशा प्रकारें प्रत्येक व्यवसायाचें सर्वोत्कृष्ट शिक्षण देणाऱ्या या संस्था हींच अमेरिकेंतील सर्वोच्च अध्ययनमंदिरें होत असा समज कोणीं करून घेऊं नये. कारण या विद्यापीठांत वरील प्रकारच्या शिक्षणाबरोबरच इतरहि अनेक विषयांचा समावेश असतो. अमेरिकेच्या उत्कृष्ट विद्यापीठांत आज दिलें जाणारें वैचारिक आणि शास्त्रीय शिक्षण पश्चिम युरोपमधील नांवाजलेल्या विद्यापीठांच्या तोडीचें असतें. वैज्ञानिक संशोधनाच्या अनेक क्षेत्रांत तर अमेरिकेनें बाकीच्या जगापुढें बरीच आघाडी मारली आहे, हें नाकारतां येणार नाहीं.

अलीकडच्या कांहीं वर्षांत अमेरिकन विद्यापीठांनीं आपल्या संशोधन विभागांत मोठ्या प्रमाणावर सुधारणा आणि वाढ केली आहे. बऱ्याच आधींपासून

या कार्याला सुरुवात झाली आहे. कारण लॉर्ड ब्राइसनें नमूद केलें आहे कीं १८८९-९० सालींसुद्धां अमेरिकेंतील पंचवीस उच्च शिक्षणसंस्थांत मिळून १७२ संशोधकांची अधिकृत रीत्या नेमणूक करण्यांत आलेली होती. या विद्यापीठांखेरीज नुसत्या संशोधनाला वाहिलेल्या इतर अनेक संस्थाहि संशोधनकार्य करीत असतात. या संस्थांचे परस्परांशीं अत्यंत सहकार्याचे संबंध असतात. अणुविज्ञान किंवा विमानविद्या यांसारख्या राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या असलेल्या कांहीं क्षेत्रांतल्या संशोधनाला मध्यवर्ती सरकार आर्थिक साहाय्य करतें. इतर यंत्रविषयक व तांत्रिक स्वरूपाच्या क्षेत्रांतील संशोधनाचा खर्च मोठमोठ्या औद्योगिक कंपन्यांकडून मिळतो. अनेकदां हें संशोधनकार्य निव्वळ वैज्ञानिक स्वरूपाचें आणि फायद्याचा दृष्टिकोण न बाळगतां केलें जातें. त्या त्या क्षेत्रांतील अंतिम सत्य हुडकून काढण्यासाठीं, त्याचा विचार व अभ्यास करण्यासाटीं, त्यावर प्रयोग आणि लेखन करण्यासाठीं आपला सर्व वेळ देणें संशोधकांना शक्य व्हावें म्हणून त्यांना सर्व प्रकारच्या सवलती आणि साहाय्य दिलें जातें. देशाच्या सुबत्तेंत प्रत्यक्ष वाढ करणाऱ्या संशोधनकार्यांइतकेंच साहाय्य तत्त्वज्ञानप्रधान व निव्वळ वैचारिक स्वरूपाच्या संशोधनांनाहि मिळतें. विज्ञानानें सांस्कृतिक विकासाबरोबर पावलें टाकलीं पाहिजेत हें सरकार आणि समाज यांना पटलें आहे असें दिसून येतें. जुन्या पद्धती सुधारल्या पाहिजेत, नव्या शोधून काढल्या पाहिजेत आणि विज्ञानाचीं क्षितिजें एकसारखीं विशाल झालीं पाहिजेत. संपूर्ण स्वातंत्र्य आणि निष्काम तपश्चर्येच्या वातावरणांतच वैज्ञानिक वृत्ति परमोच्च प्रकारचें कर्तृत्व साध्य करूं शकते याची त्यांना जाणीव आहे.

अध्यापनाच्या किंवा दैनंदिन कारभाराच्या व्यापांतून मुद्दाम मोकळे करण्यांत आलेले हजारों शास्त्रज्ञ आज सर्व अमेरिकेभर पसरलेल्या संशोधनकेंद्रांमधून संशोधनकार्यांत गढून गेले आहेत. अशा खास नेमणुका झालेल्या शास्त्रज्ञांची संख्या दीड लाख आहे असें सांगण्यांत येतें. ज्ञान आणि विज्ञान यांची प्रगति घडवून आणणें हेंच त्यांचें एकमेव कार्य. उपजीविकेसंबंधींच्या कोणत्याहि अडचणी न उद्भवतां केलें जाणारें निष्काम तत्त्वचिंतन आणि संशोधन हें ऐहिक सुखसंपत्तींनीं समृद्ध असलेल्या या देशाच्या संस्कृतीचें एक महान् वैशिष्ट्य बनूं पाहत आहे. विद्यापीठांत आणि अन्य अध्ययनमंदिरांत संशोधन ही एक नैतिक जबाबदारी मानली जाते. विद्वत्तापूर्ण आणि वैज्ञानिक व्यासंग हे जीवनाचे आवश्यक घटक समजले जातात. हे व्यासंग म्हणजे माणसाच्या मानव्याचाच आविष्कार आहेत असें मानण्यांत येतें. संशोधनाच्या साधनाद्वारा हे शास्त्रज्ञ

अमेरिकन आदर्शांनाच स्वयंसिद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न करीत आहेत असें वाटतें.

अमेरिकेंतील शिक्षणाविषयींचें माझें विवेचन संपविण्यापूर्वी मला एका संस्मरणीय अनुभवाचा दाखला द्यावासा वाटतो. अमेरिकेंतील उत्कृष्ट दर्जाच्या शिक्षण संस्थांची बौद्धिक पातळी, कार्यपद्धति आणि विशुद्ध शास्त्रीय सचोटी यांचा पडताळा या दाखल्यावरून येऊं शकेल. निग्रोंच्या प्रश्नाचा संपूर्ण आणि सर्वांगीण अभ्यास व्हावा यासाठीं एक स्वतंत्र संस्था निर्माण करून तिला सर्व प्रकारचें साहाय्य करण्याचें न्यूयॉर्कच्या कार्नेगी कॉर्पोरेशननें ठरवलें. दुसऱ्या महायुद्धाच्या थोड्या आधींची ही घटना आहे. 'ज्ञान आणि परस्परांबद्दलचें सामंजस्य यांचा प्रसार आणि प्रगति घडवून आणणें' हें कार्नेगी कॉर्पोरेशनच्या घटनेंतील एक प्रमुख कलम आहे. निग्रोंचा प्रश्न ही अमेरिकेंतली एक सर्वांत क्लेशपूर्ण समस्या आहे ही गोष्ट अमेरिकेंत जाणाऱ्या मर्मज्ञ निरीक्षकाच्या नजरेंतून सुटत नाहीं. या प्रश्नावर आजपर्यंत असंख्य पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत आणि अगणित वादविवाद झाले आहेत. म्हणूनच या प्रश्नासंबंधींची उपलब्ध असलेली सर्व सत्य माहिती काळजीपूर्वक एकत्रित करून तिचें व्यवस्थित संकलन करण्याची व हा जुना प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें कोणते नवे मार्ग उपयुक्त होऊं शकतील याचा योजनाबद्ध अभ्यास करण्याची वेळ येऊन ठेपली आहे, अशी कॉर्पोरेशनची खात्री पटली. हें एक अत्यंत अवघड आणि वाटेंत अनेक धोके असलेलें कार्य होतें. कारण जेव्हां जेव्हां निग्रोंचा प्रश्न उपस्थित होई तेव्हां तेव्हां तर्कशुद्ध विचाराला प्राचीन अहंकारी अभिनिवेश, सामूहिक मनोविकृति, जाणूनबुजून पोसलेले किंवा अंतर्मनांत दडलेले पूर्वग्रह यांचें ग्रहण लागे. अशा या अत्यंत दूरगामी स्वरूपाच्या व्यापक प्रश्नाला हात घालूं शकतील व सर्व जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊं शकतील असे समर्थ आणि नामवंत समाजशास्त्रज्ञ आज अमेरिकेंत आहेत. पण असें असूनहि राष्ट्रीय प्रतिष्ठेच्या किंवा व्यावहारिक गैरसोयीच्या सर्व अडथळ्यांना तोंड देऊन परराष्ट्रांतला एक तज्ज्ञ आणला गेलाच पाहिजे हें कॉर्पोरेशननें ओळखलें. युरोपमधील कोणत्याहि संस्थेनें असा क्रांतिकारी निर्णय घेण्याबाबत इतकी तत्परता दाखवली नसती. असा परदेशीय तज्ज्ञ आणला तरच या प्रश्नांचा विचार शास्त्रशुद्ध रीतीनें व निःपक्षपाती वातावरणांत होऊं शकेल, अशी कार्नेगी कॉर्पोरेशनच्या चालकांची खात्री झाली. कारण आपल्या देशाचा इतिहास, सद्यःस्थिति, वैयक्तिक अनुभव किंवा उपजत प्रेरणा यांचा कोणत्याहि अमेरिकन तज्ज्ञाच्या निष्कर्षांवर अन्याय्य प्रभाव पडण्याची

सदैव शक्यता होती. कॉर्पोरेशननें याहूनहि अधिक दक्षता घेण्याच्या दृष्टीनें अशी अट घातली कीं, जो तज्ज्ञ आणायचा तो वैज्ञानिक प्रगतींत आघाडीवर असलेल्या पण साम्राज्यशाहीचा पूर्वेतिहास नसलेल्या अशा देशांतला असला पाहिजे. हेतु हा कीं, त्याच्या मनांत काळ्या लोकांबद्दल पूर्वग्रह असू नये. अखेर स्वीडनचे गुन्नार मिर्दल यांची निवड झाली.

वेगवेगळ्या समाजशास्त्रीय शाखांत तज्ज्ञ असलेल्या ७५ सहकाऱ्यांच्या मदतीनें हा कुशाग्र बुद्धिमत्तेचा विद्वान् अनेक वर्षें कसलाहि अडथळा न येतां अविरत कार्य करीत होता. गुन्नार मिर्दल यांना आवश्यक ती सर्व साधनसामग्री पुरवण्यांत येत असे. युद्धाचे अखेरीस गुन्नार यांनीं केलेल्या परिश्रमांचे सारभूत असे दोन मोठे ग्रंथ कार्नेगी कॉर्पोरेशननें प्रसिद्ध केले. अमेरिकेंतील निग्रोंच्या प्रश्नासारख्या पराकोटीच्या वादग्रस्त प्रश्नालसुद्धां पूर्णतया पूर्वग्रहरहित, उदार समाजशास्त्रीय पद्धती कशा लावतां येतात याचा आदर्श म्हणून या दोन ग्रंथांकडे बोट दाखवतां येईल.[१] आपल्या समाजाविषयींहि असा प्रमाणभूत ग्रंथ उपलब्ध असता, किंवा आपल्या शेजारी राष्ट्रासंबंधीं असा माहितीपूर्ण प्रबंध असता तर तें सर्वच दृष्टींनीं किती तरी समाधानकारक आणि उपयुक्त ठरलें असतें! या पुस्तकांत कुठलाहि आडपडदा न ठेवतां संपूर्ण सत्य सांगण्यांत आलें आहे. हीं सत्य विधानें शल्यकाराच्या हत्यारांसारखीं धारदार असल्यानें कांहीं क्षण तरी तीं अमेरिकन वाचकाला व्यथित करून सोडतील. तरीहि अमेरिकेंत या ग्रंथाचा एक अभिजात ग्रंथ म्हणून उल्लेख केला जातो. या विषयावरील ग्रंथांत तर या ग्रंथाला तोड नाहीं. अनेकवार चर्चिल्या जाणाऱ्या या प्रश्नावरील कोणत्याहि चर्चेची सुरुवात किंवा सांगता या पुस्तकाच्या उल्लेखानें होते.

---

१. गुन्नार मिर्दल : **द अमेरिकन डायलेमा, द निग्रो प्रॉब्लेम अँड मॉडर्न डेमॉक्रसी,** न्यूयॉर्क १९४४.

# स्त्री आणि बालक

नव्या जगांत आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं एका सकाळीं न्यूयॉर्क-मध्यें येऊन दाखल झालेल्या एका फ्रेंच माणसाची नुकतीच घडलेली पुढील सत्य हकीकत उदाहरण म्हणून सांगतां येईल. बंदरांतून आल्यावर शहरांत पहिली चक्कर काटण्यासाठीं म्हणून तो मानहाटन विभागांत पोंचतो न पोंचतो तोंच त्याला एक स्त्री दिसली आणि तिच्याबद्दल त्याला आकर्षण वाटूं लागलें. त्यानें एकदम तिला थांबवलें आणि तिच्याशीं तो फाजील सलगी करूं लागला. तिनें ताबडतोब एका पोलिसाला बोलावून घडलेला प्रकार सांगितला. त्या फ्रेंच माणसाला अटक करून नजीकच्या पोलिस ठाण्यावर नेण्यांत आलें. येथपर्यंतचा भाग अगदींच सामान्य वाटेल, पण पुढें जें घडलें तें मात्र निश्चितपणें सांगण्यासारखें आहे. पोलिस अधिकाऱ्यांनीं आपल्यापुढील तक्रारीचा काळजीपूर्वक अभ्यास केला आणि असें ठरविलें कीं त्या तरुणावर खटला भरण्यापूर्वी त्याची मनोविकृतितज्ज्ञाकडून तपासणी करून घेतली पाहिजे. वेडेपणाचीं लक्षणें आढळणाऱ्या सर्व गुन्हेगारांना आणि उपद्रवी लोकांना ज्या सार्वजनिक मनोविकृति-उपचारकेंद्रांत पाठविण्यांत येतें त्याच केंद्रांत पोलिसांनीं या फ्रेंच तरुणाला पाठवलें. तिथें काम करणाऱ्या एका ग्रीक मनोविकृति तज्ज्ञ स्त्रीनेंच मला ही हकीकत सांगितली. स्तिमित झालेल्या त्या फ्रेंच तरुणाच्या तपासणीचें काम त्या स्त्रीकडेच आलें होतें.

"मला कां अटक करण्यांत आली आहे?" त्यानें विचारलें.

तिनें खुलासा करण्याचा प्रयत्न केला : "तुला माहीत नसलेल्या मुलीचें तूं रस्त्यांत चुंबन घेण्याचा प्रयत्न करीत होतास. हा विनयभंग समजला जातो. कायद्यांत अशा कृत्याला शिक्षा सांगितली आहे."

"हरकत नाहीं," तो म्हणाला. "मीं जर कायदा मोडला असेल तर त्यांनीं मला खुशाल शिक्षा करावी. पण मला त्यांनीं या वेड्यांच्या इस्पितळांत कां धाडलें आहे?"

"असें कृत्य करायला तूं वेडा असला पाहिजेस असा त्यांचा संशय आहे."

"ते स्वतःच वेडे आहेत," तो फ्रेंच माणूस ओरडला. "त्यांचीच तपासणी केली पाहिजे."

तो तरुण पूर्णपणें शहाणा असल्याचें त्या मनोविश्लेषणतज्ज्ञ विदुषीनें निदान केलें आणि परिणामतः त्याला पांच दिवस कैदेची शिक्षा दिली गेली. तो नुकताच अमेरिकेंत आलेला असल्यानें कायद्याची त्याला नीटशी माहिती नसावी या कारणासाठीं त्याच्या गुन्ह्याचा सौम्यपणें विचार करण्यांत आला, असा खुलासाहि त्या वेळीं केला गेला. हा लहानसा प्रसंग म्हणजे नैतिक वर्तणुकीबाबत अमेरिकेंत कशा प्रकारची परिस्थिति आहे त्याचें एक मनोरंजक उदाहरण होय. युरोपांतून येणाऱ्या प्रवाशानें ध्यानांत बाळगण्यासारखे हे धोक्याचे इशारे आहेत. अमेरिकेंत नीतिमत्ता ही एक अत्यंत गंभीर बाब आहे हें त्यानें प्रारंभींपासूनच ओळखलें पाहिजे. भोवतालच्या वातावरणाशीं समरस व्हायचें असेल तर त्यानें लग्न करावें आणि पत्नीला बरोबर घेऊन सर्वत्र जावें हें बरें. "एकटा प्रवासी हा सैतान असतो," असें महंमदानें म्हटलें आहे. अमेरिकेंत तर या सैतानाला चांगल्याच जाचांतून जावें लागतें.

वर्तनशुचितेच्या कटाक्षाबद्दल मी जेव्हां सांगतों त्या वेळीं मागील एका प्रकरणांत मीं अमेरिकन नीतिमूल्यांचा उल्लेख केला आहे तशाच अर्थानें या बाबीसंबंधींहि बोलत असतों. या सबंध देशावर प्युरिटन पंथाचा प्रभाव आहे असें गृहीत धरणें हें उघड उघड अतिव्याप्तीचें ठरेल. न्यूयॉर्क, शिकागो, सान फ्रान्सिस्को आणि लॉस एन्जलिस यांसारख्या मोठ्या शहरांत आणि कित्येक लहान गांवांतहि समाजाच्या कांहीं थरांत कांहींसा नैतिक स्वैरपणा निश्चित आढळेल. न्यू ऑर्लीन्सच्या 'व्यू कारे' (Vieux Carre) विभागांतील रात्रीच्या नाचतमाशांची दंगल पॅरिसशीं स्पर्धा करणारी असते आणि त्यांतील कांहीं कार्यक्रम तर अधिक अर्वाच्य असतात. धंदेवाईक किंवा खाजगी वेश्यागृहें सर्वत्र आहेत आणि त्यांपैकीं बरींचशीं गुंडगिरी करणाऱ्या टोळ्यांशीं संबंधित असतात. अमेरिकेला आपण नीतिमान् म्हणतों, कारण तिच्या सामाजिक जाणिवेला वाईट आणि चांगलें, योग्य आणि अयोग्य, राजकीय दृष्ट्या कायद्याचें पालन करणारे, आपल्या व्यवहारांत प्रामाणिकपणानें वागणारे आणि लग्नसंस्थेवर श्रद्धा ठेवणारे बहुसंख्य नागरिक आणि या सद्गुणांबाबत ढिले असणारे लोक यांच्यांतील फरक चांगला कळतो. या लक्ष्मणरेषेबद्दल प्रत्येक जण इतका जागरूक असतो कीं ती ओलांडल्यास काय शासन होईल याची प्रत्येकाला नीट कल्पना असते.

तिथें तरुण मुलें कशीं वागत असतील असा एकाद्याला प्रश्न पडेल. लहान-

पणापासून मुलगे आणि मुली एकमेकांत मोकळेपणानें मिसळतात. त्यामुळें त्यांच्यांत साहजिकच मैत्रीचे आणि भावनिक अनुबंध निर्माण होतात, व तरुण मुलगे व मुली संध्याकाळीं एकमेकांबरोबर फिरायला जातात. त्यांच्यावर कुणीं पाळत ठेवण्याची आवश्यकता नसते. 'डेटिंग' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या या तरुणांत प्रचलित असलेल्या या पद्धतीला घरांतील वडीलधाऱ्या मंडळींनीं कितीतरी पूर्वींपासून मान्यता दिली आहे आणि या प्रथेला आतां कुणीहि आक्षेप घेत नाहीं. जिऑफ्रे गॉर्डर या इंग्लिश मानववंशशास्त्रज्ञानें म्हटल्याप्रमाणें 'डेटिंग' हा कांहीं तितकासा प्रणयाचा प्रश्न नाहीं, पण तरुणांचा आत्मविश्वास दृढ करणारी आणि इतरांनीं आपल्याला नांवाजावें अशी जी एक सुप्त ओढ प्रत्येकाच्या मनांत असते ती ओढ पूर्ण करणारी अशी ही एक यशस्वी सामाजिक प्रथा आहे. ही ओढ हा तर अमेरिकन व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष आहे.' आपल्या मित्रवर्तुळांत प्रिय असणाऱ्या जास्तींत जास्त मुलांकडून निमंत्रणें मिळणें हा मुलीचा आदर्श असतो. ज्यांना विशेष आग्रह होतो अशा मुलींना शक्य तितक्या अधिक वेळां फिरायला घेऊन जाणें ही तरुणाची महत्त्वाकांक्षा असते. शृंगाराच्या कांहींशा अस्पष्ट स्वरूपाच्या सीमांवर खेळला जाणारा हा एक खेळ असतो. पुष्कळदां एकमेकांशीं सुखसंवाद किंवा निर्मळ मैत्री एवढेंच या जिव्हाळ्याचें स्वरूप असतें. पुष्कळदां या आपुलकींत औपचारिक प्रणयाच्या खुणा दिसतात, पण त्यांमागें भावनांची उत्कटता नसते. कांहीं वेळां निसर्गप्रेरणा अनावर ठरते आणि या तरुण व्यक्तींना परस्परांपासून जीवनरहस्याचें ज्ञान होतें. त्यांचें एकमेकांवर खरें प्रेम असण्याचीहि शक्यता असते आणि मग स्वाभाविकपणें तीं लग्न करतात. सामान्यतः अमेरिकन तरुण बऱ्याच लवकर लग्न करतात आणि त्या क्षणापासून त्यांचे आयुष्यक्रम आमूलाग्र बदलून जातात.

लैंगिक विकृति, लग्नपूर्व संबंध, व्यभिचार यांसारख्या विषयांसंबंधीं प्रसिद्ध होणाऱ्या कांहीं आंकडेवारीच्या तत्त्यांवर मी कधींहि विश्वास ठेवूं शकलेला नाहीं. हा विषय इतका व्यक्तिगत स्वरूपाचा आहे आणि कोणत्याहि दोन प्रकरणांतील सत्य गोष्टींत इतकी तफावत असते कीं, माझ्या मतें, या अपरिहार्यपणें अत्यंत मर्यादित गटांतील व्यक्तींचें निरीक्षण करून काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य समाजाच्या संदर्भांत निरर्थक ठरतील. फक्त घटस्फोटासंबंधींची आंकडेवारी विश्वासार्ह असते. एरवीं अभ्यासाची ही पद्धत अनर्थकारी ठरेल. प्रामाणिकपणें

१. जिऑफ्रे गॉर्डर : द अमेरिकन्स : ए स्टडी इन नॅशनल कॅरॅक्टर, लंडन, १९४८.

अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

"ते स्वतःच वेडे आहेत," तो फ्रेंच माणूस ओरडला. "त्यांचीच तपासणी केली पाहिजे."

तो तरुण पूर्णपणें शहाणा असल्याचें त्या मनोविश्लेषणतज्ज्ञ विदुषीनें निदान केलें आणि परिणामतः त्याला पांच दिवस कैदेची शिक्षा दिली गेली. तो नुकताच अमेरिकेंत आलेला असल्यानें कायद्याची त्याला नीटशी माहिती नसावी या कारणासाठीं त्याच्या गुन्ह्याचा सौम्यपणें विचार करण्यांत आला, असा खुलासाहि त्या वेळीं केला गेला. हा लहानसा प्रसंग म्हणजे नैतिक वर्तणुकीबाबत अमेरिकेंत कशा प्रकारची परिस्थिति आहे त्याचें एक मनोरंजक उदाहरण होय. युरोपांतून येणाऱ्या प्रवाश्यानें ध्यानांत बाळगण्यासारखे हे धोक्याचे इशारे आहेत. अमेरिकेंत नीतिमत्ता ही एक अत्यंत गंभीर बाब आहे हें त्यानें प्रारंभींपासूनच ओळखलें पाहिजे. भोवतालच्या वातावरणाशीं समरस व्हायचें असेल तर त्यानें लग्न करावें आणि पत्नीला बरोबर घेऊन सर्वत्र जावें हें बरें. "एकटा प्रवासी हा सैतान असतो," असें महंमदानें म्हटलें आहे. अमेरिकेंत तर या सैतानाला चांगल्याच जाचांतून जावें लागतें.

वर्तनशुचितेच्या कटाक्षाबद्दल मी जेव्हां सांगतों त्या वेळीं मागील एका प्रकरणांत मीं अमेरिकन नीतिमूल्यांचा उल्लेख केला आहे तशाच अर्थानें या बाबीसंबंधींहि बोलत असतों. या सबंध देशावर प्युरिटन पंथाचा प्रभाव आहे असें गृहीत धरणें हें उघड उघड अतिव्याप्तीचें ठरेल. न्यूयॉर्क, शिकागो, सान फ्रान्सिस्को आणि लॉस एन्जलिस यांसारख्या मोठ्या शहरांत आणि कित्येक लहान गांवांतहि समाजाच्या कांहीं थरांत कांहींसा नैतिक स्वैरपणा निश्चित आढळेल. न्यू ऑर्लीन्सच्या 'व्ह्यू कारे' (Vieux Carre) विभागांतील रात्रीच्या नाचतमाशांची दंगल पॅरिसशीं स्पर्धा करणारी असते आणि त्यांतील कांहीं कार्यक्रम तर अधिक अर्वाच्य असतात. धंदेवाईक किंवा खाजगी वेश्यागृहें सर्वत्र आहेत आणि त्यांपैकीं बरींचशीं गुंडगिरी करणाऱ्या टोळ्यांशीं संबंधित असतात. अमेरिकेला आपण नीतिमान् म्हणतों, कारण तिच्या सामाजिक जाणिवेला वाईट आणि चांगलें, योग्य आणि अयोग्य, राजकीय दृष्ट्या कायद्याचें पालन करणारे, आपल्या व्यवहारांत प्रामाणिकपणानें वागणारे आणि लग्नसंस्थेवर श्रद्धा ठेवणारे बहुसंख्य नागरिक आणि या सद्गुणांबाबत ढिले असणारे लोक यांच्यांतील फरक चांगला कळतो. या लक्ष्मणरेषेबद्दल प्रत्येक जण इतका जागरूक असतो कीं ती ओलांडल्यास काय शासन होईल याची प्रत्येकाला नीट कल्पना असते.

तिथें तरुण मुलें कशीं वागत असतील असा एखाद्याला प्रश्न पडेल. लहान-

पणापासून मुलगे आणि मुली एकमेकांत मोकळेपणानें मिसळतात. त्यामुळें त्यांच्यांत साहजिकच मैत्रीचे आणि भावनिक अनुबंध निर्माण होतात, व तरुण मुलगे व मुली संध्याकाळीं एकमेकांबरोबर फिरायला जातात. त्यांच्यावर कुणीं पाळत ठेवण्याची आवश्यकता नसते. 'डेटिंग' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या या तरुणांत प्रचलित असलेल्या या पद्धतीला घरांतील वडीलधाऱ्या मंडळींनीं कितीतरी पूर्वीपासून मान्यता दिली आहे आणि या प्रथेला आतां कुणीहि आक्षेप घेत नाहीं. जिऑफ्रे गॉर्डर या इंग्लिश मानववंशशास्त्रज्ञानें म्हटल्याप्रमाणें 'डेटिंग' हा कांहीं तितकासा प्रणयाचा प्रश्न नाहीं, पण तरुणांचा आत्मविश्वास दृढ करणारी आणि इतरांनीं आपल्याला नांवाजावें अशी जी एक सुप्त ओढ प्रत्येकाच्या मनांत असते ती ओढ पूर्ण करणारी अशी ही एक यशस्वी सामाजिक प्रथा आहे. ही ओढ हा तर अमेरिकन व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष आहे.[1] आपल्या मित्रवर्तुळांत प्रिय असणाऱ्या जास्तींत जास्त मुलांकडून निमंत्रणें मिळणें हा मुलीचा आदर्श असतो. ज्यांना विशेष आग्रह होतो अशा मुलींना शक्य तितक्या अधिक वेळां फिरायला घेऊन जाणें ही तरुणाची महत्त्वाकांक्षा असते. शृंगाराच्या कांहींशा अस्पष्ट स्वरूपाच्या सीमांवर खेळला जाणारा हा एक खेळ असतो. पुष्कळदां एकमेकांशीं सुखसंवाद किंवा निर्मळ मैत्री एवढेंच या जिव्हाळ्याचें स्वरूप असतें. पुष्कळदां या आपुलकींत औपचारिक प्रणयाच्या खुणा दिसतात, पण त्यांमागें भावनांची उत्कटता नसते. कांहीं वेळां निसर्गप्रेरणा अनावर ठरते आणि या तरुण व्यक्तींना परस्परांपासून जीवनरहस्याचें ज्ञान होतें. त्यांचें एकमेकांवर खरें प्रेम असण्याचीहि शक्यता असते आणि मग स्वाभाविकपणें तीं लग्न करतात. सामान्यतः अमेरिकन तरुण बऱ्याच लवकर लग्न करतात आणि त्या क्षणापासून त्यांचे आयुष्यक्रम आमूलाग्र बदलून जातात.

लैंगिक विकृति, लग्नपूर्व संबंध, व्यभिचार यांसारख्या विषयांसंबंधीं प्रसिद्ध होणाऱ्या कांहीं आंकडेवारीच्या तत्त्वांवर मी कधींहि विश्वास ठेवूं शकलेला नाहीं. हा विषय इतका व्यक्तिगत स्वरूपाचा आहे आणि कोणत्याहि दोन प्रकरणांतील सत्य गोष्टींत इतकी तफावत असते कीं, माझ्या मतें, या अपरिहार्यपणें अत्यंत मर्यादित गटांतील व्यक्तींचें निरीक्षण करून काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य समाजाच्या संदर्भांत निरर्थक ठरतील. फक्त घटस्फोटासंबंधींची आंकडेवारी विश्वासार्ह असते. एरवीं अभ्यासाची ही पद्धत अनर्थकारी ठरेल. प्रामाणिकपणें

---

१. जिऑफ्रे गॉर्डर : द अमेरिकन्स : ए स्टडी इन नॅशनल कॅरॅक्टर, लंडन, १९४८.

अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

होणारे सर्व प्रयत्न उपकारक ठरतील, पण या बाबतींत अत्यंत सावधानतेनें त्यांचा विचार झाला पाहिजे.

सामान्यतः कोणत्याहि समाजांत वावरतांना प्रतीत होणाऱ्या नैतिक वातावरणाशीं संबंधित अशा अनेक गोष्टींवरून आपलें जें उत्स्फूर्त मत तयार होतें त्यावरच जास्त भरंवसा ठेवणें इष्ट. विशेषतः अमेरिकनांइतक्या मनमोकळ्या, आतिथ्यशील आणि प्रामाणिक स्वभावाच्या लोकांबाबत तर या आंतरिक निर्वाळ्यावरच अधिक विश्वास टाकला पाहिजे. विवाह झाल्यामुळें अमेरिकन व्यक्तीला कोणत्याहि प्रकारच्या सैल वर्तनाची किंवा प्रतारणेची थोडीसुद्धां मुभा मिळत नाहीं, थोडक्यांत म्हणजे ज्या प्रकारांमुळें समाजांत व्यक्तीला मान खालीं घालावी लागते असे प्रकार विवाहानंतरसुद्धां किंचितहि सौम्य दृष्टीनें पाहिले जात नाहींत, याबद्दल अमेरिकेंत येणाऱ्या बहुतेक परदेशी पाहुण्यांची खात्री पटते. विवाहबंधन पाळणें या गोष्टीला अमेरिकेंत फार मोठें सामाजिक महत्त्व आहे. ती एक केवळ व्यक्तिगत प्रतिष्ठेची नव्हे, तर सामाजिक प्रतिष्ठेची बाब आहे. वैवाहिक एकनिष्ठेची प्रतिज्ञा मोडली तर, विशेषतः हा दुराचार कोर्टांत सिद्ध झाला तर, त्याकडे कोणीहि सौम्यपणें पाहत नाहीं. अशा व्यक्तीची सारी सामाजिक प्रतिष्ठा धुळीला मिळते आणि सामाजिक क्षेत्रांतहि तिचें खूप मोठें नुकसान होण्याची दाट शक्यता असते. विवाह जर यशस्वी होत नसेल तर असा विवाह रद्दबातल करण्यास युरोपियनांपेक्षां अमेरिकन लोक अधिक तयार असतात. पुन्हा एकदां तीं दुसऱ्याबरोबर विवाहबद्ध होतात आणि त्यांच्या लैंगिक संबंधांत कोणताहि उणेपणा किंवा संकोच येत नाहीं. प्रणयाच्या क्षेत्रांत अधिक अनुभवी, उत्साही आणि कुशल गणलीं जाणारीं युरोपियन राष्ट्रें घटस्फोटापेक्षां व्यभिचार कमी दुःखद, सोपा आणि अधिक सोयीचा मानतात. पण त्यामुळें संसार भग्न होतो आणि नवरा-बायकोच्याच नव्हे तर त्यांच्या अपत्यांच्याहि हितसंबंधांना गंभीर धोका पोंचण्याचा संभव असतो. व्यभिचार म्हणजे अमेरिकन लोक आपल्या व्यक्तिमत्त्वाचा उपमर्द समजतात आणि म्हणूनच ते घटस्फोट अधिक पसंत करतात. अर्थात् या नियमालाहि बरेच अपवाद आहेत, पण सामान्यतः या प्रश्नाकडे पाहण्याच्या युरोपियनांच्या आणि अमेरिकनांच्या मानसिक दृष्टिकोणांत खूपच फरक आहे.

असें नेहमीं म्हटलें जातें कीं, कोणत्याहि देशाच्या नीतिमत्तेविषयीं बोलत असतांना आपण त्या देशांतील स्त्रीजातीविषयीं बोलत असतों. कोणत्याहि देशांतील प्रेमविषयक रीती किंवा कौटुंबिक जीवन यांना बंधनकारक असणाऱ्या अलिखित

तत्त्वांवर स्त्रियांचा फार मोठा प्रभाव प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें पडलेला असतो. अमेरिकेंत स्त्रीला असणारें असामान्य स्थान पाहून प्रत्येक युरोपियन स्तिमित होतो. तिचा आब आणि समाजांत तिच्या हातीं असणारी सत्ता यांचें त्याला आश्चर्य वाटतें. कित्येक बाबतींत तर असें वाटूं लागतें कीं अमेरिकेंत स्त्री-पुरुषांत खरी एकता नाहींच, उलट अनेकदां स्त्रीलाच पुरुषाहून वरचढ अधिकार असतात. असें असण्याचें मूळ कारण शोधण्यासाठीं आरंभींच्या अमेरिकन समाजरचनेपर्यंत—वसाहतवाल्या जमातींपर्यंत—जावें लागेल.

पूर्वींच्या सरहद्दीवरील एकाकी वस्त्यांत सुरूप कुलीन स्त्रिया क्वचितच सांपडत. संपत्तीचें वेड लागलेल्या त्या संकटमय रानटी प्रदेशांत वेश्याव्यवसाय आणि दरोडीखोरी बेसुमार होती. रेड-इंडियन लोक इतस्ततः संचार करीत असत. पण पश्चिमेकडील जंगलपट्ट्यांत मात्र कांहीं सुगृहिणी असत. अर्थातच त्यांच्या वास्तव्याला फार प्रभावी अर्थ प्राप्त होई. तेथील लोकांच्या सुप्त सामाजिक प्रेरणा आणि स्त्रीदाक्षिण्याची भावना या स्त्रियांच्या वास्तव्यामुळें जागृत होत. सबंध जीवनालाच नवें स्वरूप प्राप्त होत असे. लग्न करून घरांत येणारी पत्नी स्वतःबरोबर टापटीप, सुव्यवस्था, वात्सल्य आणि वात्सल्यापोटीं जन्मणारी दक्षता व शिशु-संवर्धनाची आस्था या गोष्टीहि घरांत आणी. सबंध वसाहतीलाच ती नीटनेटकेपणा, विनयपूर्ण चालीरीती, स्वाभिमान या संस्कृतीला आवश्यक अशा प्राथमिक सद्गुणांचे धडे देई. रानटी प्रवृत्ती सौम्य होत, भाषेंत नम्रता येई, आणि अनागोंदी कारभार संपून त्यांतून एक सुसंकलित नियमबद्ध समाज निर्माण होई. कदाचित् तिला त्याची कल्पनाहि नसेल, पण स्त्री आपल्याबरोबरच त्या समाजांत कायद्याची कल्पना घेऊन येत असे. तिच्यामुळेंच आद्य वसाहतकाराला आपल्या नागरिकत्वाची जाणीव झाली, आपल्या जीवनाच्या सुस्थिरतेसाठीं आणि आपल्या कुटुंबाच्या संरक्षणासाठीं त्याला सरकार, कायदे, आणि कोर्टें यांची आवश्यकता भासूं लागली. आपल्या शक्तीची स्त्रीला जाणीव होती आणि तिचा ती पूर्ण उपयोग करून घेत असे. आपल्या सहकार्याशिवाय माणसें सुसंस्कृत समाज निर्माण करूं शकणार नाहींत हें तिनें ओळखलें. शिवाय आयुष्यक्रम अत्यंत धकाधकीचा आणि संकटमय असल्यानें स्त्री-पुरुष सर्वांनाच काबाडकष्ट, साहस, धडाडी, स्वतंत्र, चलाख व शोधक बुद्धि या गुणांच्या जोरावर तग धरावा लागे. या क्षेत्रांत अमेरिकन स्त्रीनें तिच्या सामाजिक इतिहासाच्या सुरुवातीपासूनच असामान्य हक्क मिळविले आणि अगदीं आजपर्यंत तिनें ते कायम टिकविले आहेत—इतकेंच नव्हे, कित्येकांचें प्रभावक्षेत्र वाढवलें आहे.

स्त्रीच्या दास्यशृंखला गळून पडण्यास प्रथम अमेरिकेंतच कां प्रारंभ झाला आणि या देशांतूनच सबंध जगभर या मुक्तिसंदेशाचा प्रसार कां झाला तें वरील विवेचनावरून स्पष्ट होतें. एकोणिसाव्या शतकांतच अमेरिकेंत सनातनी युरोपियनांना हादरा देणारा स्त्रियांच्या मतदानाचा प्रश्न प्रथम उपस्थित झाला. आणि १८९० साल उगवण्यापूर्वींच अमेरिकेच्या कांहीं संस्थानांनीं स्त्रियांना मतदानाचा हक्क देऊनहि टाकला होता. युरोपांत खास पुरुषांचीं अधिकारक्षेत्रें मानल्या जाणाऱ्या व्यवसायांतहि अमेरिकेंतील स्त्रियांच्या उन्नतीच्या चळवळीनें प्रवेश केला. लवकरच समान कायदेशीर हक्क आणि समाजाच्या सर्व क्षेत्रांत समानतेनें वावरण्याचें स्वातंत्र्य मिळवण्यांत स्त्रियांना कसलीहि अडचण पडली नाहीं. तरुण मुलां-मुलींमधलें साहचर्य, औपचारिकपणाचा आणि त्यांच्या सामाजिक संबंधांवरील दडपणांचा अभाव, सर्वच अमेरिकन स्त्रियांचें विशाल स्वातंत्र्य हीं खास अमेरिकेचीं वैशिष्ट्यें मानलीं जाऊं लागलीं.

अमेरिकेंत आज कुठेंहि गेलांत तरी तुम्हांला ऐकूं येईल कीं, कौटुंबिक उत्पन्नापैकीं ८० टक्के रकमेचा विनियोग आपल्या स्वतःच्या मताप्रमाणें स्त्रिया करतात. व्यापारी आणि औद्योगिक जाहिराती मुख्यतः स्त्रियांच्या नजरेला पडाव्या यासाठींच असतात. प्रतीकचिन्हें, चित्रें, घोषणा, आपल्या मालाविषयींची प्रशंसा या सर्वांची योजना आणि मांडणी बहुसंख्य स्त्रियांच्या मनांवर परिणाम करील अशा प्रकारें करण्यांत येते. समाजांत कुणा-कुणाशीं मैत्री व येणें-जाणें ठेवायचें, आठवड्यांत आलेल्या निमंत्रणांपैकीं कुठलीं स्वीकारायचीं, कोणत्या सिनेमाला किंवा नाटकाला जायचें हें सर्व स्त्रियाच ठरवतात. मुलें मिळवायला लागेपर्यंत त्यांना कोणतें शिक्षण द्यायचें या बाबतींतहि तिचें मत फार प्रभावी असतें. घरांत तिची पुरुषापेक्षां जास्त सत्ता असल्याचें आढळतें.

हे सामाजिक व कौटुंबिक हक्क मिळविणारी सर्वसामान्य अमेरिकन स्त्री अत्यंत सालसपणें काम करते. घरींच राहणारी दाई, आया, नर्स या गोष्टी अमेरिकेंत अत्यंत महाग व फक्त अत्यंत श्रीमान् कुटुंबांनाच परवडूं शकतील अशा झाल्या आहेत. मध्यमवर्गीय गृहिणी, सर्वसामान्य व्यावसायिकाची पत्नी, इतर स्वतंत्र धंद्यांत असणाऱ्या गृहस्थाची बायको, प्रोफेसरीणबाई—या सर्वांना स्वतःलाच आपल्या मुलांचें सगळें करावें लागतें. शिवाय बाजारहाट, स्वयंपाक आणि घरांतलीं इतर कधीं न संपणारीं कामें असतातच. जास्तींत जास्त म्हणजे ही स्त्री एकाद्या दिवशीं कुणाला तरी तासावारी मजुरी देऊन मदतीला बोलावूं शकते. ही मदतनीस स्वतःच्या मोटारींतून येते आणि काम करून

निघून जाते. अर्थात् अमेरिकन घर हें अत्याधुनिक उपकरणांनीं आणि श्रम वांचविणाऱ्या यंत्रांनीं सुसज्ज असतें. पण नुसतें घरांतलें करून अमेरिकन स्त्रीचें काम संपत नाहीं. बहुतेक गृहिणी, विशेषतः लहान मुलें नसतील तर, कुठें तरी नोकरी करीत असतात आणि त्याशिवाय प्रत्येक गृहिणी कुठल्या ना कुठल्या तरी सार्वजनिक संस्थेंत किंवा विकाससंघटनेंत शक्य तितकें समाजोपयोगी कार्य करण्यांत गढलेली असते. मदतकार्यें करणाऱ्या अशा संस्थांना अमेरिकेंत फार महत्त्वाचें स्थान आहे आणि या सगळ्याच्या जोडीला अमेरिकन शहरांचा अफाट विस्तार ध्यानांत घेतला म्हणजे कळून चुकतें कीं अमेरिकन स्त्रीचें आयुष्य ऐष-आरामाचें निश्चितच नाहीं.

पुरुषसुद्धां घरांत पडतील तीं कामें करीत असतो हें आपण विसरतां कामा नये. अमेरिकन स्त्रीच्या हाताशीं दाई तर नसतेच, पण अनेक वेळां घरांतील तांत्रिक दुरुस्तीच्या किंवा नळदुरुस्तीच्या कामांसाठीं बाहेरून मनुष्य बोलावणेंहि परवडण्यासारखें नसतें. त्यांचे दर फार महाग असतात आणि शिवाय असल्या सटरफटर कामांसाठीं ते येतील कीं नाहीं याची शाश्वती नसते. म्हणून अमेरिकन स्त्रीला जशीं केरवारा, धुणें, स्वयंपाक हीं कामें अंगवळणीं पाडावीं लागलीं आहेत त्याचप्रमाणें पुरुषालाहि वरील प्रकारचीं दुरुस्तीचीं सगळीं कामें करावीं लागतात. मजुरीचे महाग दर आणि उंचावलेलें जीवनमान यांतून निर्माण झालेल्या या स्थितीचा अमेरिकन समाजाच्या सध्यांच्या रचनेवर मोठा परिणाम झाला आहे. घरकामासाठीं पगारी नोकर ठेवण्याची पद्धत नाहींशी झाल्यामुळें समाजांतले सगळे वर्ग एका पातळीवर येण्यास फार मदत झाली आहे.

सुंदर स्त्रियांची अमेरिकेंत मुळींच वाण नाहीं. अनेक राष्ट्रीयत्वांचा आणि वंशांचा संगम, ताजें, सकस अन्न, आरोग्यपूर्ण राहणी आणि व्यायामाची आवड या सर्वांचें श्रेय असे कीं अमेरिकेंत सुंदर बांध्याच्या आणि सुंदर चेहऱ्याच्या स्त्रियांचें प्रमाण आश्चर्य वाटण्याइतकें जास्त आहे. टेक्सासमधील डल्लास या गांवीं एका रात्रीं आम्ही एक नाटक पाहायला गेलों असतांना खालीं 'पिटां'त बसलेल्या प्रेक्षकांमध्येंसुद्धां सुंदर स्त्रिया इतक्या मोठ्या संख्येनें आढळल्या कीं आम्ही आश्चर्यचकित झालों. कोणत्याहि एका ठिकाणीं एवढें सौंदर्य एकत्र आल्याचें आम्हीं पूर्वीं केव्हांहि पाहिलें नव्हतें. आपल्या हालचालींतील मोहक सहजतेनें सर्वांवर छाप पाडणाऱ्या या ललना आम्हांला केवळ न्यूयॉर्क-बॉस्टन-सारख्या पूर्वकिनाऱ्यावरल्या मोठ्या सामाजिक केंद्रांतच आढळल्या असें नव्हे तर जिथें या शतकाच्या प्रारंभीं प्रारंभीं सुद्धां जुन्या स्वरूपाच्या वसाहती होत्या अशा

काल-परवां स्थापन झालेल्या दक्षिण संस्थानांतल्या शहरांतसुद्धां आम्हांला अशा युवतींची गर्दी दिसली. या ठिकाणीं मी ऐश्वर्यवती स्त्रियांच्या झगमगाटाविषयीं किंवा भपक्याविषयीं बोलत नसून सर्वसाधारण अमेरिकन स्त्रीच्या नीटस रूपाविषयीं आणि मोहक व्यक्तिमत्त्वाविषयीं बोलतों आहें. थोडक्यांत म्हणजे मी स्वयंपाकपाणी करणाऱ्या गृहिणींबद्दल आणि नोकरी करणाऱ्या असंख्य मुलींबद्दल बोलत आहें. त्या नेहमीं चांगल्या अभिरुचीचा पोशाख करतात आणि नीटनेटक्या असतात. त्यांच्या सबंध वागणुकींत एक प्रकारचा मोहक विनय असतो. अगदीं काम करीत असतांना सुद्धां त्यांचें वागणें असेंच असतें. आणि यांत पैशाची अडचण येत नाहीं, कारण सर्व प्रकारचीं आवश्यक सौंदर्यप्रसाधनें अल्प किंमतींत उपलब्ध असतात. पण इथेंसुद्धां छानछोकीपणापेक्षां आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आब कायम राहील आणि गबाळेपणा दिसणार नाहीं इतकेंच प्रसाधन करण्याची प्रवृत्ति प्रतीत होते.

अमेरिकन मूल शाळेंत जाऊं लागलें कीं त्याला घरापेक्षां शाळेचाच अधिक लळा लागतो. शाळेंतले नेहमींचे तास आणि अभ्यासक्रमाबाहेरील हालचाली यांत तो सबंध दिवस रमलेला असतो. अर्थात् या सर्व विकासाकडे पालकांचें लक्ष असतें, पण मुलें आतां त्यांच्या आधीन राहिलेलीं नसतात. आणि असें होणें अपरिहार्यच असतें. कारण शनिवार-रविवारखेरीज त्यांना मोकळा वेळच नसतो. मुलें घरीं ठेवून नोकरीला जाणाऱ्या अमेरिकन मातांच्या बाबतींत असें घडणें एका दृष्टीनें अटळ असतें, आणि दुसरें असें कीं मुलांमध्यें धडाडी, स्वावलंबन, व्यक्तित्व या गुणांचा विकास व्हावा हाच हेतु शालेय शिक्षणांत अभिप्रेत असतो. त्यांना स्वतःलाहि असें शिक्षण मिळालेलें असल्यामुळें आणि आधुनिक मानसशास्त्रीय व शैक्षणिक विचारसरणींची माहिती असल्यामुळें पालकसुद्धां गंड व मानसिक दडपण या भावनांपासून मुलांचें मन मुक्त करण्याच्या प्रयत्नांत शाळेशीं सहकार्य करतात. त्यामुळें आपल्या कौटुंबिक आयुष्यापेक्षां अनेक प्रकारें वेगळ्या अशा स्वतःच्या स्वतंत्र आयुष्यास मुलें खूपच लवकर प्रारंभ करतात. वयांत येईपर्यंत त्यांचा स्वतःचा असा मानसिक दृष्टिकोण तयार झालेला असतो आणि त्यामुळें स्वतःचा व्यक्तिगत जीवनक्रम, शिक्षण किंवा भावी व्यवसाय या बाबतींत तीं इतर कोणाला फारशी ढवळाढवळ करण्यास वाव देत नाहींत.

आर्थिक दृष्ट्या आपल्या आईवडिलांवर अवलंबून न राहतां शक्य तितक्या लवकर स्वतःच्या पायावर उभें राहायचें अशी प्रत्येक मुलाची प्रवृत्ति असते. हायस्कूलमध्यें असतांपासूनच वृत्तपत्रें विकणें, दुकानांत पार्सलें पोंचवणें यांसारखे

छोटे छोटे उद्योग करून पैसे मिळविण्याचे तो प्रयत्न करूं लागतो. या सुरुवातीच्या अर्थार्जनामुळें आपण आपला सर्वच भार कुटुंबीयांवर टाकीत नाहीं असें समाधान त्यास मिळतें आणि त्याचा आत्मविश्वास व त्याचें व्यक्तित्व कणखर बनतें. अमेरिकेचें हें वैशिष्टय उत्तम प्रकारें दर्शविणारी पुढील गोष्ट पाहा :

एका छोट्या गांवांतील एका कुटुंबानें माळ्याच्या दुकानांतून फुलें मागवलीं होतीं. संध्याकाळीं त्यांच्या दाराशीं फुलांचा गुच्छ घेऊन एक रुबाबदार तरुण आला. त्याच गांवांतील तो एक सन्मान्य आणि सुसंपन्न नागरिक असल्यानें त्या कुटुंबाच्या तो माहितींतला होता. म्हणूनच प्रथम त्यांना या घटनेचें आश्चर्य वाटलें, पण नंतर दुसऱ्या दिवशीं त्यासंबंधींचा खुलासा कळल्यावर सर्वांना त्याचें कृत्य अगदीं स्वाभाविक होतें हें पटलें. त्या श्रीमान् माणसाच्या हायस्कूलमध्यें शिकणाऱ्या एका मुलानें शाळा सुटल्यावर उरणाऱ्या संध्याकाळच्या वेळांत हें फुलें पोंचवण्याचें काम पत्करलें होतें. त्या दिवशीं तो मुलगा आजारी होता आणि त्याच्या व्यावसायिक कर्तव्यांत खंड पडूं नये म्हणून त्याच्या वडिलांनीं स्वतः त्याचें फुलें पोंचविण्याचें काम केलें.

आपल्या वडिलांचाच व्यवसाय पुढें चालवूं इच्छिणारीं मुलें अगदीं क्वचितच आढळतात. वडिलांच्या अधिकारकक्षेतून बाहेर पडावें, त्यांच्यापेक्षां आपण कोणीतरी वेगळें व्हावें, आणि शक्य तों त्यांच्याहून अधिक कर्तबगारी दाखवावी अशी प्रत्येक मुलाची उपजत प्रेरणा असते. स्वतःचें आवश्यक स्वातंत्र्य आणि कर्तृत्व सिद्ध करण्यासाठीं तो वडिलांहून वेगळा पेशा पत्करतो. मुलीसुद्धां विवाह होईपर्यंत घराबाहेर पडून नोकरी करतात : मग त्या घरच्या श्रीमंत असोत किंवा गरीब असोत. हुंड्याच्या पद्धतीला अमेरिकेंत स्थान नाहीं. स्वतः कांहीं न मिळवतां वडील, सासरा किंवा बायकोकडून मिळणाऱ्या पैशावर जगणें अपमानास्पद समजलें जातें. अमेरिकेंत अशा माणसाला कुचकामी समजतात आणि समाजांत त्याच्याबद्दल मुळींच आदर नसतो. आईवडिलांपासून स्वतंत्र होण्याची, स्वतःच्या पायावर उभें राहण्याची प्रवृत्ति अमेरिकेंत अगदीं बालपणापासून पद्धतशीरपणें जोपासण्यांत येते. त्यामुळें अमेरिकन वातावरणांत वाढलेलीं मुलें अधिक निःस्पृह आणि मनमोकळीं असतात. अमेरिकन मुलांच्या चालण्याबोलण्यांत, वेशभूषेंत एक प्रकारची सहजता, धिटाई, स्वाभिमान आणि सर्वांना कौतुकास्पद वाटणारी निश्चयात्मकता असते. स्वतंत्र देशाचे, स्वतंत्र मनोवृत्तीचे नागरिक तयार करणें हें शिक्षणाचें प्रमुख ध्येय असेल तर अमेरिकेंतील शिक्षण निश्चितपणें यशस्वी झालें आहे. पण हा प्रश्न दिसतो तितका

सोपा नाहीं. त्यांत बरीच गुंतागुंत आहे. तरुण मनांत स्वतंत्र वृत्तीचा विकास होत असतांना कांहीं विशिष्ट पथ्यें पाळलीं गेलीं नाहींत तर त्यांतून अनेकदां आटोक्यांत ठेवतां येणें अशक्य अशी स्वैर व उच्छृंखल परिस्थिति निर्माण होते. अधीर, चंचल अशा तरुण मनांत संपूर्ण स्वातंत्र्य आणि सुशीलता यांच्यांतला नाजुक समतोल कायम राखणें ही एक सोपी गोष्ट नाहीं.

एक दिवस न्यूयॉर्कमधल्या आमच्या हॉटेलांत खूप दूर असलेल्या एका शिक्षण संस्थेंतील विद्यार्थ्यांचा एक गट येऊन उतरला. ही मंडळी फक्त २४ तासांसाठीं आली होती. वीस वर्षांच्या आंतील अशीं कित्येक डझन मुलें त्यांत होतीं. नंतर जें कांहीं घडलें त्याचें यथार्थ वर्णन करतां येणें कठीण आहे. सबंध रात्रभर त्यांचा आरडाओरडा आणि धांगडधिंगा सुरू होता. खिडक्यांबाहेर डोकीं काढून हे विद्यार्थी चमत्कारिक, कर्कश, कानठळ्या बसणाऱ्या आवाजांत आरोळ्या ठोकीत. रात्रभर त्यांचीं गाणीं चाललीं होतीं. फर्निचर मोडून त्यांनीं त्याचे तुकडे खिडक्यांबाहेर भिरकावले. बाटल्या आणि काचेचे पेले फोडले. वरून हॉटेलच्या अंगणांत त्यांनीं विजेचे दिवेहि फेकले. फुटल्यावर त्यांचा छोट्या बॉंबसारखा आवाज होई. हॉटेलमधील युरोपियन पाहुणे आपल्या खोल्यांचीं दारें उघडीत आणि पुन्हा लावून घेत. भयचकित दृष्टीनें ते एकमेकांकडे पाहत. आपल्या देशांतल्यासारखें एखादें यादवी युद्ध सुरू झालें कीं काय असें त्यांना वाटे. रात्रीं कुणाला क्षणभरसुद्धां झोप आली नाहीं. हॉटेलमधल्या सगळ्या नोकरांनीं त्या मुलांना आवरण्याचा प्रयत्न केव्हांच सोडून दिला होता. "उद्यां सकाळीं जाणारच आहेत तीं मुलं. जरा वेगळ्या वातावरणांत आल्यामुळें साहजिकपणें उसळतं तरुण रक्त थोडा दंगा करणारच," असा त्या नोकरांनीं खुलासा केला. लोकांना इतका त्रास आणि इतकें नुकसान सहन करायला लावणारा हा प्रकार अत्यंत गैर होता अशी कांहींनीं टीकाहि केली, पण ते पुढें म्हणाले कीं एकादे वेळीं तरुण मुलें उच्छृंखल बनायचींच. क्वचित्-प्रसंगीं त्यांना हवें तसें वागूं द्यायला हवेंच. एकाद्या प्रचंड वावटळीसारखी आणि तितकीच नैसर्गिक अशी त्या रात्रीची ती घटना होती. अशा तुरळक प्रसंगीं आपल्या खोलींत दार बंद करून बसणें आणि बाहेरची वावटळ विरून जाण्याची वाट पाहणें एवढेंच बाकीच्यांनीं करायचें असतें.

पण स्वातंत्र्याला जर मर्यादेंत ठेवलें नाहीं तर तें स्वैराचारी आणि घातक बनतें. सर्वसामान्य माणसानें—म्हणजेच आपल्यापैकीं बहुसंख्य लोकांनीं—तरुणपणीं कांहींहि चुका केलेल्या असल्या तरीहि पुन्हा त्याला आपला स्वाभाविक

तोल सांपडून एक चांगला नागरिक बनण्यास फारशी अडचण पडत नाहीं हें आपण विसरतां कामा नये. यौवनाचीं प्राथमिक कातर वर्षें उलटलीं म्हणजे आपलीं तरुण मुलें त्यांच्यावर झालेल्या संस्कारांपैकीं फक्त चांगल्या संस्कारांवरच निष्ठा बाळगतात आणि आपलें स्वतंत्र जीवन घडवायला इतर कुठल्याहि राष्ट्रांतल्या तरुणांपेक्षां अधिक समर्थ असतात या तत्त्वावर अमेरिकनांचा पूर्ण विश्वास आहे. अर्थात् त्यांच्या या पद्धतींत कांहीं धोके नाहींतच असें ते म्हणत नाहींत. अमेरिकेंत बालगुन्हेगारी ही एक अत्यंत कूट अशी सामाजिक, मानसशास्त्रीय, आणि नैतिक समस्या होऊन बसली आहे. शिक्षण, विज्ञान, सार्वजनिक शासन-संस्था आणि लोकमत या सर्व क्षेत्रांतल्या अनेक तज्ज्ञांचें सगळें लक्ष या समस्येवर केंद्रित झालें आहे. प्राथमिक युवावस्थेंत आपल्याच वयाच्या तरुणांची टोळी जमवून चित्रपटांत दाखवल्या जाणाऱ्या गुंडगिरीसारखे गंभीर गुन्हे केल्याची कबुली देणारे अनेक जण आहेत. या लोकांनीं केवळ शांतताभंग करणाऱ्या दंगलीच नव्हे, तर छोट्या चोऱ्या आणि खाजगी मालमत्तेची नासधूस हे प्रकारहि केले होते. आणि हें सारें त्या विध्वंसनांतून येणारी बेहोशीची मजा चाखण्याच्या आणि आपल्यांतल्या धाडसप्रवृत्तीला वाव देण्याच्या एकमेव हेतूनें त्यांनीं केलें होतें. त्यासाठीं त्यांनीं अनेकदां स्वतःचे आणि इतरांचे प्राण धोक्यांत घातले होते. पण ते जेव्हां ताळ्यावर आले तेव्हां मात्र त्यांनीं चांगल्या अमेरिकन नागरिकाला शोभेल अशा समंजसपणानें सार्वजनिक नीतिसंवर्धक संघटनांत किंवा शास्त्रीय संशोधनसंस्थांत तरुणांना हितकर असें कार्य करण्यास सुरुवात केली.

प्रकरण पंधरावें

# अमेरिकन रंगभूमि

संपत्तीची वाढ, जनतेच्या जीवनमानांत सुधारणा आणि सर्वांसाठीं शिक्षणाची सोय हीं अमेरिकेचीं तीन प्रमुख ध्येयें आहेत. विज्ञान, औद्योगीकरण आणि शिक्षणाच्या लोकशाही पद्धती यांच्या द्वारा हीं ध्येयें साध्य करण्याचा प्रयत्न अमेरिका करीत असते. असें करतांना इतर राष्ट्रांत खानदानी परंपरेनें चालत आलेल्या कांहीं सौंदर्यशास्त्रीय कलाकुसरीकडे ती दुर्लक्ष करते आणि अशा कलाकुसरीचा त्याग करते. केवळ आनंदमय तत्त्वचिंतन किंवा संथपणांतल्या सौंदर्याचें आकर्षण या वृत्ती अमेरिकन स्वभावाला परक्या आहेत. पण तरीहि नैसर्गिक सौंदर्योत्सुकता आणि आपल्या सौंदर्यकल्पनेला व्यक्त रूप देण्याची आकांक्षा या गोष्टी संपूर्णपणें टाळण्याची मात्र अमेरिकेची इच्छा नसते आणि तें तिला शक्यहि होणार नाहीं. आपल्या विशिष्ट जीवनक्रमाशीं सुसंवादी अशी कला निर्माण करण्याचा ती अत्यंत उत्सुकतेनें आणि अनेकदां अभिजात रसिकतेनें प्रयत्न करीत असते. जिथें कोणतेहि अनिर्बंध प्रयोग घडत राहणें शक्य असतें अशा सांस्कृतिक विकासाच्या एका विशिष्ट अवस्थेंत अमेरिका आज आहे हें इथें पुन्हा सांगणें कदाचित अगदींच अनावश्यक ठरेल. कोणत्याहि गोष्टीबद्दल खुल्या दिलानें चर्चा करण्यास, तिला चांगल्या वाटणाऱ्या मूल्यांचा स्वीकार करण्यास अमेरिका नेहमींच उत्सुक असते. कलेच्या क्षेत्रांत तर तिला स्वतःची ही पूर्वग्रहरहित वृत्ति फारच उपकारक ठरेल. पण तिचे कलाविषयक प्रयत्न पूर्णपणें स्वतंत्र आणि अहेतुक आहेत असा ग्रह करून घेण्याच्या भरीस मात्र कोणीं पडूं नये. कारण हे प्रयत्न तिच्या सामाजिक रचनेवर अवलंबून आहेत आणि त्या रचनेशीं अत्यंत निगडित आहेत. तिथल्या रंगभूमीवर या गोष्टीचें अत्यंत स्पष्ट प्रतिबिंब पाहायला मिळतें. या रंगभूमीचें निर्भेळ कलात्मक यश कमी लेखण्याचा माझा हेतु नाहीं. परंतु रंगभूमि ही स्वरूपतःच एक सामाजिक कृति असल्यामुळें तिच्यामधून आपल्याला अमेरिकेच्या आजच्या स्वभावाचें, संस्कृतिप्रवाहांचें, तिच्या यौवनसुलभ उत्साहाचें, तिच्या अंतर्मनांतील द्वंद्वांचें, तिच्या समस्यांचें आणि तिच्या

भविष्यकाळाचें सूचक दर्शन घडूं शकतें हें अगदीं निर्विवाद आहे.

कांहीं थोडे अपवाद वगळले तर न्यूयॉर्कच्या टाइम्स स्क्वेअरमधल्या कांहीं इमारतींमध्येंच अमेरिकेंतली व्यावसायिक रंगभूमि केंद्रित झाली आहे. तीस नाट्यगृहांत या कंपन्या प्रयोग करीत असतात. हा रंगभूमिमय ब्रॉडवे विभाग म्हणजे एक मोठ्या शहरांतलें छोटें शहर आहे. नाट्यव्यवसायाबाहेरच्यांना या स्वायत्त शहरांत मज्जाव आहे. तिथपर्यंत पोंचणें किंवा हें वातावरण ध्यानांत येणें कांहीं सोपें नाहीं. इथें शिरकाव होण्यासाठीं कांहीं खास व्यक्तींच्या ओळखी तुम्हांला सांगतां आल्या पाहिजेत आणि कांहीं विशिष्ट ठिकाणीं तुमचें वारंवार जाणें-येणें असलें पाहिजे. पण खेदाची गोष्ट म्हणजे हे सगळे प्रकार नेहमींच सुखकर असतात असें नाहीं.

सर्वसामान्यतः या नाट्यगृहांतून इंग्लिश लेखकांनीं लिहिलेलीं आधुनिक नाटकें केलीं जातात. (हे नाटककार ब्रिटिश, अमेरिकन किंवा आयरिश असतात.) इतर भाषांमधून इंग्लिशमध्यें भाषांतरित करण्यांत आलेल्या नाट्यप्रयोगांना ब्रॉडवेवर क्वचितच स्थान मिळतें, आणि असे नाट्यप्रयोग यशस्वी झाल्याचें उदाहरण तर अधिकच दुर्मिळ असतें. या नियमाला अपवाद असे जवळ-जवळ नाहींतच, त्यामुळें त्यांचा उल्लेख करण्यांत स्वारस्य नाहीं.

दिग्दर्शन आणि अभिनय या बाबतींत हे बहुतेक प्रयोग चांगले, व कांहीं तर उत्कृष्ट असतात. पण नेपथ्य मात्र सामान्य असतें. नेपथ्ययोजना बऱ्याच काळजीपूर्वक केलेली आणि डोळ्यांना आल्हाददायक असते, पण तिला कोणताहि खास असा उच्च दर्जा प्राप्त होत नाहीं. लंडन, पॅरिस आणि इतर कांहीं याहून लहान युरोपियन शहरांत जी नेपथ्यरचना आढळते त्या तोडीची नेपथ्य-व्यवस्था निदान सध्यां तरी अमेरिकेंत आढळून येत नाहीं. स्थापत्य क्षेत्रांत मात्र अमेरिकेनें स्वतःची स्वतंत्र अशी महान् कला निर्माण केली आहे. याउलट जिथें जिथें चित्रकलेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येतो तिथें तिथें अमेरिका अजून प्रयोगावस्थेंतच आहे, आणि तिला अद्याप आपली स्वतंत्र, वैशिष्ट्यपूर्ण अशी शैली निर्माण करतां आलेली नाहीं असें वाटूं लागतें.

युरोपमध्यें कायम स्वरूपाच्या नाटक कंपन्या असतात. या कंपन्यांचे स्वतःचे दिग्दर्शक आणि इतर नोकर असतात. त्यांच्यांत संघभावना असते. त्यांच्या कामांत एक प्रकारचा अखंडपणा असतो. बहुतेक नाटक कंपन्यांना ठराविक प्रेक्षक-वर्गाचा आश्रयहि मिळतो. ब्रॉडवेमध्यें असें नाहीं. जेव्हां कोणताहि निर्माता एकादें विशिष्ट नाटक रंगभूमीवर आणायचें ठरवतो तेव्हां तो कांहीं व्यक्तींकडून

त्यासाठीं पैसा उभारण्याच्या उद्योगाला लागतो. अनेकदां तो स्वतःच हें सगळें भांडवल देतो. तो थिएटर ठरवतो आणि दिग्दर्शक व नट-नटींशीं करार करतो. या नट-नटींनीं पूर्वीं केव्हांहि एकत्र काम केलें नसल्याची आणि पुन्हाहि तीं कधीं एकत्र न येण्याची शक्यता असते. नाट्यप्रयोग रंगभूमीवर सादर करणें हें एक अवाढव्य खर्चाचें काम आहे. थोड्या भूमिका असलेल्या आणि पडदे वगैरेसाठीं फारसा खर्च न येणाऱ्या एकाद्या साध्या नाटकाचा प्रयोग करायचा म्हणजेसुद्धां किमान साठ हजार ते ऐशीं हजार डॉलर खर्च येतो. एकाद्या संगीतिकेसाठीं तीन लक्ष ते चार लक्ष डॉलर खर्च येणें ही अगदीं मामुली गोष्ट समजली जाते. अमेरिकेंतील इतर सर्व क्षेत्रांप्रमाणें इथें सुद्धां मुख्य खर्चाची बाब म्हणजे मजुरी. सर्वशक्तिमान् मजूर संघटनांनीं असे कडक कायदेकानू निर्माण केले आहेत कीं कोणत्याहि नाट्यप्रयोगाला आर्थिक नफा मिळायला फारच थोडा वाव शिल्लक राहतो.

इतर देशांतल्याप्रमाणेंच इथेंहि नाटक चालणार कीं पडणार हें अगदीं अल्पावधींत ठरतें. तें पडलें तर निर्मात्यांचे पैसे गेले—आणि नट-नटी व इतर नोकरवर्गालाहि दुसरी नोकरी शोधण्याची पाळी येते. या क्षेत्रांतील एक तज्ज्ञ, कॅलिफोर्नियांतल्या स्टॅनफर्ड विद्यापीठामधील प्रा. एच्. सी. हेफनर यांचा निष्कर्ष असा कीं ब्रॉडवेवर येणारीं ७५ ते ८५ टक्के नाटकें पडतात.[१] आपले पैसे बुडण्याची ८० टक्के शक्यता आहे हें निर्मात्यांना सुरुवातीपासूनच माहीत असतें. तरीहि केव्हां ना केव्हां आपण एखादें 'तुफान लोकप्रिय' होईल असें नाटक रंगभूमीवर आणूं आणि त्यांत सगळा तोटा भरून काढून चांगला फायदाहि मिळवूं, या आशेवर हे निर्माते नाटकांना भांडवल देतच राहतात.

ब्रॉडवेवरील या नाटक कंपन्यांच्या कचेऱ्यांतलें वातावरण सुसंस्कृत नसतें किंवा कलात्मकहि नसतें. किंवा तें एखाद्या शिस्तशीर नीटनेटक्या व्यापारी किंवा औद्योगिक कंपनीच्या ऑफिससारखेंहि नसतें. तिथें गेल्यावर आपल्याला तेजीच्या वेळच्या शेअर बाजारांतल्या वातावरणाची आठवण होते खरी. या धंद्यांतले लोक हाडाचे जुगारी असतात. त्यांना कला कशाशीं खातात हेंसुद्धां माहीत नसतें. पैसा मिळविण्याचा एक वेडा ध्यास त्यांना लागून राहिलेला असतो. न्यूयॉर्कमधील व्यावसायिक रंगभूमि इतर सत्तेचाळीस संस्थानांतल्या फिरत्या कंपन्यांप्रमाणें

१. ह्यूबर्ट सी. हेफनर : **द डिक्लाइन ऑफ द प्रोफेशनल थिएटर इन् अमेरिका (द क्वार्टरली जर्नल ऑफ स्पीच,** वर्ष ३५ वें, अंक २ रा).

या लोकांच्या जुगारी साहसांमधील अतर्क्य तेजीमंदीवर अवलंबून असते. आणि तरीहि ब्रॉडवेमध्यें गर्दी करून सोडणाऱ्या लोकसमूहाला खुणावणारे झगमगते दिवे अनेकदां उत्कृष्ट नाटकांची आणि निःसंशय गुणसंपन्न अशा प्रयोगांची जाहिरात करीत असतात. याच ब्रॉडवेनें सध्यांच्या थॉर्नटन वाइल्डर, टेनेसी विल्यम्स, किंवा आर्थर मिलर यांसारख्या श्रेष्ठ लेखकांना एकदम यशाच्या शिखरावर नेऊन बसविलें आहे. पण तरीहि नाटकें, दिग्दर्शक, नाटककार हीं सगळीं नशिबाच्या लहरीचीं बाहुलीं असतात, ही वस्तुस्थिति कांहीं बदलत नाहीं. त्यांच्या यशाला किंवा अपयशाला या शेअरबाजारांतील आकस्मिक घडामोडींचा चांगलाच हादरा बसतो. असंस्कृत आणि अव्यवहारी संघटनेमुळें, त्याचप्रमाणें मजूर संघटनांनीं लादलेल्या निर्बंधांमुळें अमेरिकेंतील व्यावसायिक रंगभूमीचा ऱ्हास होत चालला आहे यांत शंका नाहीं. १९२८ सालीं ब्रॉडवेवर ऐशीं नाट्यगृहें होतीं. वीस वर्षांच्या आंत ही संख्या तिसावर आली आहे. अनेक नटनट्या बेकार असून रेडिओ व टेलिव्हिजनवर कामें करून कशीबशी गुजराण करीत असतात, किंवा ते ब्रॉडवेला रामराम ठोकतात आणि नटनट्यांनीं आधींच 'हाउस फुल्ल' होऊन गेलेल्या लॉस एंजलिसच्या अफाट, अनागोंदी विश्वांत सामील होतात. तिथें तीं (नाटकाबाहेरील) हर प्रकारचीं विचित्र कामें पत्करतात किंवा एकादा विख्यात सिनेनिर्माता किंवा त्याचा एजंट त्यांना हेरून, त्यांचा चेहरा लक्षांत ठेवून त्यांना पडद्यावर झळकण्याची संधि देईल या आशेनें अगदीं फुकटांत, पगार न घेतां, रंगभूमीवर कामें करतात. पण चित्रपटव्यवसाय आज टेलिव्हिजनशीं जीवघेण्या संघर्षांत अडकला असल्यानें मोठ्या अडचणींत आहे आणि अत्यंत काटकसरीनें वागत आहे. अगदीं विख्यात नटनट्यासुद्धां आपल्या भविष्यकाळाचा विचार करतांना शहारतात. त्यांच्यांतहि स्पर्धा फार तीव्र आहे आणि चांगल्या भूमिका मिळवणें अत्यंत दुर्लभ होऊन बसलें आहे. आपल्या लोकप्रियतेच्या क्षणभंगुर वैभवकाळांत त्यांनीं बरीचशी पुंजी जमवली नाहीं तर पुन्हा एकदां बेकारीच्या भयानक समुद्रांत त्यांना गटांगळ्या खाव्या लागतात. आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस व्यावसायिक रंगभूमीच्या या ऱ्हासाचीं पूर्व चिन्हें दिसूं लागण्यापूर्वींच अमेरिकन समाजांतल्या एका वाढत्या गटानें जाणलें कीं नाट्यकलेसारखा संस्कृतीचा मौलिक आविष्कार अशा रीतीनें शेअरबाजारी स्वरूपाच्या चढउतारांवर अवलंबून असणें इष्ट नाहीं. कांहीं तरी करणें जरूर होतें आणि तसे प्रयत्न घडलेहि. या प्रयत्नांना 'लिटल थिएटर' चळवळ असें संबोधण्यांत येतें. युरोप खंडांतील अँतोइन, स्टानिस्लावस्की, रीनहार्ट आणि कोपो

यांसारख्या रंगभूमीच्या आद्य प्रवर्तकांच्या मार्गदर्शनाखालीं या चळवळीचा विकास झाला. युजीन ओ' नीलचीं नाटकें प्रथमच रंगभूमीवर आणणारी मॅसाच्युसेट्स येथील 'प्रॉव्हिन्सटाउन प्लेअर्स' ही नाट्यसंस्था आणि 'थिएटर गिल्ड ऑफ न्यूयॉर्क' ही न्यूयॉर्कमधील नाटक कंपनी या दोन 'लिटल थिएटर्स' चळवळींतून जन्माला आलेल्या व कांहींसें यश मिळविणाऱ्या नाट्यसंस्था होत. दोहींची स्थापना १९१५ मध्यें झाली. या दोन्ही संस्थांचें स्वरूप ब्रॉडवेवरील नेहमींच्या संस्थांच्या नेमकें उलट होतें. नफेबाजीच्या कचाट्यांतून रंगभूमीची मुक्तता करून उच्च अभिनयाच्या क्षेत्रांत अनिर्बंधपणें नवे नवे प्रयोग करण्याचा आणि एरवीं ज्या गुणवान् नाट्यप्रयोगांना अमेरिकन प्रेक्षक मुकला असता ते नाट्यप्रयोग रसिकांसमोर सादर करण्याचा या नव्या संस्थांचा मनोदय होता.

आजहि ही चळवळ अप्रतिहतपणें फोफावत आहे. ग्रीनिच (न्यूयॉर्क) येथील 'सर्कल इन् द स्क्वेअर' किंवा डल्लास (टेक्सास) येथील 'मार्गो जोन्स थिएटर' यांसारख्या नव्या, लक्ष वेधून घेणाऱ्या, व्यावसायिक नाट्यसंस्था या चळवळींतून निर्माण झाल्या आहेत. या संस्थांमधलें वातावरण बरेंचसें युरोपमधील 'आर्ट्स थिएटर्स'शीं मिळतें-जुळतें असें असतें. पण त्यांच्या ब्रॉडवे-विरोधी वृत्तीनें विशाल सामाजिक स्वरूपाच्या चळवळींना जन्म दिला आहे आणि या चळवळी आतां सबंध अमेरिकेभर पसरल्या आहेत. त्यांपैकीं पहिली—द कम्युनिटी थिएटर—चळवळ, मुख्यतः, सबंध अमेरिकेंतल्या अफाट प्रेक्षकवर्गाला रंगभूमि ही एक सामाजिक आवश्यकता आहे याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करीत असते. दुसरी—द युनिव्हर्सिटी थिएटर—चळवळ नाट्यकला ही शैक्षणिक दृष्ट्या मौल्यवान् आहे असें मानते आणि अभिजात रंगभूमीची जागतिक परंपरा टिकविण्याचे व तिचा प्रसार करण्याचे प्रयत्न करते.

'कम्युनिटी थिएटर' या संज्ञेचा अर्थ कांहीं म्युनिसिपालिटीच्या मदतीवर चाललेली (चळवळ) असा नाहीं. एका विशिष्ट विभागांत राहणाऱ्या प्रेक्षकांसाठीं असलेली एक स्वतंत्र सामाजिक (नाट्य) संस्था असें या चळवळीचें स्वरूप आहे. अमेरिकेच्या अठ्ठेचाळीस संस्थानांत स्थानिक स्वरूपाचे भिन्न भिन्न कायदे असल्यानें या नाट्यसंस्थांची घटना इतकी गुंतागुंतीची असते कीं तिचें नीटसें वर्णनहि करतां येणार नाहीं. सहकारी मंडळ, क्लब, शैक्षणिक संस्था किंवा अमेरिकनांना आवडत्या अशा कोणत्याहि संघटनाप्रकाराच्या स्वरूपांत या नाट्यसंस्था सांपडूं शकतात. आणि कायदेशीर अर्थानें या साऱ्या संस्था बिननफ्याच्या तत्त्वावर चाललेल्या असतात. म्हणजे असें कीं त्यांना मजूर संघटनांचे वगैरे

संबंधित कायदे व नियम लागू नसतात. त्यामुळें अशा संस्थेला आर्थिक दृष्ट्या तग धरणें शक्य होतें. या संस्थेच्या उत्पन्नाचे सर्वांत खात्रीचे दोन मार्ग म्हणजे सभासदांची वर्गणी आणि देणग्या. या देणग्या चांगल्या घसघशीत असतात. "डेनव्हर (कोलोराडो) येथील श्रीमती अमुक अमुक यांनीं नव्या कम्युनिटी थिएटरसाठीं दहा लक्ष डॉलरची देणगी दिली आहे" अशा प्रकारच्या बातम्या तुमच्या कानीं पडतील आणि तरी त्याबद्दल कोणीसुद्धां आश्चर्य व्यक्त करतांना तुम्हांला आढळणार नाहीं. अमेरिकन रंगभूमीचा विख्यात इतिहासकार जॉर्ज फ्रीडले यानें मला १९५२-५३ च्या हिवाळ्यांत सांगितलें कीं अमेरिकेंत सुमारें दोन लक्ष कम्युनिटी थिएटर्स कार्य करीत आहेत. दुसऱ्या कोणीं जर मला हा आंकडा सांगितला असता तर मीं त्यावर सहसा विश्वास ठेवला नसता. नंतर मला कळलें कीं एकट्या क्लीव्हलँड शहरांत व त्याच्या आसमंतांत अशा तीनशें संस्था आहेत. आणि क्लीव्हलँड हें अमेरिकेच्या मोठ्या शहरांपैकीं खचितच नाहीं. सबंध देशभर कावळ्यांच्या छत्र्यांसारखे या संस्थांचें पीक आलें आहे. 'एरिना' (गोल) रंगभूमीचें नावीन्यपूर्ण स्वरूप आणि अशा प्रयोगांनीं मिळविलेली लोकप्रियता हीं या वाढीचीं कारणें म्हणून सांगतां येतील. अगदीं नवीं सामाजिक दालनें खुलीं करणारी अशी ही रंगभूमि आहे. ज्याचा या कलेकडे ओढा आहे आणि ज्याच्याजवळ आवश्यक ती प्रकाशयोजनेची सामग्री आहे असा कोणीहि कलावंत स्वतःची एक रंगभूमि तयार करून पाहिजे त्या ठिकाणीं प्रयोग करूं शकतो. कोणत्या तरी इमारतींत जागा भाड्यानें घेतली म्हणजे झालें. मग तो एक प्रशस्त हॉल असो, मोठें हॉटेल असो किंवा साधें धान्याचें कोठार असो. अशा प्रकारें शैक्षणिक संस्था, कलावंतांचीं मंडळें, किंवा इतर संघटना अगदीं दूरवरच्या खेड्यांत सुद्धां स्वतःची एक कायम स्वरूपाची नाट्यसंस्था निर्माण करूं शकतात.

यांपैकीं कांहीं 'कम्युनिटी थिएटर्स' संघटना आज फार महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यांतल्या दोन प्रमुख म्हणजे 'क्लीव्हलँड प्लेहाउस' आणि 'पॅसाडेना प्लेहाउस'. 'क्लीव्हलँड प्लेहाउस'चीं दोन प्रशस्त नाट्यगृहें आहेत आणि एक छोटी गोल एरिना पद्धतीची रंगभूमि आहे. 'पॅसाडेना प्लेहाउस' लॉस एंजलिसनजीक असून या संघटनेच्या मालकीचें एक मोठें नाट्यगृह व तीन छोटीं नाट्यगृहें आहेत. या दोन्ही संघटनांच्या नाट्यशिक्षणशाळा आहेत. दोन मोठ्या नाट्यगृहांत नामवंत व्यावसायिक नट कामें करतात, तर विद्यार्थी छोट्या नाट्यगृहांत प्रयोग करतात. पण बहुतेक वेळां ही 'कम्युनिटी थिएटर्स' संघटना फक्त

हौशी कलावंतच घेते. एका अनुभवी दिग्दर्शकाच्या हाताखालीं या हौशी कलवंतांना शिक्षण मिळतें.

अमेरिकन लोकांच्या ज्या अनिवार उत्साहाकडे पाहून युरोपमधून आलेला प्रवासी चकित होऊन जातो त्याच उत्साहाचें एक दर्शन आपल्याला तिथल्या हौशी रंगभूमीद्वारें घडतें. अमेरिकन लोकांची तरुणसुलभ उत्स्फूर्तता, उच्च शिक्षणाबद्दलची त्यांची आवड, आणि त्यांना शाळेंत दिलें जाणारें नाट्यविषयक शिक्षण यांचा हा परिणाम म्हणतां येईल. न्यायाधीश, लष्करी अधिकारी, पत्रकार, दुकानदार, व्यापारी, तंत्रज्ञ, गृहिणी, आणि नोकरी करणाऱ्या स्त्रिया असे सगळ्या व्यवसायांतले स्त्रीपुरुष आधुनिक वास्तववादी नाटकांत भूमिकेशीं अगदीं समरस होऊन कामें करतात. अशीं कामें करण्याची त्यांना मनापासून हौस असते, त्यामुळें त्यांचा रिकामा वेळ अत्यंत मजेंत जातो आणि त्यांची अभिनयकलाहि अधिक समृद्ध होते. पुढें यांपैकीं बरेच हौशी नट इतके तयार होतात कीं ते धंदेवाईक नटांच्या तुलनेचे वाटतात, असें अनेक दिग्दर्शकांनीं मला सांगितलें. त्यांना नीट शिक्षण मिळालें असलें तर त्यांचे नाट्यप्रयोग अत्यंत चांगले वठतात. अमेरिकेचें एक सामाजिक वैशिष्ट्य बनून राहिलेल्या या स्थानिक नाट्यसंस्था सर्वसामान्य अमेरिकनाच्या नाट्यप्रेमाचीच नव्हे तर प्रत्यक्ष अभिनयकलेविषयींच्या त्याच्या आपुलकीची साक्ष देतात.

प्रो. जॉर्ज पियर्स बेकर (१८६६-१९३५) यांनीं अमेरिकेंत विद्यापीठीय रंगभूमीची स्थापना केली आणि तिला सतत स्फूर्ति दिली. प्रो. बेकर या शतकाच्या सुरुवातीस हार्वर्ड विद्यापीठांत नाट्यकलेच्या इतिहासाचे प्राध्यापक होते. ते न्यू इंग्लंडमधल्या प्युरिटनांचे वंशज होते. युरोपांत त्यांचें नांव फारसें कुणाला माहीत नाहीं, पण आपल्याला जर अर्वाचीन अमेरिकेचें स्वरूप समजून घ्यायचें असेल तर आपल्याला प्रो. बेकर यांच्या नांवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. बेकर हे एक (अत्यंत व्यापक अर्थानें) राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षणतज्ज्ञ होते. एका संस्कृतींत अत्यंत मौलिक भर घालणारी ही एक थोर व्यक्ति होती.

नाट्य हा संस्कृतीचा श्रेष्ठतम व सम्यक् आविष्कार आहे, असा प्रो. बेकर यांचा दृढ विश्वास होता. आपण जसें संगीतकला, चित्रकला किंवा शिल्पकला यांचें शिक्षण देतों त्याचप्रमाणें कांहीं प्रमाणांत नाट्यलेखनाचें शिक्षणहि देतां येतें आणि तें तसें दिलेंच पाहिजे असेंहि त्यांचें मत होतें. त्यासाठीं त्यांनीं १९१३ सालीं हार्वर्डमध्यें नाट्यलेखनाचें शिक्षण देणारा एक वर्ग सुरू केला. या वर्गाला 'वर्कशॉप ४७' म्हणत. त्यांच्या विद्यार्थ्यांकडून आपल्याला अशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थळप्रत.
अनुक्रम २३८७२ वि: निबंध
क्रमांक ..... नों: दि: २६।८।५८

# अमेरिका : एक प्रबंध

**[ An Essay on America ]**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९८७८

लेखक
जॉर्ज थिओटोकास

अनुवादक
मधु अभ्यंकर

REFBK-0009774

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

मूल्य अडीच रुपये

हौशी कलावंतच घेते. एका अनुभवी दिग्दर्शकाच्या हाताखालीं या हौशी कलावंतांना शिक्षण मिळतें.

अमेरिकन लोकांच्या ज्या अनिवार उत्साहाकडे पाहून युरोपमधून आलेला प्रवासी चकित होऊन जातो त्याच उत्साहाचें एक दर्शन आपल्याला तिथल्या हौशी रंगभूमीद्वारें घडतें. अमेरिकन लोकांची तरुणसुलभ उत्स्फूर्तता, उच्च शिक्षणाबद्दलची त्यांची आवड, आणि त्यांना शाळेंत दिलें जाणारें नाट्यविषयक शिक्षण यांचा हा परिणाम म्हणतां येईल. न्यायाधीश, लष्करी अधिकारी, पत्रकार, दुकानदार, व्यापारी, तंत्रज्ञ, गृहिणी, आणि नोकरी करणाऱ्या स्त्रिया असे सगळ्या व्यवसायांतले स्त्रीपुरुष आधुनिक वास्तववादी नाटकांत भूमिकेशीं अगदीं समरस होऊन कामें करतात. अशीं कामें करण्याची त्यांना मनापासून हौस असते, त्यामुळें त्यांचा रिकामा वेळ अत्यंत मजेंत जातो आणि त्यांची अभिनयकलाहि अधिक समृद्ध होते. पुढें यांपैकीं बरेच हौशी नट इतके तयार होतात कीं ते धंदेवाईक नटांच्या तुलनेचे वाटतात, असें अनेक दिग्दर्शकांनीं मला सांगितलें. त्यांना नीट शिक्षण मिळालें असलें तर त्यांचे नाट्यप्रयोग अत्यंत चांगले वठतात. अमेरिकेचें एक सामाजिक वैशिष्ट्य बनून राहिलेल्या या स्थानिक नाट्यसंस्था सर्वसामान्य अमेरिकनाच्या नाट्यप्रेमाचीच नव्हे तर प्रत्यक्ष अभिनयकलेविषयींच्या त्याच्या आपुलकीची साक्ष देतात.

प्रो. जॉर्ज पियर्स बेकर (१८६६-१९३५) यांनीं अमेरिकेंत विद्यापीठीय रंगभूमीची स्थापना केली आणि तिला सतत स्फूर्ति दिली. प्रो. बेकर या शतकाच्या सुरुवातीस हार्वर्ड विद्यापीठांत नाट्यकलेच्या इतिहासाचे प्राध्यापक होते. ते न्यू इंग्लंडमधल्या प्युरिटनांचे वंशज होते. युरोपांत त्यांचें नांव फारसें कुणाला माहीत नाहीं, पण आपल्याला जर अर्वाचीन अमेरिकेचें स्वरूप समजून घ्यायचें असेल तर आपल्याला प्रो. बेकर यांच्या नांवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. बेकर हे एक (अत्यंत व्यापक अर्थानें) राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षणतज्ज्ञ होते. एका संस्कृतींत अत्यंत मौलिक भर घालणारी ही एक थोर व्यक्ति होती.

नाट्य हा संस्कृतीचा श्रेष्ठतम व सम्यक् आविष्कार आहे, असा प्रो. बेकर यांचा दृढ विश्वास होता. आपण जसें संगीतकला, चित्रकला किंवा शिल्पकला यांचें शिक्षण देतों त्याचप्रमाणें कांहीं प्रमाणांत नाट्यलेखनाचें शिक्षणहि देतां येतें आणि तें तसें दिलेंच पाहिजे असेंहि त्यांचें मत होतें. त्यासाठीं त्यांनीं १९१३ सालीं हार्वर्डमध्यें नाट्यलेखनाचें शिक्षण देणारा एक वर्ग सुरू केला. या वर्गाला 'वर्कशॉप ४७' म्हणत. त्यांच्या विद्यार्थ्यांकडून आपल्याला अशी

माहिती मिळते कीं, प्रो. बेकर शिकवतांना कोणतींहि तत्त्वें विद्यार्थ्यांवर लादीत नसत किंवा नियमांची लोखंडी चौकटहि निर्माण करीत नसत.[१] लेखकाला प्रतिभेची देणगी जन्मजातच असते पण आपल्या कलेच्या साधनांशीं त्याचा नीट परिचय घडून येण्यासाटीं त्याला कांहीं किमान शिक्षण दिलें गेलें पाहिजे असें त्यांचें मत होतें. लेखनाच्या विविध बाजू, आवश्यक तें तंत्र आणि अनुभवांतून मिळणारे धडे यांचें त्यानें शिक्षण घेतलेंच पाहिजे असें त्यांचें मत होतें. विद्यार्थ्यांनीं लिहिलेल्या नाट्यकृतींच्या अनुषंगानें या वर्गांत नाट्यलेखनाच्या तंत्राविषयीं शिक्षण दिलें जाई. उदार सहकार्याच्या, सामंजस्याच्या आणि आपल्या विषयासंबंधींच्या प्रेमाच्या वातावरणांत, प्रतिभावंत लोकांना पुढें येण्याची संधि दिली जाई. प्रो. बेकर यांच्या अगदीं सुरुवातीच्या शिष्यांपैकीं एक म्हणजे यूजिन ओ' नील.

लौकरच प्रो. बेकरना कळून आलें कीं आपलें शिक्षण फलदायी ठरण्यासाठीं त्याला प्रात्यक्षिकाची जोड दिली पाहिजे. म्हणजेच विद्यार्थ्यांनीं स्वतः रंगभूमीवर काम केलें पाहिजे. अशा प्रकारें त्यांनीं हार्वर्डच्या नाट्यशिक्षणक्रमांत अभिनयाच्या प्रात्यक्षिकांचा समावेश केला. पुढें जेव्हां रसिकांकडून आणि मित्रांकडून त्यांना पुरेशा देणग्या मिळाल्या तेव्हां त्यांनीं अशी सूचना केली कीं हार्वर्डमध्यें एक नाट्यशिक्षणशाळा सुरू करावी आणि या शाळेसाठीं एक कायम शिक्षक नेमण्यांत यावा. ही शाळा जनतेसाठीं असावी. पण हार्वर्ड विद्यापीठ फार सनातनी मतांचें होतें आणि ही कल्पना तेथें फेटाळून लावण्यांत आली. पण येल विद्यापीठाला या कल्पनेचें आकर्षण वाटलें आणि त्यानें प्रो. बेकरना त्यांचें स्वप्न साकार करण्यासाठीं येलला बोलावलें. १९२५ सालीं येल विद्यापीठांत ललित कलांच्या अभ्यासक्रमांतला एक भाग म्हणून नाट्यविभाग सुरू करण्यांत आला. प्रो. बेकर या विभागाचे प्रमुख होते. या अभ्यासक्रमाला स्थापत्य आणि शिल्पशास्त्रांच्या बरोबरीचा दर्जा देण्यांत आला होता. पिट्सबर्गमधील 'कार्नेगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संस्थेच्या ललित कलांच्या कॉलेजांत १९१४ पासूनच असा नाट्य-विभाग सुरू होता. पण येल विद्यापीठांतील हा अभ्यासक्रम मात्र सबंध देशाच्या बौद्धिक आणि कलात्मक जीवनावर प्रभाव पाडणारा ठरला आहे याचें सारें श्रेय बेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाला व त्यांच्या परिश्रमांना दिलें पाहिजे.

---

१. 'थिएटर आर्ट्स' मासिकाच्या जुलै १९३३ च्या अंकांतील बॉइड स्मिथ आणि जॉन मेसन ब्राउन यांचे या विषयावरचे लेख पाहा.

अशा बौद्धिक आणि मानसशास्त्रीय प्रवृत्ती इथें एकमेकांत विलीन होत असलेल्या आपल्याला पाहायला मिळतात यांत शंका नाहीं. या सर्व प्रवृत्तींचें आंतरिक सामर्थ्य आज तिथें एकवटलें जात आहे आणि त्यांतूनच भविष्यकाळीं बौद्धिक आणि कलानिर्मितीच्या क्षेत्रांत गाजवावयाच्या नव्या नव्या पराक्रमांची तयारी होत आहे. विद्यापीठांतील नाट्यविभाग मुख्यतः भावी काळासाठीं नवे मार्ग आणि नवीं तंत्रें शोधून काढून अनुकूल वातावरण निर्माण करीत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. या सगळ्या परिश्रमांची आणि सर्जनशील प्रयत्नांची फलश्रुति अखेर काय आहे, तें आत्तांच सांगतां येणार नाहीं. पण एक मात्र खरें कीं विद्यापीठांतील रंगभूमीद्वारा अमेरिका नवे नवे नाट्यनिपुण कलावंत तयार करीत आहे आणि या कलावंतांनीं आपल्या कौशल्यानें भविष्यकाळाबद्दल मनांत आशा निर्माण केल्या आहेत.

प्रकरण सोळावें

# निग्रो लोक

आम्ही न्यूयॉर्कला पोंचल्यावर तिसऱ्या दिवसाची गोष्ट. सुप्रसिद्ध 'फिफ्थ ॲव्हेन्यू'वरून जाणाऱ्या बसनें आम्ही जनरल ग्रँटची समाधि पाहण्यास निघालों होतों. उन्हाळा संपत आला होता. त्या रविवारची दुपार तर अत्यंत रम्य होती. सर्वत्र स्वच्छ सूर्यप्रकाश भरून राहिला होता आणि माझ्या मनांत अमेरिकेंतील आणि आपल्या एकंदर जीवनांतील आनंददायक अशा गोष्टींबद्दलच विचार घोळत होते. "त्या सबंध रस्त्यावर आणि सबंध गांवावर एक प्रकारचें अवर्णनीय असें आनंदाचें, निरागस...स्नेहपूर्ण वातावरण पसरलें होतें." असें वर्णन डी. डब्ल्यू. ब्रॉगन यांनीं एके ठिकाणीं केलें आहे. 'जगांतील सर्वांत श्रीमंत रस्त्यावरील' उत्कृष्ट इमारती आणि सेंट्रल पार्क उद्यानांतील वृक्षांच्या रांगा यांमधून आमच्या बसनें सफाईदार वळण घेतलें. रविवार असल्यानें रोजची वर्दळ बंद होती. त्यामुळें न्यूयॉर्कचें नवें, शांत-सुंदर स्वरूप आम्हांला पाहायला मिळालें. अगदीं आकस्मिकपणें, कोणत्याहि प्रकारची पूर्वसूचना न मिळतां पलीकडील दोन इमारतींमधल्या वातावरणांत एकदम बदल झाल्यासारखें मला वाटूं लागलें. या नव्या वातावरणांत एक अशी कांहीं अस्वस्थता होती कीं त्या रविवारच्या दुपारची सगळी शांति आणि विशुद्धता या अस्वस्थतेनें बिघडून गेली. मी परका असल्यामुळें मला या लोकांच्या अंतर्गत भानगडींत पडण्याचें कांहीं कारण नाहीं, या विचारानें मला खूपच बरें वाटूं लागलें. बाहेरील लोकांमध्यें काळे चेहरे अधिकाधिक दिसूं लागले होते आणि हीं काळीं माणसें उघड्या खिडक्यांमध्यें आणि फूटपाथवर गर्दी करीत होतीं. निग्रोंची राजधानी समजल्या जाणाऱ्या हार्लेम विभागांत आमच्या बसनें प्रवेश केला होता.

"हार्लेममध्यें पाऊल टाकूं नका," असें आम्हांला कितीतरी वेळां मित्रांनीं सांगितलें आहे. "केवळ कामापुरतेंच गोऱ्या माणसानें हार्लेममध्यें जावें आणि त्या वेळींसुद्धां तिथला एकादा माहीतगार इसम बरोबर असेल तरच." ही सूचना मीं कितीदां तरी ऐकली आहे. हार्लेमच्या हवेंत एक प्रकारची रहस्यमयता

आज कोणत्याहि चांगल्या विद्यापीठाची अशी किमान एक नाट्यशाळा आणि विद्यापीठाच्या आवारांतच एक नाट्यगृह नसणें या गोष्टी कल्पनेंतसुद्धां अवास्तव वाटतात. यांपैकीं कांहीं नाट्यगृहें तर अशीं आहेत कीं राजधानीच्या शहरांनीं सुद्धां त्यांचा हेवा करावा. याला मोठा अपवाद एकच—आणि तो म्हणजे आपली चूक झाली हें कबूल न करणारें हार्वर्ड विद्यापीठ.

सर्व नाट्यशाळा कांहीं एकाच धर्तीच्या नसतात. उदाहरणार्थ, रंगभूमीबद्दलचें तांत्रिक शिक्षण देण्यावर येलमध्यें विशेष भर दिला जातो. तेथील प्रकाशयोजना इतकी प्रगत आणि इतकी खर्चाची आहे कीं ब्रॉडवेलासुद्धां ही चैन परवडणार नाहीं. याउलट कॅलिफोर्नियांतील विद्यापीठांचें म्हणणें असें कीं तांत्रिक बाजूवर अवास्तव भर दिला जातो. या विद्यापीठांचे नाट्यतज्ज्ञ अत्यंत जिव्हाळ्यानें असें सांगतात कीं रंगभूमीचें स्वरूप कटाक्षानें सांस्कृतिकच राहिलें पाहिजे. प्रगल्भ अभ्यासक्रमाचाच तो एक भाग असला पाहिजे आणि त्यानें विद्यार्थ्यांचें मन, आवडीनिवडी आणि त्याचें शील यांना योग्य वळण लावलें पाहिजे. या उलट-सुलट मतांमधून एक गोष्ट सिद्ध होते कीं, विद्यापीठांमधील रंगभूमि ही एक सांचेबंद संस्था नसून ती उत्साहपूर्ण व जिवंत चळवळ आहे, आणि नव्या नव्या पद्धतींचा अवलंब करण्यास ती नेहमींच उत्सुक असते.

किती विविध प्रकारचे लोक या नाट्यशाळांत शिकत असतात हें पाहून एकाद्याला आश्चर्य वाटेल. आपण एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं अमेरिकन विद्यार्थी स्वतःचा अभ्यासक्रम निवडायला पूर्णपणें मोकळा असतो. अर्थात् त्याच्या विशिष्ट निवडीला आवश्यक असे कांहीं विषय त्याला सक्तीचे असतात. पण पदवी-परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठीं जितक्या एकूण मार्कांची परीक्षा द्यावी लागते तितकी बेरीज भरण्यासाठीं त्याला आपल्या आवडीचे विषय निवडण्याला भरपूर वाव असतो. म्हणूनच वेगवेगळ्या विषयांत तज्ज्ञ होणार असलेले विद्यार्थी नाट्यशाळेंत दाखल होतात. अर्थात् जे पुढें रंगभूमि हाच आपला व्यवसाय करणार आहेत असेहि विद्यार्थी त्यांत असतात; मग त्यांची मनीषा नाटककार होण्याची असो, किंवा दिग्दर्शक, नट, नेपथ्यतज्ज्ञ, तंत्रज्ञ किंवा नाट्य-शिक्षक होण्याची असो. एक साहित्यप्रकार किंवा शैक्षणिक साधन म्हणून नाटकाकडे बघणारे वाङ्मयप्रेमी आणि शिक्षक या अभ्यासक्रमाकडे वळूं शकतात. किंवा ज्यांना पुढें सिनेमा, रेडिओ, टेलिव्हिजन या क्षेत्रांत काम करायचें आहे असे इंजिनियरसुद्धां नाट्यशाळेंत शिक्षण घेतात. केवळ आपल्या शैक्षणिक ज्ञानांत भर पडावी यासाठीं दाखल होणारेहि अनेक विद्यार्थी असतात. आणि

हे बहुतेक सर्व विद्यार्थी पुढें निरनिराळ्या व्यवसायांत शिरले तरी हौशी नट नटी म्हणून कामें करीत राहतात.

अमेरिकेंतील विद्यापीठांची रंगभूमि हें सगळ्या जगांतील देशांच्या नाट्य-परंपरांचें संगमकेंद्र बनलें आहे. या रंगभूमीवर प्राचीन ग्रीक नाटकें पाहायला मिळतात. शेक्सपियरच्या नाट्यकृति सादर केल्या जातात. जुनीं स्पॅनिश, फ्रेंच आणि जर्मन नाटकें किंवा आधुनिक काळचीं इब्सेन–चेकॉव्ह यांचीं श्रेष्ठ नाटकें होत असतात. नवीं नवीं अमेरिकन आणि ब्रिटिश नाटकें तर सतत बसवलीं जात असतात. ब्रॉडवेंत आणि या विद्यापीठ रंगभूमींत एक मोठा फरक असा कीं, या रंगभूमीवर इंग्लिशेतर युरोपियन भाषांमधल्या महत्त्वाच्या नाटकांचे इंग्लिश भाषांतरित प्रयोग हौसेनें बसवले जातात.

विद्यापीठाचे नाट्यतज्ज्ञ या नाटकांचें दिग्दर्शन करतात. नाट्यशाळेचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी त्यांत कामें करतात. शिवाय ते आळीपाळीनें निर्मिति-व्यवस्थेंतील वेगवेगळ्या कामांतहि साहाय्य करतात. रंगमंचाची सजावट, पात्रांची वेषभूषा, रंगमंच व्यवस्था, प्रॉम्प्टिंग, प्रकाशयोजना किंवा इतर पडेल तें काम करण्याची या विद्यार्थ्यांची तयारी असते. उत्कृष्ट नाट्यप्रयोगासाठीं कराव्या लागणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांचा आणि परिश्रमांचा अनुभव प्रत्येक विद्यार्थ्यानें स्वतः हीं कामें करून मिळविला पाहिजे, हें या नाट्यशाळेचें मुख्य तत्त्व आहे. पुष्कळशा विद्यापीठांचीं नाट्यमंडळें तर व्यावसायिक नाटक मंडळ्यांसारखीं चालवलीं जातात. माफक दरांचीं तिकिटें ठेवून हीं मंडळें लोकांसाठीं जाहीर नाट्यप्रयोग करीत असतात. या विद्यापीठांमधील छोट्या नाट्यगृहांत पुष्कळदां विद्यार्थी त्यांनीं स्वतः लिहिलेलीं नाटकें बसवतात. प्रा. बेकर यांनीं हीच पद्धत सुचवली होती. हे प्रयोग मात्र लोकांसाठीं खुले नसतात. कधीं या नाटकांना कांहीं विशिष्ट दर्जा यावा आणि कामें करणाऱ्यांनाहि उत्साह वाटावा म्हणून मुख्य कामांसाठीं कांहीं नामांकित व्यावसायिक नट-नटींना बोलावलें जातें. या प्रकारच्या नाटकांतून निर्मितीबाबतचे नवीन नवीन प्रयोग करून पाहतात. अगदीं जुन्या पद्धतीच्या तंत्रापासून तों अत्याधुनिक तंत्रापर्यंत सर्व तंत्रांची प्रायोगिकता कसाला लावली जाते. या निर्मितीच्या पद्धतीबाबत प्रत्येक गटाला संपूर्ण स्वातंत्र्य असतें. त्यांना आपल्या प्राध्यापकांची अनुमति मिळवावी लागत नाहीं.

विद्यापीठांच्या आवारांतील या प्रशांत पण आनंदमय वातावरणांत अमेरिकेचें सांस्कृतिक जीवन हळूहळू सुजाण होत आहे. अमेरिकेंतील अत्यंत गुंतागुंतीच्या

अशा बौद्धिक आणि मानसशास्त्रीय प्रवृत्ती इथें एकमेकांत विलीन होत असलेल्या आपल्याला पाहायला मिळतात यांत शंका नाहीं. या सर्व प्रवृत्तींचें आंतरिक सामर्थ्य आज तिथें एकवटलें जात आहे आणि त्यांतूनच भविष्यकाळीं बौद्धिक आणि कलानिर्मितीच्या क्षेत्रांत गाजवावयाच्या नव्या नव्या पराक्रमांची तयारी होत आहे. विद्यापीठांतील नाट्यविभाग मुख्यतः भावी काळासाठीं नवे मार्ग आणि नवीं तंत्रें शोधून काढून अनुकूल वातावरण निर्माण करीत असल्याचें स्पष्ट दिसून येतें. या सगळ्या परिश्रमांची आणि सर्जनशील प्रयत्नांची फलश्रुति अखेर काय आहे, तें आत्तांच सांगतां येणार नाहीं. पण एक मात्र खरें कीं विद्यापीठांतील रंगभूमीद्वारा अमेरिका नवे नवे नाट्यनिपुण कलावंत तयार करीत आहे आणि या कलावंतांनीं आपल्या कौशल्यानें भविष्यकाळाबद्दल मनांत आशा निर्माण केल्या आहेत.

प्रकरण सोळावें

# निग्रो लोक

आम्ही न्यूयॉर्कला पोंचल्यावर तिसऱ्या दिवसाची गोष्ट. सुप्रसिद्ध 'फिफ्थ ॲव्हेन्यू'वरून जाणाऱ्या बसनें आम्ही जनरल ग्रँटची समाधि पाहण्यास निघालों होतों. उन्हाळा संपत आला होता. त्या रविवारची दुपार तर अत्यंत रम्य होती. सर्वत्र स्वच्छ सूर्यप्रकाश भरून राहिला होता आणि माझ्या मनांत अमेरिकेंतील आणि आपल्या एकंदर जीवनांतील आनंददायक अशा गोष्टींबद्दलच विचार घोळत होते. "त्या सबंध रस्त्यावर आणि सबंध गांवावर एक प्रकारचें अवर्णनीय असें आनंदाचें, निरागस...स्नेहपूर्ण वातावरण पसरलें होतें." असें वर्णन डी. डब्ल्यू. ब्रॉगन यांनीं एके ठिकाणीं केलें आहे. 'जगांतील सर्वांत श्रीमंत रस्त्यावरील' उत्कृष्ट इमारती आणि सेंट्रल पार्क उद्यानांतील वृक्षांच्या रांगा यांमधून आमच्या बसनें सफाईदार वळण घेतलें. रविवार असल्यानें रोजची वर्दळ बंद होती. त्यामुळें न्यूयॉर्कचें नवें, शांत-सुंदर स्वरूप आम्हांला पाहायला मिळालें. अगदीं आकस्मिकपणें, कोणत्याहि प्रकारची पूर्वसूचना न मिळतां पलीकडील दोन इमारतींमधल्या वातावरणांत एकदम बदल झाल्यासारखें मला वाटूं लागलें. या नव्या वातावरणांत एक अशी कांहीं अस्वस्थता होती कीं त्या रविवारच्या दुपारची सगळी शांति आणि विशुद्धता या अस्वस्थतेनें बिघडून गेली. मी परका असल्यामुळें मला या लोकांच्या अंतर्गत भानगडींत पडण्याचें कांहीं कारण नाहीं, या विचारानें मला खूपच बरें वाटूं लागलें. बाहेरील लोकांमध्यें काळे चेहरे अधिकाधिक दिसूं लागले होते आणि हीं काळीं माणसें उघड्या खिडक्यांमध्यें आणि फूटपाथवर गर्दी करीत होतीं. निग्रोंची राजधानी समजल्या जाणाऱ्या हार्लेम विभागांत आमच्या बसनें प्रवेश केला होता.

"हार्लेममध्यें पाऊल टाकूं नका," असें आम्हांला कितीतरी वेळां मित्रांनीं सांगितलें आहे. "केवळ कामापुरतेंच गोऱ्या माणसानें हार्लेममध्यें जावें आणि त्या वेळींसुद्धां तिथला एकादा माहीतगार इसम बरोबर असेल तरच." ही सूचना मीं कितीदां तरी ऐकली आहे. हार्लेमच्या हवेंत एक प्रकारची रहस्यमयता

आहे. हिंसा, गुन्हेगारी, परस्परांबद्दल अविश्वास यांच्या गडद छटा त्या वातावरणांत तरंगत असतात. कितीहि लगबगीनें आणि काळजीपूर्वक ही वस्ती पार करून पुढें जाण्याचा एकाद्या नवख्या माणसानें प्रयत्न केला तरी अनेक काळेभोर डोळे आपल्यावर पाळत ठेवीत आहेत, आपल्यावर कसले तरी निष्कारण आरोप करीत आहेत अशी भावना त्याच्या मनांत बळावल्याखेरीज राहणार नाहीं. अकारण आपल्याकडे वाकडेपणानें पाहणाऱ्या या लोकांबद्दल त्याच्याहि मनांत स्वाभाविकपणें अप्रीति निर्माण होते. आणि अखेर एकदम त्याला अमेरिकन जीवनावरील एका कलंकाची—निग्रो प्रश्नाची—जाणीव होते.

अमेरिकेच्या पश्चिम आणि उत्तर भागांत हा प्रश्न तितकेंसें लक्ष वेधून घेत नाहीं ही गोष्ट खरी आहे. घरें मिळण्याच्या अडचणीपुरताच मोठ्या शहरांत हा प्रश्न आपल्या ध्यानांत येतो. आणि ही कांहीं तितकीशी महत्त्वाची अडचण नाहीं. शहरांतील निग्रो वस्तीखेरीज अन्य भागांतहि जाऊन राहण्याकडे निग्रोंची प्रवृत्ति असते. गोरे लोक ही लाट थांबवण्याचा प्रयत्न करीत असतात, आणि जेव्हां तें अशक्य आहे असें दिसून येतें तेव्हां स्वतःच काढता पाय घेतात. आतां मात्र निग्रो वस्तीची सरहद्द कटाक्षानें मर्यादित राखण्याचा ते प्रयत्न करतात. दैनंदिन जीवनाच्या पृष्ठभागाखालीं सतत सुरू असलेला हा संघर्ष आपल्याला कळूं शकतो. दोन्ही बाजूंस अत्यंत दाट लोकवस्ती असलेले निग्रो रस्ते, तेथील हलाखीचें जीवनमान, आणि त्यांच्या आयुष्यांतली एकंदर अनिश्चितता यामुळें गुन्हेगारी प्रवृत्ति वाढते आणि समाजाच्या सगळ्या वंशांमधील संशयास्पद वर्तनाच्या आणि हेतूंच्या व्यक्ती या वस्तींत राहायला येतात. नैतिकता, सामाजिक सभ्यता आणि प्रामाणिकपणा यांना अशा प्रकारें वर्णद्वेषाचें ग्रहण लागतें.

वरील राहण्याच्या घरांचा प्रश्न सोडला तर इतर बाबतींत उत्तर आणि पश्चिम संस्थानांमध्यें काळ्या-गोऱ्यांच्या स्थितींत फारशी तफावत भासत नाहीं. सार्वजनिक ठिकाणीं निग्रो लोक निर्भयपणें गोऱ्यांमध्यें मिसळतात. (खास गोऱ्यांसाठीं राखून ठेवलेल्या करमणुकीच्या ठिकाणीं मात्र निग्रो लोकांना मज्जाव असतो. वेटर किंवा गायक अशीं कामें करणारे तिथले निग्रो नोकरच फक्त तिथें वावरूं शकतात.) शाळांतून आणि विद्यापीठांतून ते गोऱ्यांबरोबर शिक्षण घेतात, सरकारी आणि म्युनिसिपल कचेऱ्यांत कामें करतात, आणि कित्येक महत्त्वाच्या हुद्द्यांवरहि निग्रो अधिकारी असतात. आम्हीं भेट दिलेल्या क्लीव्हलँडमधील कारामु संघटनेसारखें या दोन जमातींच्या ऐक्याचें आदर्श उदाहरणहि तुम्हांला आढळूं शकतें. कारामु हें एक शैक्षणिक केंद्र आहे. तेथें नाट्य, नृत्य आणि

इतर ललित कलांचें शिक्षण देण्यांत येतें. एक उत्तम प्रकारें चालविलें जाणारें नाट्यगृहहि तिथें आहे. निग्रोंची बौद्धिक पातळी वाढावी आणि या दोन वर्णांत निकट मैत्री, सहकार्य व परस्परांबद्दल समंजसपणाचें वातावरण निर्माण व्हावें यासाठीं ही संघटना स्थापन झाली आहे. अशा चळवळींमध्यें आपल्याला पूर्वीच्या प्यूरिटन लोकांसारखी सेवेची तळमळ दिसून येते.

दक्षिणेंत मात्र परिस्थिति अगदींच निराळी आहे. न्यू ऑर्लिन्समधील ट्रॅम वाहतूक हें त्याचें बोलकें उदाहरण म्हणतां येईल. तिथें प्रथमच गोरे आणि काळे लोक वेगवेगळ्या भागांत बसलेले आम्हीं पाहिले. ट्रॅममधील मागच्या बाकांवर 'फक्त काळ्या ग्राहकांकरितां' अशी पाटी लटकत होती. मागील बाकांवर न बसण्याचें हें गोऱ्या लोकांना सौजन्यपूर्ण निमंत्रण होतें काय? नाहीं. काळ्या लोकांना ट्रॅमच्या पुढील भागांत गोऱ्यांच्या बरोबरीनें बसण्यास बंदी करणारा तो एक सौजन्यपूर्ण मनाईहुकूम होता!

अगदीं आजसुद्धां दक्षिणेकडला प्रदेश हा अमेरिकेचा एक मागसलेला, दुर्लक्षित आणि जुन्या संघर्षांच्या आठवणी मनांत घोळवत बसलेला असा भाग आहे. हा प्रदेश मुख्यतः ग्रामीण स्वरूपाचा आहे. इतर देशाच्या मानानें तो तंत्रज्ञानदृष्ट्या आणि आर्थिक दृष्ट्या अप्रगत आहे. राज्यकारभार आणि सामाजिक संघटना या क्षेत्रांतहि तिथें खूप उणिवा आहेत. तिथल्या गाड्या नेहमीं वेळापत्रकापेक्षां उशिरां येतात. भूतकाळांत जमा झालेल्या कालखंडापासून चालत आलेले द्वेषभावना आणि तर्कदुष्ट पूर्वग्रह तेथील लोकांच्या मनांत घर करून राहिले आहेत. त्यांच्यांत अद्याप अनेक भ्रामक समजुती प्रचलित आहेत. या भागांत एक प्रकारचें कसलें तरी गूढ वातावरण नांदत असतें आणि त्यांतहि एक विशिष्ट रम्यता आहे. अमेरिकेच्या इतर भागांतल्या लोकांपेक्षां या लोकांची सर्व प्रकारचे गुन्हे करण्याकडे, कायदा स्वतःच्या हातांत घेण्याकडे अणि अविचारी कृत्यें करण्याकडे जास्त प्रवृत्ति आहे. आज हा विभाग प्रगतीच्या मार्गावर आहे हें खरें. दक्षिणेंत आतां मोठमोठे उद्योगधंदे निघूं लागल्यामुळें तेथील जीवनमान सुधारत आहे आणि विचारसरणींत व चालीरीतींतहि बदल घडून येत आहे. पण जोंपर्यंत तेथील समाजव्यवस्थेचीच आमूलाग्र पुनर्रचना केली जात नाहीं तोंपर्यंत ही मनोविकृति आणि हा नैतिक पेचप्रसंग कायम टिकणार आणि दक्षिण अमेरिका तिच्या स्वतःच्याच पूर्वेतिहासाचा बळी बनून राहणार.

वर्णद्वेष हा दक्षिणेचा सर्वांत मोठा, आजपर्यंत न सुटलेला आणि कदाचित् पुढेंहि लवकर सुटणार नाहीं असा कूटप्रश्न आहे. बाकीचे सगळे राजकीय,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ........................ दि: ....................

आर्थिक आणि सामाजिक प्रश्न गौण आहेत. हा एकच यक्षप्रश्न लोकांच्या मनांत अहर्निश वावरत असतो आणि त्यांचें जीवन विखारी करीत असतो. एकूण लोकसंख्येंत निग्रोंचें प्रमाण आश्चर्य वाटण्याइतकें जास्त आहे, असें सार्वत्रिक खानेसुमारीच्या आंकड्यांवरून दिसून येतें. दक्षिण कॅरोलिना आणि मिसिसिपी या दोन संस्थानांची तर जवळजवळ निम्मी लोकसंख्या निग्रो आहे. इतर संस्थानांत हें प्रमाण कांहीं विशेष कमी नाहीं. पूर्वींच्या गुलामगिरीची, यादवी युद्धाची, दुःखद आठवण अत्यंत प्रकर्षानें जागृत करणारा हा वर्णद्वेष ठिकठिकाणीं, प्रत्येक पावलागणिक, प्रकट होत असतो. सार्वजनिक चौकांतून उभारलेल्या सेनापतींच्या पुतळ्यांनीं तर यादवी युद्ध कायम स्मरणांत राहतें. युरोपांतील राष्ट्रें ज्याप्रमाणें आपल्या थोर राजांचा आणि सम्राटांचा सन्मान करतात त्याप्रमाणें अमेरिकेच्या दक्षिण संस्थानांत संघराज्यविरोधी बंडाच्या नेत्यांचा गौरव केला जातो. असें बंड करण्यांत आपली चूक झाली होती ही गोष्ट दक्षिण संस्थानें केव्हांहि कबूल करणार नाहींत आणि जरी आपल्या हातून कांहीं चुका घडल्या तरी त्या चुका करण्यास आपल्याला भाग पाडणाऱ्यांचाच तो दोष आहे अशी त्यांची भूमिका असते. देशाच्या परंपरा टिकविण्यासाठीं आणि आपल्या वंशाची शुद्धता कायम राखण्यासाठीं हें पूर्वींच सुरू झालेलें धर्मयुद्ध आपण एका निराळ्या प्रकारें व निराळ्या पातळीवर पुढें चालवीत आहोंत अशी दक्षिण संस्थानांची भावना आहे. या संस्थानांत केव्हां केव्हां वर्णद्वेषाची अशी पिसाट आणि क्रूर लाट उसळते कीं हा प्रश्न त्यामुळें अधिकच बिकट होतो.

पुढील दोनच शब्दांत हा प्रश्न सारांशरूपानें मांडतां येईल : घरें आणि सार्वजनिक वाहतूक या बाबतींत 'विभक्तता', आणि राजकीय, वैध, सामाजिक, मानवी हक्कांच्या बाबतींतहि 'पक्षपात'. दक्षिणेंत हा सारा संघर्ष इतकें विदारक रूप धारण करतो कीं सबंध जनता सामील झालेलें हें एक भयानक, विचित्र, सामूहिक नाट्य आहे असा भास होतो. अमेरिकेच्या इतर भागांतहि वरील दोन वाक्प्रयोगांवर सतत चर्चा सुरू असते. अमेरिकेच्या अंगावरलें हें दुखरें करट नीट समजल्याशिवाय कुणालाहि खरी अमेरिका कळूं शकणार नाहीं. "वाडवडिलांचीं पापें मुलांना भोगावीं लागतील" या बायबलमधील उक्तीचेंच हें सत्य सृष्टींतलें प्रत्यंतर होय.

वेगवेगळ्या प्रकारें या प्रश्नाचा खुलासा करण्यांत येतो. अमेरिकेंतील निग्रोंची गुलामगिरी मूलतः आर्थिक कारणांमुळें निर्माण झाली. पण सद्यःपरिस्थितीच्या प्रकाशांत हीं कारणें समर्पक वाटत नाहींत. देशाच्या बऱ्याचशा भागांत हा प्रश्न

कायम राहण्यामागें जबरदस्त सामाजिक हितसंबंध निगडित असलेले दिसतात. तरीहि या परिस्थितीमुळें अमेरिकेला अतोनात आर्थिक नुकसान सहन करावें लागतें असें निःशंकपणें म्हणतां येईल. हा प्रश्न जर मिटला तर दोन जमातींकरितां विभक्त शाळा, इस्पितळें आणि इतर सुखसोयी पुरविण्यांत जो अवाढव्य पैसा खर्च होतो तो वांचेल आणि दक्षिण संस्थानांच्या प्रगतीच्या मार्गांतले अनेक अडथळे दूर होतील. त्यामुळें या संस्थानांत आधुनिक सुधारणा घडून येण्यास अत्यंत मदत होईल आणि राष्ट्रीय उत्पन्न वाढेल. निग्रो लोकांना नोकरींत न घेणाऱ्या अनेक कंपन्या आणि कारखाने अमेरिकेंत सर्वत्र आहेत, पण आपल्या या धोरणापासून त्यांना कांहींच फायदा नाहीं. उलट गोऱ्या लोकांपेक्षां कमी वेतनावर काम करणाऱ्या निग्रो लोकांना कामावर घेतल्यानेंच त्यांचा खरा फायदा होईल. श्रीमंत आणि सुशिक्षित वर्गांत हें. वर्णद्वेषाचें प्रमाण सामान्य जनतेपेक्षां खूपच कमी आहे हें चटकन् दिसून येतें. न्यूयॉर्कच्या चांगल्या लोकवस्तीच्या भागांत राहणाऱ्यांनीं मला सांगितलें कीं, बुद्धिमान निग्रोंना आणि कलावंतांना आपल्या घरांत येऊं देण्यास त्यांची पूर्ण संमति आहे, पण दारावरील गोरे रखवालदार आणि लिफ्ट चालविणारे गोरे शिपाई त्या रागानें आमच्याशीं असहकार पुकारतील या भीतीनें आम्ही तसें करीत नाहीं. रोमारोमांत वर्णद्वेष भिनलेलीं दक्षिण संस्थानें हें एक टोक, तर सर्व राष्ट्रांचा संगम घडवून आणणारें, सामाजिक आणि राष्ट्रीय भेदभावांचा निरास करणारें न्यूयॉर्क हें दुसरें टोक! आर्थिक बाजूहून सर्वस्वीं भिन्न अशा या प्रश्नाचें दुसरें कारण हें कीं, समाजाच्या खालच्या थरांतील गोऱ्या लोकांमध्यें एक विशिष्ट अहंगंड खोलवर रुजलेला आहे. निग्रो लोक आपल्यापेक्षांहि निकृष्ट दर्जाचे राहण्यांत त्यांना एक प्रकारचें आसुरी, विकृत समाधान वाटतें. आणि म्हणून निग्रोंच्या सामाजिक उन्नतीसाठीं चालविलेल्या कोणत्याहि प्रयत्नांना हे गोरे लोक विरोध करतात. हे समाजशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय खुलासे बरेचसे पटण्यासारखे आहेत; पण मला वाटतें कीं या आर्थिक आणि सामाजिक कारणांपेक्षांहि अधिक खोलवर जाणारें असें कांहीं वेगळें मूलगामी कारण या प्रश्नामागें असलें पाहिजे. अमेरिकन लोकांच्या लैंगिक जीवनाशीं कांहीं प्रकारें या कारणाचा संबंध पोंचतो.

अमेरिकेंतल्या आणि परदेशांतल्या लेखकांना आणि पत्रकारांना सुपरिचित असलेला असा एक प्रश्न दक्षिण अमेरिकेंतल्या सनातनी मनोवृत्तीच्या माणसां-कडून तुम्हांला नेहमीं विचारला जाईल :

"अशी कल्पना करा कीं तुमच्या वयांत आलेल्या मुलीनें एक दिवस तुम्हांला

सांगितलें कीं एका निग्रोबरोबर विवाहबद्ध होण्याची तिची इच्छा आहे—मग त्या बाबतींत तुम्ही काय कराल?"

सुरुवातीलाच आपण मोकळेपणानें कबूल करूं या कीं, या प्रश्नानें आपण चांगलेच गोंधळांत पडूं. निग्रोला आपल्यापेक्षां कमी मानवी हक्क असावेत असें आपल्याला वाटत असल्यानें कांहीं हा गोंधळ निर्माण होणार नाहीं. आम्ही दक्षिण युरोपियनांनीं आत्यंतिक स्वरूपाच्या राष्ट्राभिमानांचा आणि धर्मवेडांचा अनुभव घेतला आहे. पण वर्णद्वेष ही मात्र आमच्या प्राचीन आणि अर्वाचीन परंपरेला सर्वस्वीं अपरिचित अशी गोष्ट आहे. आमच्या देशांत जर निग्रो असते तर खचितच आम्ही त्यांना आमच्या बरोबरीचे न्यायविषयक व सामाजिक हक्क दिले असते. त्याला जर चांगलें व्यक्तिमत्त्व असेल, तो संभाषणचतुर असेल तर अशा निग्रोला आम्ही आनंदानें आमच्या घरीं नेऊं आणि आमच्या दारावरचा चाकर या गोष्टीला कसलीहि हरकत घेणार नाहीं. वृद्ध किंवा अपंग निग्रो बसमध्यें किंवा ट्रॅममध्यें चढलेला दिसला तर निश्चितपणें आम्ही स्वतः उठून उभे राहूं आणि आमची जागा त्याला देऊं. पण आपल्या मुलीनें निग्रोशीं लग्न करण्याची, आपल्याला काळीं नातवंडें होण्याची आणि आमचें कुटुंब अशा प्रकारें कृष्णवर्ण बनण्याची कल्पना मात्र आम्हांला कमालीची अस्वस्थ करून सोडील. पूर्वी आम्हांला जिच्या अस्तित्वाची कल्पनाहि नव्हती अशी आमच्यांतली एक सुप्त अंतःप्रवृत्ति अशा घटनेविरुद्ध निषेधाचें बंड उभारील. ही प्रवृत्ति ना तर्कशास्त्राला धरून आहे, ना नैतिकतेला किंवा धार्मिकतेला, हें आम्हांला सर्वस्वीं मान्य आहे. पण तरीहि ती प्रवृत्ति आहे हें मात्र नाकारतां येणार नाहीं. असा कांटेरी प्रश्न आमच्या देशांत नाहीं ही खरोखर देवाची मोठी कृपा म्हटली पाहिजे.

अमेरिकेंतल्या गोऱ्यांच्या मनांत एक प्रकारची भीति नांदत असल्याचें आपल्याला कळून येतें. पण आफ्रिकेच्या कांहीं भागांत त्यांना वाटते तशी दंगेधोपे, क्रांति, राजकीय आणि सामाजिक जीवन बरबाद करून टाकणाऱ्या कत्तली यांची ही भीति नाहीं. या दोन जमातींत बेटीव्यवहार होण्याचेंच त्यांना जास्त भय वाटतें. या संकरामुळें आपला वर्ण आणि स्वभाव बदलेल आणि मग आपण खऱ्या अर्थानें गोरे राहणारच नाहीं या नुसत्या कल्पनेनें सुद्धां गोऱ्यांच्या अंगावर शहारे उभे राहतात. कदाचित् हें भय निराधारहि असूं शकेल. काळ्यांना आणि गोऱ्यांना सर्व क्षेत्रांत समान दर्जा मिळावा म्हणून झटणारे कार्यकर्ते सांगतात कीं, अमेरिकेंत गोऱ्या लोकांना त्यापासून खरोखर कसलाहि धोका नाहीं. निग्रो आणि श्वेतवर्णीय

यांचें प्रमाण एकास दहा असें असल्यानें निग्रोंमुळें श्वेतवंशांत केव्हांहि संकर माजण्याची शक्यता नाहीं. या दोन जमातींच्या विवाहांवर असलेलीं बंधनें ताबडतोब रद्द करावींत अशी या निग्रोंच्या समान हक्कांसाठीं झगडणाऱ्यांची मागणी आहे. त्यामुळें कालांतरानें निग्रो जमात संपूर्णपणें गोऱ्यांमध्यें मिसळून जाईल. पण अर्थात् हें स्थित्यंतर घडून येण्यासाठीं फार मोठा काळ मध्यें जावा लागेल. मध्यंतरींच्या काळांत वर उल्लेखिलेलें भय तसेंच कायम राहणार आणि आत्तां तरी कितीहि पटवण्याचा प्रयत्न केला तरी तें नाहींसें होणार नाहीं. दक्षिणेंत तर या भीतीचें रूपांतर एका अत्यंत तीव्र अशा सार्वत्रिक मानसिक वेदनेंत झालें आहे आणि या वेदनेच्या कळा सबंध सार्वजनिक जीवनाला सहन कराव्या लागतात.

* * *

कोणत्याहि प्रकारची टीका करण्याचा या विवेचनाचा हेतु नाहीं. शक्य तितक्या काळजीपूर्वक आणि निःपक्षपातीपणें हा प्रश्न विशद करण्याची माझी इच्छा आहे.[१] १६१९ मध्यें, म्हणजे प्युरिटन लोक मॅसाच्युसेट्स् किनाऱ्यावर येण्याच्या एक वर्ष आधीं, आफ्रिकन निग्रोंनीं भरलेलें पहिलें गलबत व्हर्जिनियाच्या किनाऱ्याला लागलें. म्हणजे इंग्लिशांच्या पहिल्या तुकडीनें अमेरिकेंत वसाहत केली त्याच वेळीं निग्रोहि अमेरिकेंत होते. या देशांतील आपल्या प्रदीर्घ वास्तव्याचा आणि तेथील पूर्वेतिहासाशीं असलेल्या आपल्या अनुबंधांचा निग्रोंना फार अभिमान वाटतो. स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचे वेळीं निग्रोवंशीयांची संख्या एकूण लोकसंख्येच्या सुमारें एकपंचमांश होती, असा इतिहासतज्ज्ञांचा अंदाज आहे. नंतरच्या शतकांत हें प्रमाण सुमारें एकदशांशावर आलें आहे. एकोणिसाव्या शतकांत आणि विसाव्या शतकाचे अखेरीस युरोपियन निर्वासितांचा जो प्रचंड ओघ अमेरिकेंत आला त्यामुळें श्वेतवर्णीयांची लोकसंख्या साहजिकच वाढली. इसवी सन १८०० नंतर लवकरच उत्तर अमेरिकेंतल्या संस्थानांनीं आपल्या प्रांतांत गुलामगिरी रद्द केली आणि संघराज्य सरकारनें सबंध देशभर गुलामांच्या नव्या आयातीस बंदी

१. आज उपलब्ध असलेल्या दोन सर्वांत विश्वसनीय संदर्भग्रंथांवरून मी हें वर्णन केलें आहे. एक म्हणजे गुन्नार मिर्दल यांच्या अभ्यासाचा अहवाल, आणि दुसऱ्याचें नांव '**टू सेक्युअर दीज राइट्स—द रिपोर्ट ऑफ द प्रेसिडेंट्स कमिटी ऑन सिव्हिल राइट्स** (वॉशिंग्टन, १९४७)...त्याचप्रमाणें माझ्या अभ्यासाच्या दौऱ्यांत मला अगदीं अलिकडच्या महत्त्वाच्या घडामोडींविषयीं जी माहिती मिळवतां आली तिचाहि उपयोग मीं केला आहे.

घातली. तरीहि पुढें यादवी युद्ध होऊन सर्व निग्रो गुलामगिरींतून मुक्त होईपर्यंत दरम्यानच्या काळांत, आफ्रिकेंतून दक्षिण संस्थानांत निग्रो गुलामांची चोरटी आयात होत असे. निग्रोंची राजकीय पूर्वपीठिका सारांशरूपानें अशी आहे. त्यांचा वांशिक इतिहास मात्र याहून बराच गुंतागुंतीचा आहे.

ज्या व्यक्तीच्या नसांतून आफ्रिकेंतील कृष्णवर्णीयांचें रक्त, अगदीं अल्प प्रमाणांत कां होईना, खेळत आहे अशा प्रत्येक व्यक्तीला अमेरिकेंत 'निग्रो' ही संज्ञा दिली जाते. उद्यां जर पुष्कीन किंवा अलेक्झांडर ड्यूमा न्यू ऑर्लिन्समध्यें अवतीर्ण झाले तर त्यांना सक्तीनें ट्रॅममधल्या मागच्या बाकांवर बसावें लागेल. अनेक निग्रो भूमध्यसमुद्र टापूंत राहणाऱ्या दक्षिण-युरोप-वासीयांइतके गोऱ्या कातडीचे आहेत. खरें म्हणजे काळे गणल्या जाणाऱ्या बहुतेकांची कातडी तपकिरी रंगछटांची असते. आफ्रिकेंतील तद्देशीयांइतके काळे असणारे लोक मला अगदीं क्वचित् आढळले. अमेरिकेंतील निग्रोंपैकीं ७० टक्के लोक संमिश्र रक्ताचे आहेत असा मिर्द्ल यांचा निष्कर्ष आहे.

गुलामगिरीच्या काळांतच गोऱ्या आणि निग्रो जमातींचा हा महान् संगम घडून आला. याच सुमारास रेड-इंडियनांबरोबर निग्रोंचे बेटी-व्यवहार होऊं लागले. प्रचंड निग्रो लोकसंख्येमध्यें सबंध रेड-इंडियन टोळ्या विरून गेल्या. नंतर आफ्रिकन, युरोपियन आणि रेड-इंडियन यांच्यांत सतत आणि कल्पनाहि करतां येणार नाहीं अशा अनेकविध प्रकारांनीं संकर घडून त्यांतूनच आजची निग्रो जमात निर्माण झाली. त्यांतील व्यक्तीव्यक्तींच्या कातडीच्या रंगछटा वेगळ्या असल्या तरी मूळ आफ्रिकन निग्रोंचीं कांहीं वैशिष्ट्यें त्यांच्यांत कायम आहेत.

पण त्यांत सुद्धां अपवाद आहेतच. मूळ निग्रोंचें एकहि वैशिष्ट्य नसणारीं उदाहरणें आहेत. असा निग्रो यशस्वीपणें आपला वंश लपवूं शकतो. तो 'चालेल' असें तिकडे म्हटलें जातें. पण हेंहि तितकें सोपें नाहीं. या 'चालेल' सदरांतल्या निग्रोनें गतकाळाबरोबरचे आपले सगळे संबंध पूर्णपणें तोडून टाकले पाहिजेत. आपले मित्र, आपले कुटुंबीय, आपली वस्ती सगळें कांहीं सोडून कोणी ओळखणार नाहीं अशा दूर ठिकाणीं—कधीं कधीं तर अमेरिकेच्या एका टोकाला—जाऊन त्यानें राहिलें पाहिजे. तिथें तो गोऱ्यांत मिसळूं शकतो आणि इतर कोणाहिप्रमाणें निखळ अमेरिकन गणला जातो. अशा प्रकारें त्याला नव्या आयुष्याला सुरुवात करतां येते. त्या नव्या प्रदेशांत राहणाऱ्या एखाद्या निग्रोला हें रहस्य कळलें तरी सहसा तो तें कुणाला सांगणार नाहीं. सगळ्या निग्रोंमध्यें हा जणुं कांहीं अलिखित पण अनुल्लंघ्य करारच झाला आहे. अशा प्रकारें दरवर्षी

नक्की किती निग्रो 'गोरे' होतात याचा अंदाज कुणालाच सांगतां येणार नाहीं. ही संख्या कांहीं लाख असावी असें बोललें जातें. पण हा केवळ तर्क आहे. अनेक निग्रो दरवर्षी गडप होतात आणि नंतर त्यांच्या निकट मित्रांना सुद्धां त्यांचा कांहीं मागमूस लागत नाहीं हें मात्र खरें आहे. आणि अशी सावधगिरी बाळगणें अत्यंत योग्यच आहे. कारण जर का एकाद्या गोऱ्या म्हणून वावरणाऱ्या व्यक्तीच्या नसांत निग्रो रक्त असल्याची थोडीहि कुणकुण लागली तर दक्षिण संस्थानांत तो एक भयंकर अपमान समजला जातो आणि त्यांतून हिंसा आणि खून उद्भवतात.

जिथें व्यावसायिक देवघेवीसाठीं या दोन्ही जमाती एकत्र येणें अपरिहार्यच आहे अशा जागा सोडून इतरत्र प्रत्येक क्षेत्रांत विभक्ततेचा अंमल जारी करण्यासाठीं अनेक प्रकारचे कायदे, चालीरीती आणि नियम दक्षिण संस्थानांत तयार करण्यांत आले आहेत. तिथें निग्रोंसाठीं स्वतंत्र प्रार्थनामंदिरें, इस्पितळें, शाळा, हॉटेलें, उपाहारगृहें, क्रीडांगणें, सिनेमागृहें, नाट्यगृहें, मद्यालयें आणि इतर करमणूकस्थानें आहेत. तिथें निग्रोंना आणि गोऱ्यांना एका इमारतींत रहातां येत नाहीं. तो निग्रो जर त्याच घरांतील गोऱ्याचा चाकर असेल तरच फक्त अपवाद केला जातो. त्यांना एकत्र खातां, पोहतां, नाच करतां येत नाहीं. थोडक्यांत म्हणजे जिथें त्यांच्यांत अल्पशी सुद्धां सलगी निर्माण होण्याची शक्यता आहे अशा कोणत्याहि संयुक्त कार्यक्रमांत त्यांना सामील होतां येत नाहीं. रेल्वे स्टेशनांवर सुद्धां ते वेगवेगळ्या प्रतीक्षागृहांत थांबतात, वेगवेगळ्या डब्यांत बसतात. अगदीं परवां-परवां-पर्यंत एकाच कंपनींत काम करणाऱ्या निग्रोंच्या आणि गोऱ्यांच्या कामाच्या जागा वेगवेगळ्या असत. पण औद्योगिक आणि तांत्रिक प्रगतीमुळें हीं कडक बंधनें कांहींशीं शिथिल झालीं आहेत. आतां अनेक कारखान्यांतून काळे आणि गोरे एकत्र काम करतात. विमानप्रवासांतहि भेदभाव केला जात नाहीं. तरीहि दक्षिण संस्थानांतील वातावरण आज सुद्धां संतप्त आहे. कधीं कधीं तर तें असह्य होतें. कारण एकीकडे सामूहिक न्यूनगंड आहे तर दुसऱ्या बाजूवर अपराधित्वाचें मानसिक ओझें आहे. त्या वातावरणांतल्या प्रत्येक श्वासागणिक आपल्याला सुप्त निषेध, सूडबुद्धि, अस्वस्थता, असंतोष आणि भीति यांचें दडपण जाणवतें.

'विभक्त पण समान' या शब्दांत दक्षिण संस्थानें तेथील परिस्थितीचें समर्थन करतात. त्यांचें म्हणणें असें कीं, गोऱ्यांना आणि काळ्यांना समान हक्क, सामाजिक सोयी-सवलती, संरक्षण आणि संधि आहे, फक्त वेगवेगळ्या जागीं

ते या समान हक्कांचा उपभोग घेतात. अमेरिकन राज्यघटनेंत अभिप्रेत असलेल्या समतेच्या तत्त्वाचा यामुळें नैतिक दृष्ट्या तरी भंग होतो यांत शंका नाहीं. इथें फक्त कायद्याच्या शब्दापुरती समानता आहे आणि प्रत्यक्षांत मात्र तो भेदभावच ठरतो. निग्रोंच्या शाळांचा, इस्पितळांचा किंवा इतर सार्वजनिक सुखसोयींचा दर्जा गोऱ्यांना मिळणाऱ्या तत्सम सवलतींपेक्षां निश्चितपणें किती तरी निकृष्ट असतो. हें मुद्दाम केलें जात नाहीं पण स्थानिक अधिकारी त्याबाबत तितकेंसें आस्थेनें लक्ष देत नसल्यानें आणि निग्रोंजवळ द्रव्यबळ नसल्यानें असें घडून येतें. कारण कांहीं असलें तरी परिस्थिति तीच राहते. आणि त्यांत 'सर्वांना समान संधी'च्या तत्त्वाचा भंग पाहायला मिळतो. दक्षिण अमेरिकेंत लोकशाही कटाक्षानें अंमलांत यावी म्हणून संघराज्याला वाढत्या प्रमाणांत हस्तक्षेप करावा लागत आहे. १९५० सालीं सुप्रीम कोर्टानें दिलेले शिक्षणविषयक निर्णय हें अशा हस्तक्षेपांचें उद्बोधक उदाहरण होय. त्या भागांत जर निग्रोंसाठीं विद्यापीठ नसेल तर तेथील सरकारी विद्यापीठांनीं निग्रो विद्यार्थ्यांना प्रवेश दिलाच पाहिजे असे नियम या निर्णयांनीं घालून दिले आहेत. याहूनहि महत्त्वाचा, किंबहुना क्रांतिकारी, निर्णय म्हणजे सुप्रीम कोर्टानें १९५४ मध्यें घेतलेला निर्णय. या निर्णयाद्वारें सर्व शैक्षणिक वर्गांत आणि संस्थांत वांशिक विभक्तता घटनाबाह्य ठरविण्यांत आली आहे.

देशाच्या इतर भागांत ही विभक्तता कायद्यावर आधारलेली नाहीं. उलट कित्येक संस्थानांनीं विभक्त-व्यवस्थेला कायद्यानें बंदी केली असून विभक्तता अंमलांत आणूं पाहणाराला शिक्षेची तरतूद केली आहे. या राज्यांत आपल्याला प्रवेश न देणाऱ्या हॉटेलमालकावर किंवा खाद्यपदार्थ नोकराकरवीं देण्यास नकार देणाऱ्या उपाहारगृहाच्या व्यवस्थापकावर निग्रो मनुष्य दावा लावूं शकतो. प्रत्यक्षांत मात्र अमेरिकेंत्या सुमारें निम्म्या हॉटेलांत, उपाहारगृहांत आणि मद्यालयांत निग्रोंना या ना त्या सबबीवर प्रवेश नाकारण्यांत येतो आणि निग्रो व्यक्तीसुद्धां त्याबद्दल कांहीं करण्याच्या फंदांत पडत नाहीं. आपल्याला कुठें प्रवेश मिळेल आणि कुठें नाहीं हें त्याला सामान्यतः माहीत असतें आणि तो असे तंट्यांचे प्रसंग टाळतो. उत्तर आणि पश्चिम भागांतल्या संस्थानांत मात्र या बाबतींत नियमांचा बराच लवचिकपणा आढळतो. त्या विशिष्ट जागेवर, तिथल्या अनेक प्रकारच्या आणि परदेशी माणसाला नीट समजणें सुद्धां अशक्य होतील अशा प्रकारच्या स्थानिक चालीरीतींवर निग्रोप्रवेशाचा प्रश्न अवलंबून असतो.

परदेशी पाहुण्याला चटकन् खटकणारा प्रश्न म्हणजे राहण्याच्या जागेचा. न्यूयॉर्क,

शिकागो, डेट्रॉइट यांसारख्या उत्तर अमेरिकेंतल्या मोठ्या औद्योगिक शहरांत तर हा प्रश्न विशेषेंकरून जाणवतो. कारण अशा शहरांच्या निग्रो लोकसंख्येंत पहिल्या महायुद्धाचे वेळीं व तदनंतर बरीच भर पडली आहे. म्हणून हा प्रश्न सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा असून त्याचे दुष्परिणाम अमेरिकन जीवनावर झाले आहेत. शहरांमधील बहिष्कृत, दाट लोकवस्तीच्या 'काळ्या' घरांतलें जीवन-मान अगदीं हलाखीचें असतें आणि नैतिक वातावरण भ्रष्ट असतें. पुन्हा एकदां केंद्रीय सत्तेनें उपाययोजना केली आहे. तथाकथित निर्बंध-संकेताचें उदाहरण येथें देण्यासारखें आहे. सबंध देशभर माजलेल्या वर्णद्वेषापोटीं हा संकेत निर्माण झाला. इमारती आणि घरें निग्रोंना विकूं नयेत किंवा भाड्यानें देऊं नयेत अशी मनाई करणारें एक कलम तत्संबंधींच्या करारांत होतें. हा संकेत इतका सर्वमान्य होता कीं, शिकागोमधील ८० टक्के घरांच्या विक्रीकरारांत त्याचा समावेश करण्यांत आला होता. १९५० मध्यें, प्रतिपक्षानें कायद्याचा बराच कीस काढल्यानंतर, सुप्रीम कोर्टानें हा निर्बंध घटनाविरोधी ठरवून त्याला मनाई केली. एवढ्यानें कांहीं हा प्रश्न संपलेला नाहीं पण त्याबाबतची संघराज्याची भूमिका वरील निर्णयानें स्पष्ट झाली आहे. निग्रोंसाठीं घरें बांधण्याच्या प्रचंड योजनांना पैसा पुरवून सरकारनें निग्रोंचा घरटंचाईचा प्रश्न सोडविण्यास आणखीं मदत केली. एक काळ असा होता कीं, लष्करांत सुद्धां विभक्त-व्यवस्था होती त्यामुळें निग्रोंच्या तुकड्या वेगळ्या असत पण ही व्यवस्था १९५१ मध्यें रद्द करण्यांत आली. आज लष्करांत निग्रो व गोरे एकत्र असतात. निग्रो अधिकाऱ्यांच्या हाताखालीं गोरे सैनिकसुद्धां असूं शकतात.

वर्णविषयक 'पक्षपाता'चीं ठळक वैशिष्ट्यें पुढीलप्रमाणें आहेत :

(१) **राजकीय हक्क** : निग्रो गुलामांच्या मुक्ततेपासून अधिकृतपणें तरी निग्रोंना इतर सर्व अमेरिकन नागरिकांइतकेच हक्क मिळाले आहेत. राज्य-घटनेंतच हें तत्त्व असून एक दक्षिण संस्थानांचा अपवाद वगळला तर इतर सबंध अमेरिकेंत तें पाळलें जातें. दक्षिण संस्थानांनीं त्यांतून सुटण्याच्या अनेक पळवाटा काढून निग्रोंना मतदानाच्या हक्कांपासून वंचित ठेवलें आहे. निवड-णूक-करासंबंधींचा एक असाच नियम आहे. या कराची रक्कम फार नसते— वर्षाकांठीं एक किंवा दोन डॉलर असेल—पण कोणतींच ठाम राजकीय मतें नसलेल्या बहुसंख्य गरीब निग्रोंना मतपेटीपासून दूर ठेवण्यास ती पुरेशी आहे. आतां फक्त पांच राज्यांतच हा निवडणूक-कर द्यावा लागतो. 'मतदार साक्षर पाहिजे' हा अशा स्वरूपाचा दुसरा नियम होय. पूर्वीं बहुसंख्य निग्रो

निरक्षर होते त्यामुळें अर्थातच त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यास मनाई असे. आतां अमेरिकेंत निरक्षरता जवळ जवळ नाहींच. तेव्हां कांहीं राज्यें 'साक्षर'चा अर्थ असा करतात कीं, भावी मतदाराला विचारण्यांत आलेल्या, मुख्यतः राज्यघटनेसंबंधींच्या प्राथमिक प्रश्नांचीं उत्तरें देतां आलीं पाहिजेत. हा नियम व्यवहारांत आणतांना संबंधित अधिकारी निग्रोंना अगदीं सहज घाबरवून सोडूं शकतात. इतर कांहीं ठिकाणीं तर अगदीं उघड उघड, त्यांच्यावर नुसतें मानसिक दडपण आणून गोऱ्यांनीं निग्रोंना मतदानाची मनाई केली आहे. राज्यघटनेचा असा भंग होऊं नये म्हणून संघराज्यानें हातीं असलेल्या सर्व कायदेशीर उपायांनीं अशा विषमतेला विरोध केला आहे. आतां हळूहळू जनमत समतेला अनुकूल होत चाललें आहे. १९५४ मध्यें दक्षिण संस्थानांत दहा लक्ष निग्रोंनीं आपला मतदानाचा हक्क बजावला. अवघ्या एका पिढीपूर्वी ही कल्पना म्हणजे एक वेडें ध्येयस्वप्न ठरलें असतें.

(२) **न्याय :** दोन प्रकारचीं कोर्टें अमेरिकेंत न्यायदानाचें काम करतात. संघराज्याकडून ज्यांना अधिकार मिळतात तें फेडरल कोर्ट हा पहिला प्रकार, आणि कोणत्याहि घटक राज्यांनीं केलेल्या कायद्यांचा अर्थ लावणारें आणि त्यांची अंमलबजावणी करणारें त्या त्या राज्याचें एक एक प्रांतिक कोर्ट हा दुसरा प्रकार. सर्वसामान्यपणें या कोर्टांचे न्यायाधीश जनतेनें निवडलेले असतात. फेडरल कोर्टांच्या अध्यक्षांचा नैतिक लौकिक आणि न्यायाचा दर्जा प्रांतिक कोर्टांतल्यापेक्षां उच्च दर्जाचा असतो; कारण फेडरल कोर्टांत व्यावसायिक कामकाजाचे सर्व नियम अत्यंत कसोशीनें पाळले जातात, असें सामान्यतः सर्व लोक मानतात. तरीहि बरेचसे खटले प्रांतिक कोर्टांतूनच चालवले जातात आणि दक्षिण संस्थानांत हीं कोर्टें स्थानिक वर्णद्वेषापासून अलिप्त नसतात. साहजिकच हीं कोर्टें निग्रो वादीविरुद्ध गोऱ्या प्रतिवादीचे बाजूनेंच न्याय द्यावा अशा कलाचीं असतात. प्रतिवादी काळा असेल तर अर्थातच हें धोरण बदलतें. दोन्ही बाजू जिथें निग्रोच आहेत अशा खटल्यांत त्यांना स्वारस्य वाटत नाहीं. कायदा आपल्याला पुरेसें संरक्षण देत नाहीं असें वाटल्यानें काळे लोक अधिकाधिक कायदाबाह्य वर्तन करतात, गुन्ह्यांच्या प्रमाणांत वाढ करतात, बेकायदेशीर कृत्यें दडवून ठेवतात, कायद्याचें उल्लंघन करणाऱ्यांना संरक्षण देतात आणि सामान्यतः कायद्याच्या मार्गांत शक्य असेल तितके अडथळे निर्माण करतात. दुसरें महायुद्ध संपल्यानंतरच्या काळांत, बऱ्याच प्रयत्नांनंतर, हें घातचक्र फोडण्यांत दक्षिण संस्थानांना थोडें यश मिळालें. देशाच्या अन्य भागांत मात्र न्याय सर्वांना सारखा आणि निःपक्षपातीपणानें दिला जातो. आज

तुम्हांला तिथें निग्रो न्यायाधिशाचें काम करतांना सुद्धां आढळतील. दहा वर्षांपूर्वी ही कल्पनासुद्धां कुणाला सहन झाली नसती.

(३) **सामूहिक क्रौर्याचा बळी :** कायदा आणि सुव्यवस्था स्थापन होण्याच्या आधींच्या काळांत जुन्या सरहद्द प्रदेशांत खटला न भरतांच आरोपीला जनमताचा कौल घेऊन देहांत शासन करण्याची अमानुष पद्धत प्रचलित होती. नागरिकांनीं आपल्या हातीं कायदा घेऊन आपल्या घरांच्या आणि जीवितांच्या संरक्षणार्थ अतिभयानक अशा गुन्हेगारांना देहांत सजा फर्मावणें हें त्या काळीं स्वाभाविकच होतें. यादवी युद्ध संपून गुलाम मुक्त झाल्यानंतर मात्र वरीलप्रमाणें जमावानें बळी घेण्याची पद्धत हें दक्षिणेंतील गोऱ्यांच्या हातचें काळ्या जमातीविरुद्धचें प्रमुख हत्यार बनलें आहे. एखाद्या निग्रोनें गोऱ्या स्त्रीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केल्याची नुसती अंधुक अफवा पसरायचा अवकाश, कीं गोऱ्यांचीं माथीं भडकून जात. सगळा सारासार विचार आणि नीतितत्त्वें धाब्यावर बसवून ते त्या वेडाच्या भरांत अन्यायाचीं अक्षम्य कृत्यें करण्यास उद्युक्त होत. पण अशा प्रक्षोभांत भाग घेतल्याचा आरोप असणाऱ्यांना दक्षिणेंतील कोर्टें शिक्षा करीत नसत. वांशिक रक्तपावित्र्याच्या कोणत्या तरी अनाकलनीय आणि मागसलेल्या समजुतीमुळें या जमातीच्या गुन्हेगारांना शासनापासून अभय मिळत असे! वैचारिक स्वातंत्र्याच्या आणि उद्बोधनाच्या युगांत जन्माला आलेल्या अमेरिकेला अजून सुद्धां कधीं कधीं युरोपांतल्यासारखीं मध्ययुगीन भुतें पछाडतात हें जितकें विचित्र तितकेंच सत्य आहे. सुदैवानें असल्या सामूहिक बळींचे प्रकार दुर्मिळ होत चालले आहेत आणि जसजसें शिक्षण वाढत जाईल तसतशी ही अमानुष प्रथा संपूर्णपणें लोप पावेल असा विश्वास बाळगण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. १९००च्या सुमारास सुमारें शंभराहून अधिक लोक अशा प्रकारें बळी पडले (१९०१ मध्यें हा आंकडा १३० होता), त्यांतले बहुतेकजण निग्रो होते. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या वर्षांत सरासरी २·३ लोक मारले गेले आणि १९५२ सालीं, अगदीं प्रथमच, असा एकहि बळी पडण्याचा प्रकार घडला नाहीं.

(४) **अर्थव्यवस्था :** यादवी युद्धाच्या शेवटीं, गुलामगिरींतून मुक्त झाल्यावर अक्षरशः निष्पर्ण अवस्थेंत निग्रोंनीं आपल्या नव्या आयुष्याला सुरुवात केली आणि तदनंतरचीं कित्येक दशकें ते सामाजिक बहिष्कृत म्हणून जीवन कंठीत होते. ते कांहीं नुसतेच आर्थिक दृष्ट्या पुरेसे हक्क न मिळालेले, पण परिश्रम, शिक्षण, कार्यक्षमता किंवा नशीब यांच्या जोरावर समाजाच्या वरच्या थरांत जाऊं शकतील असे लोक नव्हते. मिर्दल यांनीं म्हटल्याप्रमाणें आशियाच्या

भाषेंत सांगायचें म्हणजे ते शूद्र होते. इतर समाजापासून अत्यंत दूर, हलाखीच्या अवस्थेंत, समाजाच्या वरच्या थरांत जाण्याचीं साधनेंहि नसलेला आणि हक्कहि नसलेला असा हा लोकांचा एक मोठा गट होता. शेतमजूर किंवा हरकामी नोकर यांसारखीं हलक्यांत हलकीं कामें हे लोक करीत. कालांतरानें उद्योगाच्या आणि हस्तव्यवसायाच्या कांहीं क्षेत्रांत त्यांना प्रवेश मिळूं लागला आणि संघसत्तेनें त्यांच्यासाठीं कांहीं नोकऱ्याहि खुल्या ठेवल्या. धर्मगुरु, शिक्षक, व्यापारी, दुकानदार इ. अनेकविध व्यावसायिकांनीं मिळून तयार झालेल्या निग्रो मध्यमवर्गाचा आपण निर्देश करूं शकतों. आपल्या 'जातीं'च्या चौकटींत राहूनच ज्यांनीं आपली व्यावसायिक-आर्थिक उन्नति करून घेतली आहे अशा या लोकांत कलावंतांचा आणि आपल्या जमातीबाहेर काम करणाऱ्या सार्वजनिक नोकरांचाहि समावेश करतां येईल. पहिल्या महायुद्धामुळें प्रथमच निग्रो लोक मोठ्या संख्येनें उत्तरेकडील राज्यांत गेले आणि तेथील उद्योगधंद्यांत त्यांना काम मिळालें. दुसऱ्या महायुद्धाच्या आगमनाबरोबर त्यांना आणखी नव्या क्षेत्रांत प्रवेश मिळाला आणि या क्षेत्रांतलें आपलें स्थान त्यांनीं आजहि टिकवून ठेवलें आहे. अनेक क्षेत्रांत ते आतां कुशल कामगार आणि कारकून म्हणून गोऱ्यांशीं बरोबरीनें स्पर्धा करतात. पण अजूनहि अनेक मालक निग्रोंना नोकऱ्या नाकारतात आणि गोऱ्या कामगारांना निग्रोंबरोबर काम करण्याची कल्पनाहि रुचत नाहीं. कांहीं ठिकाणीं गोऱ्यांच्या मजूर संघटनांत त्यांना प्रवेश मिळतो तर कांहीं ठिकाणीं मिळत नाहीं. बहुतेक वेळां एकाच प्रकारच्या कामासाठीं निग्रोला मिळणारा पगार त्याच्या गोऱ्या सहकाऱ्याच्या पगारापेक्षां कमी असतो. भिन्नभिन्न प्रदेशांतल्या निग्रोंच्या व्यावसायिक आणि आर्थिक स्थितींत कमालीची तफावत असते. उद्योगधंद्याच्या दोन वेगळ्या शाखांत किंवा दोन वेगळ्या मालकांच्या नोकरींत काम करणाऱ्या दोन निग्रोंच्या स्थितींतहि असेंच महदंतर सांपडतें. प्रतिदिन त्यांच्या स्थितींत बदल होत असतो. एवढें मात्र निश्चित कीं, औद्योगिक प्रगतीमुळें निग्रोंभोंवतालची चौकट अनेक जागीं फुटून गेली आहे आणि गेल्या महायुद्धापासून निग्रोंचें सरासरी उत्पन्न खूपच वाढलें आहे.

विभक्तता आणि पक्षपात या दोहोंचें मूळ अनेक प्रकारच्या सामाजिक आणि मानसशास्त्रीय कारणांत आहे. आणि तरीहि निग्रो पुरुष आणि गोऱ्या स्त्रिया यांचा लैंगिक संयोग—काय वाटेल तें करून—थांबवलाच पाहिजे असा गोऱ्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, प्रकट किंवा सुप्त निश्चय झालेला दिसतो. दक्षिणेंत अशा प्रकारचा संयोग त्या निग्रोचे प्राण जाण्यास कारणीभूत होईल. या उलट लक्षांत घेण्या-

सारखी गोष्ट अशी कीं, गोरा पुरुष आणि निग्रो स्त्री यांचा संयोग गोऱ्या वंशाला अधोगतिकारक किंवा धोक्याचा आहे असें कुणीं केव्हांहि मानलेलें नाहीं. हा तर्कशास्त्राचा प्रश्न नसून अंतःप्रेरणांचा आणि सामूहिक भावनाविकारांचा प्रश्न आहे हें अगदीं स्पष्टच आहे. पण आज अशा प्रकारचा संयोग सुद्धां समाजाला नैतिक दृष्ट्या रुचत नाहीं आणि पूर्वी नेहमीं घडणारे असे गोरा पुरुष व काळी स्त्री यांचे लग्नसंबंध अलीकडच्या काळांत अगदीं क्वचित् होतात. सामाजिक प्रगतीचा आणि शिक्षणाचा परिणाम असा दिसून येतो कीं, उच्चवर्गीय निग्रोंमध्यें सुद्धां आपल्या वंशाबद्दलचा अभिमान वाढत आहे आणि म्हणून तो मिश्रविवाहाची कल्पना त्याज्य मानतो. या बाबतींत मध्यमवर्गीय निग्रोंचा निग्रो बहुजनसमाजावर फार प्रभाव पडतो. वेश्याव्यवसाय सोडला तर असें म्हणतां येईल कीं, गोऱ्यांत आणि काळ्यांत मोकळे लैंगिक संबंध फक्त कलावंतांत, बुद्धिजीवी वर्गात किंवा खूप दूरवर प्रवास केलेल्या उदार दृष्टिकोणाच्या व्यक्तींतच आढळतील. उपलब्ध असलेल्या अत्यल्प अपवादांमुळें या नियमाला पुष्टीच मिळते. बहुतेक राज्यांतून या दोन जमातींतील विवाहाला, स्थानिक कायद्यानें मनाई आहे. आणि जिथें या विवाहांना परवानगी आहे तिथें सुद्धां फारच थोडेजण असा विवाह करतात. कारण विवाहानंतर दोघांनाहि सामाजिक बहिष्काराचें जें शासन मिळतें तें असह्य असतें. या परिस्थितीमुळें नैतिक दृष्ट्या व्यक्ति कशी खची होते आणि तिचा सगळा आनंदच नव्हे तर तिचें सगळें जीवनच कसें उद्ध्वस्त होतें याचें अत्यंत परिणामककारक चित्रण ‘युजिन ओ’ नीलनें आपल्या All God's Chillun Got Wings या नाटकांत केलें आहे.

* * *

निग्रोंनीं आफ्रिकेला परत जावें असा पुरस्कार करणाऱ्या चळवळीहि पूर्वी अमेरिकेंत झाल्या. कांहीं ध्येयवादी निग्रोंचा हा वर्णविषयक ज्यू-राष्ट्रवाद (Zionism of Color) होता. हा वर्णभेदाचा प्रश्न क़ायमचा सुटण्यासाठीं या चळवळीचा उपयोग होईल असें वाटून कांहीं गोऱ्या लोकांनींहि या चळवळीला पाठिंबा दर्शविला. पण या योजनेविषयीं निग्रो बहुजनसमाज पूर्णपणें अनुत्सुक होता त्यामुळें तीमधून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अमेरिकन निग्रोला आतां आफ्रिकेंतील परिस्थितीशीं, हवामानाशीं आणि मानसिक दृष्टिकोणाशीं समरस होतां येणें शक्य नव्हतें. आणि एकवंशत्वाच्या मुद्द्यालाच महत्त्व देऊन बोलायचें झालें तर त्याहि दृष्टीनें पूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणें, अमेरिकन निग्रो हा खऱ्या अर्थानें आफ्रिकन राहिला नव्हता.

पण तरीहि सुशिक्षित निग्रो तरुणांनीं अन्यत्र कुठें जाऊन आपलें नशीब अजमावण्याचा प्रयत्न कां करूं नये, असा विचार कोणाच्या मनांत येईल. लॅटिन अमेरिकेमधल्या अफाट, समृद्ध, अद्याप पूर्ण विकास न झालेल्या प्रजासत्ताकांत वर्णभेद जवळजवळ अस्तित्वांत नाहींच, असला तर अगदीं अल्प आहे. यांपैकीं अनेक प्रजासत्ताकांत निग्रो लोक अग्रभागीं राहूं शकतील, सर्वोच्च समाजांत त्यांना वावरतां येईल, दडपशाही आणि मनोगंडापासून ते मुक्त होतील. पण निग्रो तरुण अमेरिका सोडण्यास तयार होणार नाहींत. अद्यापहि आपल्यावरील बंधनें झुगारून देण्याच्या प्रयत्नांत असलेल्या सर्वांत कनिष्ठ गणल्या जाणाऱ्या जमातींत राहणें ते पसंत करतात, त्यांना अपमानास्पद भेदभाव सहन करावा लागतो, दुःखद अशा दडपणाखालीं आणि हलाखींत दिवस काढावे लागतात. 'दुय्यम दर्जाचें नागरिकत्व' मिळविण्याच्या त्यांच्या आकांक्षा सत्यस्थितीशीं नेहमींच असंबद्ध राहतात. कुणाला या गोष्टीचें आश्चर्य वाटेल, पण हें सारें सहन करूनहि ते अमेरिकेंतच राहूं इच्छितात. कारण अमेरिकेवर—त्यांच्या देशावर—ते मनापासून प्रेम करतात. आपण केवळ अमेरिकन आहोंत, अन्य कोणी नाहीं, आणि जर आपण अमेरिका सोडून गेलों तर तिथें आपल्याला अमेरिकेची अनिवार ओढ लागून राहील असें त्यांना वाटतें. आपण राहत असलेल्या देशावर आपले जन्मसिद्ध हक्क आहेत, ते कोणालाहि आपल्यापासून हिरावून घेतां येणार नाहींत, अशी त्यांची श्रद्धा आहे. संघराज्याचा, त्याच्या सामर्थ्याचा आणि तेथील प्रथांचा त्यांना अभिमान आहे. आणि या देशाच्या निशाणाखालीं लढण्याची त्यांची सदैव तयारी असते. अमेरिकेपासून दूर जाण्यास केव्हांहि तयार होणार नाहींत अशीं हीं अमेरिकेचीं कष्टी बालकें आहेत. अमेरिकेनें त्यांना आपलें म्हणावें ही एकच आस त्यांना लागली आहे.

पण हा प्रश्न त्यांना जितका कष्टप्रद आहे तितकाच त्यांच्या देशालाहि आहे. आपल्या इतिहासांतून उत्क्रांत होत गेलेल्या लोकशाहीच्या तत्त्वांवर अमेरिकेची दृढ निष्ठा आहे. सर्वच अमेरिकन लोक सामान्यतः अत्यंत प्रामाणिक आणि सरळ आहेत. आज किती तरी वर्षें निग्रोंच्या प्रश्नाची त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला टोचणी लागून राहिली आहे. ही गोष्ट ते अनेक प्रसंगीं उघडपणें कबूल करतात किंवा तिला मूक मान्यता दर्शवतात. ज्या उदात्त आदर्शांचा अमेरिका पुरस्कार करते आणि जे आदर्श ती प्रत्यक्षांत उतरविण्याचा मनापासून प्रयत्न करते, जे आदर्श ती जगांतील इतर राष्ट्रांना शिकवूं इच्छिते, जे आदर्श तिला अभिमानास्पद वाटतात, व ज्यांच्या अनुरोधानें अमेरिका आपल्या भूमिकेचें समर्थन करते,

त्या आदर्शांनाच 'विभक्तता' आणि 'पक्षपात' या धोरणांच्या सर्वंकष सामाजिक व वैध परिणामांमुळें हरताळ फासला जातो, याची अमेरिकेला जाणीव आहे. 'सर्व माणसें जन्मतःच समान आहेत,' या जेफर्सनच्या तत्त्वाशीं या नव्या 'जाति'-व्यवस्थेंची सांगड कशी घालतां येणार? किंवा ही व्यवस्था सहजगत्या नष्ट तरी कशी करणार? "तुमच्या मुलीनें निग्रोशीं लग्न करायचें ठरविलें तर काय?" नैतिक मूल्यांना आणि हेतुशुद्धतेला असें मूलभूत महत्त्व देणाऱ्या राष्ट्राला या बिकट मानसिक पेचप्रसंगामुळें अतिशय वेदना होणारच. आणि हा अस्वस्थ करणारा प्रश्न लवकर सुटावा म्हणून ते सदैव उत्सुक असणार.

पूर्वीं कांहीं वर्षें कांहीं बुद्धिवंतांनीं आणि प्रतिक्रांतिकारकांनीं राष्ट्राला असें पटवून देण्याचा प्रयत्न केला कीं जीवशास्त्रदृष्ट्या निग्रो वंश कनिष्ठ दर्जाचे आहेत आणि गोऱ्यांनीं सुसंस्कृततेची जी एक पातळी गांठली आहे ती त्यांना केव्हांहि गांठतां येण्याची आशा नाहीं. शास्त्रीय संशोधनानें या सिद्धांताला पुष्टि देण्याचे प्रयत्नहि करण्यांत आले. माकडाशीं कॉकेशियन माणसापेक्षां आफ्रिकन माणसाचें जास्त साम्य आहे, आफ्रिकन माणसाची कवटी इतर माणसांच्या कवटीपेक्षां निराळ्या आकाराची असते आणि त्याचा मेंदू कमी चलाख असतो, असा दावा मांडण्यांत आला. वर्णभेदावर आधारलेला पक्षपात म्हणजे सामाजिक अन्याय नव्हे किंवा लोकशाही तत्त्वांचा भंगहि नव्हे, उलट ती एक स्वाभाविक प्रवृत्ति असून त्याबद्दल कोणालाच दोषी धरण्याचें कारण नाहीं, आणि या दोन वंशांत संकर झाल्यानें गोऱ्या वंशाचा व संस्कृतीचा ऱ्हास ओढवल्याखेरीज राहणार नाहीं, असा वरील पुराव्यांचा उघड निष्कर्ष होता.

आज अमेरिकन विज्ञानानें वरील सिद्धांताचा डोलारा मोडून टाकला आहे आणि जीवशास्त्र व उत्पत्तिशास्त्र यांवर आधारलेला त्यांचा डळमळता पायाच उद्ध्वस्त करून टाकला आहे. वांशिक विषमतेच्या पुरस्कर्त्यांनीं पुढें केलेलीं विधानें आधुनिक ज्ञानाच्या प्रकाशांत क्षणभरहि टिकाव धरूं शकत नाहींत. लोकमताचा मुलाहिजा न ठेवतां अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञांनीं आणि समाज-शास्त्रज्ञांनीं पुढाकार घेऊन विषमतावाद्यांच्या समर्थनांचे वाभाडे काढले हें या शास्त्रज्ञांना अभिमानास्पदच आहे. शतकानुशतकें चालत आलेल्या पूर्वग्रहांचीं आणि वर्णवेडाचीं तणें दूर करून या शास्त्रज्ञांनीं एक नवा उपक्रम केला. आणि ज्या वेळीं 'थर्ड रीश' हा हिटलरचा सर्वंकष सत्तारूढ पक्ष आपल्या शास्त्रीय मुखवटा चढवलेल्या वंशश्रेष्ठत्वाच्या सिद्धांतांनीं युरोपियन विचारसरणीचा बुद्धिभेद करीत होता त्याच वेळीं अमेरिकन शास्त्रज्ञ मात्र आपल्या शास्त्राशीं एकनिष्ठ

राहून निग्रोंना न्याय मिळवून देत होते, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. वंश अगर वर्ण यांत कितीहि भिन्नता असली तरी सर्व माणसांच्या सुप्त शक्ती समानच असतात आणि माणसाचा शीलस्वभाव भोवतालच्या परिस्थितीनें घडून येतो, आनुवंशिक प्रभावांनीं नाहीं, या तत्त्वांना आज अमेरिकेंत शास्त्रीय व वैचारिक क्षेत्रांत सार्वत्रिक मान्यता मिळाली आहे आणि अमेरिकेंतल्या सर्व शिक्षणपद्धतींवर या समतेच्या कल्पनांचा खोल ठसा उमटला आहे. हा सिद्धांत आतां निग्रोंच्या प्रश्नाचा आफ्रिकन वंशाच्या जीवशास्त्रीय भवितव्याशीं संबंध जोडीत नाहीं. उलट तो अमेरिकेचें सामाजिक जीवन आणि आधुनिक अमेरिकेची संस्कृति यांच्याशीं निग्रो-प्रश्नाचा कसा निकटचा संबंध आहे तें दाखवून देतो. अमेरिकेंतील निग्रो जर आज आरोग्यसंपन्नता, बौद्धिक हुषारी, शिक्षण आणि नीतिमत्ता या बाबतींत सर्वसामान्यपणें गोऱ्यांपेक्षां कमी दर्जाचे असतील— आणि ते तसे आहेत याबद्दल दुमत असणें शक्य नाहीं—तर त्याला कारणें निग्रोंची हलाखीची राहणी आणि इतर प्रतिकूल परिस्थितीचा त्यांना होणारा जाच हीं आहेत हें मान्य केलें पाहिजे. योग्य सांपत्तिक स्थितींत आणि नैतिक वातावरणांत त्याला वाढवलें तरीसुद्धां निग्रो गोऱ्या लोकांएवढी प्रगति करूं शकणार नाहीं, यावर विश्वास ठेवतां येईल असें एकहि शास्त्रशुद्ध कारण नाहीं. आणि म्हणूनच अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानाची जोड मिळालेलें अमेरिकन विद्यापीठ पुन्हा एकदां मानवता आणि बुद्धिप्रामाण्यवाद या दोन तत्त्वांपर्यंत येऊन पोंचतें. या विशाल तत्त्वांवरच अमेरिकन प्रजासत्ताकाच्या निर्मात्यांनीं आपल्या आशा-आकांक्षा केंद्रित केल्या होत्या. गुन्नार मिर्दल म्हणतात, "अठराव्या शतकांतील प्रबोधनाची प्रकर्षानें आठवण यावी असे अनेक पैलू अमेरिकेंतील समाजशास्त्राच्या सध्यांच्या विकासांत आढळतात."

गोऱ्या आणि काळ्या लोकांत संपूर्ण समता निर्माण व्हावी म्हणून अमेरिकेंत आज अनेक प्रभावी शक्ती वर्णभेदाविरुद्ध झुंजण्याचें कार्य करीत आहेत. या शक्तींमध्यें विज्ञान, शिक्षण, सुप्रीम कोर्ट आणि (जेव्हां जेव्हां ती हस्तक्षेप करूं शकते तेव्हां तेव्हां) केंद्रीय सत्ता यांची गणना होते. वाढतें औद्योगीकरण ही एक उपकारक घटना असून तिच्यामुळें या सुधारणेला वेग येतो. पण या मुक्तीकरणाला विरोध करणाऱ्या शक्तीहि अजून जबरदस्त आहेत : परंपरा, भीति, समाजिक गटाची स्वार्थी असहिष्णु वृत्ति, सामूहिक मनाची विकृत विचारसरणी, गोरें रक्त आणि गोऱ्या स्त्रिया यांच्या श्रेष्ठतेबद्दलची आणि शुद्धतेबद्दलची मनोगंडात्मक विपरीत कल्पना, या त्या प्रतिगामी पण प्रबळ शक्ती होत. कोणत्याहि

आधुनिक समाजापुढें असलेल्या अत्यंत बिकट प्रश्नांपैकीं हा एक प्रश्न आहे. हा प्रश्न म्हणजे अखेरपक्षीं बुद्धिजन्य सुज्ञता आणि अगम्य, काबूंत ठेवण्यास अशक्य अशा प्रमाथी प्रवृत्ति यांच्यामधील संघर्ष आहे.

अनेक बाजूंनीं या प्रश्नाचा विचार करणारें बुद्धिवादी मन तर्कदुष्टतेपुढें मान तुकवूं शकत नाहीं. शास्त्रज्ञ भावनांना बळी पडत नाहींत, ते निरपेक्ष सत्याचीच उपासना करतात. राज्यघटनेला नेमकें काय अभिप्रेत आहे तें फेडरल कोर्टाचे न्यायाधीश विशद करतात. शिक्षणसंस्थांतील विभक्त-व्यवस्था रद्द करण्याच्या त्यांच्या १९५४ च्या निर्णयामुळें निग्रोंच्या जीवनांत एक नवें युग अवतीर्ण झालें आहे. वैज्ञानिक सत्य आणि राज्यघटना यांचें केंद्रीय मुत्सद्द्यांना चांगलें ज्ञान असतें. शिवाय ते हेंहि जाणून असतात कीं, जगांतील दोनतृतीयांश लोक काळे आहेत, अमेरिकन निग्रोंसंबंधींच्या प्रत्येक घडामोडीकडे या कृष्णवर्णीयांचें बारीक लक्ष असतें आणि त्या सगळ्यांची एकजूट निग्रोंच्या पाठीशीं उभी आहे. केंद्रीय सरकारच्या धोरणाचे जागतिक स्वरूपाचे परिणाम घडून येतात आणि म्हणूनच हे मुत्सद्दी जागतिक लोकमताकडे दुर्लक्ष करूं शकत नाहींत. अमेरिकेच्या अध्यक्षानें नागरी हक्कांचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या समितीनें आपल्या अहवालांत व्यक्त केलेले पुढील विचार या संदर्भांत अत्यंत अर्थपूर्ण आहेत : "कोणत्याहि वंशाच्या, धर्माच्या, राष्ट्राच्या गटाविरुद्ध अमेरिकेंत केला जाणारा पक्षपात किंवा अशा गटाला मिळणारी अन्यायाची वागणूक हा केवळ अमेरिकेचा अंतर्गत प्रश्न समजला जात नाहीं. अशा घटनेमुळें एखाद्या संबंधित देशाच्या प्रतिष्ठेला धक्का पोंचूं शकतो किंवा एखादें सबंध खंड अगर जगांतील बहुसंख्य लोकसुद्धां प्रक्षुब्ध होऊं शकतात."

आज ना उद्यां सबंध जगच लोकशाहीकडे वळणार असा रंग दिसतो. या लोकशाहींत बहुजनसमाज दास्यांतून मुक्त होतील आणि त्यांची उन्नति घडून येईल, स्वातंत्र्य आणि समतेचीं तत्त्वें अधिक विशाल अर्थानें जगभर नांदूं लागतील हें द तोकव्हिलेचें भाकीत अत्यंत सूचक होतें याचा आज प्रत्यय येत आहे. या धिम्या प्रगतीकडे पाहून मला असा विश्वास वाटूं लागतो कीं, कोणतीहि सामाजिक समस्या कधींच न सुटण्याइतकी बिकट नसते. पण तरीहि आजच्या जगांत कांहीं प्रश्न असे आहेत कीं, ते एका पिढीच्या हयातींत, इतक्या अल्प मुदतींत, सुटूं शकणार नाहींत.

प्रकरण सतरावें

# मनमोकळी कबुली

ज्या पहिल्या दोन रम्य संध्याकाळीं मला अमेरिकेच्या अंतरंगाचा साक्षात्कार झाला त्या मी केव्हांहि विसरणार नाहीं असें मला वाटतें. ऑगस्ट संपत आला होता. आम्ही न्यूयॉर्कमध्यें होतों. रोज रात्रीं झगमगणाऱ्या 'ग्रेट व्हाइट वे' रस्त्यावरून आम्ही मोटारीनें न्यूयॉर्कच्या शांत, तुरळक वस्तीच्या भागाकडे जात असूं. मानहाटनचा रुबाबदार समुद्रकिनारा, बॉस्फरसची आठवण करून देणारी हडसन नदी, न्यू जर्सी विभागांतून दिसणाऱ्या विरळ धुक्यांतून माना उंचावणाऱ्या आश्चर्यकारक गगनचुंबी इमारती, भुयारी रस्त्यांतून धावणाऱ्या असंख्य मोटारींच्या भोंग्यांचा गोंगाट, धातूंच्या बनविलेल्या अजस्र टांगत्या पुलांचा आश्चर्यकारक एकसारखेपणा ! खरोखरच तो एक जादूचा क्षण होता. मी पहिल्यानें पॅरिस पाहतांना जसा स्तिमित झालों होतों तसा तेव्हांहि झालों. पण पॅरिसच्या वेळीं मी एकवीस वर्षांचा कोवळा तरुण होतों. पुढें अनेक वर्षांनीं त्या प्रसंगाकडे वळून पहातांना मला वाटत असे कीं, तो एक अतुलनीय, अनिर्वचनीय अशा आनंदाचा प्रसंग होता व तसा आनंद आपल्याला पुन्हा केव्हांहि लुटायला मिळणार नाहीं. कारण फक्त तरुणच अशा बेहोष आनंदाचा अनुभव घेऊं शकतात. पुढें पंचवीस वर्षांनीं आणखी एक शहर पाहतांना अगदीं तशाच हर्षानें मी बेहोष होऊन जाणार आहें याची मला कल्पनाहि नव्हती. आणि हीं पंचवीस वर्षें तरी किती अभ्दुत होतीं ! छायाचित्रें आणि सिनेमांतील दृश्यें यांच्यामुळें न्यूयॉर्कचा देखावा सबंध जगभर ज्ञात आहे त्यामुळें प्रवासी न्यूयॉर्कला येण्यास निघतो तो या शहराचें दृश्य मनांत घोळवीतच. पण मनःपटलावरचें हें चित्र म्हणजे एक स्तब्ध चित्र असतें. त्यामुळें प्रत्यक्ष अनुभवायला मिळणाऱ्या दृश्याची त्याला थोडीहि सर येत नाहीं. ग्रीक पुराणांत वर्णन केलेल्या अजस्र आकाराच्या एकाक्ष राक्षसासारख्या भासणाऱ्या या ताडमाड उंच इमारती, चकाकणारें पाणी, भव्य रस्त्यांच्या आणि चौकांच्या मध्यभागीं निर्माण केलेलीं छोटीं बेटें आणि उद्यानें, दाट झाडीचे भाग, धुराडीं, लोखंडी तुळया हें सगळें स्वप्नांतल्याप्रमाणें बेभान

उत्साहाच्या आणि गलबताच्या एका प्रचंड लाटेंत घेरलें गेल्यासारखें वाटतें. असें दृश्य माणसानें पूर्वी केव्हांहि पाहिलें नसेल. जगांतल्या इतर कोणत्याहि शहरांत इतकीं विसंगतिपूर्ण दृश्यें, असे अकल्पित बदल, इतका तीव्र उत्कट उत्साह किंवा दैनंदिन जीवनाच्या कोलाहलाचें असें परीकथेसारख्या सत्य-कल्पनांच्या अजस्र दुनियेंत झालेलें परिवर्तन आढळत नसेल.

कांहीं क्षण तर असे होते कीं, त्यावेळीं माझ्या मनांत 'हें न्यूयॉर्क खरोखरीच सत्यसृष्टींतलें आहे कीं निव्वळ एक मृगजळासारखा आभास आहे?' असा प्रश्न उभा राहिला. पुढें जेव्हां मी माझ्या या संमिश्र प्रतिक्रियांचें पृथक्करण करूं लागलों तेव्हां प्रथम माझ्या मनासमोर ज्या गोष्टी उभ्या राहिल्या त्या म्हणजे न्यूयॉर्कच्या पुलांचें चकित करून सोडणारें अनपेक्षित सौंदर्य आणि गगनचुंबी इमारतींचा तरल डौल! या इमारतींचा अजस्रपणा एकप्रकारें मनावर दडपण आणणारा आणि माणसाचें व्यक्तिमत्त्व खुरटून टाकणारा असेल अशी माझी कल्पना होती. पण अमेरिकेंत गेल्यावर मात्र पहिल्या दिवसापासून मला असें प्रतीत झालें कीं, आधुनिक अमेरिकेच्या सौंदर्याभिरुचीचा सर्वांत शैलीपूर्ण आविष्कार तिच्या वास्तुकलेंतच आढळून येतो.

या बाबतींत आणखी बरेंच सांगण्यासारखें आहे. पण त्यासाठीं, मला वाटतें, न्यूयॉर्कचें उदाहरण घेणें योग्य होणार नाहीं. कारण न्यूयॉर्कचें एकंदर स्वरूपच असें भारून टाकणारें आणि चकित करणारें आहे कीं, नवख्या माणसाला त्यांतून एकादीच इमारत निवडून त्यावरून कलेच्या प्रगतीचे टप्पे आणि भावी स्वरूप यासंबंधींचें अनुमान करणें फार कठीण जाईल. पण सबंध देशभर प्रवास करतांना मात्र नजर बसत जाते आणि तुलनात्मक निरीक्षण जमूं लागतें. स्थापत्यकलेचे अत्युत्कृष्ट नमुने आढळतात त्याचप्रमाणें अयशस्वी प्रयत्नहि दृष्टीस पडतात. न्यूयॉर्क, विशेषतः पहिल्या भेटींत तर, अत्यंत अस्ताव्यस्त व्यापाचें आणि दुर्दम्य उत्साहाचें उधाण आलेलें कोलाहलमय शहर वाटतें. दगडाच्या आणि पोलादाच्या अक्षरांनीं लिहिलेलें तें एक महाकाव्य आहे.

अमेरिकेंतील स्थापत्यशास्त्र हें औद्योगीकरणाच्या युगांतील सौंदर्यदृष्टीचें द्योतक आहे. विसाव्या शतकांतील विशिष्ट लयीचा कलात्मक आविष्कार या स्थापत्य-कलेंत पाहावयास मिळतो. अमेरिकेबाहेरहि या शिल्पशैलीचा प्रसार झाला असून पश्चिम युरोपांत आणि मॉस्कोमध्यें इमारतबांधणीची ही पद्धत हळूहळू दृढमूल होत आहे. इतिहासांत आजवर आढळणाऱ्या वास्तुशैलीप्रमाणेंच ही नवी पद्धतहि सामाजिक गरजा आणि सामाजिक विचारप्रणाली यांमधून निष्पन्न झाली

आहे. व्हर्सायच्या वैभवकाळ सोडला तर तेव्हांपासून आजपर्यंत जगाला स्थापत्य-क्षेत्रांत इतकी संपन्नता, निर्भय कल्पकता आणि नवनिर्मिति पाहायला मिळालेली नाहीं. एकोणिसाव्या शतकांतील भांडवलशाहीप्रधान युरोपचें व्यक्तित्व, कादंबरी, चित्रकला आणि संगीत या कलांमधून व्यक्त झालें. वास्तुकलेंत त्यानें फारशी मोलाची भर घातलेली नाहीं. त्या काळच्या युरोपनें वास्तुशिल्पाच्या क्षेत्रांत मात्र अगदींच मध्यम प्रतीच्या कलाकृती निर्माण करण्यांत आणि कल्पकतापूर्ण पण जुन्या स्थापत्यांच्या प्रतिकृती उभारण्यांतच समाधान मानलें. अमेरिका हें दुर्दम्य उत्साहानें प्रेरित झालेल्या लोकांचें एक अद्वितीय खंडप्राय राष्ट्र असल्यानें आणि तेथें तंत्रज्ञानाच्या आणि उत्पादनाच्या क्षेत्रांत विलक्षण प्रगति झाली असल्यानें या देशांतच नव्या उत्स्फूर्त शिल्पशैलीचा जन्म झाला. कारण या देशांतले लोकच नव्या काळाच्या गरजा तीव्रतेनें जाणत होते आणि औद्योगीकरणावर त्यांचा इतर कोणत्याहि राष्ट्राहून अधिक विश्वास होता. त्यांचा मार्ग बरोबर होता कीं चूक होता हें इथें महत्त्वाचें नाहीं. अमेरिकन समाजांत एक नवी सृजनशक्ति निर्माण करण्याइतकी ही श्रद्धा प्रभावी होती ही गोष्ट महत्त्वाची आहे.

आजच्या युगांत आवश्यक असणारा अचूकपणा, लखख रेषा, कार्यक्षमता आणि सुगमपणा यांच्या जोरावर अमेरिकनांनीं आपल्या इमारती आकाशाला नेऊन भिडवल्या आणि प्रचंड पूल टाकून नद्यांचे किनारे सांधले. कारण असें करणें ही त्यांच्या जीवनांतली अत्यावश्यक गरज होऊन बसली होती. पण जिच्यांतून माणूस परिश्रमांस प्रवृत्त होतो ती नवनिर्मितीची ओढ, लय आणि मेळ साधण्याची अंतःप्रेरणा, सौंदर्यात्म आविष्काराची स्वयंभू प्रज्ञा, अनुभवांनीं आलेली सुजाणता, गाणें म्हणत म्हणत कष्ट करण्यांत रमलेले मजूर यांचा परिणाम असा होई कीं, स्थापत्यविशारद तासन् तास हर्षित वृत्तीनें काम करीत आणि त्यांचे हातून नव्या, आनंदमय, प्रकाशमान कलाकृति निर्माण होत. आपल्या डौलदार शैलीनें तुमचें मन मोहून टाकणाऱ्या अनेक गगनचुंबी इमारती अमेरिकेंत तुम्हांला आढळतील. कांहीं कांहीं इमारती तर इतक्या हलक्याफुलक्या भासतात कीं, मोठ्या वाऱ्यानें त्या पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळतील असें वाटतें. इतर कांहीं ठिकाणीं तुम्हांला उद्यांचीं शहरें कशीं असतील याची एक झलक दाखवणाऱ्या इमारती आढळतील......सुबक घाटाचे, सूर्यप्रकाशांत निथळणारे, उंचच उंच मनोरे, भोवतालीं विस्तीर्ण हिरवळ, क्षितिजाची स्पष्ट दिसणारी परिघरेषा, आणि मध्यें कोणताहि अडथळा न येतां पाहायला मिळणारें अथांग आकाश!

इतर कोणत्याहि देशांतल्या प्रवासाप्रमाणेंच अमेरिकेंतला प्रवास सुद्धां, त्याला एक प्रकारची साहसाची झालर असेल तरच, खऱ्या अर्थानें बहुमोल ठरतो. मनाइतकेंच अंतःकरणालाहि हें साहस प्रतीत झालें पाहिजे, जीवनाच्या एकाद्या नव्या पैलूचा आपल्याला साक्षात्कार झाला पाहिजे, आणि असा एकादा अभिनव अनुभव मिळाला पाहिजे कीं ज्यामुळें जीवनाचें मूल्यमापन करण्याच्या आपल्या दृष्टिकोणांतच फरक पडेल. त्या सारवृत्तांत मी माझे कांहीं ठळक अनुभव नमूद करणार आहें. स्टेंडहालच्या भाषेंत सांगायचें म्हणजे ज्या अनुभवांतून सत्याचें स्फटिकनिर्मल स्वरूप स्पष्ट होतें ते अनुभव मी सांगणार आहें.

एका संध्याकाळीं मी 'रॉकफेलर प्लाझा' मधल्या उद्यानांतील हिरवळ, फुलें, कारंजीं आणि रॉकफेलर सेंटरच्या इमारती यांमध्यें सहज हिंडत होतों. अनेक इमारतींची ही एक भव्य वसाहत आहे. युरोपच्या तुलनेनें तर हें एक मोठ्या शहरांतलें छोटें शहरच ठरेल. मानहाटन विभागांतील प्रचंड इमारतींच्या कुशींत वसलेली ही रॉकफेलर इमारतींची वसाहत अत्यंत सुंदर आणि प्रमाणबद्ध आहे. या वसाहतींतल्या गगनचुंबी इमारतींची रचना अत्यंत मनोवेधक आहे. रात्र झाली होती आणि बरोबर मध्यभागीं असलेला मनोरा सत्तराव्या मजल्यापर्यंत विजेच्या दिव्यांनीं लखलखत होता. वाहत्या पाण्याचा मर्मरध्वनि आणि नृत्यसंगीताचे मंद स्वर माझ्या कानीं आले. आणि त्या साऱ्या वातावरणांतच एक प्रकारची जादू भरून राहिली आहे असें मला वाटूं लागलें. या वातावरणाचा प्रभाव इतका अद्भुतरम्य होता कीं, आपण दिक्कालाच्या मर्यादा ओलांडून एका नव्या जगांत प्रवेश केला आहे असें राहून राहून वाटत होतें. युरोप-मधील अनेक प्रदेश असे आहेत कीं, तेथें हिंडतांना मन एकदम भूतकाळांत, आधुनिकतेचा स्पर्श न झालेल्या प्राचीन जगांत वावरूं लागतें. अनेकांना हा अनुभव आला आहे. पण मनानें भविष्यकाळांत भराऱ्या घेणें हा एक अत्यंत अनोखा, मन विशाल करणारा, नवीं क्षितिजें दाखविणारा आणि अगदीं अकल्पित अशा सौंदर्यानें मन भरून टाकणारा अनुभव आहे.

एंपायर स्टेट अिमारतींच्या शिखरावर मी उभा होतों तेव्हांची माझी अवस्था माझ्या अजून चांगली स्मरणांत आहे. एकशेंदोन मजले उंच......सुसाट वारा चहूं बाजूंनीं मला वेढून टाकीत होता, त्या मनोऱ्याला घेरणारे ढग अितस्ततः उडवून लावीत होता. खालीं तळाशीं मला एकाद्या स्वप्ननौकेसारखे भासणारे मानहाटन बेट दिसत होतें. प्रत्यक्षांतल्यापेक्षांहि मला तें कितीतरी विस्तीर्ण वाटलें. तिथें शिडांची, धुराड्यांची, गलबतदुरुस्तीच्या आवारांची एकच गर्दी

होऊन राहिली होती. धुक्याच्या अथांग महासागरांत हें वेट संथपणें तरंगत होतें आणि त्याच्या सभोवार लाटा आपटत होत्या. त्याचप्रमाणें रेल्वे इंजिनांच्या खालून येणाऱ्या असंख्य आवाजांनीं दुर्दम्य उत्साहानें व धावपळीनें भरलेल्या न्यूयॉर्कचें अस्तित्व जाणवत होतें.

बर्फ, धूर आणि वेड लागल्यासारखी बांधकामाची धावपळ यांनीं भरलेल्या पिट्सबर्गमध्यें मला अशीच एका कल्पनातीत प्रचंड उपद्यापाची आणि संघर्षाची जाणीव होत असे. शिकागोमध्येंहि प्रत्येक ठिकाणीं मला हीच जाणीव अत्यंत प्रकर्षानें झाली. दुतर्फा गगनभेदी इमारती असलेल्या रस्त्यांवरून भर वेगानें धावणाऱ्या मोटारींची ती अक्षय रांग, असंख्य माणसांच्या डोक्यांवरून झुलता पूल धडधडत ओलांडणाऱ्या आगगाड्या, मध्यभागींच पृथक् होऊन मोठ्या जहाजांना वाट करून देणारे नद्यांवरील पूल, आणि आधींच गजबजाटानें भरून गेलेल्या शहरांत बाणासारख्या घुसणाऱ्या या जहाजांच्या कर्कश शिट्या! क्लीव्हलँडमधील 'ऑब्झर्वेशन टॉवर'वरूनहि हाच अनुभव येतो. उन्हाळ्यांतल्या मंद सूर्यप्रकाशांत हा औद्योगिक भाग एक वेगळेंच स्वरूप धारण करतो. शहरांतली सगळीं धावपळ या दक्षिण भागांत एकवटल्यासारखी वाटते. हिरव्या झाडाझुडपांतून धूर वर चढत होता. अधूनमधून एकादी ज्वालाहि फडकून जाई. जणू कांहीं अग्निवर्षावाखालीं असलेल्या युद्धआघाडीवरच मी उभा आहें असें मला वाटलें. एकादी अत्यंत अटीतटीनें चाललेली, यंत्रसामर्थ्यांत प्रबळ असलेल्या राष्ट्रांमधील लढाई पाहत असल्याचा मला भास झाला.

नायगारा धबधब्यासमोर उभे राहिलें म्हणजेसुद्धां आपल्याला असाच तुंबळ संघर्षाचा भास होतो आणि या संघर्षांत आपणहि भाग घेत आहोंत असें वाटतें. प्रत्यक्ष नायगारा धबधब्याच्या आठवणीपेक्षांहि तिथून जवळच असलेल्या बफेलो गांवीं मीं एक रात्र काढली तिथली आठवण माझ्या मनांत अधिक प्रभावीपणें जागृत आहे. प्रत्यक्ष धबधब्याच्या दृश्यानें माझ्या मनावर अधिक परिणाम केला कीं त्याच्या आवाजानें, तें मला नीटसें सांगतां येणार नाहीं. दोहोंचाहि माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला पण त्यांत एकाहून दुसरा वरचढ असें कांहीं नव्हतें. हे दोन्ही अनुभव सजीवपणें संकलित झाले तेव्हां त्यांतून एक अत्यंत अस्वस्थ करून सोडणारा, अवर्णनीय असा नवा अनुभव निर्माण झाला आणि माझ्या साऱ्या चित्तवृत्ति चैतन्यानें उफाळून आल्या. कोणत्याहि प्रकारचें संरक्षण न देतां आपल्याला या आजच निर्माण झालेल्या विश्वांत भिरकावून दिलें आहे आणि भोवतालच्या विक्राळ शक्तींपुढें आपण कस्पटासारखे

आहोंत असें आपल्याला वाटूं लागतें. भयानकपणें कोसळत राहणारा जलप्रपात ही एकच शक्ति आपल्यापुढें उभी नसते, तर अनेक प्रमाथी शक्ति या धबधब्याच्या रूपानें एकत्र आलेल्या असतात. कुऱ्हाडीच्या घावांनीं सुद्धां खची करतां येणार नाहीं अशी ही जलरूप शक्ति असते. तुम्ही असहाय्य होऊन जातां. कोणतीहि मानवनिर्मित शक्ति तुमच्या साहाय्यार्थ येऊं शकत नाहीं. आश्चर्य, भीति आणि एकाकीपणाची जाणीव यांनीं तुम्ही भांबावून जातां आणि तुमच्या अंतर्मनांत कोलाहल माजतो. एकट्यानेंच झुंज घेणें भाग पडतें. एकाकी खांद्यांवर हा न पेलणारा भार उचलावा लागतो आणि मग एकदम मनांत कल्पना चमकून जाते कीं, या शक्तींचा दाब थोपविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे गगन-स्पर्शी मनोऱ्यांचें एक मोठें शहर वसवणें.

पण अमेरिका म्हणजे कांहीं केवळ निसर्गाचा किंवा मानवी इच्छाशक्तीचा उत्स्फूर्त, अपघाती प्रस्फोट नव्हे. बॉस्टनमधील प्रशान्त किनारपट्टी, स्वप्निल वातावरणानें भारलेले प्राचीन उत्तर युरोपची आठवण करून देणारे रस्ते, अठराव्या शतकांतल्याप्रमाणें भासणारी न्यू इंग्लंडमधील नयनरम्य कुरणें, खेडीं, प्रार्थनामंदिरें, विचित्र पूल अशा कितीतरी गोष्टी मला आठवतात. दक्षिण संस्थानांच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या वॉशिंग्टनमधील आर्लिंग्टन मेमोरियल पुलाचा जुन्या पद्धतीच्या दगडी कमानीहि मला चांगल्या आठवतात. सूर्य मावळत होता आणि या स्मारकासभोवतीं नदीच्या दोन्ही कांठांवर उगवलेल्या हिरव्या वृक्षराजींवर व व्यवस्थित राखलेल्या फ्रेंच उद्यानांतील फुलवेलींवर सोनेरी धूलिकण पसरले होते. शांत पाण्यांत पांढऱ्या खांबांचीं प्रतिबिंबें पडलीं होतीं. हे खांब अचानकपणें प्राचीन काळच्या देवळांची, आणि त्याहूनहि अधिक प्रकर्षानें 'रेनासान्स' काळांतील कांहीं चित्रांची आठवण करून देत होते. आकाश निरभ्र होतें, हवेंत एक प्रकारचा गोड सुवास भरून राहिला होता, आणि सारें जग कसें शांत नि आनंदी होतें. आमच्या भोवतालच्या प्रत्येक अणुरेणूंतून शांतता आणि सुस्थिति यांचा प्रत्यय येत होता.

पण पुन्हा एकदां ती भविष्यकाळांत प्रवास करीत असल्याची जाणीव सजीव झाली. ती रात्रीची वेळ होती आणि डेट्रॉइटमधील एका स्मारकाच्या शिल्पाकृति कारंजासमोर आम्ही उभे होतों. पाण्याच्या वर उडणाऱ्या प्रकाशमान फवाऱ्याचे रंग एकसारखे बदलत. समोरच नदी, कालवे आणि वृक्षराजींच्या सावल्यांचे पुंजके जागोजाग पसरलेलीं उद्यानें होतीं. सबंध वातावरणांत मंद चांदणें आणि विरळ धुकें तरंगत होतें. स्मारकाच्या कारंज्यापासून आकाशांत मोठमोठे प्रकाशझोत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: ......................
क्रमांक

फेकले जात होते, त्यांच्या प्रकाशांत कधींकधीं गिरण्यांचीं धुराडीं सांपडत. अंधाराच्या आवरणांत लुकलुकणारें तें निशांकित शहर, शेजारींच असलेला कानडाचा अगदीं अस्पष्ट दिसणारा पण हालचालींमुळें सजीव वाटणारा किनारा, किनाऱ्यावरील झाडांच्या पलीकडून भुतांसारखीं शांतपणें निघून जाणारीं उंच जहाजें, परीकथेंतल्या जगाच्या या मंतरलेल्या रात्रीची ही जादूमय स्वप्नसृष्टि इतकी काव्यात्मक होती कीं, मला तिचें पूर्णपणें आकलन झालें नाहीं, पण तिच्या अस्तित्वाबद्दल मात्र कांहींच संदेह नाहीं. जिथें अजून कांहींच जन्माला आलेलें नाहीं अशा एका अनामिक युगाच्या गूढ-मादक, अनावार सौंदर्याचा मी क्षणभर पण प्रगाढ अनुभव घेऊन आलों.

* * *

"तरुण माणसा, ऊठ, आणि पश्चिमेकडे जाऊन पराक्रम कर!" एकोणिसाव्या शतकांत अमेरिकन जीवनाचें हें घोषवाक्य होतें. या घोषवाक्यांतून त्या काळच्या सामूहिक आशाआकांक्षा प्रतीत होत. मिसिसिपीपलीकडील प्रदेश म्हणजे निर्जन भूभाग होता, तिथें रानरेडे हिंडत आणि रेड-इंडियन लोकांच्या युद्धगर्जना ऐकूं येत. त्या प्रदेशांतील जंगलांत ज्यांनीं दूरपर्यंत संचार केला होता त्यांना अत्यंत विचित्र, अज्ञात असे उंचच उंच पर्वत पलीकडच्या क्षितिजाजवळ आढळले होते. वाळवंटाच्या अथांग विस्तारांत मध्येंच एखादा लाकडी किल्ला दिसे किंवा लाकडी घरांच्या वस्तींत अमेरिकेचें चट्ट्यापट्ट्याचें आणि तारकांचें निशाण फडफडत असे. वसाहत करण्यासाठीं आलेल्या गोऱ्यांच्या या छावण्या होत्या. प्रत्येक पावलागणिक मृत्यु त्यांच्यासाठीं आपला विक्राळ जबडा वासून उभा राहिलेला असे; पण बेडर छातीच्या वसाहतवाल्याला त्याची तमा नव्हती. जीवनाशीं झुंज घेण्यासाठीं बाहेर पडलेल्या तरुणाचा निडरपणा आणि साहस या वसाहतवाल्यांजवळ असे. या प्रदेशांत इतकी अंदाधुंदी होती कीं अद्याप 'जग' या संज्ञेला तो पात्र नव्हता. वसाहतीला आलेल्यांपैकीं जे विशेष कल्पक आणि दूरदृष्टीचे होते त्यांनीं तत्काळ ताडलें कीं, कोलोराडो आणि कॅलिफोर्नियामधल्या अपरंपार सोन्याच्या खाणी म्हणजे एका अत्यंत वैभवशाली भविष्यकाळाची पहिलीं पावलें आहेत.

सुवर्णप्राप्तीचें हें कुतूहल फार पूर्वींच ओसरलें आहे पण त्यांतून एक चमत्कार साकार झाला. अर्थात् आतां त्याचें कुणालाच आश्चर्य वाटत नाहीं. केवळ पश्चिम अमेरिकेंतच नव्हे तर त्या देशाच्या इतर भागांतहि आतां सर्वत्र सुपीकता आणि सुस्थिति, योजनाबद्ध विकास आणि नैसर्गिक संपत्ति, सामाजिक भरभराट

आढळते. पण अमर्यादपणाची, निसर्गशक्तींच्या प्रभावाची आणि आयुष्याच्या युयुत्सु नवीनतेची भावना मात्र अद्याप कायम आहे. निसर्गाचा रानटीपणा काबूत आणला आहे, पण त्याच्या भव्यतेला धक्का पोंचूं दिलेला नाहीं, किंवा पश्चिमेची जादूमयताहि कमी होऊं दिलेली नाहीं.

समुद्रसपाटीपासून एक मैल उंचीवर असलेलें डेनव्हर हें शहर अगदीं परवां-परवांपर्यंत नशीब काढण्याच्या अमर्याद प्रवासावर निघालेल्यांच्या वाटेवरलें एक केवळ विश्रांतीचें ठिकाण होतें. सुधारलेल्या जगाच्या हद्दीपलीकडची ती एक तात्पुरती वसाहत होती. रेड-इंडियनांच्या आणि दरोडेखोरांच्या असंख्य गोष्टी सांगणारे आजोबा तेथें अनेक घरांतून सांपडत. आपल्या आजोबांनीं हातांत पिस्तुल घेऊन वसाहत स्थापली आणि त्या वसाहतींतच आपण शांतपणें लहानाचे मोठे झालों, असें डेनव्हरचे अनेक रहिवासी सांगूं शकतील. आतां तें एक अत्यंत सुंदर, भव्य, उत्कृष्ट आंखणी केलेलें राजधानीचें शहर आहे. पहिल्या भेटींतच आपल्या थंड डोंगराळ हवेनें, हिरव्यागार वृक्षराजीनें, उबदार वातावरणानें आणि स्नेहपूर्णतेनें तें तुम्हांला मोहून टाकतें. वर डोंगरांत गेलांत कीं, तुम्हांला 'कोलोराडो स्प्रिंग्ज' नांवाचें छोटें गांव लागेल. तेथील खडकांत पुराणकालीन व्यक्तींचे आकार खोदले आहेत आणि त्या ठिकाणाला देवांचें उद्यान (गार्डन ऑफ गॉड्स) असें वेधक नांव देण्यांत आलें आहे. डोंगरांच्या कुशींत वसलेलें हें एक अत्यंत हृद्य गांव असून तेथें बाराहि महिने चैनीखातर येणाऱ्या प्रवाशांची रीघ लागलेली असते. मोठ्या शहरांतील आयुष्याला कायमचा रामराम ठोकून आलेले आणि कोलोराडोच्या हवामानावर निहायत खूष असलेले अनेक सुशिक्षित लोक या गांवच्या रहिवाशांत आहेत. सुवर्णशोधाच्या आणि दरोडेखोरीच्या दिवसांपासून गतस्मृतींनीं आणि परंपरांनीं समृद्ध असलेल्या त्या दोन्ही गांवांत आम्हांला अनेक बौद्धिक विषयांवर विचारविनिमय करणारीं मंडळें, विद्यापीठें, सामूहिक प्रयत्नांनीं चालविलेल्या नाट्यसंस्था, आणि संगीत व साहित्याबद्दल आस्था असलेले लोक आढळले. उघड्यावर शेकोटीभोवतीं बसून अत्यंत सुसंस्कृत संभाषणांत भाग घेण्याचा आणि विचारविनिमयाचा आनंद आम्हांला लुटतां आला. पूर्वकालीन संस्कृतींच्या परिशीलनाचा अत्यंत सुजाण प्रत्यय आम्हांला या संभाषणांत आला. मोकळ्या डोंगरी हवेचा आणि निसर्ग-सौंदर्याचाहि कदाचित् हा परिणाम असावा.

१४,००० फूट उंच असलेल्या 'पाइक्स पीक' या शिखरावर आम्ही चढून गेलों तो प्रसंग मला अनेकदां आठवतो. त्यांत गिर्यारोहणाचा अंशहि नव्हता.

कारण आम्ही आरामशीरपणें मोटारींतून वर गेलों आणि अनेक हिरव्यागार दऱ्यांवरून लोंबकळत उतरणाऱ्या टांगत्या रेल्वेतून खालीं आलों. पर्वताच्या दोन्ही बाजू पाहायला मिळाव्या अशा प्रकारें ही सहल आंखलेली असते. प्रत्यक्ष शिखरावर झोंबणारी थंडी असते आणि हवाहि अत्यंत विरळ असते. श्वास घेणें मुष्किल होऊन बसतें आणि तुम्हांला कांहींसें घेरी आल्यासारखें, हलक वाटूं लागतें. चालतांना पाय किंचित् लटपटतात. पण उपाहारगृहांतल्या गरम गरम कॉफीनें तुम्हांला तत्काळ बरें वाटूं लागतें. नीट उत्तेजित होऊन तुम्ही हा उबदार निवारा सोडून निर्धास्तपणें बाहेर पडतां. कारण हवें तेव्हां या विश्रामस्थानीं परततां येईल हें तुम्हाला ठाऊक झालेलें असतें. इथें सगळी व्यवस्था इतकी कांहीं परिपूर्ण रीतीनें केलेली आहे कीं, अगदीं सुरुवातीपासूनच या साऱ्या सुखसोयी या पर्वतशिखरावर निसर्गतः निर्माण झालेल्या असाव्या अशी तुमची भावना होऊं लागते. पण एका बाजूला पूर्वक्षितिजाच्या पलीकडेहि पसरलेल्या गवताळ प्रदेशाकडे पाहिलें आणि दुसऱ्या बाजूला रॉकी पर्वताच्या पायथ्याचा पर्वतप्राय लाटा उसळणारा, वादळानें घुसळून निघणारा अमर्याद समुद्र पाहिला कीं ही भावना विरून जाते. नायगारा धबधब्याप्रमाणेंच येथेंहि निसर्गाच्या भव्यतेनें तुम्ही थक्क होऊन जातां. पुन्हा एकदां मानव विरुद्ध निसर्ग या संघर्षाची भावना मनांत जागृत होते आणि अंतःकरणाचा थरकांप होतो!

आतां सुपीक झालेल्या या वाळवंटाच्या आणि मानवानें काबीज केलेल्या पर्वतांच्या पलीकडे, दुसऱ्या महासागराचा किनारा सुरू होईपर्यंत पसरलेला केळीं आणि संत्रीं यांच्या अफाट बागांनीं गजबजलेला, ऑलिव्ह वृक्षांचा, पांढऱ्या घरांचा, स्वच्छ सूर्यप्रकाशांत न्हाऊन निघणाऱ्या कुरणांचा आणि पाइन वृक्षांचें आच्छादन पांघरून बसलेल्या टेकड्यांचा प्रदेश म्हणजेच जगप्रसिद्ध कॅलिफोर्निया! ही सुवर्णभूमि आहे! आद्य वसाहतवाल्यांचें हें साकार झालेलें स्वप्न आहे. या आतिथ्यशील प्रदेशांत पाऊल टाकतांक्षणींच आपल्याला तेथील वातावरणांत कांहीं परिचित भास होऊं लागतात. कॅलिफोर्नियाचा समुद्रकिनारा हा अमेरिकेचा 'भूमध्यसामुद्रिक' किनारा आहे. दक्षिण किनारपट्टीचें तसें नाहीं. कारण युरोपियन माणसाच्या मनांत 'दक्षिण अमेरिका' म्हटलें म्हणजे एक वेगळेंच चित्र उभें राहतें. अमेरिकन जीवनांतली आधुनिकता आणि इतर कांहीं अधिक प्रखर, धुंद निसर्गविशेषांचा तेथें संयोग झाला आहे अशी त्यांची भावना आहे. उष्ण कटिबंधांतला सूर्यप्रकाश, आफ्रिकेंतला दमट उन्हाळा, निग्रो लोकांचे थवे, आणि गुलामगिरीच्या प्रथेनें कलंकित झालेल्या गतकालीन ऐश्वर्यस्मृति त्यांच्या डोळ्यांपुढें

तरळूं लागतात. पण जसजशी अधिक ओळख होऊं लागते तसतसें कॅलिफोर्नियाचें वेगळेंपण आपल्याला जाणवूं लागतें. तिथल्या समुद्रकिनाऱ्यावरून दिसणारें असीम क्षितिज, नजरहि पोंचूं शकणार नाहीं अशा अंतरावरून हलकेंच पण प्रभावीपणें हेलावत येणाऱ्या लाटा, समुद्राची अथांग खोली, आणि या अफाट किनाऱ्यावर सतत रेंगाळणारें बुद्धाचें अदृश्य अस्तित्व हीं कॅलिफोर्नियाच्या वातावरणाचीं वैशिष्ट्यें आहेत. कधीं कधीं कॅलिफोर्नियाचा नूर एकदम उदास गंभीर होतो. अशा वेळीं पॅसिफिकवरून येणाऱ्या दाट धुक्यामुळें तिथलें आकाश दिसेनासें होतें आणि झगमगते दिवे क्षीण भासूं लागतात, सबंध वातावरणावर हें पांढऱ्या धुक्याचें आवरण पसरतें.

पण कॅलिफोर्निया हें प्रकाशविश्वहि आहे. तकतकीत कांतीच्या लिंबांनीं आणि संत्र्यांनीं बहरलेल्या बागा, उघड्यावरील फुलांचीं दुकानें, यौवनपूर्ण, प्रशस्त, समृद्ध आणि समाधानी भूप्रदेश! कॅलिफोर्नियांत जोम आहे. तेथील सर्व प्रकारच्या उपभोगांत एक प्रकारचा समतोल, खंबीरपणा आणि निर्व्याज आनंद आहे. कॅलिफोर्निया कांहीं नुसताच अवखळ प्रदेश नाहीं. तो सुशांत आणि उत्साहदायकहि आहे. तिथें मनाला एक प्रकारची सुस्थिरता मिळते. वेदना तर विसरतातच, शिवाय नवा उत्साहहि वाटूं लागतो. साध्या पण खोल आणि अकृत्रिम आशयानें भरलेल्या आयुष्याची येथें ओढ लागून राहते. भावनांचा जिव्हाळा आणि कांहीं तरी उपयुक्त काम करीत राहण्याचा उत्साह, आनंदमय प्रज्ञाशील विचारमग्नता यांचा येथें सुरेख मेळ जमतो. या भाग्यशाली प्रदेशावर देवांची अशीच कृपादृष्टि राहिली तर तिथें एक दिवस एका स्वतंत्र प्रकाशपूर्ण आणि मानवतावादी नव्या तत्त्वज्ञानाचा उगम होऊं शकेल असें मानण्यास कांहींच हरकत नाहीं. कदाचित् हें नवें तत्त्वज्ञान म्हणजे पहिल्या 'रेनासान्स' काळाचाच पुढील भाग असेल किंवा भूमध्यसामुद्रिक विचारांचें हें एक नवें प्रबोधनपर्व असेल. तेथील नव्या विद्यापीठांच्या उत्फुल्ल उद्यानांत तरुण विद्यार्थी अशाच प्रकारचीं स्वप्नें आपल्या मानसविश्वांत फुलवीत असतील तर काय बहार होईल! सूर्यास्तकालीन क्षितिजावरून धुक्याच्या लाटांवर तरंगत कोणते तरल, उदात्त, चैतन्यमय विचार या किनाऱ्यावर अवतीर्ण होत असतील कोण सांगूं शकणार...कारण पैलतीराच्या त्या क्षितिजावरच रोज सूर्यकमलहि फुलत असतें!

ज्या दोन ध्रुवांभोवतीं कॅलिफोर्नियाचें विश्व भ्रमण करीत असतें त्यांचीं नांवें स्पॅनिश भाषेंतलीं आहेत. सान फ्रान्सिस्को आणि लॉस एंजलिस यांच्यामध्यें साम्यस्थळें शोधून काढणें फार कठीण आहे. मध्यें खूप अंतर आणि काळ

लोटल्यानंतर मनाला जो एक शांतपणा आणि प्रसन्नता प्राप्त होते त्या प्रकाशांत जुन्या आठवणींची उजळणी करतांना मनःपटलावर सान फ्रान्सिस्कोचें एक कलात्मक सुस्पष्ट चित्र उमटतें. या शहराला एक प्रकारचें उत्कट आणि सम्यक व्यक्तिमत्त्व आहे. पांढऱ्याशुभ्र उपनगरांतल्या शिल्पशैलीचा उन्मेष आणि टेकड्यांच्या उतरणीवर, जगांतील एका सर्वांत सुंदर उपसागराभोवतीं अत्यंत रेखीवपणें वसलेली मध्यवर्ती वस्ती यांची ठळकपणें आठवण होते. उद्यानाच्या सावलींतून आणि उमलत्या फुलांच्या ताटव्यांमधून त्याला अथेन्समधील लायसावेटसची आणि नेपल्सच्या उपसागराची अंधुक आठवण करून देणारी किनारपट्टी दिसते. स्पॅनिश पार्श्वभूमींत अंतर्भूत असणाऱ्या दक्षिण युरोपचा तिथें नव्या जगाच्या नावीन्याशीं संगम होत असतो. सभोवतालच्या आल्हाददायक वातावरणांत उंच इमारती छान शोभून दिसतात. समोरच्या किनाऱ्यावर असणारे वृद्ध पण भव्य म्युइर वृक्ष पाहून आपण एकाद्या हिरव्या चक्रव्यूहांतून, जुन्या पद्धतीच्या कमानी व मनोऱ्यांच्या शहरांतून हिंडत आहोंत असें वाटूं लागतें. आणि समुद्रावर तरंगणारें दाट धुकें हें चित्र पूर्ण करण्यासाठीं आणि तें लपवण्यासाठीं हळू हळू वर चढत असतें. कामावरून परतण्याच्या या संधिप्रकाशाचे वेळीं उपसागराचें प्रवेशद्वार हें एक अत्यंत मनोरम दृश्य असतें. आधुनिक अमेरिकेची निःसंशय सर्वोत्कृष्ट कलाकृति तेथून आपल्या नजरेस पडते. ही कलाकृति म्हणजे वैभवशाली 'गोल्डन गेट' पूल. विरळ होत चाललेल्या धुक्याच्या झिरझिरीत पडद्यांतून हा झुलता पूल तांबूस आणि स्वप्नवत् वाटतो. तो पाहत असतांना प्रतिभेच्या एका उत्स्फूर्त क्षणीं स्थापत्यक्षेत्रांतील या अद्भुत आश्चर्याचें स्वप्न पाहणाऱ्या कलाकाराच्या अमर सर्जनशीलतेची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. अभिजात संगीतांतील एकादा रागच या पुलाच्या रूपानें साकार झाला आहे, असें वाटतें. पाश्चात्य जगाच्या या अंतिम सरहद्दीवर, पॅसिफिक महासागराच्या साक्षीनें विज्ञान पुन्हा एकदां कलेमध्यें सामावून जातें.

आपणांला त्याची ओढ लागो किंवा न लागो, सान फ्रान्सिस्को शहर अस्तित्वांत आहे यांत संशय नाहीं. तेथील जीवनाच्या अमर हिरवेपणामुळें, तरुणतरुणींच्या अधीर स्वप्नाळु आकांक्षांमुळें, आणि आजच्या तंत्रकौशल्याच्या युगाचा मुकुटमणि शोभेल अशा शहररचनेमुळें या शहराचें अस्तित्व अविस्मरणीय झालें आहे. पण लॉस एंजलिस शहर मात्र अस्तित्वांत आहे कीं नाहीं असा माझ्या मनाला अनेकदां संभ्रम पडतो. कारण जिला कांहीं आकारच नाहीं अशा वस्तूला अस्तित्व असतें कीं नाहीं हें मी ठामपणें सांगूं शकत नाहीं. हें

शहर कुठें सुरू होतें आणि कुठें संपतें हें कुणालाच माहीत नाहीं. किंबहुना या शहराला कुठें अंतच आहे कीं नाहीं, त्याचा मध्यबिंदु कोणता, त्याची बाह्य सरहद्द कोणती याचीहि कुणालाच कल्पना नाहीं. त्याला शहर म्हणतात पण तें कांहीं शहर नव्हे. हा एक ना आदि ना अंत असा अस्ताव्यस्त विस्तार आहे झालें! मोटारीनें लॉस एंजलिसच्या एका टोकापासून निघून दुसऱ्या टोकापर्यंत पोंचण्यास कित्येक तास लागतात. गगनचुंबी मनोरे असलेल्या बाजारपेठा, एकमजली घरांच्या न संपणाऱ्या रांगा, मोकळीं मैदानें, औद्योगिक विभाग, एकांत एक गुंफलेल्या उद्यानांची लांबण, या साऱ्यांतून तुम्हांला रस्ता काटावा लागतो. शहराच्या दुसऱ्या विभागांत राहणाऱ्या मित्राला भेटण्यासाठीं तुम्हांला इतकें अंतर तोडावें लागतें कीं, पश्चिम युरोपमध्यें दोन भिन्न गांवांत सुद्धां एवढें अंतर नसेल. लॉस एंजलिस कायमचेंच एका तेजाच्या झोताखालीं असतें व त्याचा डोळ्यांना शीण होतो. या शहराला स्वतःची अशी एक वृत्ति आहे. ही वृत्ति सबंध कॅलिफोर्नियाच्या स्वभावाशीं मिळतीजुळती नसून केवळ या प्रदेशापुरतीच सुसंगत आहे. जणुं कांहीं आपल्या अलीकडच्या दिवसांत, बंद दारांआड ही वृत्ति निर्माण झाली आहे. या वृत्तीला थोड्याफार सैल पण प्रतीकात्मक अर्थानें हॉलिवुडची वृत्ति असें म्हणतां येईल. कारण सबंध लॉस एंजलिसभर सिनेमांचे स्टुडिओ इतस्ततः विखुरलेले आहेत. लॉस एंजलिसच्या स्वरूपांत ओढून ताणून लादलेलें आणि कृत्रिम असें कांहीं तरी आहे. पडद्यावरील नटनटी आणि त्यांच्या राहणीची पद्धत यांचाच मुख्यतः हा परिणाम आहे आणि निर्मात्यांची निव्वळ काम उरकण्याची मनोवृत्ति त्यांत भर घालते. स्टुडिओभोवतालच्या मोकळ्या जागांत या निर्मात्यांनीं कृत्रिम शहरें वसवलीं आहेत. हीं शहरें निर्जन आणि चैतन्यहीन असतात. त्यांतला प्रत्येक रस्ता जगांतल्या कोठल्यातरी वेगळ्या भागामधील रस्त्यासारखा आणि इतिहासाच्या भूतकाळांतल्या एकाद्या कालखंडाचें वातावरण निर्माण करणारा असा असतो. लॉस एंजलिस हें एक खूपच नावीन्यपूर्ण आणि पाहण्यासारखें शहर असेल: पण या शहरावर कुणी प्रेम करूं शकणार नाहीं. इतर कोणत्याहि अमेरिकन शहरापेक्षां, अगदीं न्यूयॉर्क किंवा शिकागो-पेक्षांहि जास्त उबग आणणारें आणि निर्वात पोकळींत स्वतःभोवतींच गिरक्या घेत फिरत बसलेल्या एकाद्या स्वयंकेंद्रित वावटळीसारखें हें शहर आहे.

* * *

ॲरिझोना वाळवंट पार करून पलीकडे गेल्यावर जंगलांत दूरवर एक बारकेंसें रेल्वे स्टेशन लागतें. झाडींतून वाट काढून प्रवासी कांहीं पावलांनंतर

एका शांत पठाराशीं येतो. आणि एकदम त्याला निसर्गाचा एक भयचकित करून सोडणारा अद्वितीय चमत्कार पुढें ठाकलेला आढळतो—एक प्रचंड दरी! जणूं कांहीं एकाद्या आसुरी शक्तीनें धरणीचें पोट फाडून तिचीं आंतडीं नुकतींच उघडीं केलीं आहेत. हीच ती 'ग्रॅंड कॅन्यॉन' दरी.

अगदीं तटस्थतेनें जर बघितलें तर उत्तर ॲरिझोनाचें पर्वतपठार दुभंगून टाकणारा तो एक खोल चर आहे. रॉकी पर्वतांत उगम पावून खालीं वाहत येणाऱ्या कोलोराडो नदीनें अगदीं आस्ते आस्ते पण नकळत हा चर खोदून काढला. या स्थित्यंतराला सुमारें सत्तर लाख ते नव्वद लाख वर्षें लागलीं असावींत असा भूगर्भशास्त्राचा अंदाज आहे. हें दृश्य पाहतांना आश्चर्यानें हेलावून जाणार नाहीं असा माणूस विरळा. ही दरी एक मैल खोल, दहा मैल रुंद आणि सुमारें दोनशें मैलांहून अधिक लांब आहे. या दरीच्या कडा आणि तिचा अंतर्भाग ठेचाळलेल्या मांसासारखा दिसतो. त्यांतले विविध रंग गंभीर पण अत्यंत भडक, सोललेल्या मांसासारखे, वाटतात आणि या रंगांच्या ज्वाळेंत कधींकधीं गडद हिरव्या आणि सोनेरी छटाहि मिसळलेल्या असतात. या पाताळदरीच्या तळाशीं नजर टाकली तर वेगवेगळ्या आकाराच्या शिंपल्यांसारख्या विचित्र आकृति दिसतात. दरीच्या पृष्ठभागाखालून नदीच्या सुत प्रवाहाबरोबर भूभाग कणशः वाहून जाण्याची जी सूक्ष्म पण प्रचंड उलाढाल लाखों वर्षें सुरू होती तिचाच हा प्रताप! जमिनींत खोदल्या गेलेल्या या आकृती आकारानें ॲसिरियांतल्या उद्ध्वस्त राजवाड्यांसारख्या भासतात. या राजवाड्यांतहि भिंतींवर कांहीं ठिकाणीं शोभेसाठीं चित्राकृती खोदलेल्या असत. किंवा हे आकार म्हणजे भग्न देवळें, अज्ञात देवतांचीं सिंहासनें, किल्ले, मनोरे, पिरॅमिड किंवा खडकाळ बाजूंत खोदून काढलेलीं भव्य प्रेक्षागृहें असावींत असेंहि त्यांच्या आकारावरून म्हणतां येईल. हें एक काल्पनिक पुराणवस्तुसंग्रहालय आहे. पूर्वी जिथें एकाद्या सामर्थ्यशाली संस्कृतीची वस्ती असेल अशा अनेक अचेतन शहरांचा आणि गांवांचा हा एक ढीग आहे. एकाद्या प्रतिभाशाली चित्रकाराला, कवीला किंवा संगीतकाराला सुद्धां निसर्गाच्या या अद्भुत चमत्काराचें यथातथ्य वर्णन करणें अवघड जाईल. मी तर असें म्हणण्याचें धाडस करतों कीं, मानवी दृष्टीला किंवा कल्पकतेला आकलन होणार नाहीं, आणि ज्याचें वर्णन करणें मानवी कलेच्या आवाक्यांतलें नाहीं असें हें दृश्य आहे. त्या भयानक आणि विक्राळ दरींत दाटून राहिलेली स्मशाननीरव शांतता जेव्हां मीं अनुभवली तेव्हां माझ्या काळजांत धडकी भरली. एकादें निसर्गदृश्य पाहून मला असा धसका यापूर्वी केव्हांहि बसलेला नाहीं एवढें

निश्चित. विश्वाच्या अमरत्वाची आणि मानवी जीविताच्या क्षणभंगुरतेची इतकी खोल आणि विदारक जाणीव मला यापूर्वी केव्हांहि झाली नव्हती.

आश्चर्याचा हा पहिला धक्का ओसरल्यावर माझ्या मनांत विचार आला कीं, ईशान्य युरोपच्या रहिवाशाला आयुष्यांत फार तर एकदांच हें स्थळ पाहण्याची संधि मिळेल. आणि म्हणूनच उपलब्ध असलेल्या वेळांत ग्रँड कॅन्यॉन दरीचा जास्तींत जास्त भाग पाहून घेण्याची आमची इच्छा असल्यानें आम्हीं खेचरांच्या पाठीवर बसून दरींत उतरण्याचें ठरवलें. पूर्वी उल्लेख केलेल्या गिर्यारोहणाच्या प्रसंगाप्रमाणेंच येथेंहि व्यवस्था अगदीं उत्कृष्ट होती. तुमच्या सुरक्षिततेबद्दल येथें पराकोटीची काळजी घेतली जाते. रस्ते रुंद आणि टणक आहेत. खेचरें शिकवून तयार केलेलीं असतात. वाटाडे निष्णात व प्रामाणिक असतात. सबंध सहलींत एक प्रकारची शिस्तबद्धता होती. प्रवासानें जे अत्यंत थकले असतील आणि ज्यांना त्याच दिवशीं परत फिरणें शक्य नसेल अशांना रात्रभर मुक्काम करतां यावा म्हणून तळाशीं खोल्याहि बांधलेल्या आहेत. अमेरिकेंतल्या पर्वतप्रदेशांत आणि खुद्द आमच्या देशांत खेचरांवरून प्रवास करण्याचा आम्हांला खूप सराव झाला होता, त्यामुळें खेचरावर बसून त्या दरींत उतरणें आपल्याला सहज जमेल असें आम्हांला वाटत होतें. पण आमची फसगत झाली. आपल्याला कांहीं धोका पोंचणार नाहीं हें मनाला पक्केपणीं पटल्यानंतर मग अचानकपणें पुढें आलेल्या निरुंद वाटेला आणि भीषण दरीला आम्ही भीतनासे झालों. पण तोंपर्यंत मात्र आमची अगदीं पांचावर धारण बसली होती. शारीरिक आणि मानसिक थकवा आणणारा हा एक नवीनच अनुभव होता. आश्चर्य आणि खडतरपणा यांचा तिथें अविस्मरणीय मिलाफ झाला होता.

अखेर आम्ही एका निर्जन पठारापाशीं आलों. काळ्या उंच खडकांतून फेसाळत वाहणाऱ्या नदीच्या पात्रावर एखाद्या गच्चीसारखें हें पठार डोकावत आहे. तिथें खालीं हवेंत खूपच ऊब होती आणि तेथील झाडेंझुडपेंहि हवामानानुसार बऱ्याच वेगळ्या प्रकारचीं होतीं. या दरींत उतरणें म्हणजे खंडाच्या दुसऱ्या भागांत प्रवास करण्यासारखेंच आहे. कारण मेक्सिकोच्या वाळवंटांत राहणाऱ्यांना येथील हवामान परिचित वाटतें. पण प्रत्यक्ष खालीं दरींत उतरल्यावर मात्र हे सारे विचार विसंगत वाटतात. दरीच्या तळाशीं उभें राहून वर पाहिलें कीं, मन अपरिहार्यपणें अस्वस्थ होतें. आतां तुम्हांला एका दृष्टिक्षेपांत सबंध दरीचें दर्शन घडत नाहीं, पण या दरीच्या आकाराची आणि त्या मानानें स्वतःच्या क्षुद्रतेची तुम्हांला अधिक वास्तव कल्पना येते. आतां तुम्ही काव्यात्म स्वप्नरंजनांत गुंगून

जात नाहीं कीं आत्मतत्त्व शोधण्यांत मग्न होत नाहीं. आपण पुन्हा वर चढून जाऊं शकूं कीं नाहीं हा एकच विचार तुमचें मन व्यापून टाकतो. परतीचा प्रवास सुरू असतांना हाच एक विचार तुमच्या मनांत प्रामुख्यानें घोळत असतो. समोरच एखादा सुरीच्या पात्यासारखा धारदार कडा तर विरुद्ध बाजूला आकस्मिकपणें भूगर्भाचा एक नेमक्या विरुद्ध रंगाचा प्रस्तर झळाळत असतो. पुन्हा एकदां तुम्हांला संघर्षाची जाणीव होते. मानवी इच्छाशक्तीवरील तो पराकोटीचा ताण, आणि निसर्गावर मात करून आपलें भवितव्य स्वतःच घडविण्याची माणसाची अपरिहार्य धडपड ! आणि अमेरिकेचा विशाल ‘ जागतिक दृष्टिकोण ’ उत्स्फूर्तपणें प्रकट होतो तो अशा ठिकाणींच.

सभोवतीं आणि खालीं भयाण जांभई देत पसरलेल्या दऱ्या. सगळ्या वातावरणावर रात्र अलगदपणें आपलें काळें आच्छादन पसरूं लागते. अशा वेळीं निश्चयानें दांत आवळून, दुखणाऱ्या हातापायांच्या आधारावर आपण वर चढूं लागलों म्हणजे निसर्गातली खोल निःशब्दता आपल्या अंतःकरणांतहि प्रवेश करते आणि आपल्याला सारा थकवा आणि भीति विसरायला लावते. उद्ध्वस्त झालेल्या या भयाण राजवाड्यांच्या, देवळांच्या आणि किल्ल्यांच्या तळाशीं एखादी पुरातनकालीन भेसूर वस्ती नांदत असेल असें वाटतें. ही दरी एखाद्या प्रचंड कढईसारखी भासते. तिथें निःशब्द उदास वातावरणांत अजस्त्र सावल्या संथपणें खुनशी कटवाल्यांप्रमाणें येरझाऱ्या घालीत असतात. तार्तार जमातींतल्याप्रमाणें धगधगत्या शेकोटीभोवतीं जमा होऊन त्यांचीं हीं कारस्थानें शिजत असतील असें वाटतें. आपण तिथून हिंडलों तरी त्यांना आपल्या अस्तित्वाची दखल नसते व त्या कसलीं तरी उग्र दर्पाचीं विचित्र रसायनें उकळीत असतात. या अद्भुत भीषण वातावरणाचा परिणाम असा होतो कीं, विस्मृतींत विलीन झालेलीं बालपणींचीं स्वप्नें पुन्हा मनांत जागृत होतात. इथेंच त्या पराभूत झालेल्या राक्षसांना भिरकावून देण्यांत आलें आणि एकावर एक असे स्वर्गापर्यंत रचलेले पर्वतांचे ढीग ढासळून टाकण्यांत आले. हे पर्वत खालीं कोसळतांना दुभंगून त्यांच्याच तर या अफाट दऱ्या बनल्या नाहींत ना ? कदाचित् ऑलिंपस पर्वतावर राहणाऱ्या देवांनींच त्यांना शाप देऊन या दऱ्यांत कैद करून ठेवलें असेल आणि वरून हे देव त्यांच्यावर पहारा करीत असतील. जर का या बंदिवानांनीं दरीच्या बाहेर निघण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या मस्तकावर प्रहार करण्यासाठीं हे देव आपलें विद्युल्लतेचें हत्यार पाजळीत सज्ज असतील. अथेन्समधील योद्ध्यांच्या भाल्यांनीं घायाळ झालेला स्वाभिमानी एन्सिलेडॉस निवारा

शोधण्यासाठीं आणि युगानुयुगें आपला त्वेष व द्वेष कायम राखण्यासाठीं या जागीं आला असेल. खरोखर हें असेंच घडलें असणें शक्य आहे का? असेलहि कदाचित्. कारण ज्या खोल गर्तेत उतरण्याचें आपण धाडस केलें आहे तेथें भूतकालीन वातावरणाच्या गडद प्रभावाखालीं कल्पनाशक्ति भराऱ्या घेऊं लागते आणि कोणत्याहि अतर्क्य व असंभाव्य गोष्टीवर ती सहज विश्वास ठेवण्यास तयार होते.

* * *

टेक्सास, लुइझियाना, फ्लॉरिडा......आमच्या परतीच्या प्रवासांतले हे टप्पे अत्यंत परस्परविरोधी वातावरणाचे होते.

टेक्सासमधल्या दोन गोष्टी प्रामुख्यानें आमच्या मनावर ठसल्या: अथांग निळ्या आकाशाखालीं पिवळ्या ज्वाळांप्रमाणें सळसळणारा गवताळ प्रेअरी प्रदेश आणि तारुण्यसुलभ उत्साह, आशावाद आणि अल्पावकाशांत प्रसन्न होणारी समृद्धि यांची त्या प्रदेशभर उसळणारी अजिंक्य लाट! युरोपांतल्या मोठ्यांत मोठ्या देशाहूनहि टेक्सास प्रांत मोठा आहे. पण तिथली लोकवस्ती इतकी विरळ आहे कीं, कामाच्या व्यापाच्या मानानें माणसांचा फारच तुटवडा भासतो. हरेक प्रकारचे प्रयत्न करूनहि तेथील जमिनीचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठीं आवश्यक तेवढे स्त्री-पुरुष मिळूं शकत नाहींत. जमिनीच्या मशागतीसाठीं, घरें बांधण्यासाठीं, सुसंघटितपणें कष्ट करून त्यांतून निर्माण होणाऱ्या समृद्धीचा उपभोग घेण्यासाठीं, निवांतपणें विचारविनिमय करण्यासाठीं, इतकेंच नव्हे तर केवळ तिथें जाऊन राहण्यासाठींसुद्धां पुरेशीं माणसें नाहींत. या प्रदेशाचा अफाटपणा आणि त्याच्या गर्भांत दडलेलें ऐश्वर्य यांचें आकर्षण फार मोठें आहे. तेथील लोक आपल्याकडून निकराचा प्रयत्न करतात, पण सध्यांच्या लोकसंख्येच्या दसपट लोकांची तेथें आवश्यकता आहे. केवळ कागदी आराखड्यांत दाखविलेल्या संख्येपेक्षां प्रत्यक्ष गरज किती तरी मोठी असल्याचा तेथें नेहमीं अनुभव येतो. गगनचुंबी इमारती, अजस्र यंत्रसामग्रीचे औद्योगिक कारखाने, सार्वजनिक खातीं, जणुं कांहीं पाहतां पाहतां जमिनींतून उगवून वर आलीं, असा तुम्हांला तेथें भास होतो. दिवसेंदिवस शहराचा विस्तार फोफावतो आहे. कुठें जाऊन तिथें अचानकपणें इमारती बांधण्यासाठीं जागा निर्माण करण्यांत येते आणि इमारतींसाठीं राखून ठेवलेल्या जागेंत तेलाच्या विहिरी खोदल्या जातात. स्वस्थ बसून विचार करायला टेक्सासला अजून उसंतच मिळालेली नाहीं. या प्रदेशाची सात्त्विक समृद्धि, तेथील आरोग्यदायक आणि उत्साहजनक हवा यांनीं तेथील

मुलींना लावण्य आणि सुडौल बांधा यांचें वरदान दिलें आहे. पण आजपर्यंत मुद्दाम एकादी सौंदर्यपूर्ण कलाकृति निर्माण करण्याची आवश्यकताच भासलेली नाहीं...उदाहरणार्थ, एकादें सुंदर, रेखीव रचनेचें शहर बांधून काढावें असें टेक्सासच्या अजून कधीं मनांतच आलेलें नाहीं. त्यामुळें टेक्सास तुमच्या मनावर कोणतीच दृश्य-स्मृति कोरीत नाहीं. तेथील जीवन अजून उधाण अवस्थेंत आहे. तें अगदीं नवें कोरें आहे आणि स्वतःचा असा स्वतंत्र घाट घेण्याचा तें प्रयत्न करील, पण त्यासाठीं त्याला थोडी सवड मिळायला हवी. सध्यां तरी टेक्सास राज्य नुसतें अस्तित्वांत आहे, डोळे दिपवून टाकील अशा वेगानें प्रगति करीत आहे आणि आपला सगळा अनिवार उत्साह कोठल्या ना कोठल्या तरी कामांत रिचवून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. टेक्सास अमेरिकेंतच अंतर्भूत आहे हा युरोपियनांचा समज सर्वस्वीं खरा आहे. टेक्सासचीं स्वतःचीं अशींहि कांहीं वैशिष्ट्यें आहेत, पण म्हणून कांहीं या राज्याची कांहीं लोक मानतात त्याप्रमाणें अमेरिकेपासून फारकत होऊं शकत नाहीं. तेथील विविध उद्योगांच्या अहर्निश धावपळींत आनंदानें भाग घेण्यास तयार असणाऱ्या तरुण आणि निरोगी व्यक्तींसाठीं टेक्सास प्रांत आहे. ही भूमि कधीं कधीं नव्या प्रवाशाला एकदम विशीचा तरुण बनवते आणि कोणत्याहि पूर्वपरंपरांच्या आणि गतस्मृतींच्या शृंखला नसणाऱ्या या देशांत आपल्याला पुन्हा नव्यानें जीवनक्रम सुरू करतां आला तर काय बहार होईल, असे विचार त्याच्या मनांत खेळूं लागतात.

टेक्सास सोडून तुम्ही शेजारच्याच लुइझियाना प्रांतांत प्रवेश केलात कीं वातावरण एकदम बदलतें. न्यू ऑर्लीन्समध्यें आल्याबरोबर युरोपियनांना असें भासतें कीं, येथील इतिहासकाल कांहीं आपल्याला अपरिचित नाहीं. फ्रान्सचा कधींहि बुजणार नाहीं असा ठसा या प्रदेशावर उमटला आहे. इतिहासाच्या ओघांत स्पॅनिश, अँग्लो-सॅक्सन इत्यादि अनेक संस्कृतींनीं येथील परंपरा समृद्ध केल्या आणि विविध राष्ट्रीयत्वांचें परस्परांत विलीनीकरण होण्याची अमेरिकेंतली वैशिष्ट्यपूर्ण प्रक्रिया येथेंहि घडत आहे; पण तरीहि फ्रान्सच लुइझियानाच्या इतिहासाचें उगमस्थान होतें. पण हा फ्रान्स देश एका निराळ्या युगांतला होता. राजसत्तेखालील साम्राज्यवैभव उपभोगणारा फ्रान्स, अत्यंत आदबशीर चालीरीतींचा आणि भोगलालस, पण पडत्या काळाला सुरुवात झालेला फ्रान्स, आतां तर लुझियानांत फ्रेंच भाषा अगदीं क्वचित् बोलली जाते.

"माझे आईवडील नेहमीं फ्रेंच बोलत आणि आम्ही जेवतांना एकादा जरी इंग्रजी शब्द वापरला तरी आम्हांला शिक्षा करीत," असें एका साठ वर्षांच्या नम्र

वृद्धानें आम्हांला सांगितलें. या वृद्धाचें नांव फ्रेंच होतें. माझी प्रश्नांकित नजर त्यानें ओळखली असावी, कारण विषण्णपणें हसून त्यानें नकारार्थी मान हलवली आणि तो म्हणाला, "त्यांची तशीच इच्छा आहे त्याला आपण काय करणार? अमेरिकेंत आतां मुलें वडिलधाऱ्या मंडळींचें ऐकत नाहींत, महाशय." अशा तऱ्हेनें गोष्टी घडत आहेत आणि या घड्याळाचे कांटे आतां कुणीहि मागें फिरवूं शकणार नाहीं. तरीहि सेंट लुईचें स्मारक म्हणून बांधलेल्या चर्चभोवतालीं असलेल्या 'व्ह्यू कार' विभागाचें महत्त्व मात्र कायम आहे. सेंट लुई हा त्या अठराव्या शतकांतील जुन्या फ्रेंच गांवाचा मूळपुरुष होता असें मानलें जातें.

या शिल्पकलेची एक स्वतंत्र अशी अनुपमेय धाटणी आहे. आज कायद्यानें तिचें जतन केलें जातें. उकाड्याचा आणि उन्हाच्या झळाळीचा त्रास होऊं नये अशा दृष्टीनें इथलीं दुमजली घरें बांधलीं आहेत. प्रत्येक घरांत एक मोकळा अंगणवजा चौक असतो आणि समोर रंगीबेरंगी फुलांनीं नटलेली बाग असते. या घरांपुढें चांगले प्रशस्त आणि वर छपरें असलेले लांबच लांब व्हरांडे असतात. या व्हरांड्यांना फुलांनीं किंवा पानांनीं सुशोभित केलेले लोखंडी कठडे, आणि शोभेचे हार कोरलेले खांब असतात. रु रॉयल, रु शार्त्र आणि रु बर्बन अशीं नांवें धारण करणाऱ्या अरुंद अंधाऱ्या रस्त्यांवर लोखंडी नक्षीकामाचे स्मारक-स्तंभ आणि भडक फुलांचे ताटवे यांच्या सांनिध्यांत उघड्या छत्रीच्या किंवा तंबूच्या निवाऱ्याखालीं चित्रकार आपल्या कामांत मग्न झालेले असतात. अंधार पडल्यानंतर हा भाग पॅरिसमधल्या मॉंतमार्त्र या रंगेल विभागाहूनहि अधिक जल्लोषमय बनतो. भौगोलिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमींत काय फरक असेल तेवढाच. एरवीं मेक्सिकोच्या आखातावरून वाहत येणाऱ्या वाऱ्याच्या आर्द्र झुळुकांनीं या शहरांतहि पॅरिसचें चैतन्य जागृत होतें.

या शहराला एक प्रकारचा उबस नासका दर्प आहे, फाजील उत्साहाचा भपकारा आहे. येथील विकृत भोगविलासाचा अस्वस्थ करणारा मादक गंध मिसिसिपीच्या सखल प्रदेशांतल्या, आकंठ सुखासीनतेनें सुस्त झालेल्या हवेंत हलके हलके मिसळत असतो. नदीच्या हिरव्यागार कांठांवर असलेल्या भव्य प्रासादांच्या अवतींभोवतीं एक प्रकारची भोगलालसा रेंगाळत असते. जिथें प्रखर उन्हांत पूर्वी अनेक निग्रो मजुरांचे थवे आर्त आफ्रिकन विरहगीतें गात गात काम करीत असत, त्या जुन्या काळच्या मळ्यांतहि हीच वासनामयता भरून राहिलेली असते. आपल्याहि मनांत हें सारें पाहून विषण्णतेची लकेर उमटून गेल्यावांचून राहत नाहीं. या 'समस्ये'मुळें सबंध दक्षिण अमेरिकेंत जें एक भीतीचें कातर वातावरण निर्माण

झालें आहे तें पाहून आपलेंहि अंतर्मन अनिवार्यपणें अत्यंत अस्वस्थ होतें. इथें ही 'समस्या' अधिकच गुंतागुंतीची होत जाते, कारण विलयाला जात असलेल्या खानदानी ऐश्वर्याच्या उदास आठवणी हंड्या-झुंबरांच्या झगमगीत प्रकाशामध्यें नृत्यगायनांत मश्गुल झालेल्या नवयुवतींचीं स्वप्नें पाहत असतात, आपापल्या पुरातन कौटुंबिक सूडांचीहि त्यांना आठवण असते.

पण इतकें असूनसुद्धां सर्वत्र तुम्हांला उत्साह आणि विविध प्रकारचीं कामें जोरांत सुरू असलेलीं आढळतील. भविष्यकाळाबद्दल सर्वांच्या मनांत खंबीर आशा आहे असें कळून येईल. उंच मनोरे, अवाढव्य यंत्रसामग्रीचे व पोलादाचे कारखाने, आश्चर्यकारक तांत्रिक प्रगति हीं आधुनिक अमेरिकेचीं सगळीं प्रतीकें तुम्हांला तिथें पाहायला मिळतील. भूत आणि वर्तमान इथें एकमेकांत विलीन होतात आणि त्यांतून एक नावीन्यपूर्ण, विविधरूपी व्यक्तींची आणि भावनांची दुनिया निर्माण होते. साहित्याच्या विलासासाठीं इतकी समृद्ध पार्श्वभूमि अमेरिकेंत इतरत्र कोठेंहि मला आढळली नाहीं. जर कधींकाळीं अमेरिकन डोस्टोव्हस्की जन्माला येणार असेल तर तो न्यू ऑर्लीन्समध्येंच निर्माण होईल.

मियामी हें संघराज्याचें सर्वांत दक्षिणेकडील शहर आहे, पण अमेरिकेंत ज्या प्रदेशाला दक्षिण ('द साउथ') अशा विशेषनामानें संबोधण्यांत येतें त्या प्रदेशाहून या शहराचें स्वरूप सर्वस्वीं भिन्न आहे. दक्षिणेची ऐतिहासिक पार्श्वभूमि आणि सामाजिक वातावरण यांचा अंशसुद्धां या शहरांत आढळत नाहीं. या फरकाचें कारण असें कीं, दक्षिण अद्याप भूतकाळांतच जगते आहे, तर मियामीला १९१२ च्या आधींचा असा म्हणतां येण्याजोगा भूतकाळच नाहीं. कारण तेव्हां तें एक अगदीं सामान्य, अप्रसिद्ध मच्छीमारीचें खेडें होतें आणि अधूनमधून रेड-इंडियन लोक या खेड्याकडे फिरकत असत. आज मियामीचा किनारा म्हणून प्रसिद्ध असलेला हा उपसागरालगतचा अरुंद भूभाग म्हणजे त्या वेळीं मलेरियाचें माहेरघर असें दाट जंगल होतें. सांचलेल्या पाण्याचीं डबकीं, दलदल, साप आणि मगरी यांचा तेथें बुजबुजाट होता. या निर्जन किर्रर रानांतून एक एक पाऊल पुढें टाकायचें, म्हणजे प्रथम हातांतल्या छोट्या परशूनें समोरचीं झाडेंझुडपें तोडून रस्ता करून घ्यावा लागे. आज मियामी हें एक समृद्ध, गुलहौशी, सूर्यप्रकाशांत तळपणारें धवल नगर असून तें लवकरच अमेरिकेंतील मोठ्या शहरांपैकीं एक गणलें जाण्याच्या मार्गावर आहे. मियामीसमोरच 'मियामी बीच' हें समुद्रकांठचें जगांतील सर्वांत विलासपूर्ण किनाऱ्याचें ठिकाण आहे. येथील भव्य हॉटेलें आणि असंख्य टुमदार बंगले यांच्यांत मिळून येणाऱ्या लाखों प्रवाशांची सोय

होऊं शकते. या दोन शहरांच्या मध्यें, प्रत्यक्ष उपसागरांत, दहा छोटीं बेटें निर्माण झालीं आहेत. हा उपसागर मोठ्या जहाजांयोग्य करण्यासाठीं म्हणून तळाचा गाळ काढून खोल बनविण्यांत आला, त्या गाळाचीं हीं बेटें तयार झालीं. हा सर्व प्रदेश आतां निरोगी बनविण्यांत आला आहे. किनाऱ्याशीं पुलांनीं जोडण्यांत आलेल्या या बेटांवर सुपीक मातीचे नवे थर घालण्यांत आले असून त्यांत ओळीनें पाम वृक्ष लावण्यांत आले आहेत. येथील बागा म्हणजे विविध रंगांची एक जोशपूर्ण मैफलच असते. एके काळीं भयाण अरण्य असलेल्या या प्रदेशाचें आतां नंदन-वनांतील उद्यानांत रूपांतर करण्यांत आलें आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश आणि कधींहि न संपणारा वसंतऋतु यांचें या शहराला वरदान लाभलें आहे. येथील नयनरम्य रंगसंगति आणि प्रशस्त मुबलक जागा यांमुळें निर्माण होणारा आनंद इथल्या शारीरिक सुदृढतेच्या आणि ऐषआरामाच्या भावनेनें सुखावलेल्या प्रवाशांच्या मुद्रांवर प्रतीत होत असतो. दीर्घकाळ खडतर परिस्थितींतून जात असलेल्या देशांतले आमच्यासारखे एका जुन्या खंडाचे रहिवासी एवढी चैन, सुखासीनता, पृथ्वीवरील नंदनवनाची ही नांदी पाहून बहुधा आश्चर्यानें थक्कच होऊन जातील. पण आधुनिक तांत्रिक प्रगतीच्या जोरावर एक दिवस आफ्रिकेंत सुद्धां काय साध्य करतां येणें शक्य आहे त्याचें हें केवळ एक द्योतक आहे. कारण मोरोक्कोच्या दक्षिण हद्दीपेक्षांहि मियामी सखल भागांत आहे.

आणि हें सगळें चालू पिढीच्या हयातींत करतां येणें शक्य आहे. ज्यांनीं स्वतः या जंगलांत प्रथम प्रवेश करून झाडें तोडलीं, साप मारले त्यांपैकीं बरेच जण आज या स्वतः हातभार लावून उभारलेल्या शहरांत अभिमानानें आणि आनंदानें राहत आहेत. त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं मेयर, बँकर, वेगवेगळ्या व्यापारी कॉर्पोरेशनचे अध्यक्ष अशा या प्रदेशांतील बहुमानाच्या जागा भूषविल्या आहेत. या नंदनवन प्रदेशांत श्रीमती एफ्. आमच्या वाटाड्या आहेत. स्वतःच्या मोटारींतून त्या आम्हांला सगळें कांहीं एका लांब फेरींत दाखवून आणतात. त्या बोलत असतांना कांहीं वेळ जणुं गतकालच पुनरुज्जीवित होतो आणि आम्ही पाहत असलेलीं वेगवेगळीं ठिकाणें या भूतकाळांतले भिन्न भिन्न टप्पे असतात. कांहीं वर्षांपूर्वीं दिवंगत झालेल्या मियामीच्या एका प्रमुख आद्य वसाहतकाराच्या श्रीमती एफ्. या पत्नी. जर कुणा एका व्यक्तीचा मियामीचे संस्थापक असा गौरव करायचा असेल तर तें स्थान कै. श्रीयुत एफ्. यांनाच द्यावें लागेल. १९१२ सालीं तीं दोघें मधुचंद्रासाठीं निघालीं असतां त्यांचें छोटें गलबत फ्लॉरिडाच्या किनाऱ्या-पासून भरकटून केवळ योगायोगानें जंगलाच्या टोकावरील एका लहान मच्छीमारी

खेड्याच्या किनाऱ्याला कसें लागलें आणि तेथेंच एक गांव वसवण्याची कल्पना एकदम त्यांच्या डोक्यांत कशी चमकून गेली ती सगळी रोमांचकारी हकीकत श्रीमती एफ्. नीं आम्हांला सांगितली. "रोज संध्याकाळीं या विवक्षित जागेवर एक अजस्र वृद्ध मगर हवेसाठीं पाण्यांतून बाहेर येत असे. मला ही मगर आवडे आणि जवळ जाऊन मी तिला हाका मारीत असें." त्यांना बक्षीस म्हणून देण्यांत आलेल्या हत्तीबद्दलहि त्यांनीं आम्हांला सांगितलें. जंगल तोडून साफ केलेल्या आपल्या जमिनीची पाहणी करण्यासाठीं या हत्तीवरून मिसेस एफ्. जात असत. जो कोणी या साफ केलेल्या जागेवर घर बांधून वस्ती करण्याचें आश्वासन देईल अशा कोणालाहि या जागा मोफत मिळत असत. आणि तरीहि तिथें त्या घेणाऱ्यांची वाण होती! आज येथील जागा अमेरिकेंतील अत्यंत महाग जागांपैकीं एक झाली आहे. नवें शहर स्थापन करणें हें एक किती वर्णनातीत, उन्मादक साहस आहे तें त्यांनीं आम्हांला सांगितलें. त्याच वेळीं आम्ही प्रकाशानें झगमगणाऱ्या दुकानांच्या खिडक्यांसमोरून जात होतों आणि नृत्यसंगीताचे सूर आमच्या कानीं येत होते. श्रीमती एफ्.च्या वर्णनांनीं आम्हांला एका अद्भुतरम्य, ऐश्वर्यशाली युगांत नेऊन सोडलें. करड्या केसांच्या, निखळ विनोदी वृत्तीच्या आणि अजूनहि अगदीं चपळ असलेल्या श्रीमती एफ्. यांचें सबंध जगावर प्रेम आहे आणि मनुष्यजातीवरील त्यांचा विश्वास ढळलेला नाहीं.

"कोणत्याहि स्त्रीला शक्य झालें नसतें असें अद्भुत आयुष्य मी जगलें आणि अजूनहि जगत आहें," श्रीमती एफ्. म्हणाल्या.

निरोप घेतांना मी त्यांना म्हणालों, "मी तुमचा फार आभारी आहें. कारण तुम्ही आम्हांला नुसत्या मियामीचीच नव्हे, तर सबंध अमेरिकेची नीट ओळख व्हायला बहुमोल मदत केली आहे."

प्रकरण अठरावें

# 'गोल्डन गेट' पुलावरून सुचलेले विचार

पाश्चिमात्य जगाची ही अखेरची हद्द. गोऱ्या लोकांची मजल या रेषेपाशीं संपते. करड्या रंगाच्या या अथांग महासागराजवळ पृथ्वीचें वर्तुळ पूर्ण होतें आणि पलीकडच्या दुग्धधवल धुक्यामधून पुन्हा एकदां पौर्वात्य जगाची सावली हलके हलके दृग्गोचर होऊं लागते.

ग्रीसच्या गुलाबी किनाऱ्यावर, आयोनियाच्या प्रसन्न प्रभातकाळीं, स्नेहल आकाशाखालीं चालणाऱ्या तत्त्वचर्चांमधून आणि जगाच्या मूलतत्त्वांची विचक्षणा करण्याचा चंग बांधणाऱ्या महाकवींच्या आणि तत्त्वज्ञांच्या उत्स्फूर्त स्वप्नांतून पाश्चात्य जगाचा आरंभ झाला. बौद्धिक प्रयत्न आणि तीव्र संघर्ष यांमधून पाश्चात्य जाणिवेला स्वतःचें असें अभिजात, मौलिक रूप प्राप्त झालें तें 'ॲटिका' येथें.

पाश्चात्य संस्कृतीच्या संघटनाचें कार्य ग्रीकांनीं हातीं घेण्यापूर्वींसुद्धां तेथें अनेक देव-देवता, काव्य, कला इत्यादि सगळें होतें. संस्कृतीचीं विविध केंद्रें होतीं आणि त्यांमधून इतिहासकालीन व्यक्तींच्या प्रतिभेचा आविष्कार साकार होत असे. पण ग्रीसमध्यें आतां एक तत्त्वज्ञानविषयक आणि शास्त्रीय स्वतंत्र विचारांचें नवें वारें खेळूं लागलें. सर्वश्रेष्ठ, अद्वितीय अशी एक शक्ति या विचारांची उद्गाती होती. मानवव्यक्ति हीच ती शक्ति होय. 'हेलेनिझम 'नें इतिहासाच्या प्रगतींत या दोन गोष्टींची मोलाची भर घातली. आणि पुढें याच पायावर ग्रीक सौंदर्यशास्त्र, लोकशाही जीवनपद्धति आणि कायदा यांविषयींच्या रोमन लोकांच्या कल्पना, ख्रिश्चन धर्म इत्यादि अनेक कल्पनांचें शिल्प उभारलें जाऊन त्या सगळ्यांच्या संगमांतून 'यूरोप' ही एकजिनसी कल्पना निर्माण झाली. ग्रीस देश नसता तर युरोपियन संस्कृतीचें स्वरूप काय राहिलें असतें याची आपण कल्पनाहि करूं शकत नाहीं. कदाचित् मग युरोपियन संस्कृतीच कधीं अस्तित्वांत आली नसती.

सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ग्रीस हें जगाकडे आणि जीविताकडे

पाहण्याच्या एका संपूर्णपणें स्वतंत्र दृष्टिकोणाचें प्रतीक होतें. मानवाच्या अस्तित्वाबद्दल तोंपर्यंत चालत आलेल्या कल्पनांपेक्षां ग्रीसची कल्पना सर्वस्वीं वेगळी होती. ग्रीसनें एक नवी विचारसरणी जगापुढें मांडली. मानवाचें ज्ञान शून्य आहे असें गृहीत धरूनच ग्रीक प्रज्ञा आपल्या विचारमंथनाला प्रारंभ करते. पण त्याचबरोबर ही प्रज्ञा नवें शिकून घेण्यासाठीं, शोध लावण्यासाठीं आणि या ज्ञानाचें स्वरूप विशद करून सांगण्यासाठीं अत्यंत उत्सुक असते, असें ग्रीक लोक मानीत. एकाद्या तत्त्वप्रणालीबद्दलचा आत्यंतिक अभिनिवेश आणि व्यक्तिमनावर आणलें जाणारें दडपण या गोष्टी ग्रीकांना निषिद्ध होत्या. कुणालाहि भाग घेतां येईल असें अनिर्बंध चर्चास्वातंत्र्य हा या संस्कृतीचा प्राणवायु होता. अंतिम सत्याच्या शोधासाठीं आणि मानवाची ज्ञानसृष्टि अधिक संपन्न व्हावी यासाठीं परस्परसहकार्यानें व परस्परांच्या मतांबद्दल पूर्ण आदर बाळगून केले जाणारे तत्त्वज्ञानविषयक वादविवाद हें या संस्कृतीचें उगमतत्त्व होतें. कोणताहि पूर्वग्रह न बाळगतां, अंतःस्फूर्तीच्या, निरीक्षणाच्या, विचाराच्या आणि तर्कशुद्ध प्रतिपादनाच्या जोरावर हे संवाद त्या त्या समस्येचें खरेंखुरें स्वरूप उघड करीत जातात. हळूहळू आपल्या मनाचें आकलनक्षेत्रहि विशाल होऊं लागतें. मूलभूत नियम आणि तत्त्वें कळूं लागतात. जगाच्या स्वरूपाबद्दल प्रज्ञा स्वतःचें मत बनवूं लागते. नव्या विचारपरंपरा निर्माण करूं लागते. निसर्गशक्तींवर विजय मिळविण्यासाठीं आधीं माणूस त्यांची कार्यपद्धति समजून घेण्याची धडपड सुरू करतो. म्हणजेच तो विज्ञानाची मुहूर्तमेढ रोवतो.

अशा तऱ्हेनें विचार करणाऱ्या माणसाचा ईजिप्त, ॲसिरिया, पर्शिया इत्यादि देशांमधील अज्ञान व अंधश्रद्धा यांत खितपत पडलेल्या व्यक्तित्वहीन जनसमुदायांशीं सुतराम् तरी संबंध आहे काय? हा एक नवमानव आहे. मानववंशाच्या आध्यात्मिक आणि नैतिक उत्क्रांतीमधील प्रगतीचा हा एक फार मोठा टप्पा आहे. हा माणूस स्वावलंबी, शिस्तबद्ध, स्वाभिमानी आणि स्वतंत्र बुद्धीनें विचार करणारा आहे. तो कांहीं कोणत्याहि जुलमी सत्तेपुढें किंवा दैवी अवडंबरापुढें मान तुकवून राहणारा नाहीं. बुद्धिप्रामाण्यानें जे नियम त्याला योग्य वाटतात, आणि खुल्या चर्चेतून जे निष्पन्न झाले आहेत तेवढेच नियम तो मानतो. आपलें व्यक्तिगत आणि सामूहिक जीवन सुनियंत्रित करण्यासाठीं प्रथम तो स्वतःचें यथार्थ स्वरूप समजून घेण्याची कास धरतो. ज्या मानववंशांत आपण जन्म घेतला तो मानववंश म्हणजे आहे तरी काय हें जाणण्याचा तो प्रयत्न करतो. त्यासाठीं तो मानवी समस्यांचें सूक्ष्म निरीक्षण करून

त्या समस्यांचें उत्तर शोधूं पाहतो. या मानवजातीबद्दल त्याला एक प्रकारचा आदर आणि विश्वास वाटतो. मानव हा स्वभावतः सत्प्रवृत्त आणि न्यायप्रिय आहे, स्वतः शक्य तितकें निर्दोष बनण्याकडे त्याचा ओढा आहे, अशी त्याची खात्री आहे. माणसाचें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व हाच नीतिपूर्ण जीवनाचा एकमेव प्रारंभबिंदु आहे असें त्याला मनोमन वाटतें. वैचारिक प्रक्रियांचें, सामाजिक प्रगतीचें आणि मानवी जीवनांतल्या मांगल्याचें तें आदितत्त्व आहे असें तो मानतो. हें व्यक्तिस्वातंत्र्याचें अधिष्ठान संपुष्टांत आलें कीं जग एकदम अपंग होईल. आनंद, नीतिमत्ता, स्वाभिमान या साऱ्यांचा लोप होईल, कारण हे मानवनिष्ठ गुणविशेष संपूर्ण स्वातंत्र्याच्या वातावरणांतच जिवंत राहूं शकतात. ते जिथें नाहींत तें जग म्हणजे शुद्ध रानटी लोकांचें जग ठरेल. अशी ज्वलन्त विचारप्रणाली निर्माण करणारा हा नवमानव व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करून माणसाला केवळ एक साधन म्हणून राबवणाऱ्या जुलमी शासनव्यवस्थेचा केव्हांहि स्वीकार करणार नाहीं. जिथें मानवी व्यक्तित्वाची सर्जनशीलता, त्यांचे व्यक्तिविशेष, मौलिक विचार, उत्स्फूर्त कल्पना, दडपल्या जातात तेथें मानवी आयुष्याला कांहीं अर्थच उरत नाहीं. हें जीवन निर्मितिहीन, निरर्थक, ओंगळ बनतें. जगण्यांत कांहींच राम राहत नाहीं. कारण मानव हेंच अंतिम ध्येय आहे, साधन नव्हे, असें या व्यक्तिस्वातंत्र्याचें सूक्त आहे. लोकांच्या संमतीनें अधिकारावर असलेलें सरकार आणि लोकशाही स्वातंत्र्य हींच मानवविकासाचें ध्येय साध्य करण्याचीं खरीं साधनें होत. तीं तशीं असतील तरच त्यांचें समर्थन करतां येईल आणि त्यांना कायद्याची मान्यता देतां येईल. सरकार आणि कायदे या लोकांच्या पायांतील शृंखला बनतां कामा नयेत. स्वतंत्र व्यक्तींच्या यशस्वी आणि आनंदमय विकासाचीं तीं साधनें ठरलीं पाहिजेत.

मॅरॅथॉनच्या रणक्षेत्रावर युरोपियन संस्कृति जन्मास आली, असें अनेकांनीं म्हटलें आहे; आणि हा खरोखरच एक उदात्त विचार आहे. कारण अगदीं प्रथम या रणक्षेत्रावरच अभिजात युरोपियनांनीं त्यांच्या व्यक्तिस्वातंत्र्याला नख लावून त्यांना पुन्हा एकदां दुर्दैवी हुकुमशाहीच्या अंमलाखालीं आणण्याचे काळ्या आशियन लोकांचे प्रबळ सामूहिक प्रयत्न एकजुटीनें हाणून पाडले. आणि अशा तऱ्हेनें मुक्त जीवनाची संधि मिळाल्यावर आपली प्रगत संस्कृति टिकविण्याचे मार्गहि त्यांनीं शोधून काढले. असें करण्यांत त्यांनीं केवळ आपापल्या शहरराज्यांचें आणि ग्रीस राष्ट्राचेंच नव्हे तर नुकत्याच आकार घेऊं लागलेल्या युरोपचें आणि एका विशिष्ट जगाचें संरक्षण केलें. हेंच जग पुढें अनेक शतकांनंतर पाश्चिमात्य जग म्हणून ओळखलें जाऊं लागलें.

* * *

अंतिम सत्याचा शोध घेण्यासाठीं आणि मानवाचें भौतिक जीवन अधिक संपन्न करण्यासाठीं अविरत प्रयत्न करीत राहणें हा या पाश्चिमात्य जगाचा स्थायी भाव आहे. प्रगतीच्या या एकसारख्या वाढणाऱ्या अनावर वेगामुळें सबंध जगावर आपला प्रभाव पाडणें युरोपला भाग पडलें. युरोपनें सर्वांना आपलींच ध्येयें मान्य करायला लावलीं आणि इतर सर्व जग असहायपणें युरोपच्या प्रभावाखालीं आलें. वैज्ञानिक प्रगतीमुळें युरोप कांहीं काळपर्यंत तंत्रज्ञान व संघटना या बाबतींत इतर राष्ट्रांना अत्यंत भारी ठरलें. आपण मनांत आणूं तें करूं शकूं, असें त्याला वाटूं लागलें. समुद्रावर स्वामित्व मिळवून युरोपनें सातांसमुद्रांच्याहि पलीकडे आपली सत्ता स्थापन केली.

अटलांटिकच्या पलीकडील निर्जन रानटी खंडांत युरोपनें निर्वेधपणें संचार सुरू केला. नैसर्गिक आपत्तींखेरीज इतर कोणतीहि शक्ति त्याच्या मार्गांत आड आली नाहीं. पूर्वेकडे मात्र त्यांच्या प्रगतीचा मार्ग रोखणाऱ्या जुन्या संस्कृतींशीं त्याला निकराची झुंज द्यावी लागली. युरोपनें या संस्कृतींच्या अनुल्लंघ्य मर्यादा शिथिल केल्या, अनेक शतकांच्या निष्क्रियतेंतून त्यांना बाहेर काढलें आणि जिथें जिथें शक्य झालें तिथें तिथें, अगदीं त्रोटक आणि अर्धवट स्वरूपांत कां होईना, पण या संस्कृतींमध्यें आपल्या जीवनपद्धति आणि आपले विचारप्रवाह पसरवले. कांहीं प्राचीन पौर्वात्य समाजांनीं तर उघडपणें युरोपीय विज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात् करण्याचे प्रयत्न सुरू केले. या ज्ञानाच्या जोरावरच आपण पुढें युरोपशीं टक्कर देऊं अशी त्यांची उमेद होती. पण पुढें काळ असा आला कीं, अनेक संस्कृतींचा अर्क काढून निर्माण झालेल्या आपल्या ऐश्वर्याच्या झगमगाटांत आणि उराशीं कवटाळून धरलेल्या परंपरांत, आपल्याच इतिहासांत, दंतकथांत, आकांक्षांत, स्वप्नरंजनांत, आवडीनिवडींत, भ्रमांत, पूर्वग्रहांत, आशंकांत गुरफटून तो राहूं लागला. त्याचा तोल गेला, सारासारविवेक राहिला नाहीं, आंतरराष्ट्रीय घडामोडींवरचें वर्चस्व कमी झालें आणि अखेर स्वतःच्या कर्तृत्वाचा विश्वासहि डळमळीत झाला.

आजच्या परिस्थितींत तर युरोप पार गोंधळून गेला आहे. एका बाजूला अमेरिका आणि दुसऱ्या बाजूला रशियाचें साम्राज्य या दोघां बलाढ्य शक्तींनीं मिळून युरोपचें ऐतिहासिक अग्रेसरत्वच हिरावून घेतलें आहे. पण कितीहि विरुद्ध प्रचार करण्यांत आला तरी युरोपच्या आणि अमेरिकेच्या वृत्तींत कांहीं तसा मूलभूत स्वरूपाचा फरक नाहीं. शिवाय पाश्चात्य जगाला आतां आपापसांत फुटीर प्रवृत्तीनें राहून चालण्यासारखें नाहीं. जागतिक प्रश्नांवर मतभेद माजवून विभक्त

राहणें परवडण्याइतका कांहीं युरोपचा आकार आतां मोठा राहिलेला नाहीं. पाश्चात्य जग अखेर एकच आहे आणि आर्थिक किंवा राज्यव्यवस्थेंतील भिन्नत्वामुळें किंवा त्यांच्या तांत्रिक प्रगतीचे टप्पे वेगळे असल्यामुळें जरी वरवर कांहीं मतभेद आढळले तरी जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा अंतिम दृष्टिकोण सारखाच आहे. युरोपांतील कांहीं प्रगत देश आपली शैक्षणिक पातळी, अभिरुचीचा आणि कलात्मकतेचा दर्जा अमेरिकेहून उच्च आहे, असा गर्व बाळगतात. पण इथें एक गोष्ट आपण विसरतां कामा नये ती ही कीं, या गोष्टी त्या देशांतल्या आम जनतेला मिळत नसून फक्त एका विशिष्ट सामाजिक थरापुरत्याच त्या मर्यादित आहेत. अमेरिकेंत मात्र तसें नाहीं. ऐतिहासिक बंधनांच्या पाशांतून मुक्त असल्यामुळें आणि अफाट समृद्ध खंड हाताशीं असल्यामुळें वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या प्रगतीला एवढा अमर्याद वाव आहे कीं, युरोपला त्याची स्वप्नांतसुद्धां कल्पना करतां आली नसती. अमेरिकेंतील खंडप्राय अर्थव्यवस्थेंत अनेक देशांचे आणि राष्ट्रांचे लोक विशाल लोकशाही संघराज्याच्या छत्राखालीं एकदिलानें आणि गुण्यागोविंदानें नांदत आहेत. या देशानें उत्पादनाच्या बाबतींत अपूर्व अशी प्रगति केली आहे आणि आपल्या लोकांचें जीवनमान तितक्याच प्रमाणांत समृद्ध केलें आहे. वैज्ञानिक पद्धतींच्या जोरावर एकाच वेळीं व्यक्तिप्रधान पण सामूहिक असा वैशिष्ट्यपूर्ण समाज निर्माण केला आहे. व्यक्तिप्रधान म्हणण्याचें कारण असें कीं, व्यक्तीच्या कर्तृत्वावर, सर्जनशीलतेवर, अबाधित हक्कांवर, बौद्धिक आणि राजकीय स्वातंत्र्यावर या समाजाचा विश्वास आहे आणि मानवी व्यक्तित्वावरच सामाजिक नीतिमत्ता आणि राज्यघटनात्मक कायदे अधिष्ठित असावेत असें अमेरिकेला वाटतें. हा समाज सामूहिकहि आहे, कारण सबंध समाजाच्या भौतिक गरजा, त्याचें शिक्षण, त्याचा सर्वांगीण विकास यांच्याकडे जाणीवपूर्वक आणि पद्धतशीर लक्ष दिलें जातें व लोकांचें जीवन अधिकाधिक सुखी व्हावें यासाठीं श्रम हलके करणारीं असंख्य यंत्रें प्रत्येक कुटुंबाला मिळूं शकतील असे प्रयत्न केले जातात. शिवाय सर्वसामान्य लोकांची क्रयशक्ति भरपूर असल्याशिवाय सर्व व्यवहार सुरळित चालणारच नाहींत अशी या समाजाची धारणा आहे आणि या तत्त्वाच्या अनुरोधानेंच समाजव्यवस्थेची रचना झाली आहे. नव्या जागतिक मंदीची भीति आणि त्या दडपणाखालीं केले जाणारे अर्धवट प्रयत्न यांच्यामुळें निर्माण होणारी अस्थिरता सावरून धरण्याचें आणि पुन्हा समतोल स्थापन करण्याचे अंतर्गत प्रयत्न अमेरिकेंत सुरू आहेत. अर्थात् सामाजिक आणि नैतिक बाबतींत अमेरिका कांहीं परिपूर्ण किंवा निर्दोष नाहीं, पण दोन गोष्टी मात्र

कुणालाहि नाकारतां येणार नाहींत : पहिली अशी कीं, औद्योगिक विकासाच्या क्षेत्रांत तिनें मुख्यतः पाश्चात्य परंपरांचाच अवलंब केला असून कांहीं बाबतींत युरोपलाहि मागें टाकलें आहे; दुसरी गोष्ट म्हणजे जगांत आजपर्यंत केव्हांहि उपलब्ध झाल्या नव्हत्या अशा वैयक्तिक आणि सामूहिक विकासाच्या आणि समृद्धीच्या संधी आपल्या अफाट प्रजेला उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळें तिनें 'लोकशाही' या संज्ञेला (ग्रीक आणि युरोपियन अर्थांना पूरक असा) नवा आणि अधिक खोल अर्थ प्राप्त करून दिला आहे.

आपल्या प्रगतीच्या ओघांत रशियानेंहि 'कधींमधीं' युरोपच्या पद्धतींचा आपल्या तीव्र, स्वतंत्र—कित्येकदां विक्षिप्त—सर्वंकष स्वभावाला मानवेल इतपत अंगीकार केला आहे. असें करण्यांत रशियानें पाश्चात्य जगाच्या वैज्ञानिक आणि तंत्रप्रधान संस्कृतींचा संगम साधला आहे, पण ग्रीक परंपरांतला दुसरा विचार मात्र रशिया घेऊं शकत नाहीं—कधींहि घेणार नाहीं : व्यक्ति हेंच समाजाचें अंतिम ध्येय आहे, साधन नाहीं, हा तो दुसरा विचार होय. अशा विचारांत अभिप्रेत असलेले नागरी आणि राजकीय हक्क, विचारस्वातंत्र्य, परस्परांबद्दल आदर या गोष्टीहि अर्थातच रशियाला रुचण्यासारख्या नाहींत. रशियाविषयीं आपल्याला जी कांहीं माहिती उपलब्ध आहे तेवढ्या माहितीवरून हें कबूल केलें पाहिजे कीं, त्यानें बरीच तांत्रिक प्रगति केली आहे आणि आपल्या प्रजेचें जीवनमान खूपच सुधारलें आहे, पण अद्याप तें मध्ययुरोपांतील लोकांच्या जीवनमानाच्या जवळपासहि नाहीं, मग अमेरिकेशीं तर तुलनाच करण्याचें कारण नाहीं. मोडकळीला आलेल्या झारशाहींत लोकांना जी विपन्नावस्था प्राप्त झाली होती त्यापेक्षां किती तरी चांगले दिवस रशियानें त्यांना मिळवून दिले आणि सामाजिक जीवनांत आधुनिक जगाला साजेशा कांहीं सुधारणा घडवून आणल्या हें खरें आहे. पण ही नवी संस्कृति स्वीकारतांना त्या संस्कृतीला आधारभूत असलेलें एक महत्त्वाचें तत्त्वच त्यानें डावललें. स्वातंत्र्यप्रिय युरोपनें प्रत्येक पाश्चात्य नागरिकाला दिलेला बौद्धिक आणि नैतिक अनुभवांचा अमोलिक ठेवा मात्र रशियानें आपल्या प्रजेला देण्याचें अत्यंत कटाक्षानें आणि निर्घृणपणें नाकारलें. रशियन सत्तेनें अत्यंत चपळाईनें आणि धूर्तपणें या मूल्यांवर अंधश्रद्धेचा, अप्रामाणिकपणाचा, डबघाईला आलेल्या समाजव्यवस्थेंतील पळवाटांचा शिक्का मारला. रशियाच्या या कृत्यांना शह देण्यासाठीं म्हणून युरोपमधील कांहीं उजव्या गटाच्या सत्ताधिष्ठित सरकारांना स्वतःकडे हुकुमशाही अमदानीसारखे अधिकार घेणें भाग पडलें, समाजमनाच्या तळाशीं दडून राहिलेल्या कांहीं तर्कदुष्ट आणि प्रतिगामी शक्ती—

मध्ययुगीन भीतींचे, मनोविकृतींचे, आत्यंतिक स्वरूपाच्या सामाजिक व राजकीय द्वेषभावनांचे हे सुप्त रानटी अवशेष—उफाळून वर आल्या आणि अशा प्रकारें रशियन शासनव्यवस्थेनें आजचा हा सबंध जगाला संकटाच्या खाईंत लोटणारा ध्येयप्रणालींचा भयानक पेचप्रसंग निर्माण केला.

कम्युनिस्ट राज्यक्रांतीनें मार्क्सवादाला श्रुतिस्मृतींइतकेंच महत्त्व दिलें, त्यांतच पवित्र रशियासंबंधींच्या अंधश्रद्ध आणि माथेफिरू कल्पनांची भर पडली. त्यामुळें अशी एक राज्ययंत्रणा निर्माण झाली कीं तिनें आपल्या हद्दींत मानवी स्वातंत्र्य नामशेष करून टाकलें. आधुनिक युरोपच्या इतिहासांत व्यक्तिस्वातंत्र्यावर एवढें भयानक संकट पूर्वी केव्हांहि कोसळलें नव्हतें. केवळ लोकशाही स्वातंत्र्याचीच नव्हे तर कला, विज्ञान इत्यादि क्षेत्रांतल्या स्वतंत्र प्रज्ञाशील विचारांची सुद्धां या शासनानें पार कत्तल केली आहे. सबंध सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन एका 'योजने'च्या वेठीला जुंपण्यांत येतें. सर्वंकष अशा पक्षीय सरकारकडून—म्हणजेच सर्व सामर्थ्य आणि सत्ता ज्या मूठभर लोकांच्या हातीं केंद्रित झाली आहे त्या गटाकडून—वेळोवेळीं या 'योजने'ची अधिकृत (व बदलती) व्याख्या सांगितली जाते. ही सर्वंकष सत्ता एक अपरिहार्य ऐतिहासिक उत्क्रांति असल्याचें आणि प्रगतीला अत्यंत उपकारक असल्याचें सांगण्यांत येतें. मानवजातीनें जागतिक समाजवादी समाजरचनेच्या ध्येयाकडे जी वाटचाल आरंभली आहे त्या यात्रेंतला हा एक पूर्वनियोजित टप्पा आहे, असें या सत्तेचें समर्थन केलें जातें. या कल्पनेचें मूळ धार्मिक भावनांत आहे आणि त्यायोगें आपोआपच शासनसंस्थेला पुन्हा एकदा धर्माचें अधिष्ठान मिळतें. इतकेंच कीं इथें देवतेची जागा 'ऐतिहासिक गरजे'नें घेतलेली असते. या सत्तेचे सूत्रधार जागतिक इतिहासाच्या प्रवाहाचा नीट अभ्यास करतात, परिस्थितीचा साधकबाधक विचार करतात आणि त्यानुसार वेळोवेळीं 'पक्षाचें धोरण' आंखतात. मानवी प्रगतीच्या संरक्षणाची सगळी जबाबदारी जणुं कांहीं आपल्याकडेच सोंपवण्यांत आली आहे अशा आविर्भावांत या पक्षाचें काम चालतें. या पक्षाचे लोक तेवढे शहाणे आणि इतर सर्व जण मूर्ख असतात. प्रत्येक वेळीं या पक्षानें घेतलेला निर्णयच तेवढा योग्य असतो. सुसंस्कृत जगांत अनैतिक, अमानुष गणले जातील अशा मार्गांचा अवलंब करण्यासहि हा पक्ष थोडासुद्धां कचरत नाहीं. त्याची कोणतीहि आज्ञा व्यक्तीनें विनातक्रार शिरसावंद्य मानलीच पाहिजे. या सत्तेच्या अंमलाखालचे नागरिक हे अबाधित हक्क असणारे, स्वतंत्र सदसद्विवेकबुद्धीचे आणि स्वतःची कर्तृत्वशक्ति असणारे, समाजाचे स्वतंत्र

अनुक्रम ........ वि॰ ........
क्रमांक ........ नों॰ दि॰

घटक नसतात. ऐतिहासिक उद्दिष्टें साध्य करण्याच्या दृष्टीनें शासनसंस्था ज्यांना हवा तो आकार देऊं शकेल असा हा मानवी कच्चा माल असतो. या सत्तेला थोडा जरी विरोध केला, किंवा पक्षाच्या आदेशाबाहेर किंचित् जरी पाऊल टाकलें तरी तो एक भयानक रोगाचा कलंक आहे किंवा मानवी प्रगतींत अडथळा आणणारा तो एक गंभीर गुन्हा आहे, असें ठरवून त्याला निर्दय शासन करण्यांत येतें.

यावरून असें दिसून येईल कीं, या दोन प्रबळ गटांत सध्यां चाललेला संघर्ष कांहीं राजकीय किंवा आर्थिक स्पर्धेच्या स्वरूपाचा नाहीं. कारण तसे संघर्ष सुधारलेल्या मानवी समाजाला आज कित्येक शतकांपासून सुपरिचित आहेत. थोडक्यांत सांगायचें म्हणजे आजचा संघर्ष हा अधिक विदारक स्वरूपाच्या मूलभूत मतभेदांतून निर्माण झाला आहे. मानवाचें जगांतलें स्थान कोणतें, समाजाशीं आणि शासनसंस्थेशीं त्याचे संबंध कसे असले पाहिजेत, त्याच्या व्यक्तिगत प्रयत्नांचें यशापयश बाजूला ठेवलें तर त्याचें एकूण विश्वरचनेंत महत्त्व काय, हे ते मूलभूत मतभेदाचे प्रश्न होत. या मतभेदांची दरी इतकी अफाट आहे कीं ती कधीं सांधतां येईलसें वाटत नाहीं. कारण परस्परांमधील सामंजस्य हें कांहीं राष्ट्राराष्ट्रांतील हितसंबंधांवर अवलंबून राहूं शकत नाहीं. त्यासाठीं नैतिक दृष्टिकोणांत आणि संस्कृतीच्या मूलभूत रचनेंतच बदल घडून आला पाहिजे. कारण या दोन प्रभावांतूनच जागतिक उत्क्रांतीची आणि मानवी प्रगतीची दिशा ठरत असते.

अमेरिका आणि रशिया यांच्यांतला हा संघर्ष आणखी कोणत्या नव्या आपत्तींतून आपल्याला जायला लावणार आहे याविषयीं युरोप अत्यंत भीतियुक्त अंतःकरणानें तर्क करीत असतें. सर्वसंहारक अणुशस्त्रें वापरलीं जातील असें महायुद्ध सुरू व्हावें ही इच्छा फक्त निरोगी नसलेल्या मनांत किंवा असहाय निराशेच्या गर्तेंत बुडालेल्या गुलामांच्या विषण्ण अंतःकरणांतच स्फुरूं शकेल. पण आज जगांत सामान्य माणसाच्या भावनांना कांहींच किंमत उरलेली दिसत नाहीं. पूर्वीं युद्धाला प्रारंभ करण्यापूर्वीं दोन्ही पक्षांचे मुरब्बी आणि जबाबदार मुत्सद्दी युद्ध करण्याइतकें कांहीं सबळ कारण खरोखरीच घडलें आहे कीं नाहीं हें ठरवीत असत. आज या दोन प्रबळ गटांतले सरकारी आणि लष्करी अधिकारी एकत्र येऊन असा कांहीं विचारविनिमय करण्याची शक्यता दिसत नाहीं. भूकंप, पूर यांसारख्या नैसर्गिक उत्पातांतच अलीकडे युद्धाचीहि गणना केली जाते! कुणालाच हे उत्पात नको असतात आणि तरी कुणीहि ते थांबवूं शकत नाहीं. तरीहि अशा समान विचारविनिमयाची शक्यता समूळ नाहींशी झाली आहे असें मानण्याचें कारण नाहीं;

कारण कांहीं अनिश्चित काळापुरता कां होईना, पण या दोन सत्तांचा समन्वय घडविणारा नवा समतोल प्रस्थापित होईल अशी अंधुक आशा बाळगण्यास अजूनहि जागा आहे. भावी काळांत कोणत्याहि घटना घडून आल्या तरी अमेरिकेचें धोरण विधायकच राहील. जगाच्या शांततेला ज्यापासून धक्का पोंचेल असें कोणतेंहि कृत्य अमेरिका करणार नाहीं. प्रत्येक राष्ट्राला शांततेनें, स्वतःला पटेल त्या बौद्धिक आणि नैतिक वातावरणांत आपल्या ध्येयाच्या दिशेनें वाटचाल करतां येईल. त्यांच्या मार्गात अमेरिका कधींहि अडथळे आणणार नाहीं. पण या संघर्षांत रशियाची जर सरशी झाली तर मात्र आम्हां सर्वांच्याच हृदयांत धडकी भरल्याखेरीज राहणार नाहीं. कारण एका राष्ट्राचें, राज्यव्यवस्थेचें, प्रबळ सत्तेचें, साम्राज्यशाहीचेंहि म्हणा हवें तर, इतर जगावरील वर्चस्व एवढाच या घटनेचा अर्थ असणार नाहीं. या घटनेंत यापेक्षां किती तरी भयंकर अशी आपत्ति दडलेली असेल. माणसाच्या प्रगतीचा मार्गच या घटनेमुळें उलटा फिरेल, त्याच्या ध्येयांची उलथापालथ होईल, स्वतःबद्दलचे आणि जीवनाबद्दलचे त्याचे सगळे संकेत पार बदलून जातील, त्याच्या संस्कृतीचा गाभाच वेगळा बनेल, मॅरॅथॉनच्या रण-क्षेत्रांत अखेर मेडीजच्या प्रमाथी सामर्थ्याचा विजय झाल्यासारखें होईल.

* * *

आपल्याभोवतीं हें जें धुक्याचें आणि अंधाराचें पटल दाटत आहे तें छेदून आपण नेमके कोणत्या ठिकाणीं आहोंत तें अजमावण्याचा, आणि भवितव्यानें आपल्यासाठीं कोणतें ताट वाढून ठेवलें आहे त्याचा वेध घेण्याचा आपण कधीं कधीं प्रयत्न करतों. अशा प्रयत्नांतून बरेच संकीर्ण विचार मनांत येतात. आपल्या प्रचलित समस्या समजून घेऊन त्या सोडविण्याचा, कांहीं सुव्यवस्था निर्माण करण्याचा आपण प्रयत्न करीत असतों तेव्हां आपल्यापेक्षां अद्ययावत् अशा समाजाची माहिती असल्यानें जे अनुभव मिळतात ते फार उपयुक्त ठरतात.

पहिलें अगदीं निर्विवाद सत्य हें कीं, आधुनिक प्रात्यक्षिक विज्ञानाची इतकी प्रगति झाली आहे कीं सबंध जगाचें दैन्य आणि हलाखी दूर करून सर्वांना सुखी जीवन जगतां येईल एवढी भौतिक समृद्धि निर्माण करण्याचें सामर्थ्य त्यांत आहे. एका अत्यंत विश्वसनीय अमेरिकन मुत्सद्द्याचेच हे शब्द आहेत. हें कांहीं केवळ स्वप्नरंजन किंवा हवेंतले तर्क नाहींत. साध्या गणितानें सिद्ध करतां येईल असें हें सत्य आहे. पण ही शक्यता प्रत्यक्षांत उतरण्यासाठीं मात्र प्रथम एक अट अपरिहार्यपणें पूर्ण झाली पाहिजे : अत्यंत पद्धतशीरपणें सबंध जगाची

अशी एकच जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वांत आणली पाहिजे.

दुसरें सत्य पुढीलप्रमाणें. (आज ही गोष्ट कुणालाहि पटूं शकते, पण या शतकाच्या सुरुवातीस हा विचार म्हणजे एक शेखमहंमदी तर्कट वाटे.) जगाची अनेक स्वतंत्र सार्वभौम राज्यांत विभागणी झालेली असणें हें कांहीं औद्योगिक संस्कृतीच्या सांच्यांत बसत नाहीं. मानवी प्रगतीच्या मार्गांतली ती एक धोंड आहे आणि निरंतर पेचप्रसंग आणि विनाश ओढवणारें तें एक कारण आहे.

युरोपच्या धर्तीवर जगांत इतरहि राष्ट्रीय राज्यें निर्माण झालीं आणि त्या काळाला अनुरूप अशीच ही घटना होती. कारण अर्थव्यवस्थेचें स्वरूप फारच साधें आणि मर्यादित होतें. या राष्ट्रीय राज्यांमुळें अर्थव्यवस्थेला एक घाट आणि स्थिरता येत असे. पण आज तंत्रज्ञानानें इतकी मजल मारली आहे कीं, वरील राज्यें आणि अर्थव्यवस्था हीं आतां मागासलेपणाचीं लक्षणें वाटतात. त्यांच्या-सारख्या तकलादू पायावर 'आज'चा अवाढव्य इमला उभा राहूं शकणार नाहीं. या परिस्थितीमुळें त्यांच्या सार्वभौमत्वाच्या पारंपरिक कल्पना कोलमडूं लागतात. हीं राज्यें आजच्या परिस्थितींत आपली अर्थव्यवस्था, आपलें चलन, आपलें राजकीय जीवन सुस्थिर करूं शकत नाहींत किंवा प्रजेचें जीवनमानहि म्हणण्याइतकें सुधारूं शकत नाहींत. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनीं जर त्यांच्यावर कुणीं आक्रमण केलें तर हीं राष्ट्रें स्वतःचा बचावसुद्धां करूं शकणार नाहींत. हीं राज्यें कायमचीं एक प्रकारच्या भीतींत, दुर्लंघ्य आर्थिक अडचणींच्या भोवऱ्यांत आणि गोंधळांत कसे-बसे दिवस कंठीत असतात. या राज्यांतलें वातावरण अराजकाला अत्यंत अनुकूल असें असतें आणि अशा राष्ट्रांमुळें जगालाहि आपला मार्ग स्पष्ट दिसत नाहीं. याचाच अर्थ असा कीं हीं राष्ट्रें जगांतला सगळा मेळ, सुस्थिरता, भविष्यकाळा-बद्दलचा विश्वास यांना खो घालतात आणि आधुनिक विज्ञानामुळें प्रचलित समाजांची जी प्रगति घडून येणें शक्य झालें आहे ती प्रगतीसुद्धां मर्यादित करतात.

तिसरी आणि शेवटची गोष्ट अशी कीं, आधुनिक अर्थव्यवस्थेचें क्षेत्र सतत वाढतें असावें लागतें. त्याशिवाय उत्पादनाची वाढ होत नाहीं आणि मजूर व व्यापार यांचें नीट संयोजन होऊं शकत नाहीं. त्यामुळें आपाततःच जगाच्या उत्पादनसामर्थ्यांत समतोल राखणारें एक जागतिक संघराज्य असें स्थापण्याच्या कल्पनेकडे जग खेचलें जाईल. त्यामुळें निश्चितपणें युद्धांचा आणि आर्थिक पेंचप्रसंगांचा धोका समूळ नाहींसा होईल. मानवी विज्ञानाची कार्यक्षमता प्रचंड प्रमाणावर राबवली जाईल आणि मानवावर उदंड समृद्धीचा वर्षाव होऊन त्याची दारिद्र्यांतून आणि युद्धाच्या भीतींतून कायमची मुक्तता होईल. अर्थात्

येथें आम्हांला खरीखुरी प्रभावी अशी आंतरराष्ट्रीय सत्ता अभिप्रेत आहे. घटकांवर आपल्या हुकमाचा अंमल चालविण्याचें सामर्थ्य या सत्तेंत असलें पाहिजे. नाहींतर लीग ऑफ नेशन्स किंवा सध्यांच्या यूनोप्रमाणें नुसतें अनेक राष्ट्रांचें एक मंडळ असून चालणार नाहीं.

इथपर्यंत जगांतील पहिल्या दर्जाच्या तज्ज्ञांचें आणि प्रचलित घडामोडींच्या अभ्यासकांचें एकमत आहे. पण त्यापासून कोण काय निष्कर्ष काढतील हा एक निव्वळ तर्काचा प्रश्न असून व्यवहाराच्या दृष्टीनें त्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण सबंध जगाचें एक राज्य ही कल्पनाच आपल्याला असंभाव्य वाटते. मग या जागतिक शासनाची रचना कशी असेल, तिचें कार्य कसें चालेल या बाबतींत आपण सुसंगत विचारसुद्धां करूं शकत नाहीं. आणि कदाचित् ही कल्पना नीट आकलन होत नसल्यामुळें, आपल्या हयातींत ती अस्तित्वांत येणार नाहीं याची खात्री असल्यामुळेंच आपण या मुद्द्यावर इतक्या शांतपणें चर्चा करीत असूं, किंवा भिन्न भिन्न मतप्रणालीचे लोक अशा सत्तेच्या आवश्यकतेचें प्रतिपादन करीत असतात तेव्हां त्यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेत असूं किंवा त्यांचे मुद्दे निदान तत्त्वतः तरी मान्य करीत असूं. जर ही कल्पना खरोखरच सत्य स्वरूपांत साकार होण्याची शक्यता असती तर आपल्या चर्चेंत एवढी एकवाक्यता आणि इतका मनःसंयम आढळला नसता.

मध्यंतरींच्या काळांत जागतिक उत्क्रांतीनें आपण चर्चा करीत असलेल्या या दोन बलाढ्य शक्तींना जन्म दिला आहे. अजून जागतिकतेच्या आदर्शाच्या दृष्टीनें हीं दोन राज्यें खूपच तोकडीं असलीं तरी परंपरागत चालत आलेल्या राष्ट्रीय राज्यांचा आकार आणि सामर्थ्य यांच्या मर्यादा त्यांनीं कधींच ओलांडल्या आहेत. या दोन अवस्थांच्या मध्यें या सत्तांचा एक तिसरा प्रकार निर्माण झाला आहे, त्याला आपण खंडराज्यें म्हणूं शकूं. हें नांव देण्याचें कारण असें कीं, युरोपांतील नेहमींच्या राष्ट्रराज्यांपेक्षां या सत्तांचा व्याप, विस्तार आणि विविधता किती तरी मोठी आहे. युरोपांतलीं अनेक राष्ट्र-राज्यें या एकेका देशांत सामावूं शकतील. या दोन्ही सत्तांचा व्याप आणि प्रभाव खंडप्राय आहे. योगायोगानें अणुशक्तीचा शोध लावण्याच्या सुमारासच या सत्तांची झालेली ही अमर्याद वाढ ही कदाचित् इतिहासाचें नवें पर्व सुरू करणारी घटना ठरेल. राष्ट्रीय राज्यांना मागें टाकून खंड-राज्यांचें उद्घाटन करणारें हें नवें पर्व असेल.

या दृष्टिकोणांतून पाहिलें म्हणजे रोमन साम्राज्याच्या अस्तानंतरच्या सुधारलेल्या जगाच्या इतिहासाला एक नवें महत्त्व प्राप्त होतें. तेव्हांपासून समाज हळूहळू

उत्क्रान्त होत आला आहे असें भासतें. सुरुवातीला ही उत्क्रांति अगदींच मंद गतीनें चालली होती. पण जस जसा आपला अलीकडचा काळ येऊं लागला तसतसा हा वेग झपाट्यानें वाढला आणि जग एका मोठ्या एकतेच्या रोखानें धावूं लागलें. सरंजामशाही ही या उत्क्रांतीची पहिली अवस्था, राष्ट्रीय राज्यें ही दुसरी, खंडराज्यें ही तिसरी, आणि अजून स्पष्टसा आकार नसलेलें, जागतिक राज्य ही चौथी अवस्था. धुक्यानें वेढलेल्या जहाजावरील खलाशांप्रमाणें आतां आपण आपलें सध्यांचें स्थान निश्चित करूं शकूं. तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीनें तरी आज आपण अशा एका विशिष्ट टप्प्यावर उभे आहोंत कीं राष्ट्रराज्यांची पद्धत आतां रद्दींत काढायला झाली आहे. त्याच वेळीं आधुनिक इतिहासांतलीं पहिलीं दोन खरींखुरीं संघराज्यें—अमेरिका आणि रशिया—आतां आपल्या सबंध जगावर छाप पाडणाऱ्या तंत्रज्ञानाच्या जोरावर सुजाण झालीं आहेत. या दोन्ही देशांचें एकराष्ट्रीय राज्याहून विशाल स्वरूप हेंच त्यांच्या ऐक्याचें बीज आहे हा कांहीं केवळ योगायोग नव्हे. त्यांच्या तत्त्वप्रणालींतला मूलभूत फरक सोडून दिला तर जगांतील जास्तींत जास्त लोकसमूहांना शक्य तितक्या मोठ्या आर्थिक संघटनेंत एकत्र आणणें हेंच दोन्ही सत्तांचें ध्येय दिसतें.

अजून जागतिक संघराज्याचें चित्र आपण तितकेंसें स्पष्टपणें मनांत उभें करूं शकत नाहीं, पण सबंध जग कांहीं खंडराज्यांत मिळून विभागलें गेल्याचें दृश्य मात्र आपण कल्पनेनें पाहूं शकतों. या नव्या जगांत स्वतःला 'स्वतंत्र' म्हणविणारीं सध्यांसारखीं साठ-सत्तर इवलीं इवलीं राष्ट्रें अस्तित्वांत असणार नाहींत. ही अवस्थाहि अजून कांहींशी दूर असली तरी आपण तिच्यासंबंधीं कल्पना करूं शकतों. इंग्लिश भाषिकांचें एक संघराज्य, शेष युरोपचें दुसरें, स्थूलमानानें आजच्या रशियाच्याच सरहद्दीचें तिसरें आणि लॅटिन अमेरिकन देशांचें चौथें, आणि याच धर्तीवर राहिलेल्या जगाची विभागणी झाल्याची कल्पना मनांत उभी करणें फारसें अवघड नाहीं. पण खंडांच्या या नुसत्या पुनर्रचनेनें युद्ध किंवा जागतिक अर्थव्यवस्थेची स्थिरता हे दोन प्रश्न निश्चितपणें सुटतीलच असें नाहीं. जोंपर्यंत आपल्या सरहद्दींत इतरांना मज्जाव करूं शकणाऱ्या, आपापले खास असे प्रादेशिक हितसंबंध असलेल्या (इथें 'प्रदेश' या संज्ञेनें आजच्यापेक्षां खूपच मोठा प्रदेश निर्देशित होत असला तरीसुद्धां) एकाहून अधिक सार्वभौम सत्ता अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत त्यांची आर्थिक सुस्थिरता नेहमींच धोक्यांत राहणार आणि त्यांच्यांत नेहमींच तीव्र संघर्ष होत राहणार. आणि या खंडराज्यांच्या मानव व समाजविषयक मूलभूत दृष्टिकोणांतच जर विरोध असेल तर ही भीति अधिकच वाढते. पण तें

कांहींहि असलें तरी या खंडराज्यांच्या अवस्थेंतून जगाला जावेंच लागेल असें दिसतें. या स्थित्यंतरामुळें भावी काळांत मानवाला प्रगतीचें आणि समृद्धीचें अगदीं अनिर्बंध नसलें तरी आजच्याहून खूपच विशाल क्षेत्र खुलें होईल. जागतिक संघराज्यांच्या आड येतील असे बहुतेक सर्व अडथळे या खंडराज्यांमुळें नाहींसे होतील आणि १९ व्या व २० व्या शतकांतील औद्योगिक सुधारणांनीं जगापुढें निर्माण केलेल्या अनेक समस्या सोडविण्याच्या दृष्टीनें हें स्थित्यंतर उपकारक ठरेल. हिरोशिमांतील अणुस्फोटाच्या दुर्दैवी परंतु अर्थपूर्ण क्षणापासून, म्हणजे दुसरें महायुद्ध संपल्यापासून, जगांत अवतीर्ण झालेल्या या नव्या पर्वांतील हें मूलभूत सत्य होय. या नव्या सत्याशीं ज्या राष्ट्रांना आपला जीवनक्रम सिळता-जुळता ठेवतां येणार नाहीं तीं राष्ट्रें ऐतिहासिक अनुभव आणि परंपरा यांच्या दृष्टीनें कितीहि समृद्ध असलीं तरी त्यांना अनेक कठीण अडचणींना तोंड द्यावें लागेल.

* * *

प्रगति : ही संज्ञा मूलतःच सापेक्ष आहे आणि म्हणून तिच्यावर ज्यांचा विश्वास आहे आणि ज्यांचा नाहीं अशा दोन गटांत चर्चा घडवून आणतांना दोघांनाहि मान्य होतील असे मुद्दे सांपडविण्याचा प्रयत्न करणें जितकें अवघड तितकेंच निरर्थक असतें. त्या दोघांनाहि मूलतः तरी एकच गोष्ट अभिप्रेत असते कीं नाहीं याबद्दल मला शंका वाटते. प्रगतीबद्दल वस्तुस्थितीशीं न जुळणाऱ्या अशा भिन्न कल्पना भिन्न व्यक्तींच्या मनांत असणें सहज शक्य आहे.

निरनिराळ्या राष्ट्रांच्या स्वतंत्र होण्याच्या प्रवृत्तींतून एकोणिसाव्या शतकांतील ऐतिहासिक प्रगति चांगल्या रीतीनें दृग्गोचर होते यांत शंका नाहीं. हें स्वातंत्र्य शक्य तितकें निरंकुश आणि स्वयंपूर्ण व्हावें ही त्यांची इच्छा होती हें अगदीं अलीकडच्या काळांतील अनेक उदाहरणांवरून दिसून येतें. या आत्यंतिक दुराग्रहाचे दुष्परिणाम केवळ आर्थिक जीवनांतच नव्हे तर, अधिक प्रकर्षानें, बौद्धिक क्षेत्रांत दिसून आले. वास्तविक बौद्धिक प्रक्रिया या स्वभावतःच असल्या भौगोलिक बंधनांतून मुक्त असतात. आज आपल्याभोवतीं सर्वत्र अनेक दुराग्रही व माथेफिरू श्रद्धांचें पेंव फुटलें असलें तरी राष्ट्रांच्या आर्थिक क्षेत्रांतील परस्परावलंबित्वाची जाणीव असल्यामुळें निदान या बाबतींत तरी आपली विचारसरणी बदलली आहे. जिचे परिणाम यापेक्षांहि गंभीर होतील अशीहि एक गोष्ट आपण आतां जाणतों; ती ही कीं योग्य जागीं टाकलेल्या अवघ्या एका बॉंबनें कांहीं मिनिटांच्या अवधींत एक सबंध राज्य, तिथलें सरकार, तिथली युद्धयंत्रणा, संस्था, अंतर्गत संघटना, उद्योगधंदे, व्यापारी आणि सांस्कृतिक केंद्रें सर्व

कांहीं होतें कीं नव्हतें असें होऊन जाईल. या कांहीं परिणामांच्या जाणिवेनेंच आपल्या स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, स्वयंपूर्णता आणि तत्सम कल्पनांच्या परंपरागत श्रद्धांना हादरे बसतात आणि वरील शब्दांना आपल्या पूर्वजांच्या शब्दकोषांत जो अर्थ होता तो आतां शिल्लक राहात नाहीं. पूर्वींच पाहिल्याप्रमाणें तांत्रिक प्रगतीनें राष्ट्राच्या सीमा ओलांडल्या आहेत असा पुस्तकी निष्कर्ष आपण काढूं शकलों तरी तत्त्वप्रणालीच्या दृष्टीनें पाहतां आपण अजून हवेंतच लोंबकळत आहोंत. ज्या मूल्यांवर आपलें सार्वजनिक जीवन आधारित आहे तीं मूल्येंच पुन्हा एकदा पारखून घ्यायला हवींत असें वाटूं लागतें.

आपल्या बदलत्या काळाला अनुरूप अशी प्रगतीची व्याख्या करण्याचा मी प्रयत्न करतों : **व्यक्तिस्वातंत्र्याला मान देणारी आणि संघराज्यांतील जास्तींत जास्त लोकांचें जीवनमान क्रमशः शक्य तितकें उंचावण्याचा प्रयत्न करण्याची वृत्ति म्हणजे प्रगति.**

म्हणून पुढील तीन अटी प्रगतीसाठीं अपरिहार्य आहेत असें आपण म्हणूं शकतों :

(१) पाश्चात्य जगांतील राजकीय आणि सांस्कृतिक वारसा घेऊन येणारें व्यक्तिस्वातंत्र्य.

(२) राजकीय लोकशाहीला पूरक अशी आर्थिक लोकशाही.

(३) संघराज्याचा क्रमशः विशाल होत जाणारा आदर्श.

वरील पहिल्या दोन तत्त्वांचें नैतिक महत्त्व स्वयंसिद्धच आहे. आणि तिसऱ्या तत्त्वाच्या आवश्यकतेबद्दलहि कुणी शंका घेणार नाहीं, कारण अशा अधिकाधिक विशाल होत जाणाऱ्या शासनसंस्थेंतच आधुनिक तंत्रज्ञानाचा व मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या सुखसोयींचा अमर्याद विकास होऊं शकतो. या एकसंध विकासाला विरोध करणारी प्रत्येक शक्ति प्रतिक्रांतिकारक मानली पाहिजे, मग ती कोणत्याहि तत्त्वप्रणालीशीं संबद्ध असो. आपण यापुढें जाऊन असेंहि प्रतिपादन करण्यास हरकत नाहीं कीं, जेव्हां वरील तीन मूलभूत अटींपैकीं कोणतीहि एक अट जरी पूर्ण व्हायची राहिली तरी प्रगति अडखळूं लागते आणि म्हणूनच असें होणें जागतिक उत्क्रांतीच्या दृष्टीनेंहि धोक्याचें ठरतें.

* * *

सुमारें चारशें वर्षें टिकवून धरलेलें जगाचें अग्रेसरत्व युरोपनें चालू शतकांत गमावलेलें आहे आणि पुन्हा त्याला तें परत मिळेल अशीं चिन्हें दिसत नाहींत. या ऐतिहासिक क्षेत्रांत उतरलेल्या नव्या स्पर्धकांच्या बरोबरीचें स्थान तरी कसें

राखायचें हा प्रश्न युरोपला यापुढें टोचीत राहणार. दुसऱ्या महायुद्धांत जरी कितीहि मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला असला तरी अजून अफाट असें बौद्धिक आणि भौतिक भांडवल युरोपजवळ शिल्लक आहे. अमर्याद प्रगति करून दाखविण्याचें आणि जगावर प्रभाव पाडण्याचें सामर्थ्य युरोपमध्यें आहे. पण युरोपची स्थिति सध्यां एखाद्या रुग्णाइतासारखी झाली आहे. कांहीं अंतर्गत कारणांमुळें युरोपचा जोमच शिथिल झाला आहे.

'काळ बदलला आहे' आणि त्याप्रमाणें आपणहि आमूलाग्र बदललें पाहिजे, नव्या परिस्थितीला अनुरूप असा नवा व्यवसाय शोधला पाहिजे हें जसें कांहीं जुन्या खानदानी कुटुंबांना कळत नाहीं तसें युरोपचें झालें आहे. नव्या परिस्थितीशीं युरोप मिळतें घेऊं शकलेलें नाहीं आणि हेंच त्याचें मुख्य दुखणें आहे. असें मिळतें न घेण्यांत या खानदानी कुटुंबांचेंच अहित आहे. जग त्यांना तसेंच हलाखींत सोडून पुढें जाईल. अशा परिस्थितींत आपल्याकडे ढुंकूनहि न पाहणाऱ्या जगालाच तुच्छ लेखण्याचा आव आणण्यांत काय स्वारस्य आहे?

परिस्थिति अद्याप आटोक्याबाहेर गेली नसली तरी अनुमान बरोबर आहे. आपल्या राष्ट्राराष्ट्रांतले हेवेदावे आणि परस्परविरोधी हितसंबंध बाजूला ठेवून अत्यंत निकडीच्या अशा जागतिक स्वरूपाच्या गरजा समजून घेण्याचें सामर्थ्य युरोपमध्यें नाहीं. त्याला भूतकाळाशीं जखडून टाकणाऱ्या प्रभावांतून युरोप मुक्त होऊं शकत नाहीं. पूर्वीचें ऐश्वर्य, परंपरांचा दिमाख, त्यांची 'ऐतिहासिक कामगिरी'ची कल्पना, तेथील लोकांचे आपापसांतील भांडणतंटे, हे कधीं कधीं अपेक्षाभंग झालेल्या प्रेमिकांमधील शत्रुत्वासारखे, कधीं भांडकुदळ नातेवाइकांच्या भांडणासारखे, तर कधीं भेकड आणि संकुचित दृष्टीच्या प्रादेशिक कटकटींसारखे वाटतात. आजपर्यंत उराशीं कवटाळून धरलेल्या आणि त्याच्या अस्तित्वाचाच भाग बनून राहिलेल्या या भावनांचा त्याग करणें युरोपच्या जिवावर आलें आहे. हे संकुचित मनोगंड सोडून देऊन जिथें पॅरिस आणि बर्लिन, ब्रुसेल्स आणि व्हिएन्ना, स्टॉकहोम आणि माद्रिद, रोम आणि अथेन्स हे एका एकसंध राज्याचे अविभाज्य घटक बनलेले असतील अशा विशाल युरोपियन समाजाच्या कल्पनांचा युरोप स्वीकार करूं शकत नाहीं. ज्यांना युरोपची माहिती असेल ते त्याला या धरसोडपणाबद्दल, निश्चयाच्या अभावाबद्दल, गतकालांतील 'सुवर्ण युगांच्या' आठवणींनीं सद्गदित होण्याबद्दल माफ करतील. पण विसावें शतक मात्र झंझावाती वेगानें पुढें जात आहे. अजूनहि वेळ गेली नाहीं तोंपर्यंत युरोप हें ऐक्य घडवून आणण्याचा सुज्ञपणा दाखवूं शकेल का

... ग्रंथ संग्रहालय, ठा... स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ..................
...................... नों: दि: ..................

असा प्रश्न मनांत साहजिकच उभा राहतो. कारण त्यानें असें केलें नाहीं तर दुय्यम दर्जाच्या मांडलिक राष्ट्रांचा एक समुदाय एवढेंच त्याचें स्थान उरेल.

युरोप खंड राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या अशा मध्यम आकाराच्या (कारण त्यांपैकीं कोणतेंच राज्य 'मोठें' म्हणतां येणार नाहीं.) अनेक राज्यांत विभागलें गेल्यानें तेथें नेहमींच गोंधळ आणि अस्वस्थता माजलेली असते. त्यामुळें तिथें समाजाला किंवा सरकारला कधीं स्थिरता मिळूंच शकत नाहीं, व या राज्यांना भवितव्याबद्दल आशा बाळगतां येत नाहीं किंवा स्वतःचा असा उन्नतीचा एक विशिष्ट मार्ग निर्माण करतां येत नाहीं. त्यामुळें युरोपच्या वृत्तींतला जोम आणि धोरणांतला स्पष्टपणा नाहींसा झाला आहे. त्याच्या कल्पनांची चमक हरपली आहे.

युरोपच्या आजच्या पिढींत पूर्वींच्या लोकांइतकी सर्जनशीलता दिसून येत नाहीं गोष्ट दुर्दैवानें निर्विवादपणें सिद्ध झाली आहे. इब्सेन, वॅग्नर या प्रतिभाशाली कलावंतांसारख्या किंवा एकोणिसाव्या शतकांतील श्रेष्ठ कादंबरीकारांसारख्या स्वतःचें असें स्वतंत्र जग निर्माण करूं शकणाऱ्या असामान्य व्यक्ती अलीकडे युरोपनें निर्माण केलेल्या नाहींत. तिथें कांहीं चांगले आणि कल्पक लेखक आहेत, पण टॉलस्टॉय किंवा बाल्झाक यांच्यासारखें स्वतःचें जग निर्माण करण्याची त्यांची कुवत नाहीं.

केवळ साहित्यक्षेत्रांतच नव्हे, तर वैचारिक प्रगतीच्या आणि मुत्सद्देगिरीच्या प्रांतांतहि युरोपमध्यें असाच एक प्रकारचा स्तब्ध अंधार दाटला आहे. भव्य उदात्त स्वप्नें पाहण्याची आणि तशाच कलाकृती निर्माण करण्याची युरोपची शक्तीच नाहींशी झाली आहे. युरोपला 'विश्वव्यापी' दृष्टिकोण उरलेला नाहीं. हें ऱ्हासाचें चिन्ह आहे कीं केवळ भरतीपाठोपाठ अपरिहार्यपणें येणारी ओहोटी आहे? कुणास ठाऊक? तरीहि अविचल श्रद्धेचें एक वेदवाक्य मात्र मला येथें मुद्दाम नमूद करावेंसें वाटतें : माणसाच्या सुप्त शक्तींचा संपूर्ण आविष्कार व्हायला हवा असेल तर त्याच्यासमोर निरभ्र आशादायक भविष्यकाल असला पाहिजे. प्रचलित युरोपवरून—१९१४ सालची ती कृष्णसंध्या दाटेपर्यंत—पुनरुज्जीवनाचा चैतन्यसूर्य कधीं मावळलाच नव्हता. त्या वेळीं युरोपच्या वृत्तींत एक प्रकारची विशालता आणि सुखपूर्णता होती, आनंदीपणा होता, धडाडी आणि आत्मविश्वास यांतून उत्पन्न होणारी नवनिर्मितीची उमेद होती. "आपणच भविष्यकाळाचे स्वामी आहोंत" या जाणिवेंतच वरील सर्व गोष्टी अंतर्भूत असतात. "आम्ही भविष्यकाळासाठीं कष्ट करीत आहोंत, आमच्या

मुलाबाळांनीं खावें यासाठीं आम्ही पेरीत आहोंत, उद्यां ज्याचें चीज होईल असा त्याग आम्ही आज करीत आहोंत, आमच्या निर्मितीचा अर्थ आज कळला नाहीं तरी उद्यांच्या पिढीला तो उमगेल," असें युरोपमधील लोक आज छातीठोकपणें म्हणूं शकणार नाहींत. ज्या क्षणीं भविष्याच्या क्षितिजावर असा अंधार दाटूं लागला तेव्हांपासूनच युरोपमध्यें महान् व्यक्ती निर्माण होण्याचें थांबलें. त्याच्या अंतर्मनांतलें कोणतें तरी एक चैतन्य अस्त पावलें. भीति, निराशा, कटुता, अभावात्मकता, उथळपणा या आज युरोपच्या सांस्कृतिक जीवनांतील स्थायी भावना झाल्या आहेत.

पण तरीहि आपण आपल्या आशांची ज्योत विझूं देतां कामा नये. आज ही ज्योत कितीहि क्षीण झालेली असो किंवा तिचा प्रकाश कितीहि फिका पडलेला असो. आपल्या मर्यादा आपण जाणून असावें, पण तरीहि आपल्या सामर्थ्याचा पुरेपूर वापर करावा; आणि आपापल्या शक्त्यनुसार आपल्याभोंवतालीं वावरणाऱ्या लोकांच्या जाणिवाहि प्रकाशमान करण्याचा आपण नेहमीं प्रयत्न करावा. पाश्चात्य जगाच्या या अंतिम बिंदूवर, पॅसिफिक महासागराच्या अथांग शांततेच्या कांठाशीं उभें राहिलें असतां अमेरिकेच्या कितीतरी रम्य आठवणी मनःपटलावरून झरझर सरकूं लागतात आणि मग त्या क्षणीं मात्र मानवाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल आणि त्याच्या अभिजात चांगुलपणाबद्दल पूर्वी केव्हांहि वाटली नव्हती एवढी निःसीम आशा मनांत उमलूं लागते. अजूनहि युरोपला तारतां येईल, स्वतःचा उद्धार व्हावा अशी तळमळीची इच्छा युरोपच्या मनांत निर्माण होण्याचाच अवकाश. आपल्या विविध राष्ट्रराज्यांना वांचवतांनाच युरोप स्वतःहि मुक्त होऊं शकेल. नव्या, आवेशपूर्ण, समृद्ध, स्वतंत्र जीवनाला आवश्यक असणारी, नव्या युगाला साजेल अशी परिस्थिति आपल्या खंडप्राय ऐक्यांतच युरोपला गवसेल. तेथें पुन्हा एकदां भविष्यकाळाबद्दल आशा निर्माण होईल, आनंद आणि नवचैतन्य युरोपच्या नसानसांतून खेळूं लागेल. पुन्हा एकदां महान् व्यक्तींच्या जन्मानें युरोपची कूस धन्य होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८७७८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
क्रमांक ........ दि: ........
नों: दि: ........

REFBK-0009774

## विश्वसाहित्य

| | रु. न.पै. |
|---|---|
| धडधडतें काळीज | २–२५ |
| आरोपी | २–५० |
| एकटा | २–५० |
| अमेरिकन संस्कृति | २ |
| असा आहे रशिया | २ |
| ध्रुवाचा अस्त | ५ |
| मी विजयी आहें | २ |
| अखेरचा रामराम | २–५० |
| आशियांतील धर्मसंग्राम | १–५० |
| बेन फ्रँकलिन | १–५० |
| जॉर्ज वॉशिंग्टन | १–५० |
| अखेरचें पान | २–५० |
| सावट | २–५० |
| अब्राहम लिंकन | १–५० |
| स्वातंत्र्याचीं नवीं क्षितिजें | २ |
| हेलेन केलर : एक व्यक्तिरेखा | १–५० |
| बाळपणींचा काळ सुखाचा | २–५० |
| प्रेमळ घर | २–५० |
| स्वातंत्र्यवीर | २–५० |
| पांच भावांची गोष्ट | १–५० |
| स्वातंत्र्य आणि संस्कृति | २–५० |
| रॉकफेलर | २–५० |
| मार्क ट्वेन | २–५० |
| अमेरिका : एक प्रबंध | २–५० |
| विद्येचा बालेकिल्ला | २ |

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंः दिः ........

# अमेरिका : एक प्रबंध

**[ An Essay on America ]**

लेखक
**जॉर्ज थिओटोकास**

अनुवादक
**मधु अभ्यंकर**

REFBK-0009774

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गिरगांव, मुंबअी ४

**मूल्य अडीच रुपये**

विश्वसाहित्य : २४

Copyright, 1954
by George Theotokas
Athens, Greece

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक
वि. ग. परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर,
गोरेगांवकर चाळ क्रमांक २, मुंबई ४